
चांगुलपणाची

# चळवळ

दिवाळी २०२२

मूल्य : रु. २००/-



## कारागृह आणि कैद्यांचे जीवन

।। सर्वजन सुखाय
सर्वजन हिताय ।।

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
भारत सरकार का उद्यम

एक परिवार एक बैंक



# महासुपर

# गृह कर्ज

आकर्षक व्याजदर (रेपो रेटला संलग्न) 7.80%*

कमीत कमी ईएमआय

3 ईएमआय फ्री

परतफेड कालावधी 30 वर्षे

8010633633 नंबर वर मिस कॉल द्या | Follow us @mahabank


www.klehospital.org
KARNATAK LINGAYAT EDUCATION SOCIETY
Since 1916
Education • Healthcare • Research
KLES
DR. PRABHAKAR KORE HOSPITAL
&
MEDICAL RESEARCH CENTRE
NEHRU NAGAR, BELAGAVI-590010
KARNATAKA, INDIA
91-831-2473777
INCREDIBLE SUCCESS AND
INSPIRING ACHIEVEMENTS
SUCCESSFUL HEART TRANSPLANT SURGERY IN NORTH KARNATAKA & GOA
• Heart surgery department founded - 1997
• Total heart surgeries - Above 26,000
• Successful operations on new borns to 85 year olds
KLE Dr. Prabhakar Kore Charitable Hospital, Belagavi
KLE Ayurveda Hospital, Belagavi
KLE Centenary Charitable Hospital, Yallur Road
KLE Belgaum Cancer Hospital, Belagavi
KLE ICU, Chikodi
KLE Dr. Kamal Hospital, Ankola
KLE ICU, Gokak
(KLE) KAHER's JGMMMC Medical College & Hospital, Hubballi
PROPOSED BUILDING
PRABHAKAR KORE HOSPITAL
Specialties
General Medicine
Respiratory Medicine
E.N.T Cardiology & CVTS
General Surgery
OBG Gynaecology
Pediatrics
Medical Oncology
Neurology
24 HOURS EMERGENCY SERVICE
CALL 1099
Belagavi Zone Limit
Toll Free
CLINICAL STRENGTHS
15 Hospital Locations
4,000+ Healthcare Beds
1,400 Free Healthcare Beds
3,000 Professional Staff
970+ Doctors
Dr. Prabhakar Kore
Chairman, KLE Society, Belagavi
290 Institutions | 1,38,000+ Students | 18,000+ Faculty

चांगुलपणाची
# चळवळ
दिवाळी २०२२
मूल्य : २०० रु.



संकल्पना
**डॉ. ज्ञानेश्वर मुळे**

प्रकाशक
**डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन**

संपादिका
**सौ. शुभांगी नितीन मुळे**

संपादन सहाय्य
**सौ. नीना भेडसगांवकर**

मुखपृष्ठ
**श्री. अन्वर हुसेन**

कॅलिग्राफी
**श्री. प्रभाकर भोसले**

आतील चित्रे
**श्री. संजय बडवे**

मांडणी / सजावट / छपाई
**अमोघ आर्टस्,**
शनिवार पेठ, पुणे ३०.

अंकातील लेखकांनी मांडलेली लेखने, उद्धृते यांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## अ • नु • क्र • म • णि • का

| | | |
|---|---|---|
| **चांगुलपणाचा नवा प्रकाश** | डॉ. ज्ञानेश्वर मुळे | ४ |
| **संपादकीय...** | सौ. शुभांगी नितीन मुळे | ६ |
| **महाराष्ट्रातील कारागृहे बनली सुधारगृहे** | डॉ. भूषण कुमार उपाध्याय | १३ |
| **डॉ. मीरा बोरवणकर यांची मुलाखत** | मुलाखतकार : शुभांगी मुळे | २२ |
| **तुरुंगाच्या भिंती** | फिलीप भीमराव शिरसाठ | २६ |
| **सबब** | नरेश चरणसिंग राठोड | २६ |
| **जीवनाचा अर्थ** | प्रकाश तुळशीराम पंडित | २६ |
| **नवी आशा** | समीर लांडगे | २६ |
| **बंदीजनांसाठी विविध कल्याणकारी योजना** | डॉ. विठ्ठल जाधव (भा.पो.से.) | २७ |
| **कैद्यातला 'माणूस' जागवताना** | श्रीमती स्वाती साठे | ३२ |
| **'गजाआड' अण्णा भाऊ, कैदी नं. ११३** | श्री. विश्वास पाटील | ३६ |
| **अंदमानच्या छळछावणीचं झालं तीर्थक्षेत्र** | मंजिरी मराठे | ४० |
| **कहाणी 'कर्मयोग्या'च्या कारावासाची!** | पार्थ बावस्कर | ४८ |
| **कारागृहातील कैदी** | ॲड. असीम सरोदे | ५८ |
| **तुरुंगवास** | रेणुताई गावस्कर | ६२ |
| **कैद्याचं मन** | मनोज डी. पवार | ६६ |
| **नाते रक्ताचे संपले** | राजेंद्र मारोती उप्पलवार | ६६ |
| **गजाआडचे जीवन...** | मितेश घट्टे | ६८ |
| **दो आँखें बारह हाथ** | दीपा देशमुख | ७२ |
| **शिक्षेतून सुधारणेचा प्रवास** | डॉ. हेमंतकुमार पवार | ७८ |
| **दोष हा कुणाचा!** | प्रा. साधना झाडबुके | ८४ |

**कैदी पुनर्वसन आणि सामाजिक संस्था**... सौ. विद्या विठ्ठलराव जाधव ९०

**भोई प्रतिष्ठान, पुणे**........................... अभय नलगे ................ ९४

**युवक गुन्हेगारी आणि पुनर्वसन**........... चंद्रकांत शिंदे ............ १००

**व्यथा...** ...................................... सुप्रिया बडवे............. १०४

**हृदय परिवर्तन** ................................ सायली सत्यजीत वैद्य .... १०६

**प्ली बार्गेनिंग - प्रलंबित खटल्यातील बंदींसाठी एक संधी**.... ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे-काटकर......... ११०

**मनुष्य जन्म हाच जणू गुन्हा** ............... प्रशांत डोळे .............. ११३

**गजाआडची शेती** ............................ संजय फडतरे ............ ११४

**समता फाउंडेशन - मुंबई**.................. नीना भेडसगांवकर........ ११८

**कैद्यांमधला माणूस** ......................... शिवानी सप्रे.............. १२४

**मी पण माणूस आहे** ....................... प्रा. साधना झाडबुके...... १३०

**कारागृहातील महिलांची मुले**.............. श्रीमती सुरेखा साळे ...... १३६

**जन्मठेप**....................................... रवींद्र संतोष बनसोडे ..... १४०

**निःशब्द** ....................................... राहुल मारुती मोरे ......... १४०

**सायबरस्पेस व गुन्हेगारी**..................... ॲड. वैशाली भागवत .... १४२

**या परिस्थितीला जबाबदार कोण?** ........ विकास कदम ............ १४७

**रिमांड होम? छे छे बालगृह...** ............. प्रा. साधना झाडबुके...... १५०

**कारागृह पर्यटन : एक महत्त्वाकांक्षी योजना**............................ महादेव गायकवाड ...... १५४

**२०१९ पासून चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन व इतर अनेक सहयोगी संस्थांमार्फत केलेले सामाजिक कार्य** ...................... १५९



डॉ. ज्ञानेश्वर मुळे
संस्थापक व मार्गदर्शक
चांगुलपणाची वैश्विक चळवळ
सदस्य, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, दिल्ली
पूर्व सचिव व राजदूत

# चांगुलपणाचा नवा प्रकाश

**वाचकहो, रसिकहो, मनापासून स्वागत व दिवाळीच्या अनंत शुभेच्छा!**

दरवर्षी दिवाळी येते आणि दिवाळी जाते. आपण उत्साहाने दिवाळी साजरी करतो. गरीब-श्रीमंत, शहरी-ग्रामीण सर्वच नागरिकांना दिवाळीत एक वेगळाच हुरूप येतो. तिमिरातून प्रकाशाकडे नेणारा उत्सव म्हणून दिवाळीची प्रतीकात्मकता सकारात्मक मोजपट्टीवर सर्वोच्च आहे. एका अर्थाने दिवाळी हे अत्युच्च आनंदाचे पर्व आहे. दिवाळी शेकडो वर्षांपासून माणसाचा सामूहिक जीवन जगण्याचा उत्सव झाला आहे. इंडोनेशिया, फिजी, मलेशिया, सिंगापूर, मॉरिशस, त्रिनिनाद, टोबॅगो, श्रीलंका, नेपाळ इतकेच नव्हे तर अमेरिका, कॅनडा, इंग्लंड या देशातही उत्साहाने दिवाळी साजरी होते. न्यूयॉर्कमध्ये टाइम स्क्वेअर या जगप्रसिद्ध चौकात साजरी केली जाणारी दिवाळी मी तिथे कॉन्सुल जनरल असताना अतिभव्य कशी करता येईल ते पाहिले. थोडक्यात, भारतासह जगभर दिवाळीचा उत्सव हा 'प्रकाशपर्व' किंवा 'आनंदपर्व' म्हणून साजरा होतो.

दिवाळीच्या धार्मिक व आध्यात्मिक आयामांबरोबर महाराष्ट्रात दिवाळी अंकांच्या माध्यमातून दिवाळीला एक सांस्कृतिक व प्रबोधनाचा आयामसुद्धा आला आहे. माणसाला फक्त फटाके, आतिशबाजी, पूजा-अर्जा, दांडिया, रास गरबा, गोडधोड फराळ, चकल्या व कडाकण्या या पलीकडे बौद्धिक भूक तशीच दर्जेदार मनोरंजनाची भूक असते ती काही अंशी का होईना दिवाळी अंकातून भागते. सोशल मीडियाच्या अनियंत्रित व बेलगाम प्रचारानंतरही दिवाळी अंकांचे महत्त्व टिकून असणे मला महत्त्वाचे वाटते. सुधारणेच्या वाटेवर अग्रणी राहून समतेचा ध्वज फडकवणाऱ्या समाजसुधारक, तत्त्वचिंतक, संतमेळावा व आधुनिक पुरोगामी व लोकशाहीवर श्रद्धा वृद्धिंगत करणाऱ्या मराठी मूल्यांवरच्या विश्वासाचे हे प्रतीक आहे.

आजच्या काळात दिवाळे अंकाचे प्रयोजन काय? आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतो आहोत. स्वातंत्र्यपूर्वीचा काळ हा अज्ञानाचा, गरिबीचा, परकीय सत्तेचा, शोषणाचा, विषमतेचा काळ होता. पारतंत्र्य ही एक 'महा आपत्ती' होती. त्यासाठी भारतीयांनी संघर्ष केला. हा संघर्ष परकीयांविरुद्ध तर होताच पण स्वकीयांमधले अज्ञान, अंधश्रद्धा, विषमता, शोषण व गरिबी या विरुद्धचाही होता. या लढाईत राजकीय स्वातंत्र्यासाठी दादाभाई नौरोजी, टिळक, गांधी, नेताजी सुभाष यांनी त्याग केला तर सामाजिक, सांस्कृतिक स्वातंत्र्यासाठी महात्मा फुले, राजा राममोहन रॉय, शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, आगरकर इत्यादींनी सर्वस्व पणाला लावले. या शृंखलेत डॉ. आंबेडकर हे मुकुटमणी होते. एका बाजूला संविधानाचे निर्माण तर दुसरीकडे सर्वसामान्यांचे उत्थान अशी दुहेरी महत्त्वाची परिवर्तनाची धुरा त्यांनी सांभाळली.

निष्कर्ष असा की त्या काळातली आव्हाने त्या काळातील व्यक्तींनी समर्थपणे पेलली. प्रसंगी सावकरांसारखा तुरुंगवास, प्रसंगी भगतसिंहांसारखे बलिदान. आता प्रश्न असा आहे की आजच्या समयाची आव्हाने आणि आपत्ती कोणती आहे? आणि या परिस्थितीत कोणत्या प्रबोधनाची, सुधारणांची आणि परिवर्तनाची आवश्यकता आहे? की सगळे आलबेल आहे? नाही सगळे आलबेल नाही. याचे कारण साधे आहे. काळ कोणताही असो प्रत्येक काळाची आव्हाने असतात. आपला काळही त्यातून सुटलेला नाही. आणि आलबेल तर मुळीच नाही. फरक इतकाच की आज प्रत्येक स्थानीय (लोकल) हे जागतिक (ग्लोबल) शी जोडले गेले आहे. एका नव्या ग्लोकल जगात आपण वावरत आहोत. ॲमेझॉनमधल्या वृक्षतोडीचा परिणाम, आर्कटिक, अटलांटिकचे बर्फ वितळणे, बांगलादेशातील गरिबी, अमेरिकेतील सुबत्ता, चीनमधले व्हायरस, कॅनडातील खलिस्तानी, युक्रेन-रशिया युद्ध आणि इराणी स्त्रियांचे हिजाबविरुद्ध विद्रोह या सर्वांचा भारतातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, इतकेच काय दररोजच्या सर्वसामान्य जीवनावर प्रत्यक्ष परिणाम पडतात. म्हणूनच

प्रबोधनाची, सुधारणांची आणि परिवर्तनाची गरज जितकी स्वातंत्र्याआधी होती तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक आज आहे. शिवाय राजकीय घटना उलथापालथ आपले सर्वांचे लक्ष वेधून घेत असले तरी खरे काम सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात असते, कारण ते लोकशाहीत जनतेलाच करावे लागते. शेवटी जनताच सार्वभौम आहे. पण सामान्य जनतेने आपल्या कार्यप्रेरणा कुठून उचलायच्या? नेमक्या कोणत्या कामाला प्राथमिकता द्यायची? आजच्या या व्यापारीकरणाच्या जगात नेमक्या कोणत्या मूल्यांच्या आधारावर आजचा समाज आणि भविष्य घडवायचे?

मला वाटते दिवाळी अंकाचे निमित्त स्वमूल्यमापनाची, प्रबोधनाची आणि प्रकाशाच्या वाटा शोधण्याची उत्तम संधी आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने निरंतर विकासाची सतरा उद्दिष्टे (सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल्स) ठरवली आहेत. त्यात शून्य गरिबी, शून्य उपासमार, स्वास्थ्य, स्वच्छ पाणी, अक्षय ऊर्जा, स्त्रीपुरुष समानता अशी उद्दिष्टे आहेत. न्याय, शांती व सहकार्य अशी ही उद्दिष्टे आहेत. त्यांच्या कार्यवाहीचा भार मुख्यत: शासनावर असली तरी जनतेची जबाबदारी मोठी आहे. पण या सतरा उद्दिष्टांत उल्लेख नसलेल्या अनेक गोष्टींवर आपल्याला लक्ष द्यावे लागेल. सामाजिक सामंजस्य, राष्ट्रीय एकता, विषमता व शोषणाविरुद्ध संघर्ष, वंचितांची प्रगती, अशा गोष्टींना विसरून चालणार नाही. याशिवाय बेरोजगारी, महागाई, अनिश्चित शेती, स्थलांतरित मजूर, बालकामगार, स्त्रिया व बालकांचे ट्रॅफिकिंग, तृतीयपंथी, कैदी, वर्गीकृत जाती व जमातीची पिळवणूक कधीतरी थांबायला हवी.

इथेच चांगुलपणाच्या चळवळीची आवश्यकता येते. भारतात (खरे तर जगात) स्त्री, बालक, वंचित वर्ग, वयोवृद्ध, दिव्यांग व इतर अनेक घटकांवर काम करणाऱ्या संस्था व व्यक्ती आहेत. प्रत्यक्षात तळागाळाला जाऊन अशा वंचित वर्गासाठी काम करणाऱ्या संस्थांप्रमाणेच वैचारिक प्रबोधनाचे कामही परिवर्तनासाठी महत्त्वाचे आहे. देशाची सकारात्मकता, सर्जनशीलता व समावेशकता परिवर्तनातील संस्था व व्यक्तीच टिकवतात. अशा अभियानाला संविधानातील स्वातंत्र्य, समता व न्याय या अक्षय मूल्यांचा मजबूत आधार आहे. चांगुलपणाची चळवळ अशा प्रकारे उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्तींना, विचारांना व संस्थांना एक देशव्यापी मंचच उपलब्ध करून देते. आज २०० पेक्षा अधिक संस्था आणि देशभरचे शेकडो नागरिक या चांगुलपणात सामील / संलग्न आहेत.

या चळवळीच्या काही वर्षातच संस्थात्मक त्याचप्रमाणे वैचारिक प्रबोधनाचे अगणित कार्यक्रम घेतले आहेत. कोविड काळातील वैचारिक प्रबोधनचे पाचशेच्यावर वेबिनार आणि प्रत्यक्षात पीपीई किट्सपासून ग्लोवज व दवाखान्यातील खाटांपर्यंत अनेक गोष्टींचे ठोस काम चळवळीतील कार्यकर्त्यांनी केले. त्याची एक सूची या अंकात आहे. चांगुलपणाच्या आजीवन कार्याचा गौरव म्हणून दरवर्षी चांगुलपणाचा जीवनगौरव पुरस्कार ५ नोव्हेंबरला 'सकारात्मकता दिवस' साजरा करत दिला जातो. २०२१ साली हा पुरस्कार 'चिपको' चळवळीतील नेते चंडीप्रसाद भट (वय वर्षे ८८) यांना दिला गेला, तर २०२२चा जीवनगौरव पुरस्कार डॉ. प्रकाश व डॉ. मंदाकिनी आमटे यांना देण्यात येणार आहे. प्रकाशाची मशाल घेऊन दिशा दिग्दर्शन करणारे वाटाडे आहेत ते. अशा खऱ्या दिशा-दिग्दर्शकांना पुरस्कार देणे हा चळवळीचा गौरव आहे.

आता हा दिवाळी अंक आणि त्याचे हे तिसरे प्रकाशमय वर्ष. आपण सगळेच जगत राहू शक्य असेल तितके , बघतही राहू काय चाललंय ते. पण आपण केव्हा आपल्यातल्याच मागे राहिलेल्या नागरिकांच्यासाठी काही करणार? इतर काय करतात, करत नाहीत, किती वाईट आहेत, कसे भ्रष्ट आहेत याची चर्चा पुरे झाली ना! मी काय करणार? करू शकतो? समाजाने, देशाने मला खूप दिले. मी केव्हा समाजाला परत देणार? या प्रश्नांचे उत्तर देत सर्व विधायक चळवळींना जोडणारी एक माला म्हणजे 'चांगुलपणाची चळवळ'. मग या चळवळीच्या दिवाळी अंकाचे वैशिष्ट्य काय असले पाहिजे? समाजातल्या अशा घटकांवर प्रकाशझोत की जिथे दिवाळीचे काय प्रकाशच पोहोचला नाही. स्वातंत्र्याचा ज्यांना पत्ता नाही असे कितीतरी समूह आहेत. तृतीयपंथी, दिव्यांग जण, देहविक्रय करणाऱ्या महिला, भटके, स्थलांतरित मजूर व त्यांची कुटुंबे वगैरे.

आमचा दिवाळी अंक अशा वर्गांवर प्रकाशझोत टाकून त्यांचे जीवन सर्वांसमोर आणण्याचा प्रयत्न करत आहे. पहिल्या वर्षी सकारात्मकतेवर, दुसऱ्या वर्षी तृतीयपंथीयांवर व या वर्षीचा अंक कैद्यांच्या जीवनाचे अंतरंग उलगडून दाखवण्यासाठी वाहिलेला आहे. चळवळीच्या प्रबोधनाचे मुखपत्र म्हणजे हा अंक. तुरुंग व्यवस्थापन, कैद्यांचे अधिकार, त्यांचे पुनर्वसन अशा विविध विषयांवर या क्षेत्रातल्या विशेषज्ञांचे लेख अंकात आहेत. श्री. म. माट्यांचे कल्पनेतले उपेक्षितांचे अंतरंग हेच तर आहे. चला तर या कारागृहाच्या जगतात प्रवेश करू या, कैद्यांना जवळून बघू या आणि माणूस म्हणून आपलेच प्रतिबिंब त्यांच्यात बघू या –

मागच्या दोन अंकांप्रमाणे याही अंकासाठी संपादक शुभांगी नितीन मुळे यांचे परिश्रम व पाठपुरावा अंकाला उत्कृष्टकडे घेऊन गेलेत.

मी संपादक, लेखक, प्रायोजक, चळवळीतील जवळचे व दूरदूरचे साथीदार व चांगुलपणाची पालखी वाहणाऱ्या प्रत्येकाला नमन करतो. अंकावरचे अन्वर हुसेन यांचे मुखपृष्ठ कमालीचे देखणे व समर्पक आहे. हरीशचे मुद्रण उत्कृष्ट असते, यावर्षीही आहे. सर्वांना शुभेच्छा!

ही दिवाळी सकारात्मकतेच्या नव्या दिशांनी वाचकांच्या जीवनात उजळो हीच अपेक्षा व प्रार्थना !



# संपादकीय...

***लक्षदीप हे उजळले घरी, दारी शोभली कणा रांगोळी,***
***फुलवाती अंगणात सोनसकाळी, आली दिवाळी आली दिवाळी!***

खरंच किती सुंदर असते ना ही दिवाळी, सगळीकडे तेजोमय देदीप्यमान वातावरण निर्माण करणारी अशी ही दिवाळी.

ही दिवाळी प्रत्येकाच्या अंतरंगात एक उत्साहाचा, आनंदाचा, आत्मविश्वासाचा दिवा पेटवते आणि आपल्या चांगुलपणाच्या चळवळीची हीच इच्छा आहे की प्रत्येकाच्या अंतरंगात एक उमेदीची, सकारात्मकतेची देदीप्यमान दिवाळी उमटावी.

दु:खी, कष्टी, उदास अशा आपल्याच बंधू-भगिनींना जर आपण ही दिव्यांची आनंदयात्रा घडवली तर? तर खरंच आपल्या जीवनात दररोज दिवाळी साजरी होईल.

जी मंडळी आपल्या घरापासून खूप लांब आहेत, ज्यांचं विश्व गजाआड बंदिस्त आहे, अशा बंदीवानांना जर आपण थोडी उभारी दिली, माणुसकीचा हात दिला, त्यांच्या पुनर्वसनाकरता मदत केली तर खरोखरी आपला प्रत्येक क्षण तेजोमय होईल. आपल्या आजूबाजूच्या सर्वांचं आयुष्य सुंदर आणि अर्थपूर्ण होईल हाच विचार घेऊन यंदाच्या वर्षाचा हा आगळा-वेगळा अंक घेऊन तुम्हा वाचकांच्या भेटीस येत आहोत.

परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'चांगुलपणाच्या चळवळी' अंतर्गत आम्ही मागील दोन वर्षं दिवाळी अंक प्रकाशित करून चांगुलपणाच्या चळवळीचे विचार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्याचा प्रयत्न केला. सर्जनशीलता, सकारात्मकता, सर्वसमावेशकता ह्या तीन तत्त्वांवर आधारित असलेली चांगुलपणाची चळवळ साहित्यातून सर्वत्र पोहोचवण्याचा प्रयत्न आहे आणि अशा ह्या समानता, माणुसकी, आपुलकी, जिव्हाळा प्रत्येकाबद्दल सद्भावना अशा विविध गुणांची झालर असलेल्या ह्या चांगुलपणाच्या चळवळीच्या दिवाळी अंकाची संपादिका म्हणून मला काम करण्याची संधी मिळत आहे हे मी माझं भाग्य समजते.

पहिल्या वर्षी म्हणजे २०२० साली आपण दिवाळी अंकाच्या माध्यमातून देशातल्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांचे विचार, त्यांचा जीवनप्रवास वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला होता. दुसऱ्या वर्षीचा म्हणजे २०२१चा दिवाळी अंक 'ट्रान्सजेंडर्स'ना समर्पित केला होता. ट्रान्सजेंडर्स व्यक्तींचे जीवन, त्यांचे विचार, आकांक्षा, त्यांच्या समाजाकडून व देशाकडून असणाऱ्या अपेक्षा, त्यांच्या समस्या व आव्हाने यांच्यावर प्रकाशझोत टाकणारा असा हा मागच्या वर्षीचा अंक होता.



आणि यंदाच्या म्हणजे २०२२च्या दिवाळी अंकाचा विषय आहे 'कारागृह आणि कैद्यांचं जीवन'. कारागृहाबद्दल लिहिणं, त्याबद्दलच्या भावना व्यक्त करणं खूपच कठीण आहे. कैद्यांच्या मनातल्या भावना, त्यांच्या विचारांचं काहूर ह्या गोष्टींचा आपण अंदाज घेऊ शकतो का? असे अनेक प्रश्न ह्या दिवाळी अंकाच्या कामाची सुरुवात करताना माझ्या मनात आले. परंतु गजाआडच्या व्यक्तींचं जीवन जाणून घेण्याची इच्छा दर्शवताच अनेक दारं आपोआप उघडली. अनेक चांगुलपणाचे हात मदतीस आले. यातली पहिली व्यक्ती म्हणजे सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठल जाधव. एका प्रसन्न सकाळी त्यांच्याबरोबर पहिली मीटिंग अरेंज केली ती उद्योजिका सुप्रिया बडवे ह्यांनी. त्यामुळे सौ. सुप्रिया बडवे यांचे मनापासून आभार. त्या पहिल्या चर्चा बैठकीतून अनेक गोष्टी उलगडल्या आणि ती रम्य सकाळ माझ्यासाठी खूप

प्रेरणादायी ठरली. डॉ. विठ्ठल जाधव व त्यांच्या पत्नी सौ. विद्या जाधव (शांतीदूत परिवाराच्या अध्यक्षा) ह्या दोघांनी अतिशय उत्तम मार्गदर्शन केलं. अनेक तुरुंग अधिकाऱ्यांशी त्यांच्यामुळे मला संवाद साधता आला आणि तुरुंग व्यवस्थापन, बंदीजन, गुन्हेगारी, समाज ह्या सगळ्यांचं एक वास्तव दर्शन, मानसिकता ह्याचा अभ्यास करण्याचा माझा प्रवास सुरू झाला.

एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला की त्या गुन्ह्याला माफी नाही हे जरी खरं असलं, तर गुन्ह्याची शिक्षा भोगल्यानंतर त्या व्यक्तीचं आयुष्य सुखकर होऊ शकतं जर समाजाने त्या व्यक्तीला साथ दिली तर! हे माझ्या लक्षात आलं.

आणि गजाआडचं जीवन जगणं, आपल्या स्वातंत्र्यावर मर्यादा येणं हीच खरं तरी खूप मोठी शिक्षा असते हे जाणवलं. महाराष्ट्र कारागृह विभागाचं ब्रीद वाक्य आहे, ‘सुधारणा आणि पुनर्वसन’ आणि त्यांच्या कार्याचा, त्यांच्या कैद्यांप्रती असलेल्या काळजीचा खूप अभिमान वाटतो. संपादक ह्या नात्याने विविध लोकांशी संवाद साधत असताना माझ्या असं लक्षात आलं की अनेक फाउंडेशन्स ह्या बंदीवानांच्या कल्याणाकरता झटत असतात. अनेक विषयांवरच्या कार्यशाळा, मेडिकल कँप कैद्यांकरता आयोजित केले जातात. कारागृह विभाग अतिशय संवेदनशीलता मनात बाळगून आपलं कार्य करत असतो. आणि गुन्हेगारामधला माणूस सतत जिवंत ठेवण्याचा प्रयत्न कारागृह विभाग व अनेक फाउंडेशन्स करत असतात. हे जेव्हा मी बघितलं तेव्हा मला असं वाटलं की चांगुलपणाच्या अनेक ज्योती प्रकाशवाटा निर्माण करताहेत. आणि माझ्या मनात सहज असा विचार आला की समाजातील प्रत्येक व्यक्तीने जर अशा पद्धतीने बंदीवानांच्या सुधारणेकरता, त्यांच्या पुनर्वसनाकरता मदत केली तर अनेक ज्योतींची सुंदर, आनंदमय, उज्ज्वल दिवाळी आपल्याला नेहमीच बघायला मिळेल आणि चांगुलपणाच्या चळवळीचा हाच संदेश आम्ही ह्या दिवाळी अंकाच्या निमित्ताने आपल्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत.

ह्या अंकाच्या निमित्ताने मला अनेक वरिष्ठ तुरुंग अधिकाऱ्यांचे विचार जाणून घेता आले. अनेक सामाजिक संस्था, ज्या बंदीवानांसाठी अनेक उपक्रम राबवतात, त्यांचं मत जाणून घेता आलं. अनेक विचारवंतांचा एक व्यापक दृष्टिकोन लक्षात आला आणि समाज परिवर्तनाचं महत्त्व किती आहे हे जाणवलं.

शिक्षा भोगून झालेल्या अनेक बंदीवानांशी संवाद साधल्यानंतर त्यांची मानसिकता लक्षात आली आणि जाणवलं की ती पण माणसंच आहेत. त्यांना पण आनंदाने जीवन जगण्याचा अधिकार आहे. त्यांच्यातल्या कौशल्याला वाव मिळाला पाहिजे. त्यांना उदरनिर्वाहाकरता काम मिळालं पाहिजे. अशा अनेक गोष्टींची जाणीव झाली. मध्यंतरी डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन आयोजित चांगुलपणाच्या चळवळीच्या अंतर्गत येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या महिला व पुरुष विभागात हास्य योग व त्याचा जीवनावर होणारा सकारात्मक परिणाम हा कार्यक्रम लोकमान्य हास्य योग संघाच्या साहाय्याने उत्साहात संपन्न झाला. त्यावेळेस मला अगदी जवळून बंद्यांच्या काही गोष्टी टिपता आल्या. त्यांना हवाहवासा वाटणारा मायेचा शब्द, काहीतरी क्रियाशील कार्य करण्याची इच्छा, त्यांची जनमानसात संवाद साधण्याची ओढ ह्या सगळ्या गोष्टी जाणवल्या. हास्य योगाच्या प्रात्यक्षिकांमुळे सर्व बंदी अगदी मनमोकळेपणाने हसले. निराशेचं, भकास, नकारात्मक वातावरण थोड्या वेळाकरता तरी बदललं, हे पाहून खूप समाधान वाटलं. आणि एक आशा वाटली की त्यांच्यात एक सकारात्मक बदल नक्कीच घडू शकतो. आणि आपल्या ‘कारागृह व कैद्यांचं जीवन’ ह्या दिवाळी अंकातील वैविध्यपूर्ण लेखांमधले विचार डोळ्यांसमोर आले. अर्थात ह्या विषयावर दिवाळी अंकाचं काम करत असताना

अनेकांचं बहुमोल सहकार्य लाभलं.

सर्वप्रथम डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची मी ऋणी आहे कारण त्यांनी मला याविषयी योग्य मार्गदर्शन केलं. स्वतंत्रपणे काम करण्याची संधी दिली आणि मुख्य म्हणजे माझ्यावर जो विश्वास त्यांनी दाखवला तो खूप मोलाचा आहे. लेखिका नीना भेडसगावकर यांनी शब्दांकन व संपादन साहाय्य करून मला खूप मोलाची साथ दिली. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध लेखिका दीपा देशमुख, दलितमित्र प्रा. साधना झाडबुके, सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी दरेकर, आय.पी.एस. उद्धव कांबळे यांचंदेखील बहुमोल सहकार्य लाभलं. हा अंक पूर्णत्वास नेण्याकरता येरवडा मध्यवर्ती कारागृहाचे मनापासून आभार. कारागृहाचे अनेक मान्यवर, सेवा निवृत्त अधिकारी ह्या सर्वांच्या सहकार्यामुळे अनेक गोष्टींची माहिती मिळाली.

कैद्यांची मानसिकता, त्यांची दिनचर्या, समाजातील वाढती गुन्हेगारी, पोलिसांचा दृष्टिकोन, वकिलांचा दृष्टिकोन, सामाजिक संस्थांची भूमिका अशा अनेक गोष्टींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न आपण ह्या दिवाळी अंकाच्या माध्यमातून केला आहे.

आपल्या ह्या दिवाळी अंकामध्ये वैविध्यपूर्ण लेख आहेत, कथा आहेत, कविता आहेत. काही लेख इंग्रजीमध्ये लिहिले होते आणि त्यांचा मराठी अनुवाद करून देण्यात संस्कृत व मराठी अभ्यासक सौ. सुचेता भूरे, तसंच सेवानिवृत्त अधिकारी श्री. अजय मुटाटकर व श्री. विजय हर्डीकर ह्यांचं मोलाचं सहकार्य लाभलं. त्याचप्रमाणे चांगुलपणाच्या चळवळीतील अनेक सदस्यांची खूप मोलाची मदत झाली.

माझे सासरे डॉ. जयंत मुळे, माझी आई सुषमा चिंचाळकर, माझे यजमान नितीन मुळे, माझा मुलगा अपूर्व मुळे या सर्वांची वेळोवेळी आवश्यक अशी साथ लाभली म्हणूनच मी ही जबाबदारी पेलू शकले. त्याचप्रमाणे कोल्हापूरचे श्री. राजेश पाटील, मुंबईचे श्री. अतुल आशर, नागपूरचे श्री. विकास रानडे, भोपाळचे श्री. अविनाश बनसोडे, ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशनचे श्री. अनिल नानीवडेकर, ब्राह्मी चौगुले, भोई फाउंडेशनचे डॉ. मिलिंद भोई या सर्वांची उत्तम साथ लाभली.

अमोघ आर्ट्सचे श्री. हरीश घाटपांडे यांनीदेखील सुसंवाद साधून उत्तम गोष्टी सुचवून हा दिवाळी अंक जास्तीत जास्त आकर्षक, सुशोभित, वाचनीय होईल यासाठी योग्य ते मार्गदर्शन केलं. मुद्रितशोधनाचे काम अतिशय उत्तमरीत्या श्री. अजित पेंडसे यांनी केलं. मुखपृष्ठाचं अतिशय समर्पक डिझाईन श्री. अन्वर हुसेन यांनी केलं. त्याचप्रमाणे लेखांसाठी योग्य अशी चित्रं श्री. संजय बडवे यांनी अतिशय तन्मयतेनी रेखाटली. श्री. प्रभाकर भोसले यांची कॅलीग्राफी वाखाणण्याजोगी आहे.

सर्व जाहिरातदारांनी आमच्या विनंतीला मान देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि त्यामुळे या वर्षीच्याही दिवाळी अंकाच्या निर्मितीचा प्रवास खूपच सुकर झाला, त्यामुळे सर्व जाहिरातदारांचे शतशः आभार. हितचिंतक, नातेवाईक, मित्र परिवार आणि वाचक सर्वांचे मनापासून आभार.

चला तर मग मंडळी, आपण सर्वजण चांगुलपणाच्या चळवळीत सामील होऊयात. सकारात्मकता, सर्जनशीलता, सर्वसमावेशकता जागृत करूयात. माणुसकीच्या अनेक दिव्य ज्योती पेटवूयात आणि तेजोमय, आनंदी, प्रफुल्लित दिवाळी प्रत्येकाच्या जीवनात निर्माण करूयात.

**शुभांगी नितीन मुळे**

**संपादिका**

भ्रमणध्वनी : ९८८१४३४४७३

दूरध्वनी : ०२०-२४५३२५१२

E-mail : mulayshubhangi@gmail.com

HAPPY
# Diwali

- Best wishes from -

# DR. D. Y. PATIL HOSPITAL
KADAMWADI, KOLHAPUR




PROVIDING QUALITY HEALTHCARE
TO SERVE THE HUMANITY

**Dr. D. Y. Patil**
Founder President,
D. Y. Patil Group, Kolhapur

**Dr. Sanjay D. Patil**
President,
D. Y. Patil Group, Kolhapur

**Shri. Satej D. Patil**
Vice-President,
D. Y. Patil Group, Kolhapur
MLC, Maharashtra

**Shri. Ruturaj S. Patil**
Trustee,
D. Y. Patil Group, Kolhapur
MLA, Kolhapur South

**Shri. Prithviraj S. Patil**
Trustee,
D. Y. Patil Group, Kolhapur



**एकनाथ संभाजी शिंदे**
मुख्य मंत्री
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२
19 SEP 2022

केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात कार्यरत असलेल्या 'चांगुलपणाची चळवळ' या उपक्रमाद्वारे 'कारागृहे आणि कैद्यांचे जीवन'या विषयावर यंदाचा दिवाळी अंक प्रकाशित करण्यात येणार आहे, हे वाचून अतिशय आनंद झाला.

प्रत्येक व्यक्तीमधील चांगुलपणा हेच संपूर्ण समाजाचे खरे बळ आहे. या चांगुलपणाला प्रोत्साहन देऊन समाजपरिवर्तनाचा एक उपक्रम म्हणून 'चांगुलपणाची चळवळ' संपूर्ण देशभरात राबविली जात आहे. परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या या चळवळीमध्ये समाजाच्या विकासासाठी विधायक काम करीत असलेल्या सुमारे २०० पेक्षा अधिक संस्था सहभागी झाल्या आहेत, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

समाजातील दुर्लक्षित घटकांवर प्रकाश टाकण्यासाठी 'चांगुलपणाची चळवळ' या उपक्रमाद्वारे गेल्या तीन वर्षापासून दिवाळी अंक प्रकाशित करण्यात येत आहे, हा अतिशय चांगला उपक्रम असून या दिवाळी अंकांना उदंड प्रतिसाद लाभला, त्याशिवाय दिवाळी अंकांचे विषय आणि त्यातील लेखन सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे असल्यानेच पहिल्याच अंकाला छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धेत स्व. सौ. कमलाबाई धारीवाल यांच्या नावाने विशेष पुरस्कार मिळाला, हे 'चांगुलपणाची चळवळ' जनमानसांत रुजते आहे, त्याचे उत्तम उदाहरण आहे, असे मी मानतो.


'चांगुलपणाची चळवळ' च्या यंदाच्या दिवाळी अंकातून तुरुंगातील कैदी, त्यांचे पुनर्वसन आणि व्यवस्थापनाविषयी व्यक्त होणारे विचार निश्चितच मार्गदर्शक ठरतील, असा मला विश्वास वाटतो.

'चांगुलपणाची चळवळ' या उपक्रमास आणि दिवाळी अंकाच्या प्रकाशनास मन:पूर्वक शुभेच्छा!

(एकनाथ शिंदे)
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

प्रति,
सौ. शुभांगी मुळे,
संपादिका
'चांगुलपणाची चळवळ' दिवाळी अंक
२०२/३, अथर्व प्लाझा, कावळा नाका,
ताराबाई पार्क, कोल्हापूर- ४१६ ००३

**दूरध्वनी :** ०२२-२२०२५१५१/२२०२५२२२, **फॅक्स :** ०२२-२२०२९२१४
**ई-मेल :** cm@maharashtra.gov.in, **वेब साईट :** www.maharashtra.gov.in




नितीन गडकरी
NITIN GADKARI

मंत्री
सड़क परिवहन एवं राजमार्ग
भारत सरकार
Minister
Road Transport and Highways
Government of India


जा.क्र. 7068/व्हीआयपी/परि/२०२२
दिनांक : 24 SEP 2022

## शुभेच्छा संदेश


भारताच्या परराष्ट्र खात्याचे निवृत्त सचिव, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य आणि आमचे मित्र डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या नेतृत्वात सुरू असलेल्या चांगुलपणाच्या चळवळीला आता देशभरात मान्यता मिळालेली आहे. या चळवळीद्वारे समाजसेवेचे अनेक उपक्रम राबविले जात असून, सुमारे २०० संस्थांचे विधायक सहकार्य या कामात मिळत आहे. गेली तीन वर्षे या चळवळीद्वारे दिवाळी अंक प्रकाशित करणे सुरू झाले आहे. ही अत्यंत आनंदाची बाब म्हटली पाहिजे. या दिवाळी अंकांना अनेक पुरस्कार मिळाले. यंदाचा अंक कारागृह आणि कैद्यांच्या जीवनाला वाहिलेला असल्याचे कळले. या कल्पनेसाठी मी चांगुलपणाच्या चळवळीशी जुळलेल्या प्रत्येकाचे अभिनंदन करतो.

कैद्यांकडे समाज फारशा आस्थेने पाहत नाही. मात्र, समाजातील काही दोषांमुळे गुन्हे घडतात, हे वास्तवही आपण लक्षात घेतले पाहिजे. कोणतीही व्यक्ती जन्मतः गुन्हेगार नसते. अनेकदा परिस्थितीजन्य बाबींमुळे वा मानसिक स्थितीमुळे एखाद्याच्या हातून गुन्हा घडतो. सराईत गुन्हेगार आणि परिस्थितीमुळे जिच्या हातून गुन्हा घडला अशी व्यक्ती यात फरक असतो. गुन्हेगार ठरल्यामुळे तुरुंगवास भोगणारी व्यक्ती कैदी म्हणून ओळखली जाते. त्यांच्या तुरुंगवासातील जीवनाकडे मानवाधिकाराच्या अंगानेही पाहिले गेले पाहिजे. आपल्या व्यवस्थेत त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी व पुनर्वसनासाठी अधिक काम करण्याची आवश्यकता आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे की, आपल्याकडे तुरुंगांच्या क्षमतेपेक्षा अधिक कैदी आहेत. त्यातही अंडरट्रायल कैद्यांची संख्या मोठी. या प्रश्नाची हाताळणी करण्यासाठी समाज, सरकारसह न्यायपालिका, पोलिस व प्रशासन या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांची गरज आहे. त्या अनुषंगाने यंदाच्या अंकात मंथन घडून येणार असल्यामुळे त्याचे सामाजिक मोल मोठे आहे.

या अंकातून या विषयाच्या संदर्भात भविष्यात जी पावले उचलणे गरजेचे आहे, त्याबाबत मार्गदर्शन मिळेल, अशी मला खात्री वाटते. मी या उपक्रमासाठी डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाऊंडेशन आणि चांगुलपणाची चळवळ चालवणारया सर्वांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

आपला,
( नितीन गडकरी )


Room No. 501, Transport Bhawan, 1, Sansad Marg, New Delhi – 110 001, Tel.: 011-23710121, 23711252 (O), 23719023 (F)
E-mail: nitin.gadkari@nic.in; website-www.morth.nic.in
Camp Office Nagpur : Plot No. 25, Opp. Orange City Hospital, Beside Jupiter School, Khamla Chowk, Nagpur-440015(MS)
Tel.: 0712-2239918/20/22/23/24 Email : office@nitingadkari.net


SAHELI ®
FESTIVAL
OF FASHION
Your One-stop Diwali Destination
SALWAR KAMEEZ
KURTIS & LEGGINGS | JEANS & TOPS
I DRESS MATERIALS | GHAGRA CHOLIS
GOWNS I PALAZZO SETS | LINGERIES I NIGHT WEAR
Opp. Commonwealth Building, City Jewel Basement, Laxmi Road, Pune 30. Tel.: 24452575, 8087074342

# महाराष्ट्रातील कारागृहे बनली सुधारगृहे

**डॉ. भूषण कुमार उपाध्याय**
**पोलीस महासंचालक व महासमादेशक गृहरक्षक दल महाराष्ट्र**

**कारागृह प्रशासनाने मला सतत कामात एवढे व्यस्त ठेवले होते की, मला माझ्या घरी पत्र लिहायलासुद्धा वेळ मिळायचा नाही. कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या जेव्हा लक्षात आले की हा चित्रकार आहे, हा सध्या जरा जास्तच निराश आहे, याच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये याचा वेळ जावा तेव्हा त्यांनी मला चित्र काढण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यानुसार चित्रकलेचे साहित्य उपलब्ध करून दिले व महाराष्ट्रातील अनेक कारागृहांमध्ये पाठवून माझ्याकडून कारागृहाच्या भिंतींवर चित्रके काढून घेतली त्यामुळे मी कामात एवढा व्यस्त राहायचो की शिक्षेचा कालावधी कधी संपला कळलेच नाही.**

कारागृह विभागाचे ब्रीदवाक्य 'सुधारणा व पुनर्वसन' असे आहे. आपल्या न्यायव्यवस्थेमध्ये कारागृह विभाग महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. गुन्हेगारांनी गुन्हा केलेला असतो त्याबद्दल त्यांना शिक्षा झालेली असते. त्यामुळे ते कारागृहात बंदीवान म्हणून आलेले असताना त्यांच्यामध्ये सतत सुधारणा घडवून समाजात एक उत्तम नागरिक म्हणून कसे पाठवता येईल हे पाहणे, कारागृह विभागाचा मुख्य उद्देश आहे. यासाठी बंद्यांचे 'सुधारणा व पुनर्वसन' ह्या ब्रीदवाक्यानुसार प्रेरित होऊन महाराष्ट्र कारागृह विभाग वाटचाल करत आहे.

पूर्वी गुन्हेगारांना त्यांनी केलेल्या गुन्ह्याबाबत कठोर शिक्षा देण्यात येई, उदा. हात किंवा पाय तोडणे, डोळे काढणे, इ. प्रकारच्या शिक्षा, परंतु आता नवीन संकल्पनेनुसार गुन्हेगारांना क्रूर शिक्षा देण्याऐवजी त्यांना कारागृहात सुधारणा करून पुनर्वसनाच्या दृष्टीने समाजात एक चांगला नागरिक म्हणून जगण्यास शिकवणे व परत समाजात राहण्यायोग्य बनवणे त्यासाठी त्यांच्या कौशल्य विकासावर भर देण्यात येतो. आपल्या देशात साधारणतः ९०% कैदी हे रागाच्या भरात किंवा चुकीने गुन्हा करतात. ते सराईत गुन्हेगार नसतात. कारागृहात दाखल होणारे बंदी हे वेगवेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीतून आलेले असतात. तसेच गरिबी, शिक्षणाचा अभाव, दहशतवाद, नक्षलवादी इ. सर्व प्रकारचे गुन्हेगार कारागृहामध्ये बंदिस्त असतात. त्यामुळे कारागृहात त्यांच्यामध्ये आपापसात भांडणे, कारागृहातील अधिकारी / कर्मचाऱ्यांवर हल्ले, कारागृहातून पलायनाचे प्रयत्न करणे, कारागृहात निषिद्ध असणाऱ्या वस्तू कारागृहात वापरणे इ. प्रकारचे गुन्हे घडण्याची शक्यता असते, आम्ही नेहमी एक शेर सांगत असतो,

कुछ ऐसे भी मंजर हैं तारिख के पन्नों में।
लम्हों ने खता की, सदियों ने सजा पायी॥

बंदीवासात गुन्हेगाराच्या आजारी मनाला दुरुस्त करून त्याला समाजात एक चांगला नागरिक म्हणून जगण्यास सिद्ध करणे हा कारागृहाचा उद्देश आहे त्यामुळे कारागृह हे एक प्रकारे सुधारगृहच आहे. **त्यामुळे मा. शासनाच्या दिनांक १ डिसेंबर २०१५ च्या अधिसूचनेनुसार कारागृह विभागाचे नामकरण कारागृह व सुधारसेवा असे करण्यात आले आहे.** कारागृह व सुधारसेवा विभागामार्फत कारागृहातील बंद्यांकरिता, बंदी सतत कोणत्या ना कोणत्या सकारात्मक कामांमध्ये गुंतून राहावा व त्याचा कौशल्य विकास होत राहावा यासाठी सातत्याने विविध उपक्रम कारागृहात राबविण्यात येत असतात. समाजाच्या सुरक्षेसाठी हे खूप महत्त्वाचे आहे की, प्रत्येक व्यक्तीला सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे, त्याला आवश्यक साधनसामग्री मिळाली पाहिजे, आवश्यक त्या सोयी-सुविधा मिळायला हव्यात, त्याचे समुपदेशन करून त्याला समाजात राहण्यायोग्य नागरिक बनवले पाहिजे.

मी कारागृह विभागामध्ये विभाग प्रमुख असताना बंद्यांसाठी व कारागृह विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी





विविध प्रकारच्या नाविन्यपूर्ण योजना सुरू केल्या, त्याचा बंद्यांवर व कारागृह अधिकारी व कर्मचारी यांचेवर सकारात्मक परिणाम होऊन प्रशासन सुलभरीत्या चालविण्यास मदत झाली. कारागृहातील गुन्ह्यांचे प्रमाण कमी झाले.

**१) गळाभेट :**

कारागृहात येणाऱ्या बंदीजनांना कुटुंबापासून दूर राहावे लागते. त्यांच्या सुधारण्याच्या कार्यक्रमात त्यांची जवळीक जर कुटुंबाशी वाढली तर कारागृहाच्या सुधारणा व पुनर्वसन कार्यक्रमास बंदी अधिक प्रतिसाद देतात असे निदर्शनास आले आहे. अनेकदा न्यायाधीन बंदी म्हणून दाखल झालेल्या बंद्यांना शिक्षा लागल्यामुळे त्यांच्या नवजात मुलांना स्पर्शदेखील करता आलेला नसतो तर कधी जवळही घेता आलेले नसते. या सगळ्यांचा विचार करून कारागृह प्रशासनाने गळाभेट उपक्रमाची सुरुवात केली. या उपक्रमांतर्गत कारागृहातील सिद्धदोष बंदीवानांच्या १६ वर्षे वयापर्यंतच्या मुलांची प्रत्यक्ष गळाभेट करून देण्यात येते. **या उपक्रमास बंद्यांकडून अतिशय उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमादरम्यान बऱ्याच बंदीजनांनी कारागृह खात्याबाबत कृतज्ञता व्यक्त केली व कुटुंबाची व मुलांची भेट मिळाल्याबाबत समाधान व्यक्त केले. तसेच बंद्यांच्या नातेवाइकांनीसुद्धा विविध प्रसारमाध्यमांना आपल्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. काही बंद्यांच्या मुलांनी पहिल्यांदाच आपल्या वडिलांसोबत वाढदिवस साजरा केला तसेच काही मुलांनी पहिल्यांदाच आपल्या वडिलांना स्पर्श केला. जेव्हा ही मुले बंद्यांच्या अंगाखांद्यावर खेळली तेव्हा बंदी खूप भावनिक झाले व कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांना धन्यवाद देऊ लागले. तुमच्यात आम्ही देव पाहिला अशादेखील भावना काही बंद्यांनी व्यक्त केल्या व आता येथून पुढे कारागृहात व्यवस्थित राहून लवकर शिक्षा संपवून घरी जाणार व कामधंदा करून कष्टाने कमवून मुलाबाळांचे भविष्य घडविणार, असा निश्चय त्यांनी केला.**

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा येथील गळाभेट कार्यक्रमावेळी सर्वांचे लक्ष वेधून घेतले ते सोनार नावाच्या कैद्याच्या मुलीने. त्या मुलीचा नववा वाढदिवस होता आणि आज जो सोनार आडनावाचा बंदी होता तो गेल्या नऊ वर्षांपासून या कारागृहामध्ये शिक्षा भोगत आहे. आज त्याने आपल्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त एक केक तयार केला आणि तो केक त्याने मुलीला भरविला. सर्वच बंद्यांनी या मुलीला आशीर्वाद दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी जेव्हा निरोप द्यायची वेळ आली त्यावेळी सर्वांचेच मन सुन्न झाले. प्रत्येक बंदी आपल्या मुलांना पोटाशी कवटाळत होता. सोहळा पार पडल्याच्या नंतर प्रत्येक कैद्याच्या मनात आपण जो गुन्हा केला आहे त्याबद्दल पश्चात्ताप नक्कीच वाटला असेल.

काही बंदी तीन ते चार वर्षांनंतर आपल्या मुलांना पाहत होते, भेटत होते. याअगोदर बंदी त्यांच्या घरच्यांना फक्त मुलाखत कक्षातून काचेतून पाहू शकत होते, काही बंद्यांनी आपापल्या मुलांना खाऊ आपल्या हातांनी भरविला.

फिजी या ठिकाणी मी आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये महाराष्ट्र कारागृह विभागाच्या गळाभेट या उपक्रमाबाबत माहिती सादर केली असता गळाभेट उपक्रमास इतर देशांतील प्रतिनिधींनी प्रशंसा केली व उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.

**२) योगाभ्यास :**

कारागृहातील बंद्यांच्या योगाभ्यासाला चालना देण्यासाठी कारागृह प्रशासनाने योगाभ्यासाच्या परीक्षा शिक्षा झालेल्या बंद्यांसाठी आयोजित केल्या. या परीक्षेत चांगल्या गुणांनी पास होणाऱ्या बंदीवानांना प्रोत्साहन म्हणून शिक्षेत माफी देण्यात येत आहे.





**३) कम्युनिटी रेडिओ सेंटर (Radio) :**

बंदीजनांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळण्यासाठी कारागृहातील ध्वनिक्षेपक यंत्रणेचा उपयोग करून कम्युनिटी रेडिओ सेंटर सुरू करण्यात आले. या रेडिओ सेंटरमधले आर.जे. हे बंदीच असतात. विविध कलाकारांचे आयुष्य, सामाजिक प्रश्न, समुपदेशन, मान्यवरांच्या मुलाखती अशा विविध विषयांवर मनोरंजनात्मक कार्यक्रम बंदी कलावंत सादर करतात.





**४) टेलीमेडिसिन :**

सर्व कारागृहांत उपलब्ध वैद्यकीय सुविधा पुरेशा नसल्याने कारागृहातील बंदींना शासकीय रुग्णालयात पाठवावे लागते. शासकीय रुग्णालयात बंद्यांना पाठवताना पोलीस पथकाची उपलब्धता ही कायम भेडसावणारी समस्या कारागृह प्रशासनास राहिलेली आहे. पोलीस पथकाच्या कमतरतेमुळे त्यांना वैद्यकीय उपचार पुरविण्यात मर्यादा येतात. यासाठी प्रशासनाने टेलीमेडिसिन सुविधा सुरू करण्यात पुढाकार घेतला. यामुळे बंदीजनांना प्रत्यक्ष शासकीय रुग्णालयात न नेता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला आणि वैद्यकीय सुविधा कारागृहातच वेळोवेळी उपलब्ध होऊ लागली.



**५) कौशल्य विकास (Skill Development) :**

कारागृहात शिक्षा लागल्यानंतर बंद्यांना काम करणे सक्तीचे असते. यात सुतारकाम, विणकाम, लोहारकाम इत्यादी प्रकारची कामे शिकविण्यात येतात. अनेकदा उच्चशिक्षित बंद्यांना अशा कामांमध्ये रस नसतो याचा विचार करून मे. मिंडा प्रा. लि., मे. टेरगस प्रा. लि., मे. घाडगे पाटील प्रा. लि. इ. कंपन्यांच्या माध्यमातून कारागृहात जॉबवर्क, वायरिंग हारनेस, शुमेकिंग, दुचाकीचे सुटे भाग, एलईडी लाईट्स बनविण्याचे प्रशिक्षण आणि उत्पादन सुरू करण्यात आले. यामुळे बंद्यांना

परंपरागत औद्योगिक प्रशिक्षणाव्यतिरिक्त आधुनिक उद्योगाच्या प्रशिक्षणाची संधी उपलब्ध झाली.





६) **व्हिडिओ कॉलिंग सुविधा (स्मार्टफोनच्या साह्याने) :**

कारागृहातील अनेकजण आपल्या गावापासून आणि कुटुंबापासून दूरच्या कारागृहात बंदिस्त असतात. कुटुंबीयांना त्यांना भेटण्यासाठी एवढ्या लांब प्रवास किंवा वेळ व पैसे खर्च करून भेटावयास यावे लागते. एवढ्या लांब प्रत्येकाला येता येणे जमत नाही म्हणून कारागृहाच्या चांगल्या वर्तणुकीच्या बंद्यांना दूरध्वनी सुविधा देण्यात आली होती. त्याचा पुढे विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांच्या नातेवाइकांचे प्रत्यक्ष भेटल्याचे समाधान मिळावे यासाठी व्हिडिओ कॉलींगची सुविधा सुरू करण्यात आली. या सुविधेमुळे त्यांना आपल्या नातेवाइकांना प्रत्यक्ष भेटल्याचे समाधान मिळू लागले आणि




त्यांचा मनावरचा ताण मोठ्या प्रमाणावर कमी झाला.

७) **कारागृह उद्योग :**

(१) **मूर्तीकाम**

नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात बंद्यांमधील अंगभूत कौशल्याचा खुबीने उपयोग करण्यात आलेला आहे. कारागृहातील एका बंद्याला शाडूच्या मूर्ती तयार करता येतात असे प्रशासनास समजल्यानंतर प्रशासनाने आवश्यक सहकार्य करून मूर्तीकाम विभाग कारागृहात सुरू केला आहे. सदर बंद्याने इतर बंद्यांनाही मूर्ती तयार करण्याची कला शिकविली आहे.




(२) **पैठणी साडी**

हातमागावर रेशमी धाग्यांपासून पैठणी साडी तयार करण्याचे काम सुरू आहे. सदरच्या पैठणी साड्या वेगवेगळ्या रंगात नक्षीदार कलाकुसरीने विणल्या असून त्यामध्ये मोरबुट्टी, हंसबुट्टी, क्युरीबुट्टीचे नक्षीकाम करण्यात येते.



**(३) महालक्ष्मी प्रसाद**

महालक्ष्मी मंदिर कोल्हापूर येथे वाटप करण्यात येणाऱ्या प्रसादाचे लाडू तयार करण्याचे काम कोल्हापूर मध्यवर्ती कारागृहास देण्यात आले असून त्या कारागृहातील पुरुष व महिला बंद्यांकडून हे काम करून घेण्यात येत आहे. जवळपास १५० ते २०० बंदी या उपक्रमात काम करतात. अतिशय स्वच्छ आणि आरोग्यदायी वातावरणामध्ये या लाडूंचा प्रसाद तयार करण्यात येतो. दररोज जवळपास ३,००० लाडूंच्या प्रसादाचा महालक्ष्मी मंदिरात पुरवठा करण्यात येतो.



**(४) मे. घाडगे पाटील इंडस्ट्रीज**

कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह येथे मे. घाडगे पाटील इंडस्ट्रीज, शासकीय तंत्रनिकेतन व कारागृह प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने फाँड्री प्रकल्प कार्यान्वित आहे. या प्रकल्पांतर्गत ट्रॅक्टर्सचे मोठे सुटे भाग, ट्रकचे मोठे सुटे भाग, जहाजाचे सुटे भाग इत्यादी तयार करण्यात येतात.





**८) बंदी कलारजनी :**

महाराष्ट्र कारागृह विभागाच्या वतीने राज्यातील विविध कारागृहांतील बंदींकडून नागपूर येथे होणाऱ्या हिवाळी अधिवेशनादरम्यान बंदी-रजनी या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सन २०१५ पासून करण्यात येते आहे. 'बंदी कलारजनी'मध्ये आपली कला सादर करणाऱ्या बंद्यांना त्यांचे शिक्षेत विशेष माफी देण्यात येते.





**९) प्रेरणापथ :**

समाजातील विविध क्षेत्रांतील नामांकित व्यक्ती यांना सातत्याने कारागृहात बोलावून त्यांची व्याख्याने, मार्गदर्शन

बंद्यांना उपलब्ध करून दिले. यामध्ये तबलावादक पंडित जाकिर हुसैन, गायक शंकर महादेवन, ड्रम वादक शिवमणी, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोरकर, बाबासाहेब पुरंदरे, शास्त्रज्ञ विजय भटकर इत्यादी मान्यवरांचा समावेश होता. त्यामुळे बंद्यांचे मनपरिवर्तन व मनोधैर्य उंचावण्यासाठी मदत झाली.





**१०) कारागृह गुप्तवार्ता पथक :**

कारागृहामध्ये सुरक्षेच्या / भ्रष्टाचाराच्या प्रशासकीय व इतर अडचणी दूर करण्यासाठी कारागृह गुप्तवार्ता पथक (PIU) स्थापन करण्यात आलेले आहे. सदर पथकाचे कारागृहातील प्रत्येकी दोन कर्मचारी एक महिन्याच्या अंतराने बोलावून त्यांच्याकडून कारागृहासंबंधी अडी-अडचणी व गैरप्रकार याबाबत माहिती घेतली जाते. सदर माहितीच्या आधारे आवश्यक ती कार्यवाही केली.

**११) सिक्युरिटी ऑडिट :**

राज्यातील कारागृहांचे सुरक्षेच्या दृष्टीने सिक्युरिटी ऑडिट पोलीस विभागाच्या मार्फत घेतले जाते व सिक्युरिटी ऑडिटमधील त्रुटींबाबत पूर्ततेची कार्यवाही शासन / मुख्यालय / कारागृह स्तरावर चालू आहे.

**१२) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग :**

कारागृहातील बंद्यांना त्यांचेवरील खटल्याकरिता न्यायालयात हजर करावे लागते परंतु अपुऱ्या पोलीस पथकामुळे काही बंद्यांना त्यांच्यावरील खटल्यावेळी न्यायालयात हजर करणे शक्य होत नव्हते. त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील न्यायालये व कारागृहे यांच्या दरम्यान व्हिडिओ कॉन्फरन्सिंग सुविधा सुरू केली आहे. त्यामुळे बंद्यांना त्यांच्या खटल्यावेळी उपस्थित केल्यामुळे न्यायदान प्रक्रिया सुलभ व वेळेत पूर्ण होण्यास मदत होत आहे. याचा बंद्यांच्या मनावर खूप सकारात्मक परिणाम होतो. यासाठी व्हिडिओ कॉन्फरन्सिंग यंत्रणा खरेदी करून महाराष्ट्र राज्यातील कारागृहे व न्यायालये यांना पुरवठा करण्यात आला आहे. यामुळे दर महिन्याला संपूर्ण राज्यातून सरासरी ११ हजार बंदी न्यायालयासमोर व्ही. सी. द्वारे हजर करण्यात येतात. वर्षात जवळपास १.२५ लाख बंदी व्ही. सी. द्वारे हजर करण्यात येतात. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात बंदी कारागृहातून न्यायालयात नेण्यासाठीचा कोट्यवधी रुपयांचा शासनाचा खर्च वाचला, तसेच पोलीस मनुष्यबळ व वेळ वाचला. बंदी व्ही. सी. द्वारे न्यायालयासमोर हजर करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशात सातत्याने तीनही वर्षी प्रथम क्रमांकावर आहे.

| अ. क्र. | सन | व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर केलेल्या बंद्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | २०१५ | ६१,९६४ |
| २. | २०१६ | ७७,६२४ |
| ३. | २०१७ | १,११,७१३ |
| ४. | २०१८ | १,३७,०३५ |



**१३) CCTV :**

राज्यातील सर्व कारागृहांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने CCTV कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत व प्रत्येक कारागृहामध्ये CCTV कंट्रोल रूम तयार करण्यात आलेली आहे. या ठिकाणी २४ तास कर्मचारी CCTV च्या माध्यमातून कारागृहातील घटनांवर सनियंत्रण करत असतात. आतापर्यंत

एकूण १,६६८ CCTV कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.



**१४) NGOs :**

टाटा ट्रस्ट, अझिम प्रेमजी फिलॉंथ्रॉपिक इनिशिएटिव्ह, प्रयास, समता फाउंडेशन, इ. अशासकीय संस्थांसोबत सामंजस्य करार करून कारागृहातील गरजू बंद्यांना न्यायालयीन मदत, बंद्यांच्या मुलांना शैक्षणिक मदत, बंद्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत, कारागृहातून मुक्त झालेल्या बंद्यांना पुनर्वसनाच्या दृष्टीने तत्काळ मदत, बंद्यांसाठी आरोग्य शिबिरे, व्यवसाय प्रशिक्षण इ. उपक्रम सुरू केले.





**१५) शैक्षणिक उपक्रम :**

कारागृहातील बंद्यांना कारागृहात राहून पुढील शिक्षण घेता येण्यासाठी कारागृहांमध्ये केंद्र सुरू करण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सोबत सामंजस्य करार केला.

**१६) संगणकीकरण :**

महाराष्ट्र कारागृह विभागाने माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शन व मान्यतेने कारागृह विभागाकरिता संगणक प्रणाली PRISMS प्रणाली कार्यान्वित केली आहे. सदर प्रणाली प्रथम येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आली होती व सन २०१५ पासून महाराष्ट्रातील सर्व कारागृहांमध्ये यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

**१७) Operation nut-bolt tracking :**

सर्व कारागृहांमध्ये महिन्यातून दोनदा अचानकपणे रात्रीच्या वेळी Operation nut-bolt tracking घेऊन कारागृहातील बॅरकचे दरवाजे, खिडक्या, गज, टाळे इ. तपासणी केली. यामुळे कारागृहातून गज कापून, टाळे उघडून पलायनाच्या ज्या घटना पूर्वी घडायच्या त्यांच्यावर अंकुश बसला.

**१८) धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रम :**

कारागृहांमध्ये वेळोवेळी धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याकरिता विविध धर्मातील गुरू, मौलवी इत्यादींना कारागृहात बोलावून बंद्यांना धार्मिक प्रवचने, किर्तन, भजन यांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे बंद्यांच्या मनामध्ये सकारात्मकता येते. उदा. ज्ञानेश्वरी पारायण, योगगुरू रामदेवबाबा यांचे व्याख्यान इ. आयोजन करण्यात आले.





### १९) कारागृहांमध्ये बंद्यांसाठी सोई-सुविधांमध्ये वाढ :



बंद्यांच्या सोई-सुविधेमध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने राज्यातील सर्व कारागृहांमध्ये स्नानगृहे, शौचालये इत्यादींची संख्या वाढविली, तसेच कारागृहातील मुलाखत कक्षांचे आधुनिकीकरण केले. यामध्ये बंदी आपल्या नातेवाइकांना पाहू शकतील अशी पारदर्शी काच बसविण्यात आली. अधिकचे असणारे गज काढून टाकले. मुलाखत कक्षात डिजिटल क्लॉक, इंटरकॉम सुविधा बसविण्यात आल्या.



### २०) इंडीगो पेंट्स :

इंडीगो पेंट्स कंपनीच्या साह्याने कारागृहातील बंद्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी कारागृहातील सर्व भिंतींवर बंद्यांच्या मदतीने विविध सामाजिक विषयावरील चित्रे काढली आहेत व भिंती रंगवल्या. या उपक्रमामुळे बंद्यांमध्ये आपण ज्या ठिकाणी राहतो, वावरतो त्या ठिकाणी आपल्या हाताने चित्रे काढली आहेत. त्यामुळे सदरचा परिसर स्वच्छ ठेवावा अशी भावना निर्माण झाली व त्यांचेमध्ये सकारात्मक भावना निर्माण होण्यास मदत झाली.

### कारागृहातून सुटका झाल्यानंतर बंद्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया

### १) राहुल मोरे (पेंटर), वर्सोवा, मुंबई

मला बायकोच्या खुनाच्या आरोपामध्ये शिक्षा लागली होती. सुरुवातीला जेलमध्ये आल्यानंतर निराश वाटत होते. सतत आत्महत्या करण्याचे विचार मनात येत होते. माझ्यासमोर




काहीही भविष्य नव्हते, कारण एवढी मोठी २० वर्षांची शिक्षा कारागृहामध्ये कशी काढायची हाच प्रश्न सतत भेडसावयाचा. ज्यावेळी जामिनावर मी बाहेर होतो त्यावेळी घरच्यांच्या आग्रहास्तव दुसरे लग्न केले होते, दुसऱ्या पत्नीने मात्र कायम साथ दिली. मला कारागृहात सतत भेटण्यासाठी यायची, लहान मुलाच्या संगोपनाची जबाबदारी तिच्यावरच पडली होती.

मी कारागृहात आल्यावर पाहिले की, तिथे वाईट तसेच चांगले लोकही आहेत. हे आपल्यावर अवलंबून आहे की, आपण दोन्हींपैकी काय पर्याय निवडावयाचा आहे. आपल्याला विश्वास बसणार नाही. ज्या बॅरकमध्ये मला ठेवण्यात आले होते त्या बॅरकमध्ये वेळ जावा म्हणून मी चित्र काढत बसायचो, तर माझ्या आजूबाजूला कोणी बिड्या ओढत असायचे, कोणी तंबाखू खात बसलेले असायचे, कोणी कारागृह कर्मचाऱ्यांना चुकवून पत्ते खेळत बसलेले असायचे, पण माझे लक्ष कधीच त्यांच्याकडे जायचे नाही. जसे की माझे त्यांच्याशी काहीही देणे-घेणे नव्हते. माझे विश्व म्हणजे माझे चित्रकलेचे साहित्य व मी.

माझ्यामुळे माझ्या घरच्यांना खूप त्रास झाला. त्यांना पूर्ण अठरा वर्षे माझ्या पाठीमागे पळावे लागले. सतत कारागृहात मला भेटायला यावे लागले. कारागृहाच्या बाहेर तासन्‌तास वाट बघत बसावे लागले. सतत प्रवास करावे लागले. माझी आई सत्तर वर्षांची होती तरी ती येरवडा जेलसमोर मला भेटण्यासाठी तासन्‌तास वाट बघत बसायची आणि फक्त पंधरा मिनिटांच्या भेटीसाठी येवढा येण्या-जाण्याचा त्रास सहन करायची.

कारागृहात असताना मी जे पेंटिंग्ज केले त्याचे कारागृह प्रशासनाने बजाज आर्ट गॅलरी, नरिमन पॉईंट, मुंबई येथे व बालगंधर्व, पुणे येथे प्रदर्शन भरवले. माझी एक पेंटिंग एका जपानी नागरिकाने एक लाख रुपयांमध्ये विकत घेतली हे ऐकून मी खूप आनंदी झालो.

कारागृह प्रशासनाने मला सतत कामात एवढे व्यस्त ठेवले होते की, मला माझ्या घरी पत्र लिहायलासुद्धा वेळ भेटायचा नाही. कारागृह प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या जेव्हा लक्षात आले

की हा चित्रकार आहे, हा सध्या जरा जास्तच निराश आहे, याच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये याचा वेळ जावा तेव्हा त्यांनी मला चित्र काढण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यानुसार चित्रकलेचे साहित्य उपलब्ध करून दिले व महाराष्ट्रातील अनेक कारागृहांमध्ये पाठवून माझ्याकडून कारागृहाच्या भिंतींवर चित्रके काढून घेतली त्यामुळे मी कामात एवढा व्यस्त राहायचो की शिक्षेचा कालावधी कधी संपला कळलेच नाही.

### २) ज्ञानेश्वर विटकर (भाजी विक्रेता), मुंबई

जेलमध्ये एकेक मिनिट एकएक वर्षाप्रमाणे असतो. ज्यावेळी मी जामिनावर बाहेर आलो तेव्हा मला समजत होते मला शिक्षा लागणार आहे. त्यामुळे मी माझ्या मुलांपासून स्वत:च लांब लांब राहू लागलो. कारण त्यांचेशी जवळीक वाढली तर मला जेलमध्ये शिक्षा भोगताना जास्त त्रास होईल. त्यामुळे मी माझ्या घरच्यांपासून दूर राहून स्वत:ला सतत नशेत बुडवून घ्यायचो आणि नशेत माझ्या आजूबाजूच्या शेजाऱ्यांना व नातेवाइकांना त्रास द्यायचा. मी माझ्या नातेवाइकांना व शेजाऱ्यांना, मी एक खून केला म्हणून फाशी होणार असेल आणि दहा-वीस खून केले तरी फाशी होणार असेल तर मी दहा-वीस जणांना मारून जेलमध्ये जाईन अशा पद्धतीने घाबरवायचो.

कारागृहामध्ये मी न्यायाधीन बंदी विपश्यना शिकलो होतो परंतु माझी केस चालली असल्यामुळे मला नेहमी वाटायचे की मला फाशी किंवा आजन्म कारावास होईल त्यावेळी मी विपश्यनेला जाऊन आलो त्यानंतर मात्र मला असे वाटू लागले की, मी खून केलेलाच नाही तर मला शिक्षा होणारच नाही. त्यामुळे मी एकदम नि:संकोच झालो.

मी आता कधी कधी कारागृहात जाऊन तेथील बंद्यांना विपश्यना शिकवतो, जसे माझे जीवन विपश्यना करून बदलले तसे इतर बंद्यांचे जीवनदेखील बदलावे अशी माझी इच्छा आहे.

### कारागृह अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी योजना

कारागृह विभाग पोलीस विभागाप्रमाणेच गुन्हेगारी प्रशासनाच्या यंत्रणेचा एक भाग असून त्यांचा अत्यावश्यक सेवेत समावेश आहे. कारागृह विभागातील कर्मचाऱ्यांना पोलीस विभागाप्रमाणे कायदा, सुव्यवस्था व संरक्षणाच्या निगडित भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्यामुळे या दोन्ही दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सुविधेमध्ये समानता असणे आवश्यक होते. त्यासाठी पोलीस विभागातील अधिकारी /कर्मचारी यांना अनुज्ञेय असणारे लाभ कारागृह व सुधारसेवेतील गणवेषधारी अधिकारी / कर्मचारी यांना लागू करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी सक्षम असलेली मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे अध्यक्षतेखाली समिती दि.२६.०४.२०१६च्या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आली. सदर समितीस पोलीस दलास लागू असलेल्या सर्व सुविधा / लाभदायी योजनांचा अभ्यास करून त्या कारागृह व सुधारसेवेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू करण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आले. तसेच यापुढे पोलीस दलास लागू होणाऱ्या नवीन सुविधा / लाभदायी योजना कारागृह व सुधारसेवेतील गणवेषधारी अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबत सदर समितीच्या अभिप्रायासह सादर करणे आवश्यक राहील. त्यामुळे कारागृह व सुधारसेवेतील गणवेषधारी अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस बलाप्रमाणे नवीन सुविधा / लाभदायी योजना लागू करण्यात आल्या.

१) पोलीस विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेले कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ कारागृह व सुधारसेवेतील गणवेषधारी अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आला.
२) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांच्या धुलाई भत्त्याच्या दरात वाढ करण्यात आली.
३) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील कारागृह शिपाई ते सुभेदार संवर्गातील कर्मचाऱ्यांना गणवेष साहित्याऐवजी गणवेष भत्ता लागू करण्यात आला.
४) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकाऱ्यांच्या गणवेष भत्त्यात वाढ करण्यात आली.
५) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना साप्ताहिक सुटीच्या मोबदल्यात देण्यात येणाऱ्या दैनिक भत्त्याच्या दरात वाढ करण्यात आली.
६) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील विहित शारीरिक क्षमताधारक कारागृह शिपाई ते तुरुंग अधिकारी श्रेणी-१ अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी प्रोत्साहन भत्ता लागू करण्यात आला.
७) महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागातील प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षकांना प्रोत्साहन म्हणून ३०% प्रशिक्षण भत्ता सुरू करण्यात आला.

तर असे हे कारागृह व सुधारसेवा विभाग, जे सातत्याने बंद्यांच्या सुधारणेकरता व पुनर्वसनाकरता प्रयत्नशील असते.

चला तर मग मंडळी तुम्ही सर्वजण सकारात्मकतेने, संवेदनशीलता जपत, समाजाच्या उत्तम स्वास्थ्याकरता, सुटलेल्या बंद्याला द्या एक संधी सुधारण्याची, धरा कास माणुसकीची, भरा त्याच्या जीवनात आनंदाचे, सौख्याचे रंग!

# डॉ. मीरा बोरवणकर यांची मुलाखत

**मुलाखतकार : शुभांगी मुळे**

**डॉ. मीरा चड्ढा बोरवणकर (डायरेक्टर जनरल ऑफ पोलीस, निवृत्त) एक अतिशय कर्तव्यदक्ष, उत्तुंग व्यक्तिमत्त्व. आनंदी बालपण, आई-वडिलांचे उत्तम संस्कार लाभलेल्या, अभ्यासाबरोबरच खेळ व कला जोपासणाऱ्या अशा एक आदर्श महिला. शिक्षणाबरोबरच आपल्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष द्यावे व आयुष्याचा समतोल सुंदर रीतीने साधावा असा सल्ला देणाऱ्या डॉ. मीरा बोरवणकर...**

**अशा उत्तुंग व्यक्तीशी संवाद साधत असताना, त्यांनी राबवलेले अनेक उपक्रम, कैद्यांच्या जीवनाबद्दलचा त्यांचा अभ्यास ह्या सगळ्या गोष्टी उलगडत गेल्या. तर जाणून घेऊयात ह्याविषयी खालील मुलाखतीतून...**

**१) तुमच्या कार्यकर्तृत्वाच्या प्रवासात अनेक आव्हानात्मक प्रसंग आले असतील त्यापैकी काही तुम्ही शेअर करू शकाल का?**

मी महाराष्ट्रात पहिलीच महिला पोलीस अधीक्षक म्हणून रुजू झाले, हे मोठंच आव्हान माझ्यापुढे होतं. माझं पोस्टिंग औरंगाबादसारख्या अतिसंवेदनशील अशा सांप्रदायिक शहरामध्ये झालं. इथे एक लीडर म्हणून मान्यता मिळवणं आणि जनसामान्यांचा विश्वास संपादन करणं हे मोठंच आव्हान होतं, यासाठी काही वेळ जावा लागला. परंतु धाडसी निर्णय घेणाऱ्या निडर, प्रामाणिक, असलेल्या अधिकाऱ्याची नेहमीच प्रशंसा होते हेच खरं. औरंगाबाद शहरामध्ये काही कठोर परंतु पारदर्शी निर्णय घेतल्यानंतर मी माझ्या टीममधील पोलीस अधिकाऱ्यांचा आणि त्याचबरोबर जनसामान्यांचाही विश्वास संपादन करू शकले. तरीपण एका स्त्रीसाठी एका जिल्ह्याच्या पोलिसांचं नेतृत्व करणं हे मोठं आव्हान होतं. याशिवाय मला मुंबईमध्येसुद्धा संघटित गुन्हेगारी, छोट्या-मोठ्या टोळ्या यांचेवर अंकुश ठेवणं हीपण मोठी जोखीम होती, आव्हान होतं. आता काळ बदलला आहे. महाराष्ट्रात आणि देशामध्ये महिलांनी पोलीस खात्यामध्ये उच्चपदस्थ, लीडर म्हणून स्वतःला सिद्ध केलं आहे.

**२) तुमच्या सेवेतील विशेष कारकीर्द आम्हा सगळ्यांना समजून घेण्यास आवडेल.**

मी अतिशय नम्रपणे सांगू इच्छिते की काही गोष्टी पहिल्यांदाच करण्याची आव्हानात्मक संधी मला मिळाली. उदाहरणार्थ, पहिली महिला जिल्हा पोलीस अधीक्षक, पहिली महिला पोलीस आयुक्त, पहिली महिला गुन्हे शाखाप्रमुख,



पहिली महिला महाराष्ट्र कारागृह प्रमुख वगैरे वगैरे. याचबरोबर दोन फाशी जाणाऱ्या दहशतवाद्यांवर देखरेख करणारी अशी मी एकमेव महिला अधिकारी आहे.

या सर्व गोष्टी मी करत असताना त्यामध्ये आलेल्या यशाचं श्रेय माझ्याबरोबर असणारे पोलीस, तुरुंगाधिकारी यांनी दिलेला पाठिंबा, त्यांचं सहकार्य, आणि अर्थातच जनतेने दर्शविलेला विश्वास यामुळेच हे शक्य झालं हे मी इथे नम्रतापूर्वक नमूद करू इच्छिते. त्या सर्वांना माझा सलाम.

त्याचप्रमाणे जळगाव येथील सेक्स स्कॅण्डल शोधून काढणं आणि संबंधित गुन्हेगारांना अटक करण्याचं कामदेखील डॉ. मीरा बोरवणकर यांनी केलं. त्याचबरोबर मुंबई येथील संघटित गुन्हेगारी टोळ्या नियंत्रित करणं हेही त्यांच्या नावावर जमा आहे.



**३) मॅडम आपण राबवलेले उपक्रम कोणते?**

कुठल्याही उपक्रमामध्ये नागरिकांचा सक्रिय सहभाग असणं आवश्यक आहे यावर माझा ठाम विश्वास आहे. यासंदर्भात मी पुढाकार घेऊन राबवलेल्या सर्व उपक्रमांना नागरिकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला. मी पुणे इथे पोलीस आयुक्त असताना आम्ही 'पुणे पोलीस विद्यार्थी अभियान' या नावाने एक योजना सुरू केली होती. ही कॉलेज विद्यार्थ्यांसाठी एक नि:शुल्क अशी इंटर्नशिप होती. ती जवळच्या पोलीस स्टेशनशी जोडली गेली होती. या इंटर्नशिपचा अभ्यासक्रम आमचे अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री. संजय लाटकर यांनी तयार केला होता. पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन विभागाचे डॉक्टर सी. चितळे हे आमचे मार्गदर्शक होते. हे आमचं एक अत्यंत यशस्वी असं जनजागृती अभियान होतं असं म्हणता येईल.

मी सातारा येथे पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना ग्रामस्थांचं आणि पोलिसांचं मिळून असं एक ग्राम सुरक्षा दल स्थापन केलं होतं. ही योजना आम्ही अतिशय यशस्वीपणे राबवली. या योजनेमुळे हमरस्त्यावरील दरोडेखोरी आम्ही थांबवू शकलो. त्याचबरोबर अशा पद्धतीने वाटमारी करणारी आंतरराज्य दरोडेखोरांची टोळी आम्ही पकडू शकलो. ही दरोडेखोरांची टोळी बंगालमधील मालदा जिल्ह्यातून येथे आली होती. ही टोळी रात्रीच्या लक्झरी बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लुटत होती. विशेष म्हणजे गावातील तरुण मुलं पोलिसांबरोबर रात्रीची गस्त घालत असत. ही मुलं अतिशय सडपातळ अंगकाठीची, चपळ आणि उत्तम धावपटू अशी होती. त्यामुळे पोलिसांबरोबर त्यांनी या दरोडेखोरांचा पाठलाग करून त्यांना यशस्वीपणे पकडलं आणि परिणामतः त्यानंतर मात्र अशा प्रकारची दरोडेखोरी बंद झाली.

**४) कारागृहात कैद्यांना कशा पद्धतीने व्यस्त ठेवलं जातं?**

कैदी दोन प्रकारांमध्ये मोडतात. एक तर कोर्टाने दोषी ठरविलेले असतात आणि दुसरे अंडरट्रायल्समध्ये असतात. आपल्याकडे या दुसऱ्या प्रकारचे कैदी जवळजवळ ७० टक्के इतके असतात. या प्रकारातील कैदी साधारणतः जामीन मिळण्याच्या प्रतीक्षेत असतात. अशा कैद्यांना तुरुंगांमध्ये विशेष रस असत नाही. परंतु पहिल्या प्रकारातील कैदी मात्र तुरुंगामध्ये जास्त काळ घालवतात त्यामुळे त्यांना व्यस्त ठेवणं ही मोठीच जबाबदारी असते. यासाठी रोजची स्वच्छता, स्वयंपाक, यांसारख्या कामांमध्ये त्यांना व्यस्त ठेवलं जातं. तसंच काही कौशल्याची कामंही त्यांना त्यांच्या कुवतीनुसार, आवडीनुसार देऊन प्रोत्साहित केलं जातं.

मला इथे सांगायला आवडेल की तुरुंगामध्ये शिक्षा भोगत असताना यातील कैदी पदवीधर किंवा उच्च पदवीधर झालेले आहेत आणि त्यांची संख्या लक्षणीय आहे. तुरुंग प्रशासन अशा गोष्टींना प्रोत्साहन देतं आणि याचं श्रेयही तेथील प्रशासनाला मिळतं आणि हे विशेष मानलं जातं. मी अशा काही कैद्यांना पाहिलं आहे की जे ललित कला, काव्य, गायन यासारख्या कलागुणांची जोपासना करत आहेत. आम्ही अशा कैद्यांना प्रोत्साहन देत असतो. अशा कैद्यांचे कवितासंग्रह प्रकाशित करतो, त्यांनी रेखाटलेल्या चित्रांचं प्रदर्शन भरवतो, तसंच अशा कलाकृती बाजारामध्ये चांगल्या भावाने विकल्या जातात आणि आम्ही तसे प्रयत्नही करतो.

वर उल्लेख केलेल्या ७० टक्के अंडरट्रायल असलेल्या कैद्यांसंबंधी आपण समाजाने आवाज उठविला पाहिजे, आपलं मत नोंदविलं पाहिजे. शिक्षा न झालेले असे इतक्या प्रचंड प्रमाणात ठेवलेले कैदी अन्य कोणत्याही देशामध्ये आढळत नाहीत. अन्य देशांत ७० टक्के शिक्षा झालेले कैदी असतात आणि अन्य फारच थोडे असतात ज्यांच्यावर निर्णय व्हायचा असतो. या अंडरट्रायल कैद्यांबाबत संबंधितांनी लवकरात लवकर निर्णय घेऊन तुरुंगावरील अतिरिक्त भार कमी करणं तुरुंग व्यवस्थेसाठी अतिशय महत्त्वाचं आहे.

**५) बंदी बांधवांना तुम्ही काय संदेश देऊ इच्छिता?**

कैद्यांनी आपला तुरुंगातील वेळ सत्कारणी लावावा. हा वेळ त्यांनी आपलं स्वतःचं कसब, कौशल्य विकसित करण्यासाठी वापरावा. तुरुंग प्रशासन अशा कैद्यांना विविध कौशल्य प्रकार शिकवीत असतं. उदाहरण द्यायचं झालं, तर सुतारकाम, चर्मोद्योग, इलेक्ट्रिकल, टेक्स्टाईल, सतरंज्या बनवणं, प्लंबिंग, बेकिंग वगैरे वगैरे. अशा प्रकारे शिकलेली वैविध्यपूर्ण कौशल्याची कामं तुरुंगामध्ये तर उपयोगात येतातच आणि तुरुंगातून बाहेर पडल्यावरही आपल्या चरितार्थासाठी




उपयोगी पडतात.

तुरुंग प्रशासन हे कैद्यांच्या सुधारणा आणि पुनर्वसनासाठी झटत असतं. कैद्यांनी तुरुंगातील आपला वेळ वाचनासाठी खर्ची घालावा आणि तुरुंग साफ, नीट नेटके ठेवण्यासाठी संबंधितांना मदत करावी. तुरुंगातील कर्मचारी वर्ग हा अगोदरच प्रशासकीय आणि कायदेशीर कामांमध्ये पार बुडालेला आहे, त्यामुळे कैद्यांनी जर शांततामय वातावरण तुरुंगामध्ये ठेवल्यास याची चांगल्या प्रकारे मदत प्रशासनाला आणि कैद्यांना स्वतःलाही होऊ शकेल.

**६) कैद्यांच्या जीवनासंदर्भात तुम्ही समाजाला काय संदेश देऊ इच्छिता?**

'गुन्ह्याचा तिरस्कार करा पण गुन्हेगाराचा नाही' हे आपल्याला राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी सांगितलं आहे आणि ते सत्यही आहे. आपल्या देशाच्या नागरिकांनी, समाजाने या अशा कैद्यांच्या पुनर्वसनासाठी सक्रिय भाग घ्यायला हवा. या अशा कैद्यांच्या कुटुंबीयांची, विशेषतः लहान मुलांची जी सर्वतोपरी निरागस, निष्पाप असतात अशांची काळजी घेणं महत्त्वाचं आहे. या कैद्यांपैकी बरेचसे कैदी भावनेच्या भरामध्ये चुकीचं कृत्य करून बसतात आणि नंतर त्याचा त्यांना पश्चात्ताप होतो अशा पद्धतीचे काही कैदी आहेत. त्यांच्याकडे वेगळ्या पद्धतीने पाहणं गरजेचं आहे. परंतु सातत्याने गुन्हे करणारे म्हणजे उदाहरण द्यायचं झालं तर साखळी चोर, लुटारू, डाकू, घरफोड्या करणारे, तसेच संघटित गुन्हेगार, बलात्कारी, अशा पद्धतीचे गुन्हे करणारे असे गुन्हेगार हे इतरांपासून स्वतंत्र ठेवले पाहिजेत आणि त्यांच्यावर कडक नियंत्रण ठेवणं आवश्यक आहे.

**७) कारागृहांचा व्यवस्थापन कसं असावं?**

तुरुंगाचं व्यवस्थापन व्यावसायिक आणि पारदर्शी असायला हवं जे आपल्याला बहुतांश ठिकाणी दिसतं. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे तुरुंगातील अधिकाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण येत आहे. आम्हाला अजून तुरुंगातील अधिकारी आणि नवीन प्रोबेशनवर असणाऱ्या अधिकाऱ्यांची खूप गरज आहे. आपण त्यांच्या साधारण प्रशिक्षण आणि कामाशी निगडित प्रशिक्षणावर अजून जास्त भर दिला पाहिजे.

**८) आपल्याला कैद्यांच्या मानवाधिकारांची काळजी कशी घेता येईल?**

संपूर्ण देशातील तुरुंग विभाग हे मानवी अधिकाराचा सन्मानच करतात. तरीदेखील अधूनमधून मानवाधिकाराच्या उल्लंघनाचे प्रकार नोंदवले जातात. यासाठी आपल्याला आपल्या कर्मचाऱ्यांना संवेदनशील बनवलं पाहिजे आणि त्यासाठी अजून प्रशिक्षण वर्ग घेतले पाहिजेत. जर एखाद्या केसमध्ये असं मानवाधिकारांचं उल्लंघन होत असेल तर त्यावर त्वरित गांभीर्याने लक्ष घालून संबंधितांवर कारवाई होणं गरजेचं आहे. या संबंधात राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय आयोग नेहमीच सक्रिय असतात आणि वेळोवेळी तात्काळ अहवाल मागवून घेतात. बरेचदा अशा घटनांमध्ये सरकारला बळी गेलेल्यांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना नुकसानभरपाई द्यावी लागते.

**९) समाजामधली गुन्हेगारी प्रवृत्ती कशी कमी करता येईल?**

गुन्हेगारी नियंत्रित करायला कुटुंब व्यवस्था प्रथमस्थानी आहे. मजबूत मूल्याधिष्ठित कुटुंब आणि समाजव्यवस्था ही माणसाला समाधानी ठेवते आणि त्यामुळे गुन्हे मर्यादित होतात.

तरुण वर्ग अमली पदार्थाच्या विळख्यात सापडू नये याचीही काळजी घेणं गरजेचं आहे. म्हणूनच मी या सगळ्यांमध्ये कुटुंब हा अतिशय महत्त्वाचा भाग मानते. गुन्हेगारी, व्यसन, सोप्या मार्गाने पैसा कमावणं, त्यांचे दुरुपयोग यासंबंधीची चर्चासत्रं, मुलं शाळा-कॉलेजमध्ये असतानाच आयोजित केल्यास गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसू शकतो. याचप्रमाणे झालेल्या गुन्ह्यांचा लवकरात लवकर तपास होणं आणि तात्काळ शिक्षा ठोठावणं यामुळेही गुन्हेगारांमध्ये वचक बसू शकतो ज्यायोगे गुन्हेगारी कमी होऊ शकते.

**१०) प्रशासन आणि न्यायालयीन व्यवस्था यांच्यामध्ये कोणत्या सुधारणा आणल्या तर आपल्या देशामध्ये त्याचा फायदा गुन्हेगारी कमी करण्यासाठी आणि तुरुंगावरचं प्रेशर जे आहे ते कमी करण्यासाठी होऊ शकेल?**

सर्वप्रथम मी असं सांगू इच्छिते की सर्व समाजाचा न्याय प्रणालीमध्ये गांभीर्याने सहभाग हवा. हा सहभाग केवळ अतिशय खळबळजनकरीत्या प्रसिद्ध झालेल्या गुन्ह्यासंबंधीच नव्हे तर नेहमीच घडणाऱ्या सर्वसामान्य गुन्ह्याबाबतही असावा. अशा गुन्ह्यांची उकल लवकर होण्यासाठी आपल्याला निश्चितच अधिक पोलीस अधिकाऱ्यांची गरज आहे आणि विशेषतः हल्लीच्या वाढत्या सायबर गुन्ह्यासाठी तर विशेषत्वाने ही गरज जाणवते. पोलिसांनी दाखल केलेले खटले न्यायालयात यशस्वीपणे चालवण्यासाठी अधिकाधिक प्रशिक्षित वकील नेमले पाहिजेत आणि चाचण्या जलद होण्यासाठीदेखील याची मदतच होईल.

पोलीस, वकील, वैद्यकीय अधिकारी, न्यायालयीन अधिकारी, तुरुंगातील अधिकारी यांच्या नियमित आणि संयुक्त प्रशिक्षणाने या संदर्भात भरपूर मदत होईल.

**११) बहुसंख्य तुरुंगांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी ठेवलेले आहेत तर ही जी मोठी संख्या आहे ती कशी कमी करता येईल?**

तुरुंग नव्हे तर जामीन मिळणे हा भारतातील न्यायव्यवस्थेचा नियम आहे, तरीही पुष्कळ गरीब जनता तुरुंगामध्ये खितपत पडलेली आहे. याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे जामीन मिळवण्याची क्षमता नसते. हा प्रश्न भारताच्या अंतर्गत ग्रामीण भागामध्ये अतिशय गंभीर आहे. विशेषतः कमकुवत वर्गामध्ये हे प्रकर्षाने जाणवतं. अशा लोकांना सामाजिक संस्था, एनजीओकडून मोफत कायदेशीर मदत मिळाल्यास जामीन आणि त्यांचं पुनर्वसन करता आलं तर तुरुंगातील अतिरिक्त कैद्यांचा भार कमी होऊ शकेल. मला असंही वाटतं की शैक्षणिक संस्था जशी की सामाजिक महाविद्यालयं कायदे संस्था, विद्यापीठं यांनी तुरुंग आणि त्यांच्या अंतर्गत व्यवस्थेमध्ये अजून रस घ्यायला हवा. जेणेकरून विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव मिळेल आणि तुरुंगातील कैद्यांना कायदेशीर मदत मिळू शकेल. जामीन तसंच त्यांच्या तक्रारी योग्य रीतीने संबंधितांसमोर मांडता येतील. भारतातील तुरुंग व्यवस्थेमध्ये निश्चितपणे नागरी समाजाने आणि सतर्क नागरिकांनी नियमित लक्ष देण्याची फार गरज आहे.

**१२) एखाद्या कैद्याबद्दलची परिवर्तनानंतरची कहाणी तुम्ही इथे शेअर करू शकता का?**

पुण्याच्या मध्यवर्ती कारागृहात एक खुनाच्या प्रकरणातील दोषी होता. (त्याचं नाव गुप्त ठेवण्यात आलं आहे.) तो नेहमी केलेल्या गुन्ह्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करायचा आणि त्याला सुधारायचं होतं. रागाच्या भरात त्याच्या हातून एक खून झाला होता आणि त्याने आपला गुन्हा कबूलही केला होता. मला तो खूपच सुस्पष्ट वाटला. तरुणपणी तो चित्रं काढायचा. त्याने कारागृहामध्ये पाणी आणि रंग मिळण्यासाठी परवानगी घेतली. लवकरच तो वेगवेगळ्या माध्यमांतून सराव करीत राहिला आणि वर्षभरानंतर त्याचं कौशल्य सुधारलं. तो एक आनंदी माणूस झाला आणि इतर कैद्यांनादेखील त्याने चित्रकला शिकवली. त्याने चितारलेली चित्रं एवढी सुंदर असायची की आम्ही त्या चित्रांचं प्रदर्शन भरवलं त्याचप्रमाणे येरवडा कारागृहाच्या सभागृहामध्ये आम्ही ती चित्रं लावायला सुरुवात केली. त्याच्या चित्रकलेला खूपच सकारात्मक प्रतिसाद मिळाला. यातून त्याने चांगले पैसे कमावले आणि पुन्हा कधीही गुन्हा न करण्याच्या निर्धाराने तो कारागृहाच्या बाहेर गेला. जेव्हापासून त्याला चित्र काढण्याची परवानगी दिली तेव्हापासून मी त्याला नेहमी उत्साही आणि हसतमुख असाच पाहिला आहे. तो आमच्याशी खूपच चांगल्या प्रकारे, विनम्रपणे आणि आत्मविश्वासाने संवाद साधायचा.

आपण जर तुरुंगातील कैद्यांना कामात त्यांच्या आवडत्या विषयात व्यग्र ठेवू शकलो आणि त्यांचं ज्ञान, कौशल्य वाढवू शकलो तर ते शांत राहतात आणि त्यांना सांभाळणंदेखील खूप सोपं होऊन जातं. या आत्मसात केलेल्या कौशल्याचा उपयोग त्यांना सुटकेनंतरच्या आयुष्यातदेखील होतो. मी अत्यंत अभिमानाने सांगते की महाराष्ट्रातील तुरुंग अशी नवनवीन आणि विविध कौशल्यं कैद्यांमध्ये रुजवण्यात अतिशय सक्रिय आणि प्रगतिशील आहेत.

■

## तुरुंगाच्या भिंती

तुरुंगाच्या उत्तुंग भिंती
आमच्यासाठी अंगाई गाती
नीती नियमांचे स्तनपान त्या
रोज आम्हा करीती
संस्काराचा गोड घासही
मायेने भरविती
नम्रतेचा देऊनी बोध
क्षीण केला आमुचा क्रोध
समतेचा देऊनी मंत्र
शिकविले आम्हा माणुसकीचे तंत्र
नाही ही नुसतीच दगडी भिंत
रोगी मनाचे करिती शुद्ध चित्त

**फिलीप भीमराव शिरसाठ**
खुले जिल्हा कारागृह, पैठण
श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*

## जीवनाचा अर्थ

जीवनाचा अर्थ मला कारागृहात कळला...
सुखी, परिवाराचा आनंद, एका क्षणात मावळला...
कळली किंमत मला आता पैशाची
कळली किंमत मला आता अन्नाची
कळली किंमत आता जगण्याची
स्वार्थी नातेवाईक फायदा घेती, पैसा लुटण्याची
निष्पाप गुन्ह्याचा कलंक इनाम मला मिळालं
दुःख नाही मला शिक्षा झाल्याचं
दुःख नाही मला आयुष्य बरबाद झाल्याचं
दुःख आहे, मला आई-वडिलांचं...
त्यांना सुखी न ठेवल्याचं...
ऐकून घटना माझी, सारा गाव हळहळला...
कारागृहात आहेत वेगवेगळे सेक्शन
या सेक्शनमुळे मिळते आम्हास शिक्षण
शिक्षण घेतल्यामुळे झाले आमचे पुनर्वसन
म्हणून शासनाने नाव ठेवलं सुधारणा पुनर्वसन
प्रकाश पंडितला पाहताच वैरी मनात जळला
जीवनाचा अर्थ मला कारागृहात कळला

**प्रकाश तुळशीराम पंडित**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह
श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*



## सबब

मेंदीत हात रंगल्यावर
तुझं असं बोलणं बरं नाही
तसं तुझ्यानंतर आता
माझ्या जीवनाचंही काही खरं नाही
तुझ्या एका नकारात
आयुष्य उद्ध्वस्त करणारा सुरुंग आहे
आता मी एक कैदी अन्
उर्वरित आयुष्य तुरुंग आहे.
तुझ्या अंगावर आज
साडी लग्नाची नवी होती
नवं घर निवडलं म्हणून दुःख नाही
नाकारण्याची सबब मात्र
खरी हवी होती.

**नरेश चरणसिंग राठोड**
नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह
श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*

## नवी आशा

नवी आशा नवी स्वप्ने
पुढे भविष्य आहे.
आज अंधारात असलो तरी
डोळ्यात उद्याचा सूर्य आहे
आज रस्ता काट्यांचा परी
अवघड ही वाट आहे
दवबिंदूंनी सजलेल्या
बगीच्यात उद्याची पहाट आहे
नवी आशा नवी स्वप्ने
पुढील भविष्य आहे
आज अंधारात असलो तरी
डोळ्यात उद्याचा सूर्य आहे

**समीर लांडगे**
बंदी क्र. सी-१४५१, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह
श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*

# बंदीजनांसाठी विविध कल्याणकारी योजना

**डॉ. विठ्ठल जाधव (भा.पो.से.)**
**विशेष पोलीस महानिरीक्षक (से.नि.)**

सामाजिक स्वास्थ्यासाठी व सुरक्षिततेसाठी कारागृहे असणे ही सामाजिक गरज आहे. अनादि कालापासून बंदीवास, तुरुंग हे गुन्हेगारांसाठी व शत्रू पक्षातील व्यक्तींना समाजापासून अलिप्त ठेवण्यासाठी व राज्याच्या सुरक्षिततेसाठी वापरात आहेत.

महाराष्ट्र राज्यात जवळपास ६० कारागृहे असून त्यामध्ये काही खुली कारागृहे, महिला कारागृहे, बालसुधार सेवा केंद्र, (किशोर सुधारालय) व एक खुली वसाहत स्वतंत्रपूर, आटपाडी, जि. सांगली येथे अस्तित्वात आहे.

राज्यात सर्वसाधारणपणे ४०,००० च्या जवळपास कैदी विविध कारागृहात राहतात. कारागृह क्षमतेपेक्षा जास्त कैदी सध्या ठेवावे लागतात. कारागृहाची बंदी क्षमता वाढवणे, नवीन कारागृहांची स्थापना करणे याबाबत वेळोवेळी योग्य ती कार्यवाही करण्यात येत असते.

बंदीजनांमध्ये पोलिसांकडून तपासकामी अटक केलेल्या व नंतर मॅजिस्ट्रेट कस्टडीमध्ये पाठवलेल्या व्यक्ती ज्यांना अंडरट्रायल बंदीजन म्हटले जाते अशा व्यक्ती असतात.

**आपल्याला जर कोणाच्या वृत्तीचा, अहंकाराचा बळी बनवलं जातंय आणि हे कुठे तरी जाणवत आहे. तर मग आपल्यातली परिस्थिती बदलली पाहिजे. कायम भक्ष्य बनून जगणे योग्य नाही.**

**एक लक्षात घेतलं पाहिजे की जो सहन करायला लावतो आणि जो सहन करत राहतो, ते दोघेही तितकेच जबाबदार आहेत.**






त्याचप्रमाणे कायदेशीर न्याय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शिक्षा झालेले बंदी यांना कारागृहामध्ये ठेवले जाते.

समाजातील विविध स्तरांतील विविध व्यवसायातील अनेक बंदी विविध कारागृहांमध्ये पाहावयास मिळतात. शिक्षा झालेल्या बंदीजनांच्या कौशल्याचा, अनुभवाचा वापर करून त्यांना रोजगारासाठी संधी दिली जाते. त्याचप्रमाणे ज्यांची काम करण्याची इच्छा आहे त्यांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित करून त्यांनाही रोजगार दिला जातो.

मुक्तपणे विहार करणे हे आपल्याला जन्मत: मिळालेले स्वातंत्र्य असते. परंतु त्याची खरी किंमत दुर्दैवाने कारागृहात रवानगी झाल्यावर कळते!

सामाजिक सुरक्षेसाठी व स्वास्थ्यासाठी कारागृहाची संकल्पना ही अतिशय आवश्यक बाब आहे. बंदीच्या वर्तनात सुधारणा होऊन, शिक्षा भोगून झाल्यावर, तो जेव्हा समाजात परत येतो तेव्हा पुन्हा त्याच्या हातून गुन्हा घडू नये म्हणून त्याचे मानसिक व वैचारिक परिवर्तन घडवत, त्याच्यात सुधारणा करणे ही जबाबदारी कारागृह व सुधारसेवा विभागावर असते.

त्या दृष्टीने त्यांच्या शारीरिक आरोग्याबरोबरच मानसिक स्वास्थ्यासाठी व त्यांच्या वर्तणुकीत सुधारणा घडवून आणण्यासाठी शासकीय पातळीवर तसेच विविध सेवाभावी संस्थांच्या मदतीने राज्यात विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. त्यामध्ये विविध राष्ट्रपुरुषांची चरित्रे, विविध विचारवंतांची पुस्तके वाचनालयामध्ये उपलब्ध करून दिली जातात. त्याचप्रमाणे विविध क्षेत्रांतील मान्यवर तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनाचे कार्यक्रम ठेवले जातात. आध्यात्मिक मार्गदर्शन, मनोरंजन व विविध क्षेत्रांतील विचारवंत यांची मानसिक परिवर्तनासाठी व्याख्याने आयोजित केली जातात. त्याचप्रमाणे योग, ध्यान व वेगवेगळ्या खेळांची सोय केली जाते.

त्यांच्या शारीरिक स्वास्थ्यासाठी चांगल्या प्रकारचा समतोल आहार व आवश्यकतेनुसार विविध आजारांवर उपचाराची सोय करण्यात येते. वेळोवेळी शिबिरांचे आयोजन करून चांगल्या आरोग्याबद्दलही मार्गदर्शन केले जाते.

बऱ्याच वेळा बहुतेक बंदीजनांस कारागृहातील जीवन व्यवस्था व वातावरणाशी जुळवून घेणे कठीण जाते. मानसिक संतुलनावर परिणाम होऊन नैराश्य, पश्चात्ताप यामुळे दु:खी मन:स्थितीत बंदीजन राहतात. त्याचप्रमाणे कुटुंबाच्या समस्या व काळजीने ते सतत तणावात व चिंतेत दिवस काढतात. अशा वेळी त्यांना मानसिक आधाराची, मानसोपचार तज्ज्ञाच्या मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता असते. नियमाप्रमाणे जवळच्या नातेवाइकांच्या भेटीसाठी, काही विशेष कारणासाठी त्यांना ठरावीक कालावधीसाठी रजाही देण्यात येते. विशेषत: बंदीजनांच्या लहान मुलांसाठी 'गळाभेट' ही अतिशय नाविन्यपूर्ण कल्पना मा. उपाध्याय सर यांच्या पुढाकारातून राबवली जाते आहे. देशपातळीवर या उपक्रमाचे कौतुक झाले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात कारागृह विभागात बंदीजनांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी अनेक चांगले निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे सातत्याने बंदीजनांच्या शारीरिक-मानसिक आरोग्याबरोबरच त्यांच्या कल्याणासाठी व सुधारणांसाठी विविध उपाययोजना करण्यात येतात. त्या दृष्टीने

संपूर्ण देशात महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभाग अग्रेसर आहे. कारागृहातील बंदीजनांची शिस्त, त्यांच्या कल्याणासाठी व सुधारणेसाठी करण्यात येत असलेले विविध कार्यक्रमाचे आयोजन हे खूप अभिमानास्पद व कौतुकास्पद आहे. या बाबींचाही प्रभावी परिणाम बंदीजनांच्या मानसिकतेवर दिसून येतो व सुधारणेच्या अंतर्गत मार्गदर्शन, कौशल्य विकास व विविध सामाजिक संस्थांकडून त्यांचे पुनर्वसनासंदर्भात केलेल्या प्रयत्नांमुळे बंदीजन आपली शिक्षा भोगल्यानंतरचे आयुष्य कुटुंबासमवेत व समाजामध्ये चांगल्या प्रकारे जगू शकतात. तसेच त्यांचा वैयक्तिक अनुभव समाजातील इतर घटकांना गुन्हेगारीपासून परावृत्त करण्यासाठी उपयोगी ठरतो.

अनेक सेवाभावी संस्थांच्या मदतीने योगा, ध्यान, विपश्यनेचे आयोजन करण्यात येते. अनेक कारागृहांत बंदीजनांना प्रौढ शिक्षण, संगणक प्रशिक्षण दिले जाते. त्याचप्रमाणे मुक्त विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय करण्यात येते. कला, क्रीडा यांच्या माध्यमातून मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. उत्कृष्ट चित्रकार व मूर्तीकार यांनाही त्यांच्या कलेच्या प्रदर्शनासाठी योग्य ते व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात येते.

बंदीजनांसाठी कारागृहात मोटार दुरुस्ती, वॉशिंग सेंटर, लाँड्री, फर्निचर उत्पादन, कपडे, पादत्राणे बनवणे, तसेच विविध धार्मिक सण-उत्सवाच्या वेळी आकाशकंदील, राख्या, अगरबत्ती इत्यादी उत्पादनासाठी संधी दिली जाते. कुशल बंदीजनांना पेंटिंग, जरीकाम, कलाकुसरीच्या कामाची संधी दिली जाते. मंदिरातील प्रसाद तयार करण्याचे कामही बंदीजन करतात.

एकंदरीत विविध कारणांमुळे विविध गुन्ह्यांत शिक्षा झालेला समाजातील एक घटक असलेल्या या बंदी बांधवांचे कारागृहातील जीवन व वास्तव्य सुसह्य व्हावे, त्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहावे व अधिक महत्त्वाची बाब म्हणजे त्याच्या वर्तणुकीत सुधारणा व्हावी व समाजात गेल्यानंतरही त्यांचे समाजातील वर्तन चांगले राहावे, त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेसाठी त्यांचे पुनर्वसन व्हावे या दृष्टीने शासन व कारागृह विभाग सर्वोतोपरी कार्यरत असतातच, परंतु या विशेषांकाच्या माध्यमातून समाजातील विविध सामाजिक सेवा संस्था, उद्योग समूह व समाजातील इतर व्यक्तींनी बंदीजनांच्या पुनर्वसनासाठी त्याचप्रमाणे त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी आपले अमोल योगदान देऊन या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा ही अपेक्षा.

नुकतीच पुणे कारागृहात प्रायोगिक तत्त्वावर बँकेकडून बंदीजनांना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची अभिनव योजना राबवण्यात येत आहे.




अशा अनेक चांगल्या उपक्रमांचे आयोजन सामाजिक पातळीवर होणे अगत्याचे आहे.

खूप गोष्टी खाली खेचायला तयार असतात आपल्याला. आपल्या आजूबाजूला जे काही घडते तर तेवढेच नाही, आपल्या आत जे काही घडत असते ते आपल्या मन:स्थितीवर चांगला किंवा वाईट परिणाम करत असते. त्याला खूप गोष्टी कारणीभूत आहेत, त्या म्हणजे आपली एकंदर विचार करायची पद्धत किंवा मानसिक घडण, घरातील वातावरण आणि आजूबाजूचे वातावरण, भूतकाळातील आघात वगैरे.

आपल्यामुळे कोणाला त्रास होतोय, आपल्या वागण्याचा, बोलण्याचा, कृतीचा कोणावर प्रतिकूल परिणाम होतोय याचे गावीही नसते अशा व्यक्ती, आपल्यातील अंधार, नकारात्मक विचार-लहरी सहजपणे आजूबाजूला पसरवतात आणि आजूबाजूचे वातावरण गढूळ करतात. पण एक आहे, प्रत्येक वेळेस अशी व्यक्ती हे हेतूपूर्वक करते असे नाही. तिची मन:स्थिती त्या ठरावीक वेळेस काही कारणाने बिघडलेली असू शकते आणि तिला ते सगळे व्यक्त कसे करावे ते कळत नाही. मग ती अशी वागते, बोलते.

काही व्यक्तींना इतके आपल्या मनासारखे होण्याची सवय होऊन बसलेली असते की तसे नाही झाले की, ते अस्वस्थ होतात आणि विचित्र वागतात. काही वेळेस 'आय डोन्ट केअर' वृत्ती असते. मी असाच किंवा अशीच वागणार, मला त्याहून वेगळे काही जमणार नाही वागायला किंवा बोलायला. मग त्यात पैसा तरी असतो किंवा प्रचंड अहंकाराचा पिसारा फुललेला असतो.

मग अशा व्यक्ती एखादे छान वातावरण बेचव किंवा गढूळ करण्यात यशस्वी होतात. बऱ्याच वेळेस समोरची व्यक्ती आनंदात आहे, सुखाने जगते आहे, सारखी हसते, बोलते आहे हेदेखील त्यांना बघवत नाही.

पण ज्याच्यावर परिणाम होत असतो किंवा जी व्यक्ती आपल्यावर या सगळ्याचा परिणाम होऊ देते ती मनाने / कानाने कमकुवत असण्याची शक्यता असू शकते. व्हायचे ते परिणाम खोलवर रुजतात तिच्यात. कमकुवतपणा, साधेपणा तिचे शत्रू बनतात. मग काय, तसे असणे गुन्हा आहे का? बिलकुल नाही.

'उंबरठा' या चित्रपटात ज्येष्ठ दिवंगत अभिनेत्री स्मिता पाटील यांच्या तोंडी एक वाक्य आहे, ''मग परिस्थितीच बदलली पाहिजे.''

आपल्याला जर कोणाच्या वृत्तीचा, अहंकाराचा बळी बनवले जातंय आणि हे कुठे तरी जाणवत आहे तर मग आपल्यातली परिस्थिती बदलली पाहिजे. कायम भक्ष्य बनून जगणे योग्य नाही.

एक लक्षात घेतले पाहिजे की जो सहन करायला लावतो आणि जो सहन करत राहतो, ते दोघेही तितकेच जबाबदार आहेत.

या आधी खूप वेळा याचा उल्लेख केला आहे मी, आताही करतोय. मुळात आपल्याला बदलणे गरजेचे आहे, नव्हे त्याशिवाय पर्याय नाही हे पहिल्यांदा कळले पाहिजे. ज्याची गरज निर्माण झालेली आहे ते आपण शोधतोच शोधतो किंवा ते शोधता येते. आपल्याला वेळ मिळत नाही असले विचार करायला किंवा हे खूप कठीण आहे हे म्हणणारे एक विसरलेले असतात की या शरीराला आणि मेंदूला आपण वाट्टेल तसे वापरलेले असते आत्तापर्यंत उदरनिर्वाहासाठी. तेदेखील अती ताण पडून थकू शकते, हा विचार आपण कधी करतो का? केला तरी मग तात्पुरता परिणाम साधणारी साधने आपण शोधून काढतो. सिनेमा बघ, गप्पा मार, कार्यक्रमाला जा, हॉटेलमध्ये जा वगैरे. हे पण ठीक आहे कधीतरी. पण असे जर वरचेवर होत राहिले, तर त्याचे परिणाम कालांतराने मनावर आणि शरीरावर होणारच होणार.

भूक आणि अन्न, तहान आणि पाणी, निवारा आणि घर, हे सगळे जसे जोडलेले आहे एकमेकांना, तसेच मानसिक शांतता आणि मानसिक आनंद ही खूप मोठी गरज आहे आणि सगळ्यात जास्त महत्त्वाची आहे. हे पुन्हा पुन्हा लिहायचे कारण हेच की जोवर आपण मानसिक ताकद, मानसिक शांतता मिळवत नाही जी आपल्यातच आहे, तोवर आपल्यावर या नकारात्मक शक्ती तीव्रतेने परिणाम करत राहणार.

आनंद आणि शांततेसाठी नियमित प्रयत्न करत राहण्याने जो फायदा होत राहतो तो कायमस्वरूपी असतो. आपल्यावर परिणाम आपणच करून घेत असतो. जग किंवा जगातील प्रत्येक व्यक्ती आपापल्या स्वभावानुसार, मनोवृत्तीनुसार वागत राहणार. या सगळ्या विचारप्रवाहांचा आपण आपल्यावर जोपर्यंत परिणाम करू देत राहू तोवर तो होणारच. याला आपणच जबाबदार आहोत. आणि हे घडत राहणारच, जोपर्यंत आपण परवानगी देतो तोपर्यंत. म्हणून स्वत:ला घडवायला हवे. घडवत राहायला हवे. त्या दिशेने विचार करायला सुरुवात करायला हवी. आधी लिहिल्याप्रमाणे ती निकड जेव्हा निर्माण होते तेव्हा मार्ग सापडतो. मार्गदर्शक आपोआप भेटतो.

हे अनुभव, त्रास देणारे, मानसिक शांततेवर आघात करणारे, मलाही वरचेवर येत असतात आणि त्रास देतात. माझे प्रयत्न चालू आहेत. कारण मला मनाने कणखर होण्याची गरज, आनंदी राहण्याची नितांत गरज आहे आणि ती आयुष्यभरासाठी आहे.

मनी कायम राहणार आहे. ही तपस्या आहे, जे हवंय ते मिळवण्याची आणि ती आयुष्यभरासाठी आहे. पैसा, आपल्या सुखसोयी गरजेच्या आहेतच. पण जास्त गरजेची आहे मानसिक शांतता, स्थैर्य, आनंद. एकदा त्या दिशेने विचार करायला सुरुवात तरी करून पहा. त्याची निकड निर्माण करून पहा, मार्ग आणि मार्गदर्शक नक्कीच सापडतील. हे काळे ढग कायमचे आपल्या आकाशात राहू देऊ नका. सकारात्मक राहण्याचे, आनंदी राहण्याचे विचार रोज करत रहा. पाऊस पडून जाऊ द्या. तो काळेपणा नष्ट होऊन जाऊ द्या. तुमच्या मनाच्या, अंतर्मनाच्या आभाळात कायम इंद्रधनू राहू द्या.

सर्वप्रथम आपण व आपल्या कुटुंबाच्या जीवनाची व आरोग्याची काळजी घ्या. सरकारी सूचनांचे, नियमांचे व कायद्याचे पालन करा.

एकमेकांना अडचणीत आणू नका. त्यापेक्षा मदत करा. जमत नसेल तर निदान गप्प तरी बसा, नको त्या उठाठेवी करू नका.

प्रत्येकाचे जीवन, आयुष्य फार सुंदर आहे ते आनंदात जगा व दुसऱ्यालाही आनंदात जगू द्या. स्वार्थ व अहंकार कधीही मनात ठेवून वागू नका. वाईट व कठीण प्रसंगाची वेळ कधी कुणावर येईल हे सांगू शकत नाही हे लक्षात ठेवा.

■



Radically different !

# BELRISE INDUSTRIES LIMITED

*(Erstwhile known as Badve Engineering Ltd)*

Our New Business Vertical

## 'RETAIL MARKET PRODUCTS'



Helmet | Gas Filled Shock Absorber | Shock Absorber | Rear View Mirror | Side View Mirror

## Best Compliments from

**Badve Engineering Ltd. &**
**Badve Group of Companies**

www.badvegroup.com | abanerjee@badvegroup.com | +91 9163040401

SportsIndi®
The Online Sports Hub



## Our Programs

- Sportsindi CeleBuzz
- Sportsindi Khelta Bolta
- Interview with Sports Players
- Sanvad Matitalya Kheladunshi
- World of Sports

**Sportsindi is a Knowledge Tank for Sports Ecosystem**

**To Make This More Stronger Join Us @**
/ SPORTSINDI

visit us @ www.sportsindi.com

# कैद्यातला 'माणूस' जागवताना

**श्रीमती स्वाती साठे**
**कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग, येरवडा, पुणे)**

''कैदी या घटकाकडे नकारात्मक भावनेने पाहिले जाते. ही 'निगेटिव्ह फोर्स' आहे, पण ती 'क्रिएटिव्ह' देखील आहे. कसलेले गुन्हेगार ज्या सराईतपणे गुन्हे करतात किंवा टोळी चालवतात त्यासाठी अनेक कौशल्ये असावी लागतात. आपण साधे कुणाला रागावून बोललो तरी दिवसभर तोच विचार मनात घोळत राहतो. मग निर्ढावलेल्या पद्धतीने गुन्हे करण्यास किती 'जिगर' लागत असावी! ही नकारात्मक ऊर्जा सकारात्मकतेकडे वळवणे ही तुरुंग अधिकाऱ्यांची भूमिका असायला हवी. एकाच वेळी नियम पाळायचे आणि त्याच बरोबरीने समोरच्या माणसातला 'माणूस' पुन्हा जागवायचा अशी ही कसरत असते.''

पोलीस दल आणि कारागृह विभाग एकच असतो, असे नागरिकांना वाटते. पण ते खरे नाही. कारागृह व्यवस्थापन हा खूप वेगळा भाग असतो. ही एक प्रकारची 'ह्यूमन मॅनेजमेंट' आहे. माणसांना सांभाळताना आणि त्यातही कारागृहात असलेल्या माणसांना सांभाळताना तुम्ही संवेदनक्षम असणे गरजेचे असते. एकाच वेळी शिस्त व नियम पाळायचे आणि त्याचबरोबरीने समोरच्या माणसातला 'माणूस' पुन्हा जागवायचा अशी ही कसरत असते. ही सगळी भूमिका फार संवेदनशील राहून बजावावी लागते. याच वेळी तुम्हाला तुमचे असे वैयक्तिक आयुष्य असते. त्या आयुष्यातील जबाबदाऱ्याही कुठे गल्लत न होता निभावायच्या असतात. दिवसभराच्या कामानंतर घरी जाताना 'जेलर' म्हणून जाऊन चालत नाही. तिथे तुमचे 'आई' किंवा 'वडील' असणेच अपेक्षित असते. यामुळेच कदाचित स्त्रियांना हे काम उत्तम जमू शकते असे मला वाटते.

कारागृह खात्यात येण्याचे मी आधी ठरवले नव्हते, पण लहानपणापासूनच मला गणवेशाचे अप्रूप होते. सकाळी दहा ते सायंकाळी सहा अशी साचेबद्ध नोकरी करायची नाही, हे तर मानत होतेच. वेगळे काही शिकावे म्हणून मी 'क्रिमिनॉलॉजी'मध्ये पदव्युत्तर पदवी संपादन केली. ते करताना कारागृहांना भेटी द्याव्या लागल्या. कारागृह खात्यात काम करणे आव्हानात्मक आहे असे वाटले आणि मग मी ठरवून या खात्यात आले. माझ्या आई-वडिलांनीही मला कोणताही विरोध केला नाही. त्यांच्या महत्त्वाकांक्षा माझ्यावर कधी लादल्या नाहीत. माझ्या सेवेतील 'स्टेकहोल्डर' म्हणजे कैदी. १९९५ मध्ये लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन मी कारागृह उपनिरीक्षक म्हणून रुजू झाले. तेव्हा महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात कारागृह सेवेमध्ये निवड झालेली मी पहिली स्त्री होते. त्यामुळे माझ्यासाठी तो पहिलाच प्रयोग असल्यासारखा होता. एक स्त्री अधिकाऱ्याला कैदी कसे स्वीकारतील ही एक धास्ती सुरुवातीला मनात होती. पण आज सत्तावीस वर्षांच्या अनुभवानंतर मी ठामपणे सांगू इच्छिते की, लिंग, धर्म, जात याने इथे कुणाला काहीही फरक पडत नाही. अधिकाऱ्याच्या खुर्चीत बसणाऱ्याकडे ते 'पालक' म्हणून पाहतात, असा माझा अनुभव आहे. स्त्री अधिकाऱ्याला स्वीकारण्याचा प्रश्न मला उलट माझ्या सहकाऱ्यांकडून जास्त जाणवला. शेवटी तुमची कार्यक्षमता तुम्ही कशी सिद्ध करता, आव्हानांना कसे तोंड देता, सेवेच्या प्रती तुमची निष्ठा किती आहे, हे सर्वांत महत्त्वाचे.

कारागृहाच्या नोकरीत नवीन असताना समोर येणाऱ्या अवघड प्रसंगांमधून खूप शिकायला मिळाले. आपली संवेदनशीलता टिकवून ठेवणे किती महत्त्वाचे आहे हेही प्रकर्षाने जाणवले. साताऱ्यात माझी पहिली नेमणूक मिळाली होती. तिथे पोलिसांनी एका देहविक्री करणाऱ्या बाईला पकडून आणले. ती फार अस्वस्थ दिसत होती, सारखी आत्महत्या करण्याची धमकी देत होती आणि हा प्रसंग हाताळणारी मी अगदीच अननुभवी होते. पोलीस सहकाऱ्यांकडे चौकशी केल्यावर तिच्याकडे मी फार लक्ष देऊ नये, असा सल्ला मिळाला. पण मी तिच्याशी बोलण्याचा आग्रह धरला. नवरा नसल्यामुळे तिने चरितार्थासाठी देहविक्रय करायला सुरुवात केली होती. घरी दोन लहान मुले आहेत आणि त्यांच्याकडे पाहणारे कुणी नाही, हे ती पुन:पुन्हा सांगत होती. तिला घरचा पत्ताही नीट सांगता येत नव्हता. नियमानुसार कैद्याला न्यायालयीन कामकाज आणि वैद्यकीय उपचारांसाठीच बाहेर काढता येते. शिवाय मुलांना न्यायालयीन वॉरंटनुसारच आणावे लागते. मग न्यायालयाला परिस्थिती सांगून आम्ही तिला पोलीस पहाऱ्यात बाहेर काढले आणि तिच्या घरी गेलो. तिची दोन्ही मुले अगदीच लहान, सहा वर्षांच्या आतली



होती आणि आई कधी परत येतेय याची वाट बघत बसली होती. आम्ही त्या मुलांना ताब्यात घेतले व दुसऱ्या दिवशी न्यायालयाला तसे सांगितले. खरे पाहता आम्ही एक नियम मोडला होता. पण न्यायालयाने तो प्रसंग समजून घेतला. कागदोपत्री काम पूर्ण करण्यात आले आणि त्या मुलांना तिच्याबरोबर राहण्याची परवानगी देण्यात आली. विविध माणसांचे असे असंख्य अनुभव हे काम करताना गाठीशी येतात आणि जगणे शिकवून जातात.

मी अगदी नवीन असताना आमच्या प्रशिक्षणाच्या दरम्यान फाशीच्या ठिकाणी हजर राहावे लागले. पुरुष असो किंवा स्त्री, फाशी प्रत्यक्ष बघणे हा अनुभव कुणाहीसाठी कठीणच. त्यामुळे माझ्यासाठीही तो अवघड होता, पण जेव्हा आपण एखादी नोकरी स्वीकारतो तेव्हा त्यातील प्रत्येक गोष्ट स्वीकारावी लागतेच, हा पहिला धडा या प्रशिक्षणातच मिळाला आणि तो मनावर कायमच ठसला.

आणखी एक महत्त्वाचा अनुभव या संपूर्ण कामाच्या दरम्यान मी घेतला तो म्हणजे मानसिकतेचा. कैदी या घटकाकडे कायमच आणि सगळ्याच स्तरांवरून नकारात्मक भावनेने पाहिले जाते. पण ही 'निगेटिव्ह फोर्स' वा नकारात्मक ताकद 'क्रिएटिव्ह फोर्स' देखील असते. कसलेले गुन्हेगार ज्या सराईतपणे गुन्हे करतात किंवा टोळी चालवतात त्यासाठीही अनेक कौशल्ये असावी लागतात. हे येरागबाळ्याचे काम नाही. आपण साधे कुणाला रागावून बोललो तरी दिवसभर तो विचार मनात घोळत राहतो. मग निर्ढावलेल्या पद्धतीने गुन्हे करण्यास किती 'जिगर' लागत असावी! ही 'निगेटिव्ह' असली तरी ऊर्जाच आहे. ही ऊर्जा सकारात्मकतेकडे वळवणे ही तुरुंग अधिकाऱ्यांची भूमिका असायला हवी. कायद्याचा भंग केलेल्या, चुकलेल्या माणसाच्या हाताला आणि मनालाही काम देणे, त्यांच्या विचारांना चांगले वळण लावून पुन्हा समाजामध्ये पाठवणे हे फार नाजूक आणि पूर्ण समर्पणाने करायचे काम आहे आणि ते होऊ शकते हा माझा अनुभव आहे. त्यामुळे या क्षेत्रात आल्याचे समाधानही मिळते.

मुळात कैदी ज्या पद्धतीने जगतात तेच आपण समजून घेत नाही. एखाद्या दिवशी समजा आपल्याला सांगितले, की तुम्ही तुमच्या खोलीच्या बाहेर पडायचे नाही, तुम्ही पूर्णतः बंदिस्त असाल तर काय होईल? त्या कल्पनेनेसुद्धा गुदमरायला होईल. मनुष्यप्राण्याला सर्वांत प्रिय काही असेल तर ते त्याचे स्वातंत्र्य. एखादा कैदी जन्मठेप होऊन कारागृहात येतो, अनेक वर्षे चार भिंतींमध्ये राहतो. ही कल्पना त्याच्या दृष्टीने भयंकरच असते. संचित (पॅरोल) आणि अभिवचन रजांवर (फरलो) खूप टीका होते. पण या रजा हा त्या कैद्याला पुन्हा स्थापित होण्याचा चांगला मार्ग आहे, असे मला वाटते. आपण कारागृहाबाहेरची मंडळी सतत कार्यरत असतो. ऑफिसला जायचे आहे, कामात आणखी 'आऊटपुट' द्यायचे आहे, असे सतत 'बिझी' असतो. किंबहुना सतत व्यग्र राहिल्यानेच आपण नीट जगू शकतो. उलट रिकामे बसून राहावे लागते तेव्हा मनात ना-ना तऱ्हेचे विचार येतात. 'रिकामे मन सैतानाचे घर' हे म्हणूनच म्हणत असावेत. एखाद्याला वीस एक वर्षांनी कारागृहाबाहेर सोडले तर त्याला रस्तादेखील ओलांडता येणार नाही, अशी परिस्थिती येऊ शकते. त्यामुळे कैद्यांना सतत नवीन उपक्रम देणे, गुंतवून कौशल्ये शिकतो त्याला रोजगार मिळणे तुलनेने कमी अवघड जाते. त्यामुळे ही तांत्रिक कौशल्ये देणे, शिक्षण देणे आणि त्याचवेळी त्या व्यक्तीचे मन चांगले करण्यासाठी प्रयत्न करणे असे तिहेरी काम कारागृहात सुरू असते.

कोल्हापूर येथे नेमणूक असताना आम्ही घाडगे-पाटील यांच्याबरोबर पब्लिक प्रायव्हेट भागीदारीमध्ये फाऊंड्री सुरू केली. 'मी काहीतरी करू शकतो' हे समाधान मी त्यात कैद्यांच्या चेहऱ्यावर पाहिले. तिथे काम करताना दिले जाणारे गमबूट, टोप्या, चष्मे गोष्टींचेही प्रचंड अप्रूप त्यांना वाटत होते. इतर कामगारांसारखी वागणूक आम्हाला मिळते आहे, ही भावना त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. मी बाहेर जाऊन काम करू शकेन हा आत्मविश्वास त्यांना मिळाला. नाशिकला रूजू झाल्यावर मी येवल्याच्या पैठणीचे माग फिरून पाहिले. त्यात खूप सर्जनशीलता दिसली आणि म्हणूनच कैद्यांसाठी ते काम सुरू करण्यात आले. कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिरात कैद्यांनी वळलेले लाडू पुरवणे हा उपक्रमही लक्षवेधी ठरला. ती फक्त



रोजगारनिर्मिती नव्हती. तो एक प्रकारचा सामाजिक बदल होता. कैदी लाडू कसे करणार, ते अस्वच्छ असतील, असा वाद त्या वेळी उभा राहिला होता. पण आमचे कैदी अतिशय स्वच्छ वातावरणात, नखे, केस कापून ॲप्रन आणि टोपी घालून लाडू वळतात. आणखी काय शुद्धता हवी? या लाडू वळणाऱ्या स्त्री-कैद्यांपैकी एक जण म्हणाली, 'आता मला देवाने स्वीकारले आहे. जग काय म्हणेल याचे आता काही वाटत नाही.' मी महत्त्वाचा (किंवा महत्त्वाची) आहे ही भावना त्यांच्यात निर्माण होणे हा या उपक्रमांचा उद्देश असतो आणि असायला हवा.

सामान्यांना कारागृहाची ओळख होते ती चित्रपटांमधून. ती बऱ्याचअंशी चुकीची असते असे मला वाटते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी सुरू केलेल्या 'स्वच्छ भारत अभियाना'च्या मापदंडांवर आमची सर्व कारागृहे पात्र ठरतात. कारागृहाचे स्वत:चे असे ठरलेले 'शेड्यूल' असते. सामान्यांच्या आयुष्यात नसेल इतके हे शिस्तीचे जीवन असते. पण कैदी हा समाजाचाच एक घटक असल्याचेही लक्षात घ्यायला हवे. समाजात जशी भांडणे, बाचाबाची, कधी मारामाऱ्या होतात, तशा त्यांच्यातही होतात. समाजात असते तशीच गटबाजीही काही प्रमाणात असते. पण चित्रपटात जसे भयंकर चित्र उभे केले जाते तसे हे जग नक्कीच नसते. तरीही सुधारणा ही बाब प्रत्येक कैद्याच्या बाबतीत शक्य असतेच असेही नाही. अतिशय गंभीर गुन्ह्यातील कैदी, गुन्हेगारी टोळ्यांमधील कैदी, आतंकवादी यांच्या बाबतीत ते करता येत नाही. त्यांच्यासाठी शिस्त हाच प्रमुख मार्ग वापरावा लागतो. हे लोक जसे बाहेरच्या जगावर सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करतात, तसेच कारागृह व्यवस्थाही आपल्या प्रभावाखाली आणण्याचा प्रयत्न करतात. तिथे आमचा खरा कस लागतो.

आर्थर रोड कारागृह हे असे एक वेगळेच जग आहे. सामान्यांसाठी तो फार कुतूहलाचा विषय आहे. सुधारणांचे उपक्रम अशा ठिकाणी समांतर पातळीवर चालवावे लागतात. अधिक आव्हानात्मक कैद्यांना सांभाळणे हे तिथले प्रमुख काम असते. त्यामुळे शिस्त आणि सुरक्षा हा तिथे पहिला अजेंडा ठेवावा लागतो. तिथे घालवलेल्या पाच वर्षांत धमकीचे फोन, माझ्या समोरच्या लोखंडी दारावर गोळीबार असे विविध अनुभव मी घेतले आहेत. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यास अशा वेळी वरिष्ठ अधिकारी आणि शासनाचाही पाठिंबा मिळतो.

गुन्हेगारांचे जग भले बेकायदेशीर आहे, पण ते खूप पद्धतशीरपणे चालवत असतात. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे गुन्हेगार कैद्यांच्या कुटुंबीयांची देखभाल त्यांच्या उर्वरित टोळीकडून फार चांगल्या प्रकारे केली जाते. आपण किती वेळा आपल्या सहकाऱ्यांची अशी काळजी घेतो? आपल्या हाताखालच्या लोकांची कधी विचारपूस करतो? यातूनच एक 'टीम' म्हणून काम करण्याचा उत्साह येत असतो. 'निगेटिव्ह फोर्स'कडून अशा काही सकारात्मक गोष्टी आपल्यालाही शिकण्यासारख्या आहेत.

सध्या मी पुणे येथे कारागृह उपमहानिरीक्षक (पश्चिम विभाग येरवडा, पुणे) म्हणून कार्यरत आहे. गेली २७ वर्षे तुरुंगाधिकारी म्हणून, वेगळी नोकरी करताना एक नक्की जाणवते की अशा नोकरीचा वैयक्तिक आयुष्यावर परिणाम होतो. पण त्यावर मार्गही आहेत. आपल्या नोकरीमुळे आपण कोणत्या कौटुंबिक आनंदांना मुकू शकतो हे एकदा स्वीकारले की, त्याचा बाऊ केला जात नाही. मला कदाचित कुटुंबातील एखाद्या लग्नाला जाता येणार नाही, समारंभांना हातभर मेंदी काढता येणार नाही या गोष्टी मी स्वीकारल्या आहेत. कुटुंबीयांच्या आपल्याकडून अपेक्षा असणे साहजिक आहे, परंतु मग जेव्हा मोकळा वेळ मिळतो तेव्हा त्यांना जास्तीत जास्त वेळ देणे हे करता येते. माझ्या कुटुंबाने मला कायम पाठिंबा दिला. कसाबचा खटला न्यायालयात उभा राहिला तेव्हा मी ऑर्थर रोड तुरुंगात नेमणुकीस होते. माझी मुलगी दहावीला होती. तिच्या परीक्षेच्या वेळी सुट्टी मिळावी असा अर्ज मी केला होता. तो अपेक्षेप्रमाणे नामंजूर करण्यात आला. मी जेव्हा घरी जाऊन मुलीला हे सांगितले तेव्हा तिने अगदी सहजपणे माझे हात हातात घेतले आणि म्हणाली, 'ममा, कंट्री फर्स्ट!' तिने उत्तम अभ्यास केला आणि छान गुण मिळवले. कुटुंबीयांनी असे एकमेकांना समजून घेणे फार गरजेचे आहे. त्यामुळे तर हा संपूर्ण प्रवास मी निर्भयतेने करू शकले आणि पुढेही करत राहीनच.

चांगुलपणाच्या चळवळीबद्दल लेख लिहायचा म्हटल्यानंतर आणि तोही तुरुंगाच्या पार्श्वभूमीवर लिहायचा म्हटल्यानंतर अनेक विचार मनामध्ये येतात. चांगुलपणाची चळवळ आणि कारागृह विभागाचे ब्रीदवाक्य हे जवळपास सारखेच आहे. सुधारणा आणि पुनर्वसन हे कारागृह विभागाचे

ब्रीदवाक्य आहे आणि चांगुलपणाची चळवळ हे आपल्या दिवाळी विशेषांकाचे शीर्षक आहे. तर ते एकमेकांना पूरक आहेत. आपल्याला परमेश्वराने मानव जन्म दिलाय ना, तर तो काहीतरी चांगले करण्याकरता दिलाय. विध्वंसक काम करण्याकरता दिलेला नाहीये. दुर्दैवाने ज्यांना आई-वडिलांचं प्रेम, संस्कार मिळालेले नाहीत, ज्यांना चांगले शिक्षण मिळाले नाही, ज्यांना चांगल्या संधी मिळाल्या नाहीत, असे लोकच तुरुंगामध्ये येतात. खूप वेळा हा आक्षेप असतो की त्यांचे जास्त लाड केले जातात किंवा त्यांना सवलती दिल्या जातात. पण तसे नाहीये. जीवनाच्या एका टप्प्यावर ते कुठेतरी मागे पडलेत, आपल्यापासून वेगळे झालेत, त्यांना आपल्यासारखे करण्याचा हा प्रयत्न आहे. म्हणजे त्यांच्यात सुधारणा करायचीये आणि त्यांचे पुनर्वसन करायचंय आणि हीच चांगुलपणाची चळवळदेखील होऊ शकते.

ह्याच्यामध्ये आपल्याला प्रामुख्याने असे म्हणता येईल की सर्वसाधारण भौतिक जगामध्ये वावरायला आपल्याला ज्या काही गोष्टी लागतात, शिक्षण लागते, हाताला काम लागते, हाताला काम मिळवण्याकरता आपल्याला जे काही कौशल्य लागते, त्यांच्यानंतर चांगले वाचन लागते, चांगले विचार करणे गरजेचे असते, हे सगळे शिकवण्याची शाळा म्हणजे तुरुंग आहे. ही बंदीशाळा नाहीये किंवा कोंडवाडा नाहीये. त्या दृष्टीने आपण बंद्यांकडे बघायला नको.

त्यानंतर येतो आपला विशेष क्लास. विशेष क्लासमध्ये महिला येतात.

आता प्रश्न येतो महिलांचा. आपला समाजच असा आहे ना की महिलांना सगळीकडे दुय्यम स्थान असते. खूपदा आम्ही असे बघतो की मोठा एखादा गुंड जर जेलमधून सुटणार असेल तर खूप लोक ढोलताशे घेऊन मिरवणूक काढून त्याच्या मुक्ततेला हजर असतात म्हणजे तो सुटणार असेल तर त्याची मिरवणूक काढली जाते. कुठली महिला जर सुटणार असेल तर तिला बघायला कोणीच नसते. अगदी घरचेसुद्धा येत नाहीत. म्हणजे मी नेहमी असे म्हणते की एक पुरुष तुरुंगामध्ये आला तर तो एकटाच येतो. आणि एक बाई तुरुंगात आली तर स्वत:चे भावविश्व बाहेर ठेवून स्वत:च्या मनामध्ये त्याच्या आठवणी ठेवून येत असते. पुरुष तुरुंगात आला तर त्याच्या मागे त्याच्या माघारी त्याची बायको, आई-वडील, त्याची मुले, त्याचे घर, त्याची शेतीवाडी, अगदी त्याचे कुत्रेसुद्धा सांभाळते. पण बाई तुरुंगात आली की माणूस दुसऱ्या दिवशी लग्न करून मोकळा होतो आणि समाजात हे स्वीकारले जाते हे अजूनच वाईट आहे. त्यांनी त्याच्या व्यक्तिगत आयुष्याचा काय निर्णय घ्यावा हा त्याचा प्रश्न आहे. पण त्या बाईला कोणी टाकू नये. म्हणून पुरुषांपेक्षा महिलांच्या पुनर्वसनाकरता समाजामध्ये जागृती असणे अजून आवश्यक आहे.

त्यानंतर विशेष क्लासमध्ये फर्स्ट टाइम गुन्हेगार येतात. यांच्याकरता तर तुरुंग हा नकोच. त्याच्या भिंतीच मुळामध्ये गळून पडल्या पाहिजेत आणि तुरुंग नव्हे संधी असे असले पाहिजे, की ज्या जोगे ते आपल्या चांगल्या मार्गातून भरकटले असतील तर त्यांना पुन्हा एकदा संधी मिळावी आणि एक चांगला नागरिक म्हणून त्यांनी जगावे. आपण पण आपल्या आयुष्यामध्ये खूप चुका करतो, पण त्या कदाचित आयपीसी मध्ये codified नसतात. म्हणून आपण तुरुंगात नाहीये. बंदीजनांनी केलेल्या चुका आयपीसीमध्ये codified आहेत म्हणून ते तुरुंगामध्ये आहेत. तर जशी आपल्याला आपल्या चुका सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे तशीच त्यांनी केलेल्या चुका सुधारायची संधीसुद्धा त्यांना मिळाली पाहिजे. कारण या जगामध्ये आनंदाने जगायचा सगळ्यांना अधिकार आहे. आयुष्य हे चांगुलपणाची चळवळच असली पाहिजे. वाईट, विध्वंसक, समाजविघातक किंवा देशविघातक, जगाला हानी करणारे किंवा पर्यावरणाला हानी करणारे आपण काहीच करायचं नाहीये. अशावेळी तुरुंगाधिकारी म्हणून आपली जबाबदारी खूप मोठी असते. कारण अशा संधी ज्यांना नाहीयेत, अशा वाटा ज्यांना माहिती नाहीयेत किंवा बाहेर सुटल्यानंतर त्यांना समाज स्वीकारणार नाहीये अशांना सुधारायची खूप मोठी जबाबदारी तुरुंग अधिकाऱ्यावर असते आणि त्याने ती सर्वंकष, सगळे नियम पाळून आणि मुळामध्ये कायद्याच्या चौकटीत बसवून ती पूर्ण करायची असते.

ह्यामध्ये अनेक NGOs च्या मदतीचा हात आपल्याला मिळतो. ही खरोखरी एक सकारात्मक बाब आहे. आणि अर्थातच ज्या काही सुविधा कैद्यांना जेलमध्ये मिळतात मग ते मुक्त विद्यापीठ आहे, लायब्ररी आहे, विविध व्यक्तिमत्त्व विकासाचे, कौशल्य विकासाचे उपक्रम आहेत ह्या सर्व गोष्टींचा कैद्यांनी जास्तीत जास्त फायदा करून घेणे आवश्यक आहे. तर खऱ्या अर्थाने चांगुलपणाची चळवळ आपल्याला प्रत्यक्ष घडताना दिसेल. कुठलाही कैदी तुरुंगामध्ये येतो तेव्हा त्याला नैराश्य आलेले असते आणि जेव्हा तो एक चांगला नागरिक म्हणजे शिक्षित, काम करणारा आणि चांगले नियम पाळणारा आपल्या कुटुंबामध्ये राहणारा असा म्हणून जेव्हा समाजामध्ये वावरेल तेव्हा आपली ही चांगुलपणाची चळवळ खूप यशस्वी झाली असे आपण म्हणू शकू.

■


# 'गजाआड' अण्णा भाऊ, कैदी नं. ११३

**श्री. विश्वास पाटील**
भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी

**इथे मला अण्णा भाऊंच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट जाणवते. इतर राजबंद्यांसारखा त्यांनी आपल्या तुरुंगवासाचा उपयोग प्रियतमेला किंवा अन्य कोणाला गोड गोड पत्रे लिहिण्यासाठी केला नाही. ना. ग. गोरे किंवा जयप्रकाशजी यांच्यासारखी अण्णा भाऊंनी आपली जेलडायरी लिहिली नाही. उलट तुरुंगात भेटलेल्या चित्रविचित्र स्वभावाच्या, नाना विकारांनी पछाडलेल्या स्त्रीपुरुष कैद्यांना त्यांनी आपल्या कथांमधून लालित्याचा अंगरखा चढवला. मात्र त्यांच्या हाडामांसातले विखारी रूप लोपू दिले नाही.**

'गजाआड' हा १९५९मध्ये प्रकाशित झालेला अण्णा भाऊंचा एक वेगळ्या अशा समृद्ध कथांचा संग्रह आहे. तुरुंगाच्या भिंतीआडच्या जीवनाचा विलक्षण पट मांडणाऱ्या या साऱ्या भिन्न धाटणीच्या वेधक कथा आहेत. ब्रिटिश काळात, म्हणजेच १९४६मध्ये सुमारे दोन महिने लेखकाच्या नशिबी तुरुंगवास आला होता. कारावासाच्या भिंतीआड गंजणाऱ्या, करपणाऱ्या आणि मारझोडीच्या सैतानी वरवंट्याखाली दडपल्या जाणाऱ्या अपूर्व विश्वाच्या या कहाण्या आहेत.

या संग्रहातील 'मला एकच बॉम्ब आणून द्या' हे पहिल्याच कथेचे शीर्षक मात्र अत्यंत भडक, अनाठायी आणि त्या सुंदर कथेवर अन्यायही करणारे आहे. तशी ही परकीय, जुलमी, पोलिसी आणि कारागृही व्यवस्थेच्या चिंध्या उलगडून दाखवणारी उत्तम कथा आहे. अण्णा भाऊंना फक्त ४९ वर्षांचे आयुष्य लाभले. मात्र साहित्यात त्यांनी पुरेशा सामर्थ्याने शब्दांची तलवार गाजवली आहे.




अण्णांनी आपले आत्मचरित्र लिहिलेले नाही. त्यांचे बंधू शंकर भाऊ यांनी 'माझा भाऊ अण्णा भाऊ' हे वृत्तान्तवजा पुस्तक लिहिले नसते, तर अभ्यासकांची अगदीच पंचाईत झाली असती. त्यांच्या विशाल कथासागरातील फक्त चार ते पाच अशा कथा आहेत, ज्या त्यांच्या जीवनचरित्रातील अगदीच थोडे प्रसंग निर्देशित करून जातात. त्या चारदोन कथा आणि काही पुस्तकांच्या त्रोटक प्रस्तावना हाच त्यांच्या अस्सल चरित्राचा प्रथमपुरुषी लेखी पुरावा उरतो.

१९४६मध्ये विदर्भात 'लाल बावटा' कलापथक कम्युनिस्ट प्रचाराचे रान उठवत फिरत होते. त्यांच्या त्या खेळांना विदर्भात प्रचंड प्रतिसाद मिळत होता.

अगदी बैलगाड्या भरभरून खेड्यापाड्यांतले लोक अमाप गर्दी करत असत. लाल बावटा कलापथकाचे ते प्रचंड यश बघून तेव्हाचा सत्तारूढ काँग्रेस पक्ष खूप बिथरून गेला होता.

आपला चाळीस दिवसांचा विदर्भ दौरा आटोपून कलापथकातली ती मंडळी मुंबईच्या वाटेवर होती. कधी एकदा अमरावतीचा प्रयोग उरकून आपण मुंबई गाठतो, असे सर्व कलावंतांना झाले होते. ते सारे चांदुर स्टेशनावर थांबून आगगाडीची वाट बघत उभे होते. त्या वेळी त्या भागातले अनेक कम्युनिस्ट कार्यकर्तेही त्यांना निरोप देण्यासाठी स्टेशनात जमलेले होते.

रेल्वे येत असल्याचा फलाटावर सिग्नल पडला. स्टेशनातले पोर्टर टण टण घंटेचा आवाज ऐकत प्रवाशांचे सामान उचलण्यासाठी पुढे धावले. परंतु काही क्षणांतच पडलेले सिग्नल पुन्हा वर गेले. साधारण ३०० पोलिसांचा आगगाडीला वेढा पडला. त्यातले कित्येक पोलीस डब्यात घुसले. त्या कलापथकातील मंडळींभोवती गराडा घालून त्यांची कोंडी केली. त्या अचानक हमल्याने सारे कलावंत भयंकर घाबरले, पोलीस आपल्या कर्कश आवाजात

मोठ्याने हाका मारत होते, ''पकडोऽऽ पकडोऽऽ भागोऽऽ.'' त्यांपैकी आठ हडेलहप्पी पोलिसांनी अण्णांना मध्येच कोंडून धरले. एकाच वेळी कोणी त्यांच्या सदऱ्याच्या खिशात तर कोणी त्यांच्या पँटच्या खिशात हात घालतोय. त्या जुलमी झटापटीत अण्णांचे खिसेसुद्धा फाटून गेले. काही पोलीस दरडावणीच्या सुरात कर्कशपणे ओरडत विचारू लागले, ''सांग कुठायऽ हत्यार कुठाय?'' अण्णा पोलिसांच्या त्या अचानक हमल्याने पुरते भांबावून गेलेले. पोलिसांना तर अण्णांकडे हत्यार हवे होते. अण्णांनी हात उंच केला. त्यांच्या हाती रिव्हॉल्वरऐवजी फाउंटनपेन बघून पोलीस अधिकच कातावले.

तिथेच उघड्यावर त्या सर्व कलाकारांची पाच तास कसून झडती चालू होती. त्या सर्वांना अटक केल्याचे सांगण्यात आले. पण हा सारा प्रकार का आणि कशासाठी हेच त्यांना कळेना. त्या सर्वांना घेऊन शेवटी एकदाची जेव्हा पोलीस गाडी मॅजिस्ट्रेटकडे निघाली, तेव्हाच त्यांना वाटेत कळून चुकले. दोन दिवसांमागे चांद्याजवळ दढी नावाच्या गावात जो मोठा दरोडा पडला होता, ज्यात त्या गावच्या सावकाराचे एक लाख रुपये लुटले गेले होते; त्या मारवाड्याच्या मांडीत गोळीही घुसली होती. तो जबरी दरोडा घालणारी टोळी म्हणजे हे 'लाल बावटा' कलापथकवालेच आहेत असे पोलिसांचे ठाम मत झाले होते. त्या गुन्ह्यासाठीच सर्वांची धरपकड केली होती. ही अटक सुरू असताना मात्र सव्वासहा फूट उंचीच्या, भक्कम देहाच्या कॉ. भूपेंद्रनाथ यांनी पोलिसांच्या हातावर तुरी दिली. ते पसार झाले. त्यामुळे प्रकरणाला अधिकच गंभीर स्वरूप प्राप्त झाले होते.

त्या १९ जणांना अटक करून बडनेरा पोलीस स्टेशनात रात्री दोन



**हा 'फकीरा' चित्रपटाचा फोटो ज्यामध्ये अण्णाभाऊ स्वतः सावळाराम दरोडेखोराच्या भूमिकेत पागोटे घालून उभे आहेत. समोर कमलाबाई रानडे ह्या सावकाराच्या पत्नीच्या भूमिकेत दिसत आहेत.**

वाजता आणले गेले. गुन्हेगारांची ती बारात घेऊन पोलिसांनी मोटार ठाण्यात पोचण्याच्या आधीच बंदुकधारी शिपाई आपली हत्यारे लोड करून दोन्ही बाजूंनी उभे होते. आधी गव्हाणकरांची तासभर झडती घेतली. मग खर्ज्यातला दरडावणीचा आवाज आला, ''अण्णा भाऊ साठे, बाहेर ये.'' ते अण्णांना धड पायात वहाणाही घालू देईनात. ''चलतोस जल्दी की इथूनच सुरू करू.'' अशी तंबी त्यांच्या कानांवर पडली.

वाघाचा बछडा दोरखंड लावून बाहेर काढावा, तसे त्यांना नेण्यात आले. तिथे टेबलावर तंगड्या पसरून बसलेल्या अंमलदाराने जेव्हा त्यांना विचारले, ''मला सांगा की, इंग्रजी राज्य कोणाला उलथून पाडता येईल यावर तुमचा विश्वास आहे का?'' देशभक्तीचे चळवळे रक्त अण्णांच्या धमन्यांतून वाहत होते. त्या कैफात त्यांनी लागलीच उलटजबाब देऊन टाकला. ''निश्चितच.'' त्या उत्तराने सर्व अधिकाऱ्यांची खात्रीच झाली. ब्रिटिश राज्य उलटवून टाकायचा ह्या डाव्या अतिरेकी कलावंतांचा कटच होता. पोलिसाने हडेलहप्पी स्वरात सांगून टाकले, ''गुन्हा कबूल करा आणि बऱ्या बोलानं लुटलेली रक्कम जमा करा.''

एकूण १९ आरोपी मॅजिस्ट्रेटसमोर हजर केले होते. पोलिसांनी त्या सर्व एकोणीस जणांना बेड्या घातल्या. त्या बेड्यांतून साखळीची सलग एक माळ बनवली होती. प्रत्येकाजवळ एक पोलीस उभा होता. त्यातच अण्णा साताऱ्याचे आहेत हे कळताच, ही मंडळी सरकार उलथवण्याचा इरादा करूनच आल्याची पोलिसांची खात्री झाली.

मॅजिस्ट्रेटकडून जेलकस्टडीचा हुकूम दिला गेला. अमरावतीच्या मध्यवर्ती तुरुंगात जिथे एके काळी राजगोपालचारींना ठेवले होते, ती बराक अण्णांसह सर्वांना मिळाली होती. तिथले बथ्थड, संवेदनाहीन वातावरण बघून अण्णांची खात्री झाली की, तुरुंग म्हणजे माणसांचे दगड बनवायचा कारखाना असतो. जिथे अनेक अट्टल गुन्हेगार, गुंड-दरोडेखोर आणि भयंकर खुनी जखडलेले असतात. तिथे अनेक कच्च्या कैद्यांचीही

खोगीरभरती असते. त्यांच्यामधील अनेक गरीब जिवांना अपराध नसताना जेलची दुष्ट हवा खाणे नशिबी येते. 'गजाआड' हा कथासंग्रह त्या दृष्टीने महत्त्वाचाच आहे. त्या संवेदनाहीन, भिंतींच्या आड अण्णा भाऊंचा एकापेक्षा एक अशा अनेक गुन्हेगार मोहऱ्यांचा जवळून परिचय झाला होता. फाशीची सजा झालेला शेरखान आणि त्याचा दोस्त बहादुरखान, प्रेयसीचे नाक दाताने कुरतडून तिला विद्रूप बनवून आलेला किसन, आपल्या घरातल्याच गणगोताने वेडा ठरविलेला उत्तम, बायकोचा सूड उगवणारा दादू न्हावी असे अनेक नमुने अण्णांनी अनुभवले होते.

इथे मला अण्णा भाऊंच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट जाणवते. इतर राजबंद्यांसारखा त्यांनी आपल्या तुरुंगवासाचा उपयोग प्रियतमेला किंवा अन्य कोणाला गोड गोड पत्रे लिहिण्यासाठी केला नाही. ना. ग. गोरे किंवा जयप्रकाशजी यांच्यासारखी अण्णा भाऊंनी आपली जेलडायरी लिहिली नाही. उलट तुरुंगात भेटलेल्या चित्रविचित्र स्वभावाच्या, नाना विकारांनी पछाडलेल्या स्त्रीपुरुष कैद्यांना त्यांनी आपल्या कथांमधून लालित्याचा अंगरखा चढवला. मात्र त्यांच्या हाडामांसातले विखारी रूप लोपू दिले नाही.

सहा वेळा बलात्कार करून तुरुंगात गेलेला कैदी 'तरस'चा नायक तरशा त्यांना कसा दिसतो?

'त्याचा चेहरा लांबट होता नि डोकं वरून चपटं होतं. त्याचे डोळे वाटोळे नि तांबारलेले होते. त्याच्या नाकाखाली सणसणीत पन्नास-साठ केस होते. त्या त्याच्या मिश्या होत्या. त्याची सगळी मान डावीकडे वाकडी झाली होती. उजवीकडच्या माणसाशी बोलण्यासाठी त्याला संपूर्ण वळून बसावे लागत होते. त्याचे दोन्ही पाय गुडघ्यांत वाकडे होते. त्यामुळे तो दोन हात नि दोन गुडघे अशा चार पायांवर अगदी तरसासारखा चालत असे. चालताना त्याचे वर वळलेले दोन पाय त्याच्या ढुंगणावर तालबद्ध लागत होते. तो बोलला की, विहिरीत बोलावं तसा त्याचा आवाज बराकीत घुमत होता आणि तो हसू लागला की, गाढव भुंकल्याचा त्रास होत होता. आणि सर्वांत वाईट म्हणजे त्याचा तो भयाण चेहरा सदैव रडत असल्यासारखा दिसत होता.'

अमरावतीच्या ब्रिटिशकालीन तुरुंगाच्या अनेक काळपट छटा आणि भीतिदायक जगण्याचे उभेआडवे किलतानी धागे अण्णा भाऊंच्या ह्या तुरुंगकथा स्पष्ट करतात. त्या बंदिशाळेत दिवसभर कावळ्यांची भीतिदायक कर्कश कावकाव ऐकू येई. बराकीतून बेड्यांचा खळखळाट आणि रात्री झोपेतून दचकून उठवणाऱ्या "ऑल वेलऽऽ"च्या पहारेकऱ्यांच्या कर्कश कानठळ्या बसवणाऱ्या आरोळ्या कानावर पडत.

त्या तुरुंगात लोखंडाचे चणे खाणारे आष्टीचिमूरचे स्वातंत्र्यसैनिक होते. मगनलाल बागडी हे तर तिथे ऐंशी वर्षांची भयंकर शिक्षा भोगत होते. तो तुरुंग म्हणजे जनावरांसारखे अनेक हडेलहप्पी कैदी आणि विचित्र इंग्रजी अधिकारी, एकूणच विकृतीने पछाडलेल्या, किडलेल्या माणसांची मांदियाळी होती. तुरुंगात कैद्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणारा तो डॉक्टर म्हणजे वास्तवात एक खाटीकच असल्यासारखा होता. मुळात तो कधी काळचा एक कंपाउंडर. एका डॉक्टरांची संपत्ती आणि पत्नी हडप करण्यासाठी त्यानेच त्या डॉक्टरांचा खून केला होता. तो पचवलाही होता. हा डॉक्टर कत्तलखान्याकडे सुरा चालवायला जायच्याऐवजी चुकून तुरुंगातल्या दवाखान्यात आला, असेच अनेकांना वाटायचे. तो सर्व कैद्यांना मेंढरे समजून त्यांना वागणूक द्यायचा. आजारी कैद्यांना आजारापेक्षा त्याचीच भीती अधिक वाटायची. ते विचित्रराव वेळेवर कधीच दवाखान्यात येत नसत. गंभीर व चिंताजनक रुग्णांना तसेच तिष्ठत बाजूला ठेवायचे. पहिले सर्दीखोकल्याचे सामान्य कैदी बघण्यात मुद्दाम वेळ घालवायचा त्यांचा जगावेगळा खाक्या होता.

इथेच अण्णा भाऊंना एक 'गजाआडचा वेडा' भेटतो. पोलिसांच्या मदतीने त्याच्या गुंड चुलत्याने खोटी कागदपत्रे रंगवली होती. त्या बिचाऱ्याला वेडा ठरवून त्याला गजाआड फेकून दिले होते. त्या काकाचा आपल्या पुतण्याच्या सुंदर पत्नीवर – ललितावर – डोळा होता. 'शेरखान'मधला सावकाराकडे वीस वर्षे चाकरी करणारा बाळूखान एक दिवस आपल्या अन्नदात्यावर उलटतो. त्याच्यावर दरोडा घालतो. त्या प्रयत्नात दोन खून पडतात. दरोडा पार पडतो. पण सर्व गुन्हेगार सापडतात. जात्यांच्या पाळीत हरभरा भरडावा, तशी बाळूखानाची अवस्था होते. सर्व जण गुन्हा कबूल करतात. त्यातला एक कैदी बहादुरखान अण्णांना भेटतो. आपल्या लेकीच्या – शबनमच्या – शादीसाठी आपण अकारण अडकल्याचे तळमळीने सांगतो. खरे तर त्याच्या छोरीच्या शादीची पूर्ण तयारी झालेली होती. त्याचा भाऊ त्याला आर्थिक मदत करणार होता. परंतु अधिक पैशाच्या लोभाने बहादुरखान ह्या दरोडेखोरीच्या भानगडीत अडकतो आणि पोरीच्या नावाचा धोसरा काढून तुरुंगात तडफडत राहतो.

पुढे अण्णा भाऊंनी 'मास्तर' नावाची छोटेखानी कादंबरी लिहिली. तिची मूळ 'जखम' नावाची सुंदर कथा याच संग्रहात आहे. क्रांतिकारक म्हणून प्रसिद्ध पावलेले मास्तर अमरावतीच्याच तुरुंगात अण्णांना भेटतात. मास्तरांना चाळीस वर्षांच्या सश्रम कारावासाची कठोर शिक्षा झालेली होती. त्या दीर्घ कारावासाच्या शिक्षेने आणि आपल्या अंधारमय भवितव्याच्या चिंतेने त्यांची पत्नी मालन गडबडून गेलेली

असते. माझे भवितव्य काय, असा प्रश्न करत ती मास्तरांना पुनः पुन्हा भेटत राहते. मास्तर अण्णांना सांगतात, ''मी याच तुरुंगात मरणार आणि माझी हाडं इथंच कुठेतरी पडणार आहेत, त्याचा चाळीस वर्षांनंतर कुणाला पत्ताही लागणार नाही.'' मास्तरांच्या डोळ्यांपुढे त्यांचा भविष्यकाळ थैमान घालतोय. चाळीस वर्षांनंतर एकाच स्मशानाकडे जाणाऱ्या दोन प्रेतांच्या भेटीच्या कल्पनेने ते खूप चिंतित होतात.

ती मोठी सजा म्हणजे आशेचा कोणताही झरोका नसलेली अंधारगुहाच ठरते. अण्णांच्या इतर त्यागमय, धैर्यवान नायिकेसारखी मास्तरांची मालन नाही. त्यामुळे असहाय मास्तर आपल्या पत्नीला दूसरे लग्न करण्याची अनुमतीही देतात. व्यवहारी मालनही परवानगी मिळताच झटकन लग्न करून मोकळी होते.

काही दिवसांतच दैवाचे चक्र फिरते. तेव्हाच्या ब्रिटिश राजवटीतच मुंबई प्रांतिक राज्यात निवडणुका पार पडतात. मध्यप्रांतात रविशंकर शुक्ला यांचा स्वातंत्र्यासाठी झगडणारा काँग्रेस पक्ष सत्तेवर येतो. मास्तरांसह सर्व राजबंद्यांची शिक्षेतून मुक्तता झाली आहे. त्यांच्या अपूर्व स्वागतासाठी गावागावांत लोक वेडे झाले आहेत. मास्तरांची ती विजयी मिरवणूक मालनच्या दारावरून पुढे जाते आहे. त्यांच्या गळ्यात जनांकडून मिळणाऱ्या फुलांच्या माळा आहेत, तर मालनच्या डोळ्यांत डबडबलेले अश्रू आहेत.

देशभक्त बर्डे गुरुजींच्या जीवनावरच ही कथा बेतली गेल्याचा अनेकांचा समज आहे. पण ही कथा येडेनिपाणीचे देशभक्त क्रांतिवीर पांडू मास्तर यांच्या भावजीवनाला अधिक जवळ जाते, असे अनेकांचे मत आहे.[१]

याच तुरुंगाच्या पार्श्वभूमीवरची परंतु अन्य कथासंग्रहांत प्रकाशित झालेली त्यांची 'दादा न्हावी' ही कथाही खूप उल्लेखनीय आहे. ''तुरुंगात तो कुरणात रेडा चरावा-फिरावा, तसा वावरत होता.'' दादा स्वभावाने भारी रगेल आणि खोडकर होता. कैद्यांचे केस कापण्याच्या त्याच्या प्रकाराचे वर्णन ''जसा धनगर आपलं मेंढरू ढेंगात धरून कराकरा भादरतो, तसा दादाचा वस्तारा चालू असायचा.'' अशा समर्पक उदाहरणाने अण्णा भाऊ करतात. अन्य वेळी जेलर हिंडावा, तशा थाटात दादा तुरुंगात फेरफटका मारायचा. तो जिभेचा खूप फाटका होता. त्याची पत्नीही पुढे एक छोटा गुन्हा करून तुरुंगात येते, तेव्हा मात्र तो चांगलाच टरकून जातो.

तेव्हा तो अमरावतीचा प्रदेश मध्यप्रांतात येत होता. मुंबई राज्याची तिथे हुकुमत चालत नव्हती. जवळपास दोन महिने अण्णांना तिथे सक्तीच्या कारावासात दिवस काढावे लागले. त्या अचानक उद्भवलेल्या कठीण काळात त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागायचे. तेव्हा आजच्यासारखे प्रगत दळणवळण नव्हते. फोनवर बोलणे करण्यासाठी दिवसदिवसभर थांबावे लागायचे. त्या काळात जेलमधून जयवंताबाईंच्या नावे अण्णा पत्रे लिहीत.[२]

अण्णा भाऊंच्या सुटकेसाठी नागपूरचे वकील जयवंत व कम्युनिस्ट नेते वर्धन यांनी तेव्हा खूप प्रयत्न केले होते. मध्यप्रांताचे मुख्यमंत्री श्री. शुक्ला यांना भोपाळपर्यंत जाऊन भेटून खूप पाठपुरावा करावा लागला होता.

जेव्हा वाटेगावला अण्णा भाऊंच्या मातोश्रींना, वालुबाईंना आपल्या मुलाला कसल्यातरी भयानक प्रकरणात तुरुंगात अडकवले गेले आहे हे समजले, तेव्हा ती माउली दु:खाने उन्मळून गेली. ''माझ्या तुकाचं नेमकं काय झालं?'' याची चौकशी करण्यासाठी त्या कऱ्हाडपासून मुंबईपर्यंत अनेकदा फेऱ्या मारत होत्या. दिसेल त्याला आपली व्यथा सांगत होत्या. असे अण्णांनीच एका कथेमध्ये लिहिले आहे.

कोर्टापुढे विठ्ठल नावाच्या एका निरागस पोराला पोलीस उभा करतात, जो न्यायदेवतेपुढे गळा फाडून ओरडतोय, ''मी कशाला होतोय माफीचा साक्षीदार? पोलीस मारझोड करून मला माफीचा साक्षीदार बनवायच्या प्रयत्नात आहेत.''

इथेच भुकेने वेडा झालेला 'सुलतान', 'भोमक्या' अशी पात्रे अण्णांना भेटली, खऱ्या अर्थी तो तुरुंग म्हणजे असा बथ्थड बिनाकाळजाचा, मनुष्याचा दगड बनवायचाच एक कारखाना. ते तिथले राकट आणि क्रूर चेहरे. कैद्यांना नग्न करून त्यांची घेतली जाणारी झडती. कांजी नावाचे प्यायला लागणारे फळकवणी. ही अजब दुनिया अण्णांनी शब्दबद्ध केली आहे. ''तुरुंगाच्या प्रचंड भिंती अंधारात बुडाल्या होत्या. नागमोडी गल्ल्या रोखून पहाऱ्यावरचे शिपाई उभे होते. त्यांच्या खांद्यावरच्या बंदुकांत मृत्यू आराम करत होता.'' अस्सल अनुभवाच्या गाथेतले हे गजाआडचे दमदार शब्द अण्णा भाऊंनी लिहून ठेवले आहेत. मराठी समीक्षकांना मायमराठीत कोणी असे अस्सल लिहिल्याची गंधवार्तासुद्धा नाही.

१. स्वातंत्र्यसैनिक बाबासाहेब पाटील यांची मुलाखत, वाटेगाव २० नोव्हेंबर २०२०
२. 'जीवनसंघर्ष अण्णा भाऊ व जयवंताबाईंचा' – सुबोध मोरे
३. 'नवती' कथासंग्रह अण्णा भाऊ साठे. पान क्र. ९१

*हा लेख विश्वास पाटील ह्यांच्या ह्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या 'अण्णाभाऊंची दर्दभरी दास्तान' ह्या पुस्तकातून घेतलेला आहे. त्यासाठी त्यांची परवानगी घेऊन ह्या विशेषांकात हा लेख प्रसिद्ध होत आहे.*

# अंदमानच्या छळछावणीचं झालं तीर्थक्षेत्र

**मंजिरी मराठे**
**कोषाध्यक्ष, स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई**

बिल्ला क्रमांक ३२७७८, अटकेचं वर्ष १९१०. मुक्ततेचं वर्ष १९६०.

५० वर्षांची आजन्म कारावासाची, काळ्यापाण्याची, दोन जन्मठेपेची शिक्षा.

बंदीवानाचं नाव होतं - विनायक दामोदर सावरकर. पण ही शिक्षा झाली होती मातृभूमीवर अलोट प्रेम केल्याबद्दल. त्यांच्या राष्ट्रभक्तीबद्दल, मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम केल्याबद्दल...

जुलै १९११ मध्ये वीर सावरकर वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी अंदमानच्या सेल्युलर कारागृहात पोहोचले. त्या कराल कारागृहाच्या जबड्यात शिरलेला बंदीवान सहसा जिवंत परत येत नाही अशी दुष्कीर्ती असलेल्या कारागृहातून सावरकर बाहेर पडणार होते ते पन्नास वर्षांनी. तारुण्याची, ऐन उमेदीची सारी वर्षंच नव्हे तर वयाच्या ७८ व्या वर्षापर्यंत त्यांना कारागृहात खितपत काढावी लागणार होती आणि तीदेखील 'सिल्व्हर जेल' नावाच्या पण अनेकांचा 'काळ' ठरलेल्या काळ्यापाण्यावर, अंदमानच्या छळछावणीत.

मुंबईतील डोंगरी, भायखळा अशा कारागृहातून

**अंदमानची ती छळछावणी पुढे पूर्णपणे बंद करण्यात आली. लाखो क्रांतिकारकांनी केलेल्या त्यागानं, बलिदानानं ब्रिटिशांना आपला देश सोडून जावं लागलं. आपला देश स्वतंत्र झाला. सेल्युलर जेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित झालं. आपल्याच आधीच्या पिढ्यांनी भोगलेल्या यातनांची थोडीतरी जाणीव झाली तरच आपण आज उपभोगतो आहोत त्या स्वातंत्र्याची किंमत आपल्याला कळेल. अंदमान हे आता पर्यटन स्थळ झालं आहे. सेल्युलर कारागृहदेखील छान रंगवलेले आहे. झाडाझुडुपांनी सजवलेलं आहे. त्यामुळे तिथलं गांभीर्य आता कमी झालं आहे.**



सावरकरांची रवानगी ठाण्याच्या कारागृहात करण्यात आली. तिथं आणल्या गेलेल्या सगळ्या जन्मठेपेच्या कैद्यांबरोबर सावरकर 'महाराजा' नावाच्या जहाजातून अंदमानला निघाले. पन्नास एक सराईत क्रूरकर्मे, अट्टल गुन्हेगार कोंबलेल्या पिंजऱ्यातून, अत्यंत गलिच्छ, कोंदट, कुबट वातावरणात सावरकरांच्या प्रवासाला सुरुवात झाली. डोक्याला डोकी, पाय भिडलेल्या अवस्थेत. अंघोळ करायची असते, दात घासायचे असतात, केस विंचरायचे असतात हेच माहीत नसलेल्या गदळ गुन्हेगारांबरोबर प्रवास करत होते लंडनमध्ये बॅरिस्टर झालेले, सुटाबुटात वावरलेले, सुसंस्कृत घरातले सावरकर. सावरकरांना ब्राँकायटिसचा त्रास असल्यामुळे गुदमरल्यासारखं वाटू लागल्यावर त्यांना पिंजऱ्यातल्या कोपऱ्यात बोटीला एक भोक होतं तिथं अंथरूण पसरायची परवानगी मिळाली. तेवढ्यात असह्य घाण सुटली. सावरकरांच्या लक्षात आलं की मलमूत्र विसर्जनासाठी जवळच एक पीप ठेवलेलं होतं आणि सर्व बंदीवानांना नाइलाजानं त्याचाच वापर करावा लागत होता. या सगळ्या घाणीची सवय असलेल्या एका अपराध्यानं त्यांना जागा बदलून देण्याचं औदार्य दाखवलं, पण आता आयुष्य असंच असणार याची जाणीव असलेल्या सावरकरांनी त्याच जागी थांबायचा निर्णय घेतला. काही दिवसांच्या जहाजावरच्या प्रवासानंतर सावरकर अंदमानला पोहोचले. दिवस होता ३० जून १९११.

खरं तर १७८९ पासूनच ब्रिटिशांनी बंदीवानांची वसाहत म्हणून अंदमानचा वापर सुरू केला होता. पण १७९६मध्ये रोगट हवामान आणि वाढत्या मृत्युदरामुळे ती वसाहत बंद



करण्यात आली. १८५७च्या स्वातंत्र्यसमरातील बंदीवानांचा इतर क्रांतिकारकांशी संपर्क येऊ नये म्हणून दूर अंदमानात पाठवण्यास सुरुवात झाली. त्या वेळी काहीच सोयी उपलब्ध नसल्यामुळे त्यांना वसाहतीत मोकळंच ठेवण्यात येत असे. रॉस बेटावर काही बरॅक्स होत्या. १८६४ ते १८६७ या काळात अंदमानातल्या वायपर बेटावर फाशीघर बांधण्यात आलं. त्या वसाहतीचा पहिला अधीक्षक डॉ. जेम्स पॅटीसन वॉकर हा इतका निर्दयी होता की, त्यानं एकाच दिवशी ८० स्वातंत्र्यसैनिकांना झाडांना लटकावून फाशी दिलं. त्यानंतर अंदमानात एक मोठी बंदी वसाहत निर्माण करायची जबाबदारी चार्ल्स जेम्स लाएल आणि ए. एस. लेथब्रीज यांच्यावर सोपवण्यात आली. त्या वसाहतीचं रूप भयाण भासावं, सर्व बंदीवानांना एकाच ठिकाणी ठेवून कठोर शिक्षा देता याव्यात यासाठी सेल्युलर कारागृहाची निर्मिती करण्यात आली. ऑक्टोबर १८९६ ते १९०६ या दहा वर्षांच्या कालावधीत केवळ पाच लाख सात हजार तीनशे बावन्न रुपयात सेल्युलर कारागृह उभं राहिलं. बंदीवानांचा एकमेकांशी संपर्क येणार नाही, ते एकमेकांना सहजी दिसणार नाहीत अशा पद्धतीनं प्रत्येक चाळीच्या दर्शनी बाजूसमोर दुसऱ्या चाळीची पाठची बाजू येईल, अशी कारागृहाची रचना करण्यात आली. मनोऱ्याच्या भोवती याप्रमाणे सात त्रितल चाळी बांधण्यात आल्या.

१९०९-१० पासून सावरकरांचे थोरले बंधू बाबाराव, जॅक्सन वधातील वामन जोशी, माणिक तोळा बॉम्ब प्रकरणातील उल्हासकर दत्त, इंदुभूषण रॉय तसेच सचिंद्रनाथ संन्याल, नानी गोपाल अशा अनेक राजकीय बंदीवानांना अंदमानला पाठवण्यात आलं.

सुरुवातीच्या काळात सगळ्या बंदीवानांना एकाच मजल्यावर एकत्र ठेवून काथ्या कुटून दोर वळण्याचं काम देण्यात येत असे. पण पाहणी करण्यासाठी कोलकात्याहून आलेल्या एका अधिकाऱ्याला बंदीवानांनी अशी हलकी कामं आणि तीदेखील एकत्र बसून करणं पटलं नाही. त्यानं संबंधित अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली आणि बंदीवानांच्या यम यातनांना सुरुवात झाली. त्यासाठी तिथं आणला गेला तेलाचा घाणा म्हणजेच कोलू आणि बैलांऐवजी बंदीवानांनाच कोलूला जुंपण्यात येऊ लागलं.

सावरकर अंदमानच्या किनाऱ्यावर उतरले पण हातापायात बेड्या असतानाही तिथल्या सृष्टी सौंदर्यानं ते हरखून गेले. संपूर्ण प्रवासात ज्याच्या दहशतीची चर्चा होती तो बारीबाबाचा सिल्व्हर जेल समोर दिसत होता. पण आजूबाजूचा अथांग सागर पाहून मात्र त्यांच्या डोळ्यांसमोर उभा ठाकला भारताच्या रक्षणासाठी सुसज्ज असलेला अंदमानच्या सिंधुदुर्गातला नौसेना तळ आणि तिथं पहारा देणाऱ्या स्वतंत्र भारताच्या अद्ययावत लढाऊ नौका. ५० वर्षांचा अंधकारमय कारावास या भव्य-भीषण भविष्याची तमा न बाळगता छत्रपती शिवाजी महाराजांचा हा चेला बघत होता भावी हिंदुस्थानची स्वप्नचित्र. अंदमान, निकोबार बेटं म्हणजे हिंदुस्थानची पूर्वेकडची द्वारं. या ठिकाणी आपल्या तीनही दलांचा जागता पहारा राहिला म्हणजे विदेशी शत्रूला तिथंच अडवता येईल हा विचारच त्यांचं द्रष्टेपण दाखवणारा आहे. त्यांचे हे विचार पूर्णत्वाने कृतीत उतरले ते मात्र नव्वद वर्षांनंतर २००१ मध्ये.

सावरकरांनी सेल्युलर कारागृहात प्रवेश केला. विविध प्रकारच्या हातकड्या, पायबेड्या, दंडाबेड्या या बंदीवानांच्या अलंकारांनी दारातल्या भिंती सजल्या होत्या. त्याही परिस्थितीत त्यांच्या ओठी होत्या, त्यांनी ब्रिक्स्टनच्या कारागृहात रचलेल्या 'मूर्ति दुजी ती' या कवितेच्या ओळी. सावरकर लिहितात, ती भीषणता माझ्याकडे टक लावून डोळे वटारून पाहत होती, मग मीही तिच्याकडे डोळे वटारून पाहू लागलो. हे धैर्य त्यांच्यात आलं कारण त्यांनी मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी जाणीवपूर्वक स्वीकारलेलं ते व्रत होतं.

*की घेतलें व्रत न हे अम्हि अंधतेने*
*लब्ध-प्रकाश इतिहास निसर्ग मानें*



*जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें*
*बुद्ध्याची वाण धरिलें करी हे सतींचे*

आणि म्हणूनच जेव्हा त्या गदळ वातावरणातल्या प्रवासातून आल्यावर सावरकरांना केवळ तीन कटोरे आणि तेही समुद्राच्या खाऱ्या पाण्याने उघड्यावरच अंघोळ करावी लागली तेव्हा ते मनाशी उद्गारले, ''इतके दिवस टर्किश बाथ अनुभवला आता अंदमानीश बाथ अनुभवूया!''

सावरकरांना सात क्रमांकाच्या चाळीतील तिसऱ्या मजल्यावरची कोपऱ्यातली कोठडी देण्यात आली. सावरकरांना ब्रिटिश इतके धोकादायक बंदीवान मानत होते की, त्यांच्या कोठडीच्या बाहेर आणखी एक लोखंडी दरवाजा लावण्यात आला होता. पहिले सहा महिने त्यांना एकांत कोठडी देण्यात आली. बंदीवानांना देण्यात येणारं एक काम म्हणजे नारळाचा छिलका कुटून त्यापासून दोरखंड वळण्याचं. छिलका कुटताना हात सोलून निघत, स्नायू दुखायला लागत, तळहाताला फोड येऊन रक्त गळत असे पण तरीही ते काम करावंच लागे. एक महिना छिलका कुटल्यानंतर दोन दोन महिने कोलूची शिक्षा देण्यात येत असे. सकाळी उठताच बंदीवानांना कोलुला जुंपलं जात असे. उखळीत खोबरं घातलं की कोलू फिरवणं जड होत असे. त्यातच जर खोबरं ओलं असेल तर ते अधिकच त्रासदायक होत असे. विशीच्या आतल्या चोर-दरोडेखोरांना कोलुला जुंपत नसत पण अगदी तरुण क्रांतिकारकांना मात्र ही सूट नसे. आठ तासांत ३० पाउंड म्हणजे सुमारे साडेतेरा किलो तेल काढावे लागे. दहा वाजेपर्यंत एकसारखं गरगर फिरत राहिल्यामुळे श्वास जड होत असे. बहुतेकांना चक्कर येत असे, तहान तहान होत असे, पण दिवसभरात दोन कटोरे पाणी पिण्याचाच नियम असल्यामुळे कितीही तहान लागली तरी पाणी मिळत नसे. काही वेळा तंबाखूची चिमूट देऊन अशी कामं करून घेतली जात. दहा वाजल्यापासून दोन तास तसेच रात्री काम बंद ठेवायचा नियम कोलूसाठी मात्र गुंडाळून ठेवण्यात येत असे. घाईघाईत जेवण उरकल्यावर पुन्हा कोलू फिरवावा लागे. सकाळपासून कमी तेल काढलं गेलं असेल तर कोलू फिरवता फिरवताच घास गिळावे लागत. अंगात ताप असो, रेच होत असोत, उलट्या होत असोत, कोलूतून



सुटका नसे. रेच, उलटीमुळे जमीन घाण झाली तर ते साफ तर करावंच लागे आणि त्याची शिक्षा म्हणून अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहिली जात असे, कोरडे ओढले जात असत. शिवाय आठ आठ तास खडा बेडीत लटकत राहण्यासारखी शिक्षाही दिली जात असे. सेल्युलर कारागृहातील आणखी एक अमानुष प्रथा म्हणजे नैसर्गिक विधीवर असलेली बंधनं. सकाळ, दुपार, संध्याकाळ व्यतिरिक्त शौचास जाणं हा तिथं अपराध मानला जात असे. संध्याकाळी सहा ते सकाळी सहा बंदीवान कोठडीत बंद असत. लघवीसाठी कोठडीत एक लहान मडकं ठेवलेलं असे. ते भरलं की कोठडीच्या कोपऱ्याचाच वापर करावा लागे. रात्री शौचास जायचं असेल तर वॉर्डरला हाक मारायची. आधी तो दुर्लक्षच करणार. लक्ष दिलंच तर तो शिव्या घालत उठणार, जमादाराकडे तक्रार करणार. त्याने परवानगी दिली तर डॉक्टरकडे जाणार. डॉक्टरला दया आली तर तो अवेळी परसाकडे जाण्याचं प्रमाणपत्र देणार. एवढे सगळे सोपस्कार पूर्ण होईपर्यंत दम निघाला नाहीतर बंदीवान नाइलाजानं विधीसाठी कोठडीचाच वापर करणार, पण हे सगळं बंदीवानांना इतकं लाजिरवाणं होत असे की स्वतःचाच तिटकारा वाटू लागे. पण एवढ्यावर हे संपत नसे. तर कोठडी घाण केली म्हणून पुन्हा शिव्यांनी उद्धार, लाथाबुक्क्या आणि शिक्षा होत असत. बहुतेक बंदीवानांना हा त्रास भोगावा लागे कारण तिथलं जेवण अतिशय निकृष्ट होतं. भाज्यांत पाली, सापांचे तुकडे असत तर कधी त्यात घासलेट पडलेलं असे, त्यामुळे त्यांना पोटाचे विकार जडत असत.

काही बंदीवानांना कामासाठी सेल्युलर कारागृहाच्या बाहेर पाठवत. कोलुतून मुक्तता मिळेल म्हणून अनेकजण बाहेरचं काम पत्करत, पण नंतर त्यांच्या लक्षात येत असे की कुठंही गेलो तरी छळातून, कष्टातून आपली सुटका होणार नाही. कोलूऐवजी जुंपलं जाणार आहे अधिकाऱ्यांच्या गाड्यांना, त्याशिवाय लांबवर विटा, ओझी वाहून नेण्याचं कामही करावं लागणार आहे. या सगळ्या छळातून सुटका करून घेण्यासाठी बंदीवान अघोरी उपाय करत, ताप येण्यासाठी मुळ्या घेत, हात पाय सडावेत म्हणून काहीबाही करत. निर्दयी काराधीप डेव्हिड बेरी बंदीवानांना छळण्याच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या शोधून काढत असे. याच साऱ्या त्रासाला कंटाळून इंदुभूषण रॉय यांनी आत्महत्या केली, उल्लासकर दत्त यांचं मानसिक संतुलन बिघडलं म्हणून त्यांना विजेचे झटके देण्यात आले. राजबंदीवानांना मिळणाऱ्या या अमानुष वागणुकीविरोधात उभा ठाकलेल्या अवघ्या सोळा वर्षांच्या नानी गोपालचा अतिशय छळ करण्यात आला. तो अंघोळ करत नाही म्हणून नारळाच्या छिलक्यानं त्याचं अंग रक्तबंबाळ होईपर्यंत घासण्यात आलं. त्यानं कपडे घालणं सोडलं तर त्याच्या अंगालाच कपडे शिवून टाकण्यात आले. त्यानं तेही फाडून टाकल्यावर त्याला बाहेरच थंडीत कुडकुडत ठेवण्यात आलं. त्यानं खाणं पिणं सोडल्यावर नाकात नळी खुपसून त्याला बळंबळं दूध देण्यात आलं. त्याला कोरडे ओढण्याची शिक्षा फर्मावण्यात आली. पण त्याचे वाईट परिणाम होतील हे लक्षात आल्यावर बॅरीनं त्याला दुसऱ्या ठिकाणी पाठवलं, तिथंही त्यानं अन्न सत्याग्रह चालूच ठेवल्यावर घाबरलेल्या बॅरीनं त्याला परत आणलं. असं हकनाक मरण पत्करू नको, अन्न ग्रहण केलं नाहीस तर मीदेखील अन्न सत्याग्रह करीन असं सावरकरांनी सांगितल्यावर अखेर नानीनं अन्न ग्रहण केलं. आपल्या देशासाठी जिवावर उदार झालेले क्रांतिकारक अगदी लहान वयातसुद्धा काय करू शकतात याचं नानी गोपाल हे मूर्तिमंत उदाहरण होतं.

अगदी सुरुवातीच्या काळातच एक दिवस कोलू फिरवून असह्य झाल्यावर सावरकरांनाही आत्महत्येचं आकर्षण वाटू लागलं. कशासाठी या यातना भोगतोस, तुझ्या या छळाबद्दल दूरदेशी कोणाला कळणारदेखील नाही. मग त्या सोसण्यानं परिणाम तरी काय साधेल, असं त्यांचं मन म्हणू लागलं. काही काळ तसाच गेला, पण अखेर विवेकानं मनावर विजय मिळवला. मरायचं तर फाशी घेऊन नाही तर हाती घेतलेले कार्य

करून मर, या विचारानं ते त्यातून बाहेर पडले. जे कार्य मी बाहेर राहून करणार होतो तेच आता कारागृहाच्या आत करायचं असा त्यांनी पुन्हा एकदा निश्चय केला. हळव्या मानसिक अवस्थेतून ते स्वतःच बाहेर आले नाहीत, तर आत्महत्येचा विचार असलेल्या अनेकांना त्यांनी त्यापासून परावृत्त केलं. अगदी सराईत अपराध्यांमध्येसुद्धा त्यांनी देशभक्ती, देशप्रेम रुजवलं. जगायचं ते देशासाठी ही भावना जागृत केली. त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण केली. त्यांना शिकवायला सुरुवात केली. प्रशासनाला आवेदनं देऊन पुस्तकांची मागणी केली, बंदीवानांना घरून पुस्तकं मागवायला सांगून पुस्तकांचं संग्रहालय बनवलं. बंदीवानांचं हे सारं शिक्षण लपत छपतच चालत असे. पण तरीसुद्धा सावरकरांनी अंदमान सोडलं त्यावेळी ऐंशी टक्के कैदी साक्षर झाले होते.

सावरकरांनी सेल्युलर कारागृहात केलेलं आणखी एक महत्त्वाचं काम म्हणजे हिंदी भाषेचा प्रसार. त्यामुळे हिंदी ही अंदमानची संपर्क भाषा झाली आणि पुढे जाऊन आपली राजभाषा.

हिंदू बंदीवानांना त्रास देण्यासाठी बॅरी मुद्दामच त्यांच्यावर मुस्लीम जमादारांची नेमणूक करत असे. दुसऱ्याच्या हातचं खाल्लं तर धर्म बुडतो या आपल्या खुळचट समजुतीमुळे बंदीवानांचं अगदी सहज धर्मांतर केलं जात असे. त्याला सावरकरांनी आणि त्यांचे ज्येष्ठ बंधू बाबाराव सावरकरांनी अटकाव केला. बळजबरीनं धर्मांतर झालेल्यांची शुद्धी केली. त्या दोघांनीही कैद्यांना आपल्यासाठी लढायला प्रेरित केलं. प्रसंगी सगळ्या कैद्यांनी आपल्या मागण्यांसाठी संपाचं हत्यार उपसलं, मुस्लिमांच्या नमाजाला, कुराण पठणांना मोकळीक होती पण हिंदूंना आपले धार्मिक ग्रंथ वाचायला बंदी होती. त्याविरोधात लढा देण्यात आला. आरे ला कारे, तुमची बांग तर आमचा शंख असे प्रत्युत्तर दिलं जाऊ लागलं.

सावरकर बॅरिस्टर होते. पन्नास वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी अंदमानात आले होते. त्यामुळे सगळेच बंदीवान त्यांना आदरानं बडे बाबू म्हणत असत. बॅरी त्यांच्यासमोर वरवर कितीही आवाज करत असला तरी तोही त्यांना वचकून असे, सावरकर नावाचंच वावडं असल्यामुळे ब्रिटिशांनी त्यांचे ज्येष्ठ बंधू गणेश दामोदर उपाख्य बाबाराव सावरकरांना राजद्रोहाच्या आरोपाखाली १९०९ मध्ये अंदमानात पाठवलं होतं, त्यांना अतोनात यातना देण्यात येत होत्या. तिथला छळ, कदान्न यामुळे त्यांची तब्येत बिघडली. त्यांना आमांश, रेच होत असत. पूर्वीच्या अर्धशिशीनंही डोकं वर काढलं होतं. वेदना असह्य झाल्या की ते अक्षरशः भिंतीवर डोकं आपटून घेत. पण बॅरी म्हणेल तोच आजारी हा दंडक असल्यामुळे बाबारावांवर योग्य उपचार झाले नाहीत आणि तेव्हापासून जडलेल्या अनेक विकारांनी त्यांना आयुष्यभर साथ दिली. बाबाराव सेल्युलर कारागृहात आहेत हे सावरकरांना माहीत होतं, पण आपला धाकटा भाऊदेखील इकडंच आला आहे हे बाबांना माहीत नव्हतं. बॅरीनं त्या दोघा भावांची भेट होऊ नये म्हणून खूप प्रयत्न केले. अखेर एका दयाळू वॉर्डरमुळे दोघांची भेट झाली. आपल्या धाकट्या अतिशय कर्तृत्ववान भावाला त्या दलदलीत पाहून बाबांना अतीव दुःख झालं. आपण हाती घेतलेल्या कार्याचं आता काय होणार असं त्यांना वाटलं. आपल्या या भावना त्यांनी चोरून पाठवलेल्या चिठ्ठीत व्यक्त केल्या. अंदमानात गेल्यापासूनच वीर सावरकरांचं मन आपल्या बंधूंच्या भेटीसाठी व्याकूळ झालं होतं. पण त्यांना सामोरं जाण्याचा धीर होत नव्हता. पण भावाला पाठवलेल्या प्रत्युत्तरात त्यांनी १९१०मध्ये लिहिलेल्या 'पहिला हप्ता' या आपल्या कवितेतल्या ओळी उद्धृत केल्या...

*सारथी जिचा अभिमानी । कृष्णजी आणि राम सेनानी ॥*
*अशी तीस कोटी तव सेना । ती अम्हां विना थांबेना ॥*

या शब्दांनी बाबांचं मन तर शांत झालंच पण सावरकरांनाही त्यांच्याच शब्दांनी त्यांचं डळमळणारं धैर्य जाऊन नवा उत्साह मिळाला. सावरकरांना १९२१ मध्ये त्यांच्या मुक्ततेपूर्वी काही दिवस तेल गोदामावर काम मिळालं. त्यांनी बंदीवानांना शिकवलं तसंच तेही त्यांच्याकडून उर्दू, पंजाबी, बंगाली शिकले. त्यांनी उर्दूत लिहिलेल्या गजलमध्ये 'पहिला हप्ता' या कवितेतल्याच भावना पुन्हा व्यक्त केल्या.

*हन्ता रावण का है अपना राम वीरवर सेनानी*
*कर्मयोग का देव है स्वयं कृष्ण सारथी अभिमानी*
*भारत तेरे रथ को कौन रोकनेवाली है*
*फिर देर क्यों उठो भाई हम ही हमारे वाली हैं ॥*

सावरकरांनी म्हटल्याप्रमाणं ते नसले तरी त्यांचं कार्य पुढं चालू राहणारच होतं. पण तरीसुद्धा कारागृहात खितपत पडून स्वातंत्र्य मिळणार नाही. कारागृहातून सुटका करून घ्या आणि बाहेर पडून पुन्हा नव्या जोमाने कामाला लागा हे त्यांचं सांगणं होतं. त्यामुळे त्यांनी स्वतःच्या आणि इतर सर्वच राजबंद्यांच्या मुक्ततेसाठी आवेदनं केली. त्यानुसार वेळोवेळी अनेकांची मुक्तता झाली. सावरकरांप्रमाणेच आवेदन देऊन मुक्त झालेल्या सचिंद्रनाथ संन्याल यांनी पुन्हा आपलं क्रांतिकार्य सुरू केलं आणि काकोरी कटात पकडले जाऊन ते पुन्हा अंदमानात आले. अंदमानात असूनही तरुणांना क्रांतिकार्यासाठी प्रेरित करण्याच्या सावरकरांच्या कार्यात खंड पडला नाही. संन्याल यांच्याप्रमाणेच बारिन घोष, भाई परमानंद, पृथ्वी सिंह आझाद अशा अनेकांनी

अंदमानातल्या आपल्या आठवणी सांगितल्या आहेत. त्या वाचल्यावर आपण जे स्वातंत्र्य उपभोगतो आहोत त्यासाठी सहस्रावधी क्रांतिकारकांनी किती हालअपेष्टा सोसल्या ते लक्षात येतं.

सावरकर आणि इतर सर्व क्रांतिकारकांना राजबंदी म्हणायलाही बॅरी तयार नसे. राजबंद्यांना मिळणारे अधिकार डावलायचे असले की तो त्यांना सामान्य बंदी म्हणत असे आणि सामान्य बंदीवानांना मिळणारे अधिकार क्रांतिकारकांना द्यायचे नसले तो त्यांना राजबंदी ठरवत असे. त्यामुळेच पाच वर्षानंतर आपल्या कुटुंबाला भेटण्याचा अधिकार सावरकर बंधूंना मिळाला नाही. त्यांना आपल्या कुटुंबाची भेट घेता आली ती आठ वर्षांनंतर. तोपर्यंत बाबारावांची पत्नी यशोदा (येसू वहिनी) आपल्या नवऱ्याच्या भेटीची आस लावून बसल्या होत्या. भेटीची परवानगी मिळाली त्याच्या आधी दोनच दिवस त्या हे जग सोडून गेल्या होत्या.

बाबारावांचा स्वभाव मुळातच सोशिक होता. पण त्यांचं धैर्य टिकून राहिलं ते योगाभ्यासाच्या जोरावर. बाबा रात्री गीता, योगवासिष्ठ अशा अनेक ग्रंथांतले उतारे आठवून त्यात मन रमवत आणि सकाळी उठून होणाऱ्या छळाला सामोरं जात. महाकाव्य म्हणजे काय हेही माहीत नव्हतं, त्या बालवयातच वीर सावरकरांनी महाकाव्य रचण्याचं स्वप्न रंगवलं होतं. मुंबईत डोंगरीच्या कारागृहात असताना त्यांनी निश्चय केला की, शिक्षेच्या पंचवीस वर्षांत एकतरी महाकाव्य रचायचं. पण त्यांची शिक्षा आणखी पंचवीस वर्षांनी वाढवल्याचं कळल्यावर त्यांनी ठरवलं जे काम ते पंचवीस वर्षं करणार होते तेच आता पन्नास वर्षं करायचं आणि त्यांच्या लेखनाला सुरुवातही झाली. लिहायला कागद, लेखणी अशा सुखसोयी नव्हत्या त्यामुळे त्यांनी भिंतींचा कागद आणि खिळ्याची लेखणी आणि त्यावर लिहिलं सहस्रावधी ओळींचं काव्य. त्यांनी ते काव्य मुखोद्गत केलं, सुटका होणाऱ्या बंदीवानांनी ते पाठ केलं आणि त्यांच्याकडून सावरकरांचे धाकटे बंधू नारायणराव यांनी लिहून घेतलं आणि नंतर प्रसिद्ध केलं.


सेल्युलर कारागृहातली भयंकर एकांत कोठडी, त्यांच्या कोठडीच्याच खाली फाशीघर. त्यांच्याच चाळीच्या तळमजल्यावर फाशी जाणाऱ्या बंदीवानांना काही दिवस ठेवण्यात येत असे. त्यांचं रात्रंदिवस विव्हळणं, तिथल्या यमयातनांना कंटाळून कोणी जीव दिला आहे, कोणी जीव द्यायच्या विचारात आहे, कोणी भ्रमिष्ट झालं आहे. फटक्यांचे, मारहाणीचे आवाज, किंकाळ्या यांनी कारागृह भरून गेलं आहे अशा परिस्थितीत सावरकरांना काव्य कसं सुचलं असेल? ते लिहितात, माझे हात पाय यंत्राप्रमाणे ते करत असताना माझं मन मात्र सर्वांचा डोळा चुकवून, सागर महासागर उल्लंघित, दऱ्याखोऱ्यातून भटकत फुलाफुलांतून फिरणाऱ्या भ्रमराप्रमाणं फक्त मधुमय वस्तूंचा आस्वाद घेत फिरत राहत आणि नंतर कविता जन्म घेते. प्रत्येक रात्री कारागृहाची बंधनं तोडून नगरानगरांतून शिखरांवरून स्वैरभ्रमण करीत सुटतो. तुमच्यासारखा कोणी सुहृद भेटेपर्यंत माझं भ्रमण सुरू असतं. अशाच त्यांच्या मनाच्या भ्रमंतीतून सहस्रावधींचं काव्य जन्माला आलं. हे सहजसाध्य नव्हतं. त्यांनी कमावलं होतं योगाभ्यासातून.

अंदमानातून २ मे १९२१ला सावरकर बंधूंची मुक्तता झाली. त्यांचा परतीचा प्रवासही महाराजा बोटीतूनच झाला. पण यावेळी त्यांच्याबरोबर होते ते मानसिक संतुलन बिघडलेले कैदी. आठ-दहा दिवस त्यांना अलीगडच्या कारागृहात ठेवण्यात आलं. तिथून दोन बंधूंची ताटातूट करण्यात आली. बाबारावांना विजापूरच्या कारागृहातील एकलकोंडीत ठेवण्यात आलं. अंदमानात निदान बंदीवान दृष्टीस तरी पडत होते, कधीतरी भेटत होते. पण आता त्यांना नेऊन टाकलं ते वर्षानुवर्षं सारवण न केलेल्या, उकरलेल्या मातीचे ढिगारे साचलेल्या, ओसाड, कोंदट कोठडीत. शेजारी दोन रिकाम्या कोठड्या. खिडकीबाहेर कारागृहाचा उंच तट, त्यामुळे कोठडीतून आकाशदेखील दिसणं अशक्य. डास, ढेकूण, पिसवा आणि विंचवांच्या साथीनं, तब्येत अजिबात साथ देत नसताना, योग्य उपचाराविना, चक्कीचं, वेत वळण्याचं काम करत बाबारावांनी तिथे आठ महिने काढले. त्यांचे धाकटे बंधू नारायणराव यांनी त्यांच्या छळाला वाचा फोडल्यावर त्यांना साबरमतीच्या कारागृहात बंद करण्यात आलं. तिथंही एकांतवास होताच पण सुविधा मिळत होत्या. बाबांची प्रकृती बरीच बिघडल्यावर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. रुग्णशय्येवरूनही त्यांनी धर्मांतर रोखणं, चुकीच्या मार्गावर जाणाऱ्या बंदीवानांचं मतपरिवर्तन करणं असं आपलं कार्य सुरू ठेवलं. तिथल्या सिव्हिल सर्जननं, बाबा, आता एक-दोन दिवसाचे सोबती आहेत असं सांगितल्यावर मात्र ब्रिटिशांचं धाबं दणाणलं आणि आसन्नमरण अवस्थेतल्या बाबांना तेरा वर्षं शिक्षा भोगल्यानंतर, सप्टेंबर १९२२ मध्ये पूर्णपणे मुक्त करण्यात आलं. पण त्यानंतरही त्यांनी आपल्या आयुष्याच्या अंतापर्यंत (१९४५) तब्येत तोळामासा असतानासुद्धा अनेक क्रांतिकारकांना साहाय्य केलं, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उभारणीत मोलाची कामगिरी केली आणि आपल्या लिखाणातून समाज प्रबोधन केलं.

वीर सावरकरांना रत्नागिरीच्या कारागृहात पाठवण्यात

आलं. अंदमानात निदान शेवटी शेवटी तरी काही सुविधा मिळू लागल्या होत्या पण आता नव्या ठिकाणी पुन्हा नव्यानं सुरुवात होती. अंदमानात नैसर्गिक विधीवरच बंधनं होती, तर रत्नागिरी कारागृहात आणखीनच विचित्र प्रथा होती. सहा-सात बंदीवानांना एकदम शौचाला पाठवलं जात असे; मध्ये आडपडदा नाही की वर उनपावसापासून संरक्षणासाठी छप्पर नाही आणि पाणीही बरोबर न्यायचे नाही तर सगळ्यांनी उठून दूरच्या नळावर जाऊन स्वच्छता करायची. इथंही पुन्हा एकदा त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार आला पण ते त्यातून मनोनिग्रहानं बाहेर पडले. पुढे सहबंदीवानांच्या प्रयत्नानं त्यांनी कारागृहात सुधारणा घडवून आणल्या. अशिक्षित बंदीवानांचं शिक्षण, धर्मांतर रोखणं, धर्मांतरितांची शुद्धी, हिंदी भाषेचा पुरस्कार असं अंदमानात हाती घेतलेलं प्रत्येक कार्य सावरकरांनी रत्नागिरीतही केलं.

सुरुवातीला तिथं पुस्तकं, लेखन साहित्य मिळत नव्हतं त्या काळात त्यांनी 'माझी जन्मठेप' ही आपल्या कारावासाची कथा मनातच लिहायला सुरुवात केली. काही टिपणं तिथल्या चिऱ्यांवर कोरून ठेवली. अंदमानात अपुऱ्या राहिलेल्या कविता त्यांनी पूर्ण केल्या, पूर्वीच्या संकलित केल्या आणि मुख्य म्हणजे हिंदू शब्दाची व्याख्या निश्चित करून 'हिंदुत्व' हा ग्रंथ साकारला. रत्नागिरीहून सावरकरांना येरवडा कारागृहात हलवण्यात आलं आणि जानेवारी १९२४ पासून रत्नागिरीतच स्थानबद्ध करण्यात आलं. राजकारणात भाग घ्यायचा नाही आणि पाच वर्षांची स्थानबद्धता या त्यांच्यावर लादलेल्या अटी ब्रिटिशांनी १३ वर्षांपर्यंत वाढवत नेल्या आणि



१९३७मध्ये सावरकरांची पूर्णपणे मुक्तता झाली. त्यानंतर देशाचं स्वातंत्र्य, त्याची प्रगती आणि उन्नती यासाठी कार्यरत राहून १९६६ मध्ये या जगाचा निरोप घेतला.

आपल्या आयुष्यातील ऐन उमेदीची २७ वर्षं स्वातंत्र्यवीर सावरकरांनी शिक्षा भोगली. सावरकर समोर असताना एकदा डेव्हिड बॅरीनं मुद्दाम इतर बंदीवानांचा अपमान केला. तेव्हा सावरकर त्यांना म्हणाले होते, ''आज या जगतात आपला अपमान होतो आहे. पण असाही एक दिवस येईल की, अंदमानच्या याच कारागृहात राजबंदीवानांचे पुतळे उभारले जातील आणि येथे हिंदुस्थानचे राजबंदीवान राहत असत म्हणून हजारो लोक यात्रेस लोटतील.'' आणि खरोखरच सावरकरांचे हे शब्द अक्षरशः खरे ठरले आहेत. या देशावर प्रेम करणाऱ्या प्रत्येकासाठी अंदमान हे तीर्थक्षेत्र आहे आणि सेल्युलर कारागृहासमोर काही राजबंदीवानांचे पुतळेही उभारले गेले आहेत.

अंदमानची ती छळछावणी पुढे पूर्णपणे बंद करण्यात आली. लाखो क्रांतिकारकांनी केलेल्या त्यागानं, बलिदानानं ब्रिटिशांना आपला देश सोडून जावं लागलं. आपला देश स्वतंत्र झाला. सेल्युलर जेल राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित झालं. आपल्याच आधीच्या पिढ्यांनी भोगलेल्या यातनांची थोडीतरी जाणीव झाली तरच आपण आज उपभोगतो आहोत त्या स्वातंत्र्याची किंमत आपल्याला कळेल. अंदमान हे आता पर्यटन स्थळ झालं आहे. सेल्युलर कारागृहदेखील छान रंगवलेले आहे. झाडाझुडुपांनी सजवलेलं आहे. त्यामुळे तिथलं गांभीर्य आता कमी झालं आहे. त्यामुळं तिथं गेलेल्या प्रत्येकानं अगदी मधुचंद्राला गेलेल्या जोडप्यांनीसुद्धा निदान सेल्युलर कारागृहात गेल्यावर तरी भान ठेवायला हवं की, इथंच असे अनेक इंदुभूषण रॉय होऊन गेले ज्यांनी आपल्या आजच्या स्वातंत्र्यासाठी असहनीय यातना सहन न होऊन गळफास जवळ केला. अनेक उल्लासकर दत्त होऊन गेले जे इथं आले ते पुढच्या पिढ्यांच्या सुखासाठी पण छळ असह्य होऊन ज्यांना वेड लागलं. हीच ती जागा आहे जी नानी गोपाल, भानसिंग, ज्योतीशचंद्र पाल अशा सहस्रावधींच्या किंकाळ्यांनी भरून जात होती.... म्हणूनच लक्षात ठेवायला हवेत बाबाराव सावरकरांचे शब्द...

*ये तीर्थ है महातीर्थों का, मत कहो इसे कालापानी*
*तुम सुनो यहां की धरती के कणकण से गाथा बलिदानी ॥*



टोल फ्री नं. १८०० २३३ ५००५ (सकाळी ११ – संध्याकाळी ७) www.pngjewellers.com I info@pngadgil.com
INDIA I USA I UAE

# कहाणी ‘कर्मयोग्या’च्या कारावासाची!

**पार्थ बावस्कर**
लेखक, व्याख्याते, इतिहास अभ्यासक

**एक जबाबदार पत्रकार आणि नेता म्हणून टिळक जनतेला या रोगाबद्दल जागृत करत होते, पण सरकारचा जुलूम वेगळ्याच पातळीवर पोहोचला होता. गोरे सोजीर घराघरांत घुसून आयाबहिणींवर तपासणीच्या नावाखाली हात टाकत होते. घराघरांतल्या लक्ष्मीची अब्रू अशी दिवसाढवळ्या लुटली जात होती. रोग नवा होता, त्याचा प्रतिकार कसा करायचा हे लोकांना माहीत नव्हते, तरुण पोरे मरत होती. संसार उघडे पडत होते. पुण्यात रॅन्डशाही माजली होती.**

सासवडच्या सरकारी शाळेत मराठीचा तास सुरू होता. महादेवराव सुभेदार मास्तर पोरांना शिकवत होते, त्यांना बातमी समजली.

‘‘लोकमान्य टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची शिक्षा झाली आहे आणि आता त्यांची रवानगी मंडालेत होणार!’’

मास्तरांच्या पायाखालची जमीनच सरकली. मास्तर हादरले. पोरांना समजेल अश रीतीने अत्यंत दु:खाने सद्गदित आवाजात त्यांनी ही बातमी सांगायला सुरुवात केली, आणि सांगता सांगता मास्तर हमसून हमसून रडूच लागले. ते पाहून पोरांच्या डोळ्यांतून धारा वाहू लागल्या. मास्तर कसेबसे सावरले आणि शाळा सुटल्यावर त्यांनी गावातील मंदिरात मुलांना जमायला सांगितले. शाळा सुटली, पोरे एखाद्या बाणासारखी मंदिराच्या दिशेने धावली. गंभीरपणे आणि अतिशय स्फूर्तिदायी शब्दांत मास्तरांनी पोरांना टिळकांचे सगळे चरित्र सांगायला सुरुवात केली. पोरांच्या हृदयालाच त्यांनी हात घातला, शेवटाला आल्यावर भयकंपित स्वरात मास्तरांनी सगळ्यांना विचारले,

‘‘टिळक देशासाठी तुरुंगात गेले, ते आता सहा वर्ष तुरुंगात खडी फोडणार! तुम्ही त्यांच्यासाठी आणि या आपल्या मातृभूमीसाठी काय करायला तयार आहात?’’

पेटलेली पोरे म्हणाली, ‘‘मास्तर, तुम्ही सांगाल ते आम्ही करू!’’

पोरांच्या डोक्यावर विलायती टोप्या होत्या. मास्तर म्हणाले, ‘‘मग आपापल्या डोक्यावरच्या विलायती टोप्या द्या फेकून इथे आणि पेटवा त्यांची होळी!’’

पोरांनी एकाएकी डोक्यावरून टोप्या काढल्या आणि जमिनीवर फेकल्या. ‘टिळक महाराज की जय’ म्हणत पुढच्याच क्षणी सगळ्या विलायती टोप्या जळून भस्म झाल्या. हा जयघोष करताना पोरांची मने पेटत्या होळीपेक्षा जास्तच पेटली असतील!

पुढे, पोरांच्या घरी ही बातमी समजल्यावर व्हायचे ते झालेच. जागरूक पालकांनी सभा भरवली आणि महादेव सुभेदार मास्तरांना गावातून ताबडतोब हद्दपार केले. दुसऱ्या दिवशी पोरे सकाळी उठली तेव्हा मास्तर गाव सोडून निघून गेलेले होते. पोरांच्या मनावर वज्राघातच झाला. दिवसभर पोरे शाळेत न जाता संगमेश्वरच्या देवळात मास्तरांच्या आणि टिळकांच्या आठवणीत आसवे गाळीत बसली. दुसऱ्या दिवशी शाळेच्या दारापाशी पोरांना अडवले गेले आणि कालच्या गैरहजेरीचा प्रसाद म्हणून छडीचे जोरदार फटके मारले गेले. यापैकी एक पोरगा मनाशी स्वत:लाच म्हणाला, ‘‘देशासाठी टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगणार. मग आम्हाला टिळकांसाठी छडीचा एकेक फटका खायला काय हरकत आहे?’’ हा पोरगा होता, अत्र्यांचा बाबू! होय, आता महाराष्ट्र त्यांना आचार्य अत्रे म्हणून ओळखतो!

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक या माणसामुळे भारतात असे अनेक चमत्कार घडले. टिळकांचे नेतृत्वच सर्वव्यापी होते. ते तुरुंगात गेले की लोकांना घरातला आपला कुणी नातेवाईक आपल्याला सोडून दूर दूर गेलाय असेच वाटत असे. तो काळ तसाच होता. मायभूमीसाठी प्राण पणाला लावणारे देशभक्त तुरुंगात जात आणि लोकांची त्यांच्यावर अपार माया असे.

टिळकांच्या वाट्याला आलेली ही राजद्रोहाची दुसरी शिक्षा. या आधी दोन वेळा टिळकांचा तुरुंगमुक्काम झालेला

होता. पहिली शिक्षा होती अगदी सुरुवातीला 'केसरी मराठा' सुरू केला तेव्हाची. प्लेगच्या काळात चाफेकर बंधूंनी रॅन्डची हत्या केली. त्याचा संबंध टिळकांच्या केसरीमधील लेखनाशी इंग्रजांनी लावला. त्यानंतर झालेला तुरुंगवास दुसरा. पुढच्या वेळी मात्र टिळकांवर पुन्हा एकदा राजद्रोहाचे कलम लावून त्यांना थेट पाठवून दिले ब्रह्मदेशी, मंडालेला!

केसरी मराठाचे ते होते सुरुवातीचे दिवस. माधवराव बर्वे हे त्यावेळी कोल्हापूर संस्थानाचे कारभारी होते. तेव्हाचे कोल्हापूरचे महाराज जे छत्रपतींच्या गादीवर बसवलेले होते, ते होते दत्तकपुत्र. त्यांचा छळ हे माधवराव बर्वे करतात, महाराजांना जणू वेडे ठरवण्याचा त्यांचा डाव आहे अशा चर्चांना तेव्हा उधाण आलेले होते. छत्रपतींचे घराणे म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता जणू! त्यांच्या बाबतीत हा असा प्रकार सहजासहजी खपवून घेतला जाणारा नव्हता, त्यामुळे केसरी मराठासह त्यावेळी सगळी वर्तमानपत्रे या माधवराव बर्व्यांच्या विरुद्ध लिहून त्यांचे प्रकार उघडकीस आणत होती. दरम्यान कोल्हापुरातीलच एकाच्या मदतीने टिळक-आगरकरांना बर्व्यांनी लिहिलेली काही पत्रे सापडली. पत्रे देणारा माणूस विश्वासातला होता, त्यामुळे त्यांनी ती पत्रे आपल्या वर्तमानपत्रात छापली. दुर्दैवाने ही पत्रे अस्सल नव्हती. बर्व्यांनी दावा केला की ही पत्रे माझी नाहीतच. ते थेट कोर्टात गेले, त्यांनी तसे सिद्ध केले, ''ही पत्रे माझी नाहीत!''

बेसावधपणातून का होईना या तरुण संपादकांकडून गुन्हा घडला होता. त्याबद्दल त्यांनी माफी मागितली. त्यांना इतकेच वाटत होते की बर्व्यांमुळे महाराजांची आबाळ होऊ नये.




**डोंगरीच्या तुरुंगातील याच खोलीत टिळक आणि आगरकर १०१ दिवस होते. हा त्यांचा पहिला कारावास.**

छत्रपतींच्या इभ्रतीला धक्का पोहोचू नये. तरीसुद्धा टिळक आणि आगरकरांना चार महिन्यांची शिक्षा सुनावली गेली. पुढे त्यांच्या चांगल्या वागणुकीमुळे शिक्षा कमी करून १०१ दिवसांची झाली. टिळक आणि आगरकर यांच्या वाट्याला आलेला हा पहिला तुरुंगवास!

'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' या पुस्तकात आगरकरांनी केलेल्या नोंदी फार महत्त्वाच्या आहेत. आगरकर म्हणतात, ''आमची समजूत अशी होती की देशाच्या बऱ्यासाठी, हितासाठी आम्ही हे उद्योग सुरू केले आहेत. करवीरस्थ प्रभूंचे चांगले व्हावे म्हणून आम्ही हे लेख लिहिले खरे, पण खटला उभा राहिल्यावर मला आणि बळवंतरावांना, शिवाय आमच्या मित्रमंडळींना बरीच यातायात करावी लागली.''

गेल्या चार-पाच वर्षांपासून टिळक आणि आगरकर लोकहिताच्या योजना आखत होते आणि त्यासाठी झटत होते. सुरुवातीलाच हा असा प्रसंग गुदरला, तेव्हा काय चलबिचल सुरू असेल या दोघांच्या मनात तेव्हा? आगरकरांच्या या ओळी पहा, ''कित्येकदा बळवंतरावांनी आणि मी रात्रीच्या रात्री त्या कोठडीत जागून काढल्या. मला चांगलं आठवतंय, शाळा आणि छापखाना काढला त्या वेळी कोणकोणत्या लोकांनी आम्हाला मागे ओढलं होतं, असल्या फंदात पडू नका असाच सल्ला दिला होता अनेकांनी. आपण कोणत्या हेतूने या सगळ्याची सुरुवात केली आणि ते ध्येय गाठताना आता आपण कुठे पोहोचलोय, याच्या चर्चा बळवंतराव आणि मी करत असू. मोठ्या धाडसाने आम्ही यात पडलो खरे, पण शास्त्रीबोवांच्या अकाली मृत्यूने आम्हाला केवढा धक्का बसला होता तेव्हा. आम्ही आरंभलेली कामे आमच्या हयातीत आणि नंतर आम्ही नसतानासुद्धा अखंड सुरू राहिली तर आमच्या देशस्थितीवर त्याचा काय परिणाम होईल? आम्ही सुरू केले तसे लोकशिक्षण जर भारतभर पसरत गेले तर हिंदुस्थानची भावी स्थिती काय होईल? या कल्पनेत आम्ही रमून जात असू. सध्या हा देश इंग्रजांच्या ताब्यात आहे, त्याचे फायदे तोटे काय आहेत, याचाही विचार सतत मनात येत असे. नेटिव संस्थानांची सुधारणा होण्यास काय उपाय करावे? देशभाषा युनिव्हर्सिटीत आणण्याला कोणती युक्ती काढावी? शाळा आणि कॉलेज बांधण्यास पैसे कसे गोळा करावेत? याची चिंता आम्हाला असे. कोल्हापूर प्रकरणात आपली चूक किती आणि आपल्याला भोगावी लागत असलेली शिक्षा कितपत न्याय्य आहे, आपण या तऱ्हेने येथे अडकून राहिल्याने लोकांच्या मनावर काय परिणाम होईल व आपल्या शाळेचे आणि छापखान्याचे किती नुकसान होईल? आणीबाणीच्या प्रसंगी आपणास कोण कोण मित्र उपयोगी पडले व पुढे कोणा

कोणाच्या मदतीवर व शब्दावर अवलंबून राहता येईल? पुन्हा अशा प्रकरणामुळे तुरुंगात न येण्यासाठी कोणत्या गोष्टीची खबरदारी घेतली पाहिजे, आणि वेळ आलीच तर काय तयारी असली पाहिजे? हे भविष्यवेधी प्रश्न बळवंतरावांना आणि मला भेडसावत. अशा नाही नाही त्या विषयावर आमचा एवढ्या जोराने वाद चाले की, आसपासचे शिपाई 'हळू बोला-हळू बोला' असा इशारा करीत आणि बोलता बोलता रात्र निघून जाई.''

देशहिताचे कार्य हाती घेतल्यावर टिळक-आगरकर लोकजागरणाचा विचार किती निरनिराळ्या पद्धतीने करत होते नाही! खरे तर टिळक-आगरकर संबंध म्हणजे अनेक दिग्गजांकडून सांगितले जाणारे महाराष्ट्रातील टोकाच्या वैचारिक विरोधाचे लोकप्रिय उदाहरण, पण इथे दिसतो टिळक-आगरकरांच्या मैत्रीपर्वाचा सर्वोतम काळ!

लोकांना टिळक-आगरकरांची बाजू समजली होती. हे दोघे निस्पृह आहेत हेही पटले होते. ज्ञानप्रकाश, इंदूप्रकाश, इंडियन स्पेक्टेटर, जगदादर्श, भडोच समाचार, गुजराती, जाम-ए-जमशेद, रास्त गोफ्तार ही वृत्तपत्रेसुद्धा सांगत होती की, टिळक-आगरकरांना केवळ समज देऊन सोडायला हवे होते, त्यांना शिक्षा देण्याची काहीच जरुरी नव्हती. रावसाहेब मांडलिक आणि प्रि. वुड्सवर्थ यांनी टिळक-आगरकरांच्या सुटकेसाठी जेम्स फर्ग्युसन यांच्याकडे पीटीशन दाखल करून या दोघांची शिक्षा माफ व्हावी अशी विनंती केली होती. पण दयाळू ब्रिटिश सरकार कशाला यांचे ऐकेल?

लोकशक्तीचे प्रयत्न मात्र अधिक जोमाने सुरू झाले. माधवराव नामजोशी व बडोद्याचे 'नाट्यार्णव' कर्ते शंकर मोरो रानडे यांनी खटल्यासाठी निधी गोळा करताना लोकांमध्ये पेटी फिरवून चारशे रुपये गोळा केले. तेव्हाच्या नाटकमंडळ्यांना आपापल्या लोकप्रिय नाटकाचे प्रयोग करायला सांगून रानडे यांनी खटल्यासाठी पैसे मिळवले. पुढे रानडे-टिळक संबंध जवळचे होते असेच आढळते. अगदी रानड्यांच्या मृत्यूनंतरही टिळक त्यांच्या कुटुंबाला पैसे पुरवत असे उल्लेख मंडालेहून लिहिलेल्या पत्रात सापडतात. टिळक-आगरकरांच्या कार्याने प्रभावित झालेले मुंबईचे यशवंत विष्णू उर्फ अण्णासाहेब नेने स्वतः जामीन राहायला पुढे झाले. ज्योतिबा फुल्यांच्या आग्रहावरून रामशेठ उरवणे हेही यासाठी पुढे झाले होते. न्यू इंग्लिश शाळा आणि डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पैसे जमवले. पुणे, मुंबईत सभा भरून जाहीर वर्गण्या जमा झाल्या, तिकडे कोल्हापुरात राजाराम कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी नाटक बसवले आणि त्यातून येणारा निधी टिळक-आगरकरांच्या खटल्यासाठी देणार असे जाहीर केले. या नाटकात तिथल्याच एका गोऱ्या-गोमट्या तरुणाने 'स्त्री' पात्राची भूमिका साकारली. त्या तरुणाला आज आपण नामदार गोपाळ कृष्ण गोखले म्हणून ओळखतो.

अवघ्या पंचविशीच्या वयात या दोघा संपादकांनी दाखवलेल्या धडाडीमुळे लोक या दोघांवर बेहद खूश होते. 'दीनबंधू' वृत्तपत्रात उल्लेख आढळतो ''अन्यायाने या उभय होतकरूंस कारागृह प्राप्त झाले आहे तर त्यांच्या मनातून सजेविषयी तिळमात्र न राहू देण्याकरिता, ते सुटतील तेव्हा त्यास मानपत्र द्यावे व तुरुंगातून सुटतेवेळेस एका मोठ्या रथात त्यांना बसवून वाजत गाजत इच्छिलेले स्थळी पोचवावे. असे करण्यास आम्ही मुखत्यार आहो.'' लोकमानस असा असला तरी टिळक-आगरकरांच्या वतीने केसरीने मोठ्या विनयाने लिहिले, ''आमच्या हातून हा सन्मान मिळवण्याजोगे काही झालेले नाही, लोकांनी सन्मान देण्याची इच्छा दाखवली हेच पुरेसे आहे. आम्हाला मिरवण्याची गरज वाटत नाही.''

टिळक-आगरकरांची सुटका वाजत गाजत झाली. त्याचा केसरीतील वृत्तांत फार थोडा आहे. आपले कौतुक आपणच काय करायचे! दि. २२ ऑक्टोबरच्या 'नेटिव ओपिनियन'च्या अंकातील वर्णन वाचा - ''टिळक-आगरकरांची सुटका होण्याची बातमी अगोदर शहरात सर्वत्र पसरली त्यामुळे तुरुंगाच्या बाहेर मित्रमंडळींची व लोकांची अतिशय गर्दी झालेली होती. जमलेल्या लोकांनी टिळक-आगरकर यांच्या गळ्यात घालण्याकरिता हारतुरे, गजरे वगैरे आणले होते, शिवाय जमलेल्या लोकांस वाटण्याकरिता पेढे, विडे, अत्तर वगैरे सामानही आणण्यात आले होते. सुटका होण्याच्या अगोदर सुमारे पाचचार मिनिटे चारपाच माणसे बसण्यासारखी उघडी गाडी तुरुंगात नेण्यात येऊन तीत बसवून आणिले व तुरुंगातून गाडी बाहेर पडताच गळ्यात हार घालणे वैगेरे समारंभ झाला... बाहेर आल्यावर एका गाडीत रा. टिळक व एका गाडीत रा. आगरकर याप्रमाणे बसवून पानसुपारी व पेढे वाटणे सुरू होऊन गाड्या उत्तर दिशेने निघाल्या.....रस्त्याच्या दुतर्फा घरांच्या व दुकानांच्या ओट्यांवरून व खिडक्यांमधून लोकसमुदाय यांच्याकडे पाहात असून तुरुंगातून मुरारजींच्या बंगल्यापर्यंत ५००-६०० लोक त्यांच्यासोबत आले होते. कित्येक लोकांनी आपल्याला झालेला आनंद प्रदर्शित करण्याकरिता गरीब भिकाऱ्यांस पैसा वाटण्यात आल्याचे आढळते.''

या वेळी रा. नारायणराव लोखंडे, दामोदर सावळाराम यंदे वगैरे ब्राह्मणेतर पुढारी ब्राह्मणांच्याही पुढे होते. दोघांना गाडीत घालून शहरात आणल्यानंतर मोरारजी गोकुळदास यांचा बंगला, दीनबंधू पत्राची कचेरी, युनियन क्लब, माधवदास रघुनाथदास

यांचा बंगला व इतर काही ठिकाणी शेकडो हजारो लोकांनी त्यांचा सत्कार केला. पानसुपारी वाटण्यापूर्वी भाषणे झाली. भाषण करणाऱ्यांत यहुदी, हिंदू व मुसलमान या तिन्ही प्रकारचे लोक होते. पुण्याला येण्यापूर्वी रेल्वे थांबवून खडकी स्टेशनवर काही विद्यार्थ्यांनी टिळक-आगरकर यांचा सत्कार केला असेही सांगितले जाते. पुण्यात आल्यावर सार्वजनिक सभेसह ठिकठिकाणी या दोघांचा सत्कार झाला, भाषणेही झाली.

टिळक-आगरकरांचा हा सत्कार सरकारी गोटात खपला नाही. या सगळ्या मिरवणुकीत डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी आणि काही वकील मंडळी सामील झाले होते. डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी म्हणजे सरकारी कॉलेजचे ना! आणि सरकार न्यायालय चालवते म्हणून वकील त्यांचा धंदा करतात! ''हे असे सरकारच्या जीवावर जगणारे लोक तीन महिने सजा भोगून आलेल्या गुन्हेगारांचा सत्कार कसा करतात? याबद्दल त्यांचे कान पिळावे.'' अशा नोटीसा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ताबडतोब बजावल्या. असा होता तेव्हाचा काळ! भलेपणाचे भाग्य इथे सदैव नासलेलेच!

या दोघांच्याही वतीने आगरकरांनी त्यांच्या आठवणीत पडत्या काळात कटू अनुभव देऊन खच्चीकरण करणाऱ्यांचा समाचार घेतला, आणि आडल्या प्रसंगात मदतीला धावून आलेल्यांचे मनापासून आभार मानले. त्यांनी लिहिले, ''आम्ही असे समजतो की एवढ्या थोड्या काळात आम्हावर जी दोन-तीन संकटे येऊन गेली व ज्यातून आम्ही फाटाफूट झाल्याशिवाय जसेच्या तसे बाहेर पडलो, त्यावरून आमच्या देशबंधूंची एवढी तरी खात्री होईल की देशसेवेचे दंभ माजवून कोठे तरी सोयीवर नोकरी मिळेपर्यंत चार पैसे मिळवण्यात गुंतलेले हे लोक नाहीत, तर यापेक्षा थोडेसे कठीण काम अंगावर घेऊन ते निश्चयाने तडीस नेण्याचा यांचा निर्धार झालेला आहे. वर्तमानपत्र काढून पुरे एक-दोन वर्ष झाले न झाले तो आम्हावर एक दोन बिकट प्रसंग येऊन गेले व त्यातून आम्ही निभावलो, हे केवळ अनेक ममताळू मित्रांच्या मदतीमुळे झाले हे आम्ही प्रांजळपणे कबूल करतो.''

दोन तरुण पोरे वेगळी वाट निवडतात. सरकारी नोकरी सोडून देशाची काळजी करण्यासाठी दोन वर्तमानपत्रे, एक शाळा सुरू करतात ही गोष्ट तेव्हा सार्वत्रिक नव्हती. दुर्मीळच होती. सुरुवातीला त्यांची टिंगल झाली खरी पण कसोटीच्या काळात ही पोरे गडबडून न जाता संकटाचा हसत हसत स्वीकार करतात, ही बाब लोकांच्या काळजात राहिली होती. वाटेवरचा प्रत्येक काटा त्यांना बोचत होता खरा. प्रत्येक ठेच त्यांना नवे काही शिकवत होती. सतीचे वाण घेतलेल्यांना अग्नीचे भय नसते हे ही पोरे आपल्या कृतीतून सिद्ध करत होती. म्हणूनच लोकांनी त्यांच्याकडे कैदी, किंवा अपराधी म्हणून बघितले नाही. वेळ पडलीच तर घरादारावर तुळशीपत्र ठेवून देशासाठी लढणारे पुढारी म्हणून लोक त्यांना पुजू लागले. ब्रिटिश राजवटीत पंचविशीतली दोन पोरे देशासाठी अशी तुरुंगात एका ध्येयाने या आधी कधी गेली नसतील. ना या सरकारी कैद्यांचे असे स्वागत लोकांनी यापूर्वी कधी केले असेल. ही पहिलीच वेळ, म्हणून त्याचे विशेष कौतुक! पुढच्या काळात राष्ट्रसेवेसाठी कराव्या लागणाऱ्या कष्टांची, वाट्याला येणाऱ्या कडू गोड अनुभवांची ही होती एक अपूर्व अशी पूर्वतयारी!

या सुटकेनंतर टिळकांची पावले नुसती डोंगरीच्या तुरुंगाबाहेर पडली असे नाही, त्यांची पावले आता महाराष्ट्रभर संचार करू लागली. नवे नेतृत्व महाराष्ट्राच्या मातीत रुजू लागले. दहा-पंधरा वर्षे सरसर सरली. दरम्यान त्या नेतृत्वाला दोन राष्ट्रीय उत्सवांच्या शाखा फुटल्या. त्यांनी गोरगरीब शेतकऱ्यांची नाळ ओळखली, त्यांच्यासाठी चळवळी केल्या, सरकारला अडचणीत आणले. आता जिथे जिथे लोकांच्या समस्या तिथे तिथे टिळक त्या सोडवायला सर्वांत पुढे, हे जणू समीकरणच होऊन बसले. दरम्यान, पुण्यात नवी समस्या उभी राहिली, प्लेगच्या रोगाची!

एक जबाबदार पत्रकार आणि नेता म्हणून टिळक जनतेला या रोगाबद्दल जागृत करत होते, पण सरकारचा जुलूम वेगळ्याच पातळीवर पोहोचला होता. गोरे सोजीर घराघरांत घुसून आयाबहिणींवर तपासणीच्या नावाखाली हात टाकत होते. घराघरांतल्या लक्ष्मीची अब्रू अशी दिवसाढवळ्या लुटली जात होती. रोग नवा होता, त्याचा प्रतिकार कसा करायचा हे लोकांना माहीत नव्हते, तरुण पोरे मरत होती. संसार उघडे पडत होते. पुण्यात रॅन्डशाही माजली होती. शिवजयंती उत्सवाच्या एका कार्यक्रमात टिळकांना तीन तरुण भेटले, म्हणाले, पुण्याची ही अशी वाताहत सुरू आहे आणि काँग्रेसचे लोक काहीच करत नाहीत? बळवंतराव त्यांच्याकडे नजर रोखून म्हणाले, ते काही करत नसतील हे खरे, पण तुम्ही तरी काय करता? फक्त भजन नि कीर्तन? टिळकांचे शब्द पोरांच्या मनात रुतून बसले, रॅन्ड आणि आयर्स्ट या दोघांचे खून त्यानंतर थोड्यात दिवसांत पुण्यात घडून आले. त्याला टिळकांचे हे शब्दच जबाबदार!

चाफेकर बंधू सापडले नसते तर या दोन खुनांसाठी बळवंतराव टिळकांच्या जहाल शब्दांनाच ब्रिटिशांनी जबाबदार धरले असते. या प्रकरणात तसा प्रत्यक्ष सहभाग टिळकांचा कुठेच नव्हता, पण तरीही त्यांना अडकवण्याची तयारी पूर्ण झालेली होती. पोलीस अहवालातसुद्धा तसेच नमूद केलेले होते.

या खुनामागे टिळकांची फूस आहे हे कबूल करण्यासाठी दामोदरपंत चापेकरांना बरीच मारहाण झाली होती.

या सगळ्या प्रकरणात आणखी एक गडबड झाली. 'मँचेस्टर गार्डियन' या पत्राला नामदार गोखल्यांनी एक मुलाखत दिली. त्यात त्यांनी स्पष्टपणे मान्य केले की प्लेगच्या संदर्भात घर तपासणाऱ्यांनी लोकांवर जी जुलूम जबरदस्ती केली, त्यामुळेच रॅन्ड आणि आयर्स्ट यांचे खून झाले. रस्त्यावर उभे करून महिलांना तपासण्याचा अघोरी प्रकार या सोजिरांनी केला, या छळाला कंटाळून बेअब्रू सहन न झाल्यामुळे पुण्यात एका महिलेने आत्महत्या केली, असेही गोखल्यांनी कबूल केले होते. गोखले असे बोलले आणि तिकडे ब्रिटिश पार्लमेंटमध्ये सगळ्यांची भंबेरी उडाली. लंडनहून मुंबई आणि मुंबईहून लंडन अशा तारा भराभरा फिरू लागल्या. भारतमंत्र्यांनी जाहीर केले लगोलग की, या बातम्या अतिशय खोडसाळ आणि चुकीच्या आहेत, प्लेगमध्ये महिलांवरच काय पण कुणावरच जुलूम झालेला नाहीये. आश्चर्य म्हणजे हे सगळे सुरू झाल्यावर आपण जे बोललो ते काही पत्रांच्या आधारे बोललो असे म्हणून जोरदार यू टर्न मारला आणि उरलीसुरली आपण जे बोललो त्याबद्दल माफीसुद्धा मागितली! काय गोखल्यांची ब्रिटिशनिष्ठा, दादच द्यायला हवी ना...!

हा सूर्य आणि हाच जयद्रथ करण्याची हीच संधी होती. ज्या ज्या माणसांवर आणि बायकांवर सोजिरांनी जुलूम केलाय त्यांनी त्यांनी आपापल्या नाव आणि पत्त्यासह आणि घडलेल्या घटनेसह सगळे तपशील केसरीकडे जमा करावे असे आवाहन केले. केसरीकडे माहिती जमा होऊ लागली. दरम्यान मुंबईच्या 'चॅम्पियन' या पत्रात ही सगळी माहिती प्रसिद्ध करायची आणि सगळे प्रकरण उघडकीस आणायचे असे टिळकांनी ठरवलेले होते. पण हे सगळे घडण्याच्या आधीच टिळकांच्या अटकेची पूर्वतयारी सरकारदरबारी झालेली होती. दाजी आबाजी खरे यांच्या आंग्रेवाडीत बळवंतराव मुक्कामी होते. रात्री नुकतेच जेवणाच्या ताटावरून उठून ते हात धुऊन बाहेर आले होते. दारातून वॉरंट हाती असलेला युरोपियन पोलीस आत शिरला. टिळकांनी ते वाचले. दाजीसाहेब आतून बाहेर येईपर्यंत आणि त्यांना सगळा मामला कळेपर्यंत बळवंतराव आपले सामान बांधून पोलिसांच्या गाडीत जाऊन बसले होते. खरा स्थितप्रज्ञ! त्यांना फोर्टच्या पोलीस कमिशनर कार्यालयात आणले. मागोमाग दाजीसाहेब खरे आले, टिळकांचा जामीन अर्ज फेटाळला होता. तोवर रात्रीचे साडेअकरा वाजले असावेत, दाजीसाहेब बघतात तर काय, टिळक गाढ झोपी गेले होते.

टिळकांच्या वाट्याला आलेली शिक्षा दीड वर्षांची होती. भायखळ्याच्या तुरुंगात त्यांना काथ्या कुटावा लागला. तुरुंगातील जेवण अतिशय निकृष्ट असे, टिळक कांदा आणि लसणाला स्पर्शही करत नसत. तुरुंगात नेमके कांदा लसूणयुक्त भोजन मिळे. अशावेळी मिळेल ती भाकरी वरणाच्या किंवा डाळीच्या ऐवजी थेट पाण्यात कुस्कारायची आणि पूर्णब्रह्माचे सेवन करायचे हाच नेम टिळकांचा होता. यामुळेच की काय, १३५ पौंडाचे टिळक आता १०५ पौंडांवर आले होते. दरम्यान मुंबईत प्लेगची साथ सुरू झाली, त्यांना पुण्यात आणले. येरवड्यात तेव्हा चापेकर बंधू होते, त्यांच्या फाशीची तयारी सुरू होती. फासावर चढताना लोकमान्यांच्या संग्रहातील गीतेची प्रत आम्हाला हवी असा हट्ट या पोरांनी धरला, टिळकांनीसुद्धा आपली प्रत लगोलग पाठवली, हाती गीता आणि भगवा ध्वज घेऊन, मुखी 'नारायण नारायण, जय गोविंद हरी' असे म्हणत ही पोरे वैकुंठवासी झाली!

टिळकांची शारीरिक अवस्था फारशी बरी नव्हती, त्यांना मधुमेह होता. दरम्यान मोतीलाल घोषांनी टिळकांना सुचवलं, ''तात्पुरती का होईना सरकारची माफी मागून सुटका करून घ्या!'' टिळक म्हणाले, ''मी माफी मागितली तर मी गुन्हा केलाय आणि त्याची कबूलीही दिलीये हे सिद्ध होईल, त्यापेक्षा मरण बरे!'' माफी न मागता बळवंतराव तुरुंगात लिहू लागले, 'आर्क्टिक होम इन द वेदाज!' उत्तर ध्रुवावरील आर्यांचे वसतीस्थान!

हिंदू धर्माभ्यासक म्हणून जगभरात बळवंतरावांचा तेव्हा लौकिक होता. टिळकांच्या या शिक्षेने आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्वानांना आश्चर्य वाटले होते. मॅक्सम्युलरने तर इंग्रजांना वेड्यात काढले होते, टिळकांना शिक्षा केली म्हणून! या दबावामुळे इंग्रजांनी टिळकांची शिक्षा जरा कमी केली. ''आता तुम्हाला सोडतोय खरं, पण पुन्हा तुमच्याकडून असे कृत्य घडलं तर मात्र आता माफ झालेली शिक्षासुद्धा पुढे भोगावी लागेल'' अशी ताकीद देऊन.

टिळक सुटल्याचे कळताच सुमारे दहा हजारांची गर्दी त्यांच्या घरासमोर झाली. या अटकेनंतर त्यांनी एक पाऊल आणखी पुढे टाकले होते, देशाचे नेतृत्व काबीज करण्याकडे!

वंगभंग आंदोलन, सुरतेचा संग्राम, स्वराज्याची चतुःसूत्री आणि दरम्यानच्या क्रांतिकारक चळवळीत मोठी उलथापालथ घडून येत होती. खुदिराम बोस हा १६ वर्षांचा तरुण बॉम्बफेक करून फासावर गेला होता. त्याच्या फाशीनंतर बंगालभर बॉम्ब फुटू लागले होते. वंदे मातरम् हा राष्ट्रमंत्र झाला होता, बंगाल धगधगत होता. टिळक क्रांतिकारकांची बाजू लावून धरत होते, ब्रिटिशांना उद्देशून लिहीत होते, ''तुम्ही असेच वागलात तर बॉम्बगोळ्यांचे अनर्थ होतच राहणार!'' टिळक देशाचे नेते झाले

होते, त्यांना अडकवल्याशिवाय हा वणवा शांत होण्याची चिन्हे नव्हती.

पहिल्या राजद्रोहाच्या वेळी चापेकरांना चिथवले आणि प्रक्षोभक लेखन केले हा आरोप, तर यावेळी मात्र टिळकांच्या लेखांमुळे बंगालमधील क्रांतिकारक पेटले आणि त्यांनी सरकारविरुद्ध कृत्ये केली, अगदी बॉम्बस्फोटापर्यंत प्रकरण गेले असा ठपका होता. त्या सहा लेखांपैकी एक लेख टिळकांचा होता. बाकी सारे लेख लिहिले होते काकासाहेब खाडिलकरांनी. १९०८ साली तुम्ही आधीच्या अटीचा भंग केला, म्हणजे तुम्ही पुन्हा आमच्याविरुद्ध चिथावणीखोर लेखन केले, हाही आरोप टिळकांवर ठेवला होता.

टिळकांच्या खटल्याचे कामकाज मुंबईत सुरू होते, तिथेच सहा वर्षांची शिक्षा त्यांना सुनावली गेली. सहा वर्षांची शिक्षा ऐकून टिळक म्हणाले होते, ''ज्युरीने कसाही निकाल दिलेला असला तरी मी पूर्णपणे निरपराधी आहे असे मी पुनः निक्षून सांगतो. जगातील व्यवहाराचे नियमन करणाऱ्या अधिक श्रेष्ठ प्रतीच्या शक्ती आहेत, आणि मी मोकळा राहण्यापेक्षा माझ्या हालपेष्टानीच माझ्या अंगीकृत कार्याचा अधिक उत्कर्ष व्हावा असा कदाचित ईश्वरी संकेत असेल.'' टिळकांचे हे विधान करारी आणि चिंतनीय आहे. इतकीच महत्त्वाची प्रतिक्रिया टिळकांच्या पत्नीची म्हणजेच सत्यभामाबाईंची आहे, त्याबद्दल पुढे बोलूच.

टिळकांना शिक्षा झाली, आणि लोक बिथरले. एखाद्या समुद्राला बेभान अशी भरती यावी तसा हिंदुस्थान खवळला. लोकमान्य गजाआड झाल्यानंतर मुंबईत मजुरांचा ऐतिहासिक संप सहा दिवस चालला, सरकारकडून तो सहजी आटपेना. पोलीस कमिशनर 'गेले' हे आपल्या वरिष्ठांना कळवून मोकळे झाले, ''घरोघर टिळकांचे फोटो भिंतीवर लावले गेले असून लोक घरोघर टिळकांची पूजा करू लागले आहेत. लोकमान्य तुरुंगात आहेत याचे लोकांच्या मनावर फार खोल परिणाम झाले. अत्र्यांचा प्रसंग मी सुरुवातीला सांगितलाच. भारतात सभा निदर्शने होणे स्वाभाविक होतेच, पण भारताबाहेरच्या 'न्यू एज'ने लिहिले की, ''अटकेपूर्वी टिळक एका पक्षाचे नेते होते. आता ते लोकनेते आणि राष्ट्रीय हुतात्मा ठरले आहेत.''

सुरुवातीला टिळक डोंगरीच्या कारागृहात होते. दादासाहेब खापर्डे आणि बाळकृष्णपंत मुंजे टिळकांना भेटायला गेले. यावेळी घडलेला तो प्रसंग सांगण्यासारखा आहे. तो मुंज्यानीच टिळकांच्या आठवणीत सांगितलाय... त्याचं झालं असं की टिळक डोंगरीला होते, डोंगरीचा जेलर कुणी तरी मद्रासी होता. या दोघांना बघितल्यावर त्याने आदराने त्यांची विचारपूस केली आणि चक्क यांच्यासाठी दोन आणि टिळकांसाठी एक अशा खुर्च्या मागवल्या. टिळकांकडे निरोप पाठवला. बळवंतराव जिना उतरून खाली आले आणि हा माणूस आदराने उठून उभा राहिला, आणि जोवर टिळक म्हणत नाहीत तोवर तो उभाच होता. सगळे बसले आणि जेलरने चक्क हळूच उठून आपल्या टेबलाखालून एक अडकित्ता आणि एक पांढरी सुपारी काढली आणि नम्रपणे टिळकांच्या समोर ठेवली.

बळवंतराव ती सुपारी घेऊन हसत हसत म्हणाले, ''जेलरसाहेब, मी आता कैदी हे विसरलात की काय?''

जेलर म्हणाले, ''मला माहितीये की तुम्हाला सुपारी फार आवडते, म्हणून मुद्दाम आणली, आमच्याकडून तुमची इतकीही सेवा होऊ नये म्हणजे?'' टिळक आणि बाळकृष्णपंत, दादासाहेब यांच्यात मग गप्पा झाल्या आणि भेटीची वेळ संपली. जेलरसाहेब तरीही आदबीने म्हणाले, ''मला माहितीये टिळक महाराज, तुम्ही वेळ पाळणारे आहात, पण तुम्हाला आणखी काही बोलायचे असेल तर सवलत आहे.''

अर्थात टिळकांनी ती सवलत घेतली नाही, ते जिना चढून निघून गेले. टिळक गेले आणि जेलर बाळकृष्णांना म्हणाला, ''बळवंतरावांसारख्यांवर असं संकट आलं की फार दुःख होतं, पण आमच्यासारख्यांना दुःखात सुख हेच की त्यांच्यासारख्या विभूतीच्या येण्यामुळे हे पापालय (home of sinners) पुनीत होतं!''

सुरुवातीला साबरमतीच्या तुरुंगात ६२ दिवस राहिल्यानंतर टिळकांची रवानगी मंडालेला झाली. मंडालेत टिळकांसाठी विशेष आचारी योजला होता, वासुदेव कुलकर्णी त्याचे नाव. मंडालेत टिळकांना ठेवले होते ती खोली दोन मजली होती. टिळक सकाळी लवकर उठत, संस्कृत श्लोक म्हटल्यानंतर सुमारे दीड तास टिळक ध्यानस्थ बसत. त्यानंतर नित्यकर्म आटोपून जेवणानंतर ते लेखन वाचनात गढून जात. त्यांचे आचारी कुलकर्णी आपल्या आठवणीत लिहितात, ''टिळक महाराजांनी कधी एक पळही आळसात वाया घालवल्याचे मी पाहिले नाही. ते आपल्या लिहिण्यावाचण्यात इतके गुंग होत की त्यांच्याकडे जाऊन काही बोलू लागलो तरी त्यांचे लक्ष जात नसे.'' संध्याकाळी वरच्या माडीवर टिळक कुलकर्ण्यांना तुकाराम, ज्ञानोबा, एकनाथ, रामदासस्वामी, श्रीकृष्ण, राम, शिवाजी महाराज कौरव पांडव यांच्या गोष्टी सांगत. कधी दासबोध समजावून सांगत. कधी पेशवाई तर कधी इंग्रजांच्या गोष्टी सांगत, जगाचा नकाशा समजावून सांगत.

मंडालेच्या कारावासात पहिल्या दीडदोन वर्षानंतर त्यांचा मधुमेह जास्तीच वाढू लागला. लघवीतील साखरेचे प्रमाण प्रचंड



**मंडाले येथील कारागृहाचा आता बाहेरून दिसणारा भाग**

वाढले. शरीर अशक्त झाले. आणि पथ्यपाणीही वाढले. मंडालेचा महाभयंकर उकाडा टिळकांना सहन होईना, त्यांच्या अंगावर या काळात फोड येत असत. उष्णतेमुळे जीव घाबरा होत असे. या उकाड्यातून सुटका व्हावी म्हणून टिळकांनी अंदमानात मला पाठवा असेही अर्ज करून पाहिले. अंदमानात उकाडा कमी असावा या आशेने त्यांनी हे अर्ज केले खरे पण शेवटी पदरी निराशाच आली. अस्वस्थ होऊन कुलकर्ण्यांना टिळक म्हणाले, ''ठीक आहे, मी कैदेतच मरावे अशी भगवंताची इच्छा दिसते!''

तुरुंगात महिन्याला एक पत्र घरी पाठवण्याची मुभा टिळकांना मिळाली, पण त्यात राजकीय विषयावर लिहिण्याला सक्त मनाईच होती. तुरुंगातून टिळकांनी पहिले पत्र लिहिले ते त्यांच्यासोबत सावलीसारखे असणाऱ्या दादासाहेब खापर्डे यांना. दादासाहेब टिळकांच्या सुटकेसाठी नंतरची तब्बल दोन वर्षे विलायतेत जाऊन खटपट करत होते हे विशेष.

आपल्याला हव्या असलेल्या पुस्तकाची यादी टिळकांनी लगेचच पाठवली, पहिल्या यादीत सुमारे २८ पुस्तकांचा समावेश होता. सोबत त्यांनी पुस्तकांची काळजी कशी घ्यावी याबद्दल विशेष नोंदही करून ठेवली होती, ''समुद्राच्या किंवा पावसाच्या पाण्यामुळे पुस्तके व वस्तू खराब होऊ नयेत म्हणून एका मेणकापडात व्यवस्थित गुंडाळून मग कार्डबोर्डाच्या पेटीत घालाव्यात.''

मंडालेच्या तुरुंगात टिळकांनी 'गीतारहस्य' लिहिले, आणि त्याची प्रत सरकारने जप्त जरी केली तरी मी पुन्हा जसेच्या तसे गीतारहस्य लिहून काढेन असा आत्मविश्वास टिळकांनी दाखवला हे बहुतेकांना ठाऊक आहे. 'गीतारहस्य' लिहिताना विविध भाषेतील ग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी मंडालेत टिळकांनी केलेला आणखी एक महत्त्वाचा उद्योग म्हणजे त्यांनी घेतलेले विविध भाषांचे शिक्षण. जर्मन आणि फ्रेंच भाषा शिकण्याची पुस्तके मागवली आणि सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पाच महिन्यांतच पूर्ण केला. फ्रेंच भाषासुद्धा टिळक पाचव्या महिन्यात व्यवस्थित वाचू लागले. टिळकांच्या सुटकेसाठी विलायतेत धडपडणाऱ्या दादासाहेब खापर्डे यांना टिळकांनी आग्रहाचा सल्ला दिला. तिकडे तुम्हीही फ्रेंच भाषा शिकून घ्याच. विलायतेत परकीय भाषा कुठे आणि कशी शिकता येईल याचे पत्तेही टिळकांनी मंडालेहून लिहिलेल्या पत्रात पाठवलेत हे वाचून आश्चर्य वाटेल.

मंडालेच्या कारागृहात असताना राजकारणाबद्दल लिहिण्या-बोलण्यास टिळकांना सक्त मनाई होती. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या पत्रात राजकीय असे काहीच सापडत नाही. एकदा त्यांनी लिहिलेल्या एका पत्रात एक शब्द असा होता की ज्याचा अर्थ सुपरिटेंडेंटला नीटसा लागेना. यात नक्कीच काहीतरी विशेष मजकूर टिळकांनी लिहिला असणार या भीतीने त्यांनी टिळकांचे पत्रच रद्द ठरवले, आणि टिळकांना चक्क दुसरे पत्र लिहायला सांगितले, केवळ त्या एका शब्दामुळे! पत्र परत पाठवल्याचे समजल्यावर टिळकांनी काढलेले उद्गार अर्थपूर्ण आहेत, ते म्हणाले, 'परवशता शतगुणे करी जाच!'

एरवी, टिळक म्हटले की 'स्वराज्य एके स्वराज्य', पण इथे मंडालेत मात्र स्वराज्य शब्द उच्चारायला बंदी म्हणूनच की काय, कुटुंबवत्सल टिळकांचे निराळे रूप यानिमिताने टिळकांनी लिहिलेल्या पत्रातून तुम्हा-आम्हाला बघायला मिळते. कारावासातील पत्रांमधून कुटुंबवत्सल टिळक दिसतात. पत्नीच्या प्रकृतीची तळमळीने काळजी करणाऱ्या निराळ्याच पतीचे दर्शन घडते. खरे तर सार्वजनिक आयुष्यात प्रचंड व्याप टिळकांनी मागे लावून घेतलेले असल्याने त्याच्या झळा सत्यभामाबाईंना सोसाव्या लागल्याच. तरीही त्यांनी कधीही कुरकुर केल्याचे ऐकिवात नाही, उलट समर्थपणे त्यांनी संसाराचा भार सांभाळला. बाई खंबीर होत्या. टिळकांना शिक्षा सुनावल्यानंतर लगेचच रात्रीच्या गाडीने निघून तेव्हाचे केसरीचे संपादक खाडिलकर पुण्याला आले. टिळकांना झालेल्या शिक्षेचा जबरदस्त धक्का त्यांना बसलेला होता. गायकवाड वाड्याच्या दारावर डोके ठेवून धाय मोकलून खाडिलकर रडूच लागले. शिपायाला त्यांना सावरता येईना. कसेबसे ते आत आले, तोच टिळकांच्या धर्मपत्नी सत्यभामाबाई माजघरातून बाहेर आल्या. त्यांना पाहून खाडिलकरांचा अश्रूंचा बांध पुन्हा फुटला, हमसून हमसून ते रडू लागले. टिळकांच्या शिक्षेची वार्ता कशीबशी त्यांनी सत्यभामाबाईंना सांगितली. अनेकांना वाटेल सत्यभामाबाई कोसळल्या असतील, आपल्या पतीला सहा वर्षे शिक्षा झाल्यावर कुठल्या पत्नीला धक्का बसणार नाही, पण छे! दुःखाचा वज्राघात परतवून लावताना एखाद्या तपस्विनीप्रमाणे सत्यभामाबाई गरजल्या, ''खाडिलकर, अहो यांना जी शिक्षा

झाली ती त्यांनी चोरी केली म्हणून नाही. छीनाली केल्याच्या आरोपावरूनही नाही. राजद्रोहाच्या खटल्यात शिक्षा झाली ना? सहा वर्षं! मग तुम्ही असे रडताय काय? देशासाठी ही शिक्षा आहे.'' थोर उद्‌गार!

सत्यभामाबाईंची तब्येत अधूनमधून बिघडत असे, त्यांनाही मधुमेहाचा त्रास होता. त्यांच्या आजारावर काही औषधे टिळकांनी आपल्या पत्रातून सुचवलेली होती. टिळकांनी लिहिलेली सगळी पत्रे त्यांचे भाचे धोंडोपंत यांच्या नावे लिहिली. धोंडोपंत ती पत्रे घरच्यांना वाचून दाखवत. जवळपास प्रत्येक पत्रात टिळकांनी आपल्या पत्नीबद्दल उत्कट काळजीने लिहिलेले दिसेल. धोंडोपंतांना टिळक सांगतात, ''माझ्यापेक्षा मला त्यांची (पत्नीची) अधिक चिंता वाटते. सौभाग्यवतीला उत्साह वाढवणाऱ्या आशादायक बातम्या सांगाव्यात त्याचा खरा अर्थ त्यांना माहीत असला तरी! संकटात किंवा दुःखात आशेवरच माणूस जगू शकतो.'' स्वतःला सुटकेची आशा नसली तरी घरच्यांना मात्र टिळक सतत प्रोत्साहित करत. मंडालेहून मी लवकरच परतणार याबद्दल त्यांच्या आशा जागवत. टिळक लिहितात, ''हे दुर्दैव एक दिवस संपेल पण तोपर्यंत आनंदात राहावे आणि शांतपणे धैर्याने वाट पाहावी असे तिला सांगावे. कोणाला तरी पराभव पत्करावा लागतोच आणि आपण जर तो पत्करला नाही तर दुर्दैवाला पत्करावाच लागेल.''

सत्यभामाबाईंची काळजी करणारे बळवंतरावांचे शब्द वाचून काळजाला खरोखर घरे पडतात. मी सुटून येईपर्यंत धीराने राहा असे ज्या पत्नीला टिळक सांगत होते तिच्याच मृत्यूची वार्ता दुर्दैवाने टिळकांना मंडालेत ऐकावी लागली. सत्यभामाबाईंच्या मृत्यूनंतरच्या भावना टिळकांच्याच शब्दांत, ''मृत्यूची तार म्हणजे वज्राघातच वाटला. संकटांचा शांतपणे स्वीकार करण्याची सवय मला आहे पण या घटनेचा जबरदस्त धक्का मला बसला आहे हे मान्य करावयासच हवे...मला सर्वांत जास्त दुःख कशाचे झाले असेल तर शेवटच्या क्षणी मला तिच्यापासून दूर राहणे भाग पडले याचे... माझ्या आयुष्यातील एक प्रकरण संपले आणि दुसरे संपावयासही फार काळ लागणार नाही असे वाटते.''

आपण मंडालेत असलो तरी आपल्या माघारी मुलांची काळजी करायला त्यांची आई आहे, ही गोष्ट टिळकांच्या मनाला समाधान देत होती. पण आता आईही या जगात नाही आणि बाप देशासाठी तुरुंगात गेलेला, अशा अवस्थेत टिळकांची मुले सैरभैर झाली. मुलांना टिळकांनी लिहिले, ''अशावेळी तुमची आई जावी हे अत्यंत दुर्दैवाचे आहे. आता मला सर्वांत जास्त काळजी कशाची असेल तर तुमच्या शिक्षणाची आणि प्रगतीची. मागे राहिलात तर तुमच्या आयुष्याचे नुकसान होईल.''

त्यांची कन्या मथु अभ्यासात हुशार होती मात्र रामभाऊ आणि बापू या दोघांचेही शिक्षणात फार लक्ष लागत नाही, हे वाचून टिळक अस्वस्थ होत. आपले भाचे धोंडोपंत यांना लिहिलेल्या पत्रातून मुलांच्या प्रगतीपुस्तकाच्या नोंदी टिळक प्रत्येक सहा महिन्याला मागवत, त्यांच्या अभ्यासाला गती यावी यासाठी उपायही सांगत. अभ्यासाबरोबर मुलांच्या व्यायामातही कुठलीही कसूर ठेवू नये याबद्दलही टिळक कटाक्षाने लिहीत. मुलांना कळकळीने केलेला उपदेश असा आहे की, ''मुलांनो, कष्ट करा आणि विविध विषयांवर प्रभुत्व मिळवा. म्हणजे तुम्हाला चिरंतन टिकणारे सुख मिळेल. आपण काही श्रीमंत नाही, पण विद्या हे आपले बलस्थान आहे आणि शिक्षणाकडे तुम्ही दुर्लक्ष केले तर जगात तुम्हाला कुणीही विचारणार नाही.''

मंडालेत कॉलराची साथ पसरल्यानंतर टिळकांना मिकटिल्ला कारागृहात हलवण्यात आले. त्यावेळी त्यांचे स्वयंपाकी कुलकर्णीही सोबत होते. मंडालेच्या स्टेशनवर त्यावेळी हजारो टिळकभक्त जमले होते आणि ''लोकमान्य टिळक महाराज की जय'' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. अत्यंत गुप्ततेने टिळकांना हलवण्याचा सरकारचा बेत फसलाच. टिळकांच्या जयघोषार्थ जमलेली गर्दी पाहून मिकटिल्लाच्या जेलरने टिळकांना विचारले, ''आपण कोणत्या देशाचे राजे आहात?'' टिळक उत्तरले, ''अहो, मी या साडेतीन हात देहाचासुद्धा राजा नाही, माझे असे राज्य कोठून असणार?''

तुरुंगवासाच्या या काळात दादासाहेब खापर्डे यांची भेट टिळकांना सुखवणारी वाटली. दादासाहेब टिळकांच्या सुटकेसाठी प्रयत्न करत जवळपास दोन वर्षे विलायतेला खटपट करत होते. टिळक लिहितात, ''रा. खापर्डे यांची मी खूप दिवस वाट पहात होतो, ते आले आणि गेले. या तुरुंगवासातील कंटाळवाण्या आयुष्यात त्यांची भेट स्वप्नासारखीच वाटली. त्यांनी माझ्यासाठी जे केले त्याहून जास्त दुसरे कुणीही करू शकले नसते. त्यांनी केलेल्या प्रयत्नात यश आले नाही याचे कारण ती केस टिळकांची होती!''

एक महत्त्वाची गोष्ट इथे सांगायला हवी. काही विशेष अटी-शर्ती लादून टिळकांच्या स्वातंत्र्यावर बंधने आणून त्यांची शिक्षा कमी करता येऊ शकली असती, किंवा राजकारणात पडणार नाही वगैरे अटी मान्य करून टिळक स्वतःची मुक्तता करूनही घेऊ शकले असते, टिळकांना तसा सल्लाही देण्यात आला होता, पण या सगळ्यावर सखोल विचार करून टिळकांनी लिहिले, ''तुरुंगातून सुटल्यानंतर इतर सर्व नागरिकांना मिळायला हवे असे स्वातंत्र्य मला मिळायला हवे. सुटल्यानंतर मुक्त

नागरिक म्हणून मला रहाणे पसंत आहे. आता अटी आणि शर्ती लादून जनतेच्या कार्यापासून सरकार मला दूर ठेवणार असेल तर ते मला नको.''

महाराष्ट्रातील मानी माणसे आपापल्या परीने निषेध व्यक्त करत होतीच. कुणी कोटावर काळ्या पट्ट्या लावून फिरू लागले. टिळक तुरुंगात गेल्याने कुणी साखर खाण्याचे सोडले, टिळक सुटेपर्यंत पायात जोडे न घालण्याचा निश्चय केला. श्री. म. माटे यांनी आपले आवडते नाटक न पाहण्याचा निश्चय केला. राम गणेश गडकरी म्हणू लागले, ''टिळक मंडालेत गेल्यापासून समोरून येताना पाहून तोंडातली बिडी टाकून द्यावी असा एकही पुढारी सगळ्या पुण्यात उरलाच नाही.'' टिळकांच्या नसण्याने कवींच्या शब्दांना हुंदके फुटले, गोविंद कवी दुःखभराने विचारू लागले,

''आमुचा वसंत कुणी नेला,
टिळक विठोबा केव्हा येईल पुण्यपूर पंढरीला?''

टिळक विठोबा परतण्यासाठी १९१४ चा जून महिना उजाडण्याची भक्तांना वाट पाहावी लागलीच. मध्यरात्रीच्या किर्र अंधारात टिळकांना विशेष व्यवस्था करून कुणालाही खबर लागू न देता गायकवाड वाड्यासमोर आणून सोडले. भरला संसार सत्यभामाबाईंच्या खांद्यावर सोडून टिळक मंडालेत गेले. सहा वर्षांनी परतल्यावर त्यांच्या स्वागताला, त्यांना डोळे भरून बघायला त्यांचे कुटुंब, अर्धांगिनी मात्र वाड्यात राहिली नाही. बाई गेल्यानंतर टिळकांनी धोंडोपंतांना सांगितले होते, ''तिच्या ज्या काही वस्तू असतील त्या एकत्रितपणे एका कपाटात ठेवून द्या, त्यांची अजिबात नासधूस करू नका, काळजी घ्या!'' तुरुंगातून घरी आल्यानंतर ज्या कपाटात आपल्या बाईंच्या सगळ्या वस्तू जमवून ठेवल्या होत्या त्या कपाटाकडे टिळक गेले असतील का? ते कपाट उघडून बाईंच्या त्या जिनसा टिळकांनी डोळे भरून बघितल्या असतील का? त्या पाहताना टिळकांच्या डोळ्यांत एखादातरी अश्रूचा थेंब आला असेल का? की, या सगळ्या केवळ कविकल्पनाच!

### अखेर टिळक सुटले

टिळक सुटले आणि भारतात दिवाळी साजरी झाली. महिना जूनचा असला तरी. लोकांनी पेढे वाटले, आपली घरे सजवली, दिवे लावले, फुलबाज्या उडवल्या. नागपुरात संध्याकाळी व्यंकटेश नाट्यगृहाच्या मागे, म्हणजे मोकळ्या मैदानात जवळपास पाच हजार लोक जमले होते, टिळक सुटले म्हणून साखर वाटायला. हे सगळे टिळकभक्त होते, यांच्या जाती, धर्म, पंथ कसा मोजणार? यांचा एकच धर्म, तो होता टिळकभक्ती! टिळक पुण्यात होते. इकडे नागपुरात टिळकांच्या अभिनंदनाचा ठराव मांडताना लोकांच्या डोळ्यांतून धारा वाहिल्या, अनेकजण गहिवरले, जणू सहा वर्षे त्यांचा कुटुंबप्रमुख त्यांच्यापासून दुरावला होता, त्याच्या येण्याचे हे अश्रू होते. त्या मोकळ्या मैदानात मध्यभागी सगळ्यांना दिसेल अशी टिळकांची भली मोठी तसबीर लावण्यात आली होती, त्याच्यावर सर्वांनी समंत्रक पुष्पाक्षदांची वृष्टी केली. टिळक सुटले म्हणून नागपूरला केशव बळीराम हेडगेवार यांनी घरावर दिवे लावले, आणि आनंदाची दीपावली साजरी केली.

टिळकांचा कारावास हा सश्रम नव्हता? ब्रिटिशांना भीती होती, टिळकांना तुरुंगात काही झाले तर इकडे हिंदुस्थान शांत बसणार नाही. कारण टिळकांच्या अटकेच्या वेळी महाराष्ट्रात



**टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर लगेच केसरीच्या अंकात बातमीसह त्यांचा हा फोटो छापून आला होता.**

झालेला प्रकोप इंग्रजांना आटपेनासा झाला होता. आठवडाभर युद्ध धुमसत होते. तिकडे मंडालेत टिळकांच्या केसाला जरी धक्का लागला असता तर खेळ, टिळकांच्या नाही, तर ब्रिटिशांच्या जिवाशी होता. त्यामुळे ते सावध होते. टिळक हे भारताचे पहिले नेते होते ना! या भीतीपोटीच टिळकांना अगदी गुपचूप मध्यरात्री पुण्यात आणून सोडले होते. कुणालाही खबर लागू न देता, हे सगळे इतके गुपचूप घडवले होते की गायकवाड वाड्याचा दरवाजा उघडायला आलेला द्वारपाल, दरवाजा वाजवणारे बाहेरचे हात या वाड्याच्या मालकाचे आहेत हे ओळखू शकला नव्हता. कोण आपण? या त्याच्या प्रश्नाला ''मी बळवंतराव टिळक!'' असे उत्तर पलीकडून आल्यावर तो हादरलाच होता.

बळवंतराव तीन वेळा तुरुंगात गेले. या तीनही वेळा तुरुंगातून बाहेर येताना त्यांनी आपल्या कार्यक्षेत्राचा परीघ अधिक मोठा केला होता. डोंगरीच्या शिक्षेनंतर ते पुणेकरांच्या दृष्टीने एक आश्वासक नेतृत्व होऊ शकणार होते, तसे ते झालेही. पहिली शिक्षा ते दुसरी शिक्षा या काळात टिळकांनी महाराष्ट्र काबीज केला होता. पहिला राजद्रोह भोगून आल्यावर टिळकांनी हिंदुस्थानचे नेतृत्व भूषवले. मंडालेनंतरची सहा वर्षे टिळक जगभरात ओळखले जात ते आशिया खंडाचे नेते म्हणून!

टिळकांना झालेल्या नंतरच्या दोन शिक्षा या राजकीय खुनांना प्रोत्साहन दिले म्हणून होत्या. प्रत्यक्षात लोकमान्य यात कुठेच बंदूक घेऊन पुढे सरसावले नव्हते. ही कमाल त्यांच्या ज्वालाग्राही शब्दांची होती. चापेकर बंधू काय किंवा खुदिराम बोस काय, त्यांच्याच काळातला अनंत कान्हेरे काय, हे सगळे जण टिळक युगात वाढले होते, टिळकांच्या लेखणीचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम त्यांच्यावर होणारच!

टिळक तुरुंगात होते, तेव्हा त्यांच्यासाठी जेवण बनवणारा गृहस्थ त्यांच्या आधी बंधमुक्त झाला. टिळकांनी त्याच्या हाती आपला पडका दात आपली आठवण म्हणून पुण्यात पाठवला होता. टिळकांच्या सुटकेनंतर एक दिवस तो भेटायला वाड्यात आला तेव्हा टिळकांनी त्याला जेवू घालून सोबत खर्चासाठी काही पैसेही देऊ केले होते. क्रांतिकारक जेव्हा अशा आरोपात अडकवले जात तेव्हा त्यांच्या बचावासाठीसुद्धा टिळक तत्पर असत. फासावर चढणाऱ्या चापेकरांना आपल्या संग्रहातली गीता त्यांनी उगाच नव्हती दिली. तिकडे अंदमानात हालहाल होऊन जगणाऱ्या सावरकरांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले. त्याच प्रेरणेतून तिकडे सावरकरांनीसुद्धा अंदमानात कैद्यांसाठी ग्रंथालय उभारले, त्यांच्या शिकवण्या घेतल्या. विष्णू महादेव भट या क्रांतिकारकाला कैदी म्हणून शिक्षा भोगल्यानंतरही टिळकांनी केसरी मराठा कचेरीत संपादकीय विभागात नोकरीला ठेवून घेतले होते. पुढे त्याचा डॉक्टर होईपर्यंतचा सगळा खर्च टिळकांनी केला.

टिळकांच्या सुटकेनंतर बराच काळ केसरीवाड्याच्या दरवाज्यावर येणाऱ्या-जाणाऱ्यांची नोंद करायला एक सरकारी अधिकारी नेमलेला असे. टिळकांना पुण्यात सोडल्यानंतर महाराष्ट्रातल्या प्रत्येक संस्थानाला आणि सरकारी कचेरीला एकेक आदेश बजावला होता, त्यात लिहिले होते, ''बाळ गंगाधर टिळक हे सुटून पुण्यास आले आहेत. त्यांच्या आगमनाने इथल्या राजकीय स्थितीत फरक होईल. त्यांच्या हालचालींवर नजर ठेवणे जरुरीचे आहे. त्यांच्याबद्दल कुणी सहानुभूती दाखवली किंवा त्यांच्या मतानुसार चळवळ केली तर आमच्याकडे तात्काळ खबर करा.'' त्यात पुढे लिहिले होते, ''जोपर्यंत टिळकांची मते बदलली आहेत असे दिसून येत नाही, तोपर्यंत टिळक हे ब्रिटिश साम्राज्याचे शत्रूच आहेत असे समजावे!'' टिळक हे ब्रिटिश साम्राज्याचे शत्रूच राहिले, अगदी शेवटच्या श्वासापर्यंत!

■

I am happy to know that Dr. Dnyaneshwar Mulay Foundation is publishing its 3rd Dipawali edition. I hope this magazine has a great educative value and encourage the people to support the weaker section of the society and come together and bring harmony in society. I extend my best wishes for the success of the third issue of this magazine.



**DIGAMBER HUMANEY**
**PRESIDENT,**
**EPF SC/ST WELFARE COUNCIL, INDORE**

# कारागृहातील कैदी

**ॲड. असीम सरोदे**

**संविधानक अभ्यासक, मानवीहक्क विश्लेषक वकील, मुंबई उच्च न्यायालय**

कारागृहातील कैदी म्हणजे कचऱ्याची एक कॅन आहे. समाजातील सगळा कचरा कारागृहात आहे व इतकेच नाही तर कायद्याच्या दृष्टीनेसुद्धा कारागृहातील कैदी कचराच आहेत, असे मत वॉशिंग्टन कॉलेज ऑफ लॉमधील प्राध्यापक हर्मन यांनी जगातील सगळ्या कारागृहांमधील कैद्यांच्या परिस्थितीचे वर्णन करताना म्हटले होते. भारतामध्ये प्रिझन ॲक्ट ऑफ इंडिया १८९४ या १२८ वर्षांपूर्वीच्या कायद्यानुसर कारागृहांचे व्यवस्थापन चालते. कारागृहातील प्रत्येक माणूस जसा समाजातील शांततेला, कायदा व सुव्यवस्थेला धोका नाही त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्ती कायदा, सुव्यवस्थेला पूरकच आहे असेही नसते. खरे तर, जो पकडला जातो तो गुन्हेगार म्हणून आपल्याला दिसतो हेच सत्य आहे इतकी गुन्हेगारी प्रवृत्ती समाजात उपस्थित आहे याची जाणीव जर आपल्याला झाली तर कैद्यांच्या प्रश्नांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल.

स्वातंत्र्याच्या काळापासून कारागृह सुधारणा या विषयावर अनेक समित्यांनी काम केले. ऑल इंडिया जेल कमिटी १९५७




ते १९५९ पासून, तर ऑल इंडिया कमिटी ऑन जेल रिफॉर्मस् १९८०-१९८३ ज्याचे अध्यक्ष न्या. ए.एन. मुल्ला होते त्यांनी अनेक सूचना दिल्या पण अंमलबजावणी झाली नाही कारण कारागृह हा विषय कुणालाच प्राधान्याचा वाटत नाही. मुल्ला कमिटीच्या सूचना तर कारागृह सुधारणा सुचविणारे आधुनिक पाऊल ठरू शकते.

कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा जास्त कैदी कोंबण्याच्या प्रकारावर सर्वोच्च न्यायालयाने अनेकदा नाराजी व्यक्त केली. भारताची लोकसंख्या सतत वाढत जाऊन आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्यांचा हा देश होणार पण कारागृहांची संख्या त्या प्रमाणात वाढलेली नाही. कारागृहातील गर्दी त्याचे अव्यवस्थापन यातून मानवीहक्क उल्लंघनाचे अनेक विषय गंभीर वळणावर येऊन ठेपले आहेत.

**तुरुंगातही मानवी प्रतिष्ठेची जपवणूक होणे आवश्यक**

संयुक्त राष्ट्रसंघाने कैद्यांचे अनेक मानवाधिकार निश्चित केले त्यानुसार पुढील हक्क महत्त्वाचे मानले जातात. १) मोफत कायदेविषयक सहायता मिळवण्याचा अधिकार, २) जामीन मिळवण्याचा हक्क, ३) आरोग्यदायक वातावरणाचा हक्क, ४) नातेवाइकांना भेटण्याचा अधिकार, ५) कारागृहातील छळवणुकीविरुद्ध दाद मागण्याचा हक्क, ६) महिला कैद्यांना असलेला शोषणाविरुद्धचा हक्क, ७) केसचा त्वरित निपटारा करण्याचा हक्क, असे अनेक हक्क आहेत. त्यामुळे भारतीय संविधानातील घटनात्मक मूलभूत हक्क जसे की, कलम १४ कायद्यापुढे समानता, कलम १५ भेदभावापासून संरक्षण, कलम १९ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा हक्क, कलम २१ मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगण्याचा हक्क, कलम २३ शोषणाविरुद्धचा अधिकार व कलम २४ धर्म स्वातंत्र्याचा हक्क या बाबतीत चिंता करण्यासारखी परिस्थिती आहे.

अनेक न्यायाधीन बंदी त्यांच्या केसच्या निकालाच्या प्रतीक्षेत कारागृहात खितपत असतात. क्षमतेपेक्षा जास्त कैद्यांची संख्या कारागृहातील इतर अनेक समस्यांना जन्म देणारी असते. १९८० साली भारत सरकारने नेमलेल्या कारागृह निरीक्षण आयोगाने अत्यंत महत्त्वाचे मत नोंदवले की, भारतीय कारागृहात

क्षमतेपेक्षा अधिक कैदी असून त्यांना जागेची कमतरता जाणवू लागली आहे. परिणामी कैद्यांना पाळीपाळीने झोपावे लागते. एकीकडे आरोग्यपूर्ण व शांत झोप हा कलम २१ नुसारच्या जीवन जगण्याच्या हक्काचा भाग असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले असताना कैद्यांना झोपण्यासाठी पुरेशी जागासुद्धा नसणे ही मानवीहक्क उल्लंघनाचा गंभीर प्रकार आहे.

**बहुमजली कारागृह बांधणे**

परंपरागत पद्धतीचे सगळेच कारागृह गाव-शहरांच्या बाहेर आहेत व ते संपूर्ण भिंतींनी सुरक्षित करण्यात आलेले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सुरक्षेचे अनेक उपाय करून बहुमजली कारागृह बांधता येऊ शकतात. योग्य जागेची कमतरता व कैद्यांची वाढती संख्या यांचा विचार करून वास्तुशास्त्रज्ञांच्या सल्ल्याने आता असलेल्या कारागृहांच्या जागीच उत्तम बहुमजली कारागृह बांधले जाऊ शकतात. बाहेर देशांमध्ये उत्तम अशी बहुमजली कारागृहे आहेत. लंडनमध्ये एच.एम. प्रिझन वँड्सवर्थ जेल, यू. एस.मध्ये अल्काट्राझ जेल, नॉर्वे बस्ट्रे जेल, स्वित्झर्लंडमध्ये चॅम्प डॉलर जेल या सर्व देशांनी उत्तम अशा बहुमजली इमारती बांधल्या आहेत.

आम्ही कैद्यांच्या मानसिक पुनर्वसनाचा प्रयोग म्हणून महात्मा गांधींच्या विचारांवर आयोजित परीक्षा पुण्याच्या येरवडा मध्यवर्ती कार्यालयात सुरू केली. २००२ मध्ये सर्वप्रथम ही घेतलेली गांधी विचार परीक्षा कैद्यांना अहिंसा, लोकशाही व माणुसकी शिकवण्याचा भारतातील पहिलाच प्रयोग ठरला. त्यानंतर अनेक कारागृहांत या परीक्षा सुरू झाल्या. गांधीविचार परीक्षा देऊन सुधारणा झालेल्या कैद्यांना शिक्षेत सूट द्यावी अशी मागणी आम्ही केली.

**जामीन न देण्याचा अन्याय**

गरिबांना जामीन मिळूच नये अशा प्रकारची यंत्रणा आज राबवली जात आहे. जामीन द्यावा असे आदेश आले परंतु जामिनासाठी पैसे नाहीत म्हणून जामीन मिळत नाही, असे खूप कैदी तुरुंगात खितपत आहेत.

भारतातील फौजदारी प्रक्रिया संहिता यामध्ये जामीनच्या प्रक्रिया सांगितल्या आहेत, तर भारतीय दंड विधान कायद्यात जामीनचे प्रकार सांगितले आहेत, पण जामीन म्हणजे काय याची व्याख्या कोणत्याच कायद्यात नाही.

एकाच गुन्ह्यासाठी श्रीमंत व पैसे असणाऱ्यांना जामीन मिळतो पण गरिबांना जामीन मिळत नाही हे चुकीचे आहे. अंडरट्रायल लोकांना पैशांच्या कारणाने जामीन मिळू न देण्यातून अनेकांचे काम जाते, त्यांचा परिवार, मुले रस्त्यावर येतात. अनेक जण कंटाळून गुन्हा केला नसेल तरीही, केवळ जेलच्या बाहेर येता येईल म्हणून गुन्हा कबूल करतात.

कैद्यांना जामीन मिळण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने अधिसूचना जाहीर केली होती. या अधिसूचनेच्या अटी जाचक होत्या. या अटींची पूर्तता न करण्यात आल्यामुळे अनेकांना कायद्याने ठरवलेल्या शिक्षेहून अधिक काळ तुरुंगात अंडरट्रायल कैदी म्हणूनच काढावा लागत असे.

मोती राम खटल्यात (AIR 1978 SC 1594) सर्वोच्च न्यायालयाने हे स्पष्ट केल आहे, की भारत एक देश आहे. त्यामुळे जामिनासाठी दुसऱ्या जिल्ह्यातून हमी मिळत असेल तर ती नाकारता येत नाही.

जामिनासाठी पासपोर्ट, छायाचित्र असलेले क्रेडिट कार्ड, पॅन कार्ड, मतदान ओळखपत्र, रेशन कार्ड, वीज बिल, लँडलाइन टेलिफोन बिल, मालमत्ता नोंदणी कागपत्रे यापैकी कुठलीही दोन कागदपत्रे कोर्टाकडे जमा करावी लागतात. या तरतुदीमुळेही अनेक जण जामीन मिळण्याच्या शक्यतेतून बाद होतात.

तुरुंगात असतानाही 'माणूस' म्हणून प्रत्येकाचे काही अधिकार अबाधित राहतात. तुरुंगात मुक्तपणे फिरण्याच्या स्वातंत्र्यावर नक्कीच बंधने येतात, पण मानवी प्रतिष्ठेची जपवणूक तुरुंगात असताना करणे आवश्यकच ठरते. 'मानवीहक्क' हा शब्द आजच्यानुसार एवढा प्रचलित झाला नव्हता, तेव्हा कारागृहातील कैद्यांनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना पत्रे लिहून त्यातून ज्या रिट याचिका दाखल झाल्या, त्यामुळे 'मानवीहक्क' हा शब्द आजच्यानुसार एवढा प्रचलित झाला नव्हता, तेव्हा कारागृहातील कैद्यांनी सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्तींना पत्रे लिहून त्यातून ज्या रिट याचिका दाखल झाल्या, त्यामुळे मानवीहक्क संकल्पनेला भारतात गती मिळाली, कारागृहातील कैद्यांचे हे योगदान महत्त्वाचे आहे.

**फाशीची शिक्षा व सुधारणावादी विचार**

भारतात फाशीची शिक्षा योग्य की अयोग्य याबाबत चर्चा करण्याचीही कोणाची तयारी नसते. त्याचप्रमाणे फाशीच्या शिक्षेसंदर्भात न्यायव्यवस्थेअंतर्गतसुद्धा कोणतेही न्यायिक एकमत नाही. ''फाशीच्या भीतीने गुन्ह्यास प्रतिबंध होतो, गुन्हे कमी होतात किंवा गुन्हेगारांना जरब बसते हे दाखवून देणारा कोणताही पुरावा नाही'', असे वक्तव्य नुकतेच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती लोकुर यांनी केले. कडक शिक्षेमुळे गुन्हेगारी कमी होते आणि प्रश्न सुटतात असे वाटणाऱ्या भारतीय समाजाने आता फाशीच्या शिक्षेसंदर्भातील विविध पैलूंवर गंभीर विचार करण्याची गरज आहे. दिल्ली राष्ट्रीय विधी विद्यापीठाने केलेल्या फाशीच्या शिक्षेसंदर्भातील वरीलप्रमाणेच काढलेल्या निष्कर्षाचे वेगळेपण यासाठी आहे



की, फाशी योग्य की अयोग्य यापलीकडे जाऊन भारतीय समाजव्यवस्थेवर न्याययंत्रणेचा वापर करून कुणाला फासावर चढविले जाते याचे अभ्यासावर आधारित मत अहवालातून व्यक्त झाले आहे. महाराष्ट्रात दलित व आदिवासींना ५० टक्के फाशीच्या शिक्षा देण्यात आल्या आहेत तर १८ ते २५ वयोगटातील मुलांचे प्रमाण २५ टक्के आहे असे अहवाल सांगतो. एकूण ७० टक्के लोकांना सर्वोच्च न्यायालयात वकीलच नेमता आला नाही. सत्र न्यायालयात केस सुरू असताना वकिलांनी नीट युक्तिवाद साधला नाही. न्यायालयाने नेमलेल्या वकिलांवर आमचा विश्वास नव्हता हे फाशीची शिक्षा सुनावण्यात आलेल्या कैद्यांच्या अहवालातून व्यक्त झालेले मत अनेक उणिवांना उघड करणारे आहे. एक व्यवस्था म्हणून चौफेर ताशेरे ओढणाऱ्या अशा अनेक बाबी अहवालातून पुढे आलेल्या आहेत. भारतातील वकिलीचा दर्जा वाढविणे आणि कायद्याचे अन्वयार्थ काढू शकतील अशा क्षमताप्रधान वकिलांची कमतरता दूर करणे, विधी सेवा प्राधिकरणाद्वारे देण्यात येणारी मोफत साहाय्यता योजना विश्वासार्ह करणे, प्रि-ट्रायल वर्क म्हणजे प्रत्यक्ष केस सुरू होण्याआधी वकिलांनी कैद्यांच्या सहभागातून तयारी करणे अशा काही गोष्टी गांभीर्याने कार्यान्वित होण्याची गरज आहे. त्याचवेळी गुन्हेगारी व समाजशास्त्र यांचा अभ्यास असलेल्यांनी सरकारच्या मदतीने सातत्याने मानसिक पुनर्वसन विषयावर काम करण्याची गरज आहे. गुन्हेगारीचा आलेख वाढणे किंवा कमी होणे यांचा संबंध भीतिदायक शिक्षांशी नसतो तर जे कायदे आहेत त्यांच्या जलद व परिणामकारक अंमलबजावणीमुळे कायद्याबाबत वचक व आदर निर्माण होऊ शकतो. भीतिदायक शिक्षा असल्या की जरब बसते आणि त्यामुळे गुन्ह्यांचे प्रमाण नियंत्रणात राहते असा समज अशास्त्रीय आणि असंबंध असल्याचे ॲम्नेस्टी इंटरनॅशनल या मानवीहक्क संघटनेने आणि नंतर ह्युमन राईट्स वॉच आणि संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवाधिकार आयोगानेसुद्धा फार पूर्वीच जाहीर केले आहे. युनायटेड नेशनच्या २०१४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या यासंदर्भातील अहवालाचा दाखलासुद्धा भारतातील लॉ कमिशननेसुद्धा दिला होता. आपल्या राष्ट्रपती पदाच्या काळात ज्यांनी सर्व दयेचे अर्ज प्रलंबित ठेवले व कोणत्याच अर्जावर निकाल दिला नाही त्या माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम यांच्याही सूचना इतर हजारो सूचनांसह विधी आयोगाला प्राप्त झाल्या होत्या. फाशीसारख्या शिक्षेमुळे भीती निर्माण होते याचा कोणताच पुरावा नाही, अशा प्रकारच्या भीतीची कल्पना एक मिथक आहे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा लॉ कमिशनने विचारात घेतला होता तो म्हणजे फाशीच्या शिक्षेविरोधात असलेले आंतरराष्ट्रीय मतप्रवाह आणि देशांतर्गतही फाशीची शिक्षा रद्दच करावी या मताला मिळणारी सहमती. आज जगातील ९९ पेक्षा जास्त देशांनी फाशीची शिक्षा पूर्णपणे हद्दपार केली आहे. आपण असे म्हणू शकतो का की ज्या देशांनी फाशीची शिक्षा रद्द केली त्या देशातील नागरिकांचे त्यांच्या देशावर प्रेम नाही, त्यांच्या देशांमध्ये गुन्हेगारी वाढावी, गुन्हेगारांचे लाड करावेत असे त्यांना वाटते? तर तसे मुळीच नाही. या सर्व देशांनी फाशीच्या शिक्षेचा सर्वंकष विचार करून फाशी रद्दच करण्याचा पुरोगामी गुन्हेशास्त्रीय विचार त्यांनी स्वीकारला आहे. जगातील १९३ देशांपैकी आज केवळ ३४ देशांमध्येच फाशीची शिक्षा प्रत्यक्षात अस्तित्वात आहे या सद्यपरिस्थितीचा संदर्भही आपल्याला लक्षात घ्यावा लागेल. या पार्श्वभूमीवर आता एखाद्या सर्वोच्च न्यायालयातील अनुभवी न्यायमूर्तींनाही तसेच वाटत असेल तर ती स्वागतार्ह बाब आहे. आतंकवादी, दहशतवादी प्रवृत्ती असलेल्या व्यक्ती 'जिहाद' किंवा 'धर्मासाठी सर्वस्व समर्पण' या भावनेने प्रेरित होऊन स्वतः मानवी बॉम्ब होण्याचे विध्वसंक रूप आनंदाने धारण करतात अशांच्या मनात फाशीने कोणते भय आपण निर्माण करणार आहोत. आणि म्हणून फाशी हा अत्यंत तत्कालीन व मलमपट्टी स्वरूपाचा उथळ उपाय ठरतो हे क्रिमिनॉलॉजी विषयावरील जगभरातील अभ्यासकांनी मान्य केले आहे. प्रसिद्ध तत्त्वज्ञ खलील जिब्रान यांच्यानुसार झाडावरचे पिकलेले पान जेव्हा गळून पडते तेव्हा त्या पडण्याला संपूर्ण झाडाची मूक संमती असते. तर,

उदाहरणार्थ, आर्य चाणक्य यांचे वाक्य महत्त्वाचे आहे की, 'जोपर्यंत वाईट गोष्टी घडण्याचे कारण समाजात अस्तित्वात आहे तोपर्यंत गुन्हेगारी कमी होणार नाही'. या दोन्ही विचारांवर आधारित फाशीच्या शिक्षेचे अस्तित्व आणि परिणामकारकता तपासली तर लक्षात येते की, आपण समाज म्हणून एकत्रितपणे गुन्हेगारी वाढण्यासाठी दोषी आहोत. दहशतवादी कारवाया करणाऱ्यांची बुद्धिधुलाई (ब्रेनवॉश) करण्यासाठी कुणाची भाषणे त्यांना ऐकविली जातात याची माहिती घेतली तर फाशीवर लटकणाऱ्या गुन्हेगारी प्रवृत्ती तयार होण्याची कारणे समाजात सतत उपस्थित आणि अस्तित्वात आहेत हेच लक्षात येते. ३१ ऑगस्ट २०१५ रोजी भारताच्या विधी आयोगाने फाशीच्या शिक्षेमागची अन्याय्यता व अयोग्यता मांडणारा अहवाल सरकारला सादर केला होता. आतंकवाद आणि देशाविरोधात युद्ध पुकारण्याच्या गुन्ह्यांव्यतिरिक्त इतर गुन्ह्यांसाठी फाशीची शिक्षा नसावीच असा सूचना अहवाल भारताच्या लॉ कमिशनने (विधी आयोगाने) केंद्रशासनाला सादर केला होता. फाशीच्या शिक्षेचे अस्तित्व मुळात घातक आहे. फाशीच्या शिक्षेचे व्यवस्थापन अयोग्य, सामाजिक-आर्थिक दुर्बलांविरोधात अप्रमाणबद्धपणे ही शिक्षा वापरली जाते असेही लॉ कमिशनने म्हटले होते. आता दिल्ली विधी विद्यापीठाने मांडलेले निष्कर्ष भारतीय संदर्भातच नाही तर विषमतापूर्ण शिक्षांच्या विरोधात काम करणाऱ्या जगातील सर्वांनाच खळबळजनक वाटणारे आहेत.

९५ टक्के प्रकरणांमध्ये उच्च न्यायालयाने फाशीच्या शिक्षेचा निर्णय रद्द ठरवून शिक्षा जन्मठेपेत परावर्तीत केली आहे या आकडेवारीचीही दखल लॉ कमिशनने घेतली आहे. न्यायव्यवस्थेत कार्यरत एक वकील म्हणून मला वाटते की, सत्र न्यायाधीशांनी जास्तीत जास्त कडक शिक्षा देणे हा त्यांच्या न्यायिक कामाचे मूल्यांकन करण्याचा एक मुद्दा असणे ही पद्धती चुकीची आहे व त्यातूनही अशा शिक्षा सुनावल्या जातात तसेच काही प्रकरणांमध्ये कमी शिक्षा दिली म्हणून किंवा पुराव्यांअभावी आरोपींना निर्दोष सोडले या कारणांवरून 'दुर्गम भागात बदली' अशा शिक्षा भोगणारे न्यायाधीशही आहेत. सर्वोच्च न्यायालयाने फाशीसंदर्भात निर्णय घेण्यासाठी त्रिसूत्री सांगितली आहे. त्यानुसार एक म्हणजे संतापजनक परिस्थिती (ॲग्रीव्हेटींग सरकमस्टान्सेस ) निर्माण होईल असे गुन्ह्यांचे स्वरूप 'क्राईम टेस्ट'मधून पुढे आले पाहिजे. दुसरे म्हणजे गुन्ह्याबाबतच्या 'क्रिमिनल टेस्ट'मधून आरोपीचीच दया येईल किंवा त्याची बाजू दु:खदायक नसली पाहिजे आणि तिसरं सूत्र म्हणजे गुन्हा दुर्मीळातील दुर्मीळ स्वरूपाचा असावा. एखादे प्रकरण समाजाच्या दृष्टीने दुर्मीळातील दुर्मीळ आहे का हे महत्त्वाचे मानावे, न्यायाधिशांच्या दृष्टीने त्यासंदर्भात विचार होऊ नये अशीही स्पष्टता न्यायालयाने केली आहे. न्यायमूर्ती कृष्णा अय्यर स्पष्टपणे म्हणाले होते की, दुर्मीळातील दुर्मीळ घटना म्हणजे काय हे ठरविण्याचा अनियंत्रित, निरंकुश अधिकार न्यायव्यवस्थेकडे ठेवणे चुकीचे आहे आणि त्यासंदर्भातील मापकदंड निश्चित केले पाहिजेत आतंकवाद आणि देशाविरोधात युध्द पुकारण्याच्या गुन्ह्यांव्यतिरिक्त इतर गुन्ह्यांसाठी फाशीची शिक्षा नेमावीच असे विधी आयोगाने सुचविल्याने दुर्मीळातील दुर्मीळ घटना म्हणजे काय यावर विचार करण्याची गरजच उरणार नाहीत असाही अन्वयार्थ आला आहे. राष्ट्रपतींनी दयेच्या अर्जावर निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा नक्की असण्याची गरज आहे. न्यायालय हे सूड घेण्याचे केंद्र बनू नये हा विचार तसेच डोळ्यांसाठी डोळा घेण्याची प्रक्रिया सर्व जगालाच आंधळे बनवेल हा महात्मा गांधींचा विचार खरे धार्मिक अधिष्ठान असणार आहे. गुन्हेगारांचा द्वेष करण्याऐवजी गुन्ह्यांचा द्वेष करा असेही गांधी म्हणायचे. मुळात प्रश्न केवळ फाशीच्या शिक्षेचा नाही तर आपण व्यापकपणे अस्तित्वात असलेल्या शिक्षांच्या पद्धतीमध्ये बदल घडवून आणणे आवश्यक आहे हे समजून घेतले पाहिजे. गुन्ह्याच्या वर्गवारीनुसार सामाजिक शिक्षांचा विचार करून माणसांना सुधारण्याची संधी देणाऱ्या शिक्षाही अस्तित्वात आणल्या पाहिजेत हा विचार कायदेविषयक सुधारणांशी संबंधित आहे.



# तुरुंगवास

**रेणुताई गावस्कर**
**सामाजिक कार्यकर्त्या**

तुरुंगवास म्हटलं की मनात येतो तो शारीरिक तुरुंगवास. एखाद्याला पोलिसांनी त्याच्यावर खटला चालला आणि त्याला किंवा तिला शारीरिक तुरुंगवासाची शिक्षा झाली असं आपण ऐकतो, वाचतो. क्वचितप्रसंगी आपल्या अगदी जवळच्या व्यक्तीला तुरुंगवासाची शिक्षा होताना आपण पाहतो व भीतीनं आपलं मन भरून जातं. आमच्या संस्थेतील एका मुलाच्या आईला झालेल्या तुरुंगवासाची एक साक्षीदार म्हणून ज्या विदारक अनुभवाला सामोरं जावं लागलं त्याची आठवण माझ्या मनातून कधीच जाणार नाही.

पुण्यातील बुधवार पेठेत देवदासी म्हणून कार्यरत असणाऱ्या या स्त्रीवर अज्ञान मुलींना या व्यवसायात ढकलण्याचा आरोप झाला. खटला चालला व या स्त्रीला काही वर्षांची शिक्षा झाली. पुण्यातील येरवडा कारागृहात तिची रवानगी झाली. त्या स्त्रीचा मुलगा त्यावेळी आमच्या सामाजिक संस्थेत राहत होता. दहा / बारा वर्षाच्या त्या मुलाला झाला प्रकार नीटसा कळलाच नाही. काही काळ असाच गेला. मग एक दिवस तुरुंग अधीक्षकांचा मला फोन आला. मुलगा आणि आईची भेट घडवून आणण्यासंबंधी ते माझ्याशी बोलले. दिनांक व वेळ ठरल्याप्रमाणे माझी मुलगी (जी या क्षेत्रात माझ्यासोबत आहे) व मी त्या मुलाला घेऊन येरवडा कारागृहात पोहोचलो. थोड्या वेळानं मुलाच्या आईला आम्ही जिथं बसलो होतो तिथं बोलावलं गेलं. तिला बहुदा या भेटीची पूर्वकल्पना नसावी कारण मुलाला पाहिल्यावर ती माता क्षणात हसू लागली तर क्षणात रडू लागली. मोठं हृदयस्पर्शी दृश्य होतं ते. आम्हा दोघींच्याही डोळ्यांतून पाणी येऊ लागलं. ती आई मुलाला कवटाळत होती, त्याचे मुके घेत होती. साश्रू नयनांनी त्याला न्याहाळत होती. पण तो मुलगा! माझी नजर त्याच्याकडे गेल्यावर मी चरकले. मुलाच्या चेहऱ्यावर नापसंतीचे भाव स्पष्ट दिसत होते. त्याक्षणी त्या वातावरणात, इतक्या लोकांच्या साक्षीनं त्याला ते आईचं प्रेम नकोसं झालं होतं. तो तिच्या मिठीतून सुटण्याचा प्रयत्न करत होता.

थोड्या वेळानं ही भेट संपली. अधीक्षकांचे आभार मानून आम्ही निघालो. इतर स्त्रियांसोबत त्या मातेला आत नेण्यात आलं. कारागृहाच्या दरवाज्यातून बाहेर पडून आम्ही गाडीत बसलो. आमच्या नेहमीच्या स्वतंत्र मुक्त जगात आमचा परतीचा प्रवास सुरू झाला. वाटेत आम्ही परस्परांशी काहीही बोलू शकलो नाही. दुःखानं, विषण्णतेनं आमची मनं भरून गेली होती. आम्ही तिघं संस्थेत परतलो. नेहमीचं, सुरळीत आयुष्य सुरू झालं. संधी साधून, तुलनेनं मानसिकदृष्ट्या माझ्या मुलीच्या जवळ असणारा हा मुलगा एकदाच तिला म्हणाला, 'मला तिथं परत नेऊ नका. मला ती भेट नको आहे.' बस्स एवढंच. पुढं या मुलाची आई तुरुंगातून बाहेर आली. तिच्या आयुष्यानं आणखी अनिष्ट वळण घेतलं व त्यातच तिचा मृत्यू झाला. मी या सगळ्याची साक्षीदार असले तरीही त्या मुलाला बघितलं (अजूनही तो मुलगा आमच्या सान्निध्यात आहे) की हटकून आठवण येते ती त्या भेटीची. 'आत' असलेली व्यक्ती व

**'उद्या माझी या घरातून सुटका होणार. शरीरानं मी या घरातून सुटणार. करार पूर्ण केल्याबद्दल मला भली मोठी रक्कम मिळणार. पण मला या कशाचाच उपयोग नाही. माझ्या लेखी या कशालाच अर्थ नाही. पैसे, तथाकथित स्वातंत्र्य, सामाजिक जीवन यातलं वैयर्थ्य मला या बंदीवासानं शिकवलं. या बंदीवासानं मला एकांतवासाचा लाभ मिळवून दिला. मी विचार करू लागलो. प्रारंभी मी वाचत असे, लिहीत असे, चित्र काढत असे, वाद्य वाजवित असे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे पुढील भविष्याची सुरम्य स्वप्नं बघत असे. हळूहळू या कशालाच काही अर्थ राहिला नाही. माझं प्राण पाखरू संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेनं उडू पाहत आहे. कोणत्याही करार मदाराची मला आता गरज नाही. म्हणून मी आदल्या दिवशीच निघून जात आहे.**

'बाहेर' असलेला त्याचा आप्तस्वकीय यांच्यातल्या न मिटणाऱ्या अंतराची ती भेट ही जणू खूण आहे.

वरच्या अनुभवाविषयी लिहिताना स्वतंत्र व मुक्त अशा जगाचा उल्लेख केला आहे, ज्या जगात आपण राहतो. रिमांड होमच्या मुलांसमवेत विविध उपक्रम करत असताना मला या मुक्त जगाची जाणीव विशेषकरून झाली हे अगदी खरं. रिमांड होममधली ही मुलं संस्थेच्या चार भिंतीत बंदिस्त असत. सायंकाळ झाली की मोठमोठ्या खोलीतून दुसरे दिवशी सकाळपर्यंत ती आणखीनच अडकून जात. त्यांना बरं वाटावं म्हणून मी रोज सायंकाळी त्या खोल्यांतून त्यांच्यासमवेत राहत असे. बाहेर कुलुपाचा खटका वाजला की सुरुवातीला आपण आहोत अशी बंदिस्तपणाची नकोशी भावना होई, प्रारंभी कधी एकदा आपल्या मोकळ्या जागेत जातो असं होऊन जाई. पण मग हळूहळू त्या बंदिस्त खोलीतही एक जग निर्माण झालं. मुलांसोबत हसण्यात, खेळण्यात त्यांची सुख-दुःखं ऐकण्यात सुरक्षितता वाटू लागली. मात्र मुलांची मनःस्थिती तशी नसे. आपण कधी एकदा बाहेरच्या जगात जातो असं त्यांना होऊन गेलेलं असे. त्यांच्यापैकी एक मुलगा उत्तम चित्रकार होता. तो नेहमी संस्थेच्या भिंतींवर एक चित्र काढायचा. आकाशाकडे चोच करून पंख संपूर्णपणे पसरवून उड्डाणाच्या तयारीत असणाऱ्या पक्ष्याचं चित्र असायचं ते. मात्र त्या पक्ष्याचे पाय



साखळदंडानं जखडलेले असायचे, उड्डाणाला हतबल करणारे. या पक्ष्याबद्दल त्या मुलाला विचारलं की तो मुलगा खिन्नपणे हसून म्हणायचा, 'या बंदीवासातून उडून जाण्याची इच्छा तर आहे. पण परिस्थितीच्या साखळदंडांनी असं काही जखडून टाकलं आहे की उडण्याची शक्यताच नाही.' हा मुलगा पुढे एक नामांकित चित्रकार झाला. आम्ही सर्वांनीच एकत्रितपणे हर प्रयत्नांनी त्याचे ते साखळदंड तोडले असं म्हणायला हवं. तो एका उत्तम कॉलेजात गेला, त्यानं चित्रकलेचं शास्त्रशुद्ध शिक्षण घेतलं व नावही कमावलं. त्याच्या व माझ्या नेहमी गाठी भेटी होत. एकदा असंच बोलताना त्या अडकलेल्या पक्ष्याचा विषय निघाला. आता तो मुक्त झाला आहे. स्वतंत्र आकाशात विहरतो आहे असं मी म्हटल्यावर काहीसं म्लान हसून तो म्हणाला, 'पण भूतकाळ विसरता आला नाही एवढं खरं.'

या झाल्या प्रत्यक्ष तुरुंगवासाच्या आठवणी. परंतु वाचकहो, आपल्या या तथाकथित मुक्त, स्वतंत्र जगात कितीतरी बंधनाचे जाच आहेत की नाही? रीतिरिवाज, रूढी, परंपरा, धर्म, समाज, राष्ट्र यांच्याप्रती मनावर झालेले संस्कार अशा कितीक गोष्टींनी माणूस मानसिक बंदीवासात असतो व त्यातली कित्येक बंधनं ही केवढी तकलादू असतात. मी एक स्त्री असल्यामुळे असेल कदाचित, पण स्त्रियांवरील बंधनं व त्यात भरडून निघणारा तिचा आनंद हा माझ्या नेहमीच जिव्हाळ्याचा विषय राहिला आहे. मला आठवतंय माझ्या लहानपणी आमची आजी तिच्या काळी होणाऱ्या बालविवाहासंबंधी किती आणि काय सांगत असे! त्या काळी बालविधवांचं प्रमाण मोठं असे व त्यानंतर मुलींच्या वाट्याला यायचा तो अखंड कारावास. त्यातून सुटका व्हायची ती फक्त मरणाने. वाचक म्हणतील की आता काळ खूप बदललाय. पण खरं सांगा, माणसाच्या आनंदाच्या अधिकारालाच नाकारणाऱ्या या तकलादू संस्कारांच्या भिंती नष्ट झाल्या आहेत का? कारावासाच्या या भिंती रुंदावल्या आहेत हे खचित पण नष्ट मुळीच झालेल्या नाहीत. व्यसनमुक्तीच्या संदर्भात स्त्रियांच्या मनात असलेला भीतीचा हा बागुलबुवा मला अनेकदा जाणवलाय. व्यसनी नवऱ्याच्या छळानं अनेक शारीरिक व मानसिक व्याधींना सामोऱ्या जाणाऱ्या स्त्रिया 'शेवटी हे जीवन आपलं स्वतःचं आहे व ते भयमुक्त आनंदाने जगणं हा आपला अधिकार आहे' या छोट्या तत्त्वालादेखील नाकारताना दिसतात ते कशामुळे? व्यसनांचा संदर्भ निघालाच आहे तर एकदा व्यसन जडलं की त्याचे पाश गळ्याभोवती किती करकचून बसतात व तो केवढा मोठा कारावास होऊन बसतो हे काय वेगळं सांगायला हवं? ती एकतर जन्मठेपेची व काही प्रसंगी मृत्यूदंडाची शिक्षा



ठोठावल्यासारखी आहे. काही दृढनिश्चयी व्यक्तित्व हे साखळदंड तोडू शकतात.'

हे माझ्या मते एक प्रकारचं 'ब्रेकिंग द बॅरियर्स' आहे. आपण आपल्याभोवती घालून घेतलेले अनेक पाश किंवा विविध कारणांनी घातले गेलेले पाश हळूहळू सोडवावे लागतात. कधी कधी अंतरंगात डोकावून पाहिलं की या मानसिक बंधनांची अनेक उदाहरणं आपल्यासमोर येतात. या भिंती माझ्या जीवनात किंचित विस्तारल्या त्या माझ्या वाचनानं. मला वाचनाची गोडी लागली ती माझ्या लग्नानंतर माझ्या वयाच्या पंचविशीत, माझ्या सहचराला चौफेर वाचनाची अतिशय आवड होती. त्यामुळे विवाहपूर्व आणि विवाहोत्तरदेखील प्रत्येक समारंभ पुस्तक भेटीनंच संपन्न होई. या काळात मला इंग्रजी वाचनाची खूप गोडी लागली. मराठी, हिंदी, इंग्रजी, बंगाली अशा अनेक भाषांतील पुस्तकांशी माझा परिचय झाला. त्यातल्या त्यात मैत्र जुळले ते कथा या साहित्य प्रकाराशी. माझ्या मातुल गृहाकडून लहानपणी मी खूप गोष्टी ऐकल्या होत्या. त्याचाही हा कदाचित परिणाम असेल. पण कथा वाचणं मला अतिशय आवडायला लागलं. मग त्यात चरित्र, आत्मचरित्र, निबंध या सगळ्यांची भर पडत गेली. वाचनाच्या माध्यमातून जीवनाच्या अनेक अंगांचा मोठा पट मनात तयार होऊ लागला व त्यामुळे मनातील असंख्य भिंती कोसळण्यास मदत झाली हे निःसंशय. मानवी मूल्यांशी नव्यानं ओळख झाली. एक नवीन आकाश बघण्यास, आनंदाचा मोकळा श्वास घेण्यास मी प्रवृत्त झाले. वाचनाची मी अतिशय ऋणी आहे. आजही एखाद्या ठिकाणी जाते आणि त्यातल्या एखाद्या कोनाड्यात उभी असलेली पुस्तकं बघते तेव्हा खुशीचे तरंग मनात उमटल्याशिवाय राहत नाहीत. आत्ताच्या आत्ता तिथं बैठक मारावी व वाचनानंदात बुडून जावं अशी उत्कंठ भावना मला व्यापून राहते.

एखाद्या उदाहरणानं माझं म्हणणं मी स्पष्ट करते. मी आधी उल्लेख केल्याप्रमाणे, इंग्रजी वाचनाची मला अतोनात गोडी निर्माण झाली. गाय द मोपॉसा, सॉमरसेट मॉम आणि अन्तोन चेकॉव्ह हे माझे अतिशय लाडके लेखक. या तीनही लेखकांच्या लेखनातून मानवी नात्यातील गुंतागुंतीचा मागोवा घेता आला. सॉमरसेट मॉम यांना साहित्य क्षेत्रात 'B' ग्रेड लेखक म्हटलं जातं असं मी ऐकलं होतं. पण मला मात्र त्यांच्या कथा वाचताना मानवी मनोव्यापाराचं स्पष्ट चित्र दिसत असे. खास करून वसाहतींचं राज्य असलेल्या ठिकाणी इंग्रज लोक जाऊन राहत असत. नोकरीसाठी गेलेल्या या लोकांचा स्थानिक जनतेशी व तेथील स्त्रियांशी विविध प्रकारे संबंध येई. संस्कृतीची इतकी कमालीची भिन्नता असे की अपरिहार्यपणे अनेक समस्या उभ्या राहत. कित्येकदा त्याचं पर्यवसान आत्यंतिक शोकांतिकेत होई. ते वाचताना माझं मन अगदी बैचेन होऊन जायचं. कित्येक काळ त्याच कथानकात अडकून राहायचं.

जे वाचनाचं तेच सिनेमाचं. एखादा सुंदर सिनेमा पाहिला की मुक्त आनंद अनुभवता येतो याची प्रचिती ज्यानं त्यानं घ्यायची असते. अगदी जवळचं उदाहरण घ्यायचं तर 'एलिझाबेथ एकादशी' या मराठी चित्रपटाचं घेता येईल. प्रतिकूल परिस्थिती उद्‌भवली असताना मानवी भावभावनांना कसं हाताळावं याचा हा चित्रपट म्हणजे आदर्श वस्तुपाठ आहे. चित्रपटाचं नाव मला भावलं नाही. त्यामुळे मी तो कितीतरी दिवस पाहिलाच नाही. मग कधीतरी पाहिला आणि त्याच्या प्रेमात पडले. एका निम्न आर्थिक परिस्थितीतील तरुण कर्ता पुरुष या जगातून उठून जातो आणि त्याची आई, पत्नी व दोन मुलं संकटाशी संघर्ष करताना वडिलांच्या एलिझाबेथ नावाच्या सायकलीला वाचवतात. बस्स एवढंच कथानक! पण जागोजागी शक्य असताना जराही मेलोड्रामा न येता ज्या हिमतीनं हे सगळं घडतं ना, त्यात मानवी शौर्याची इतकी उंची गाठली गेली आहे.

अशा चित्रपटांनी मला खूप काही दिलं. पण चित्रपट म्हटलं की इराणी चित्रपट हेच मनात येतं. पुण्यातील नॅशनल अर्काईव्हजची मी सदस्य झाले व कितीतरी इराणी सिनेमे पाहिले. 'व्हेअर इज द फ्रेंड्स हाऊस?' 'चिल्ड्रेन ऑफ हेवन' आणि 'कलर ऑफ पॅराडाईज' या सिनेमांनी मनाच्या कक्षा कितीतरी रुंदावल्या.

या संदर्भातील एक छोटीशी आठवण सांगते. अत्यंत आदरणीय असलेले भास्कर चंदावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सिनेमाचा अभ्यास करण्याची संधी मला मिळाली. त्यात आम्हाला 'बँडिट क्वीन' नावाचा सिनेमा दाखवण्यात आला. गावात दरोडेखोरांनी घातलेल्या धुमाकुळात जातीय राजकारणामुळे अनेक खून पडले आहेत. रक्ताचे पाट वाहताहेत व एक अगदी लहान मुलगी (ती मुलगी आहे हे दर्शविण्याकरिता तिच्या अंगावर कोणतेच कपडे नाहीत) न रडता, धीटपणे रक्ताच्या त्या पाटातून मार्ग काढते आहे. काही वर्षांतच त्या मुलीचं लग्न होतं. आता घुंघट चेहऱ्यावर ओढलेली ती मुलगी! केवढं अंतर त्या दोघींमध्ये... दृश्य एकच. पण स्त्री जीवनाच्या प्रश्नावर केवढा झगझगीत प्रकाश टाकला आहे त्या दृश्यानं!

तुरुंगाच्या संदर्भात ज्याला आपण मानाचं पान म्हणू या अशी एक कथा रशियन कथाकार अन्तोन चेकॉव्ह यानं लिहिली आहे. त्या कथेचा या लेखाच्या शेवटी उल्लेख केला नाही तर या लेखाची सांगता होणार नाही असं मला वाटतं.

एका घरात मेजवानीचा घाट घातलेला आहे. खूप पाहुणे मंडळी जमली आहेत. अशा वेळी नेहमीप्रमाणे गप्पांचे अड्डे जमले आहेत. एका कोपऱ्यात पाच-सहा जणांचा एक कंपू कोणत्यातरी गहन विषयावर चर्चा करतो आहे. एकाएकी त्यातला एक मातब्बर व्यापारी जगावेगळ्या खेळाची कल्पना मांडतो. त्या व्यापाऱ्याचं जवळच घर आहे. तिथं ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंत बंदीवास स्वीकारायचं आव्हान कोणी घ्यायला तयार आहे का? असा सवाल केल्यावर अर्थातच तिथे सुन्न शांतता पसरते. या शांततेचा भंग एक तरुण करतो व हे आव्हान स्वीकारण्याची तयारी दर्शवतो.

अर्थात या घरात सर्व सोयी-सुविधा उपलब्ध आहेत. भोजनाची व्यवस्था बाहेरून होणार आहे. घराचा दरवाजा मात्र उघडला जाणार नाही. हवी तेवढी पुस्तकं, लिखाणाचं साहित्य, जे मागेल ते मिळेल. बंदीवासाचा कालावधी पूर्ण केल्यास एका भरपूर रकमेची तरतूदही व्यापाऱ्याकडून होणार आहे. दुसऱ्या दिवसापासून खेळाची सुरुवात होते. तो तरणाबांड माणूस त्या जागेत बंदीवान होतो. जेवणखाणाबरोबरच पुस्तकं, लिखाणाचं साहित्य, चित्रकलेचे कागद व हरतऱ्हेची वाद्यं यांची मागणी तो करत राहतो व त्याला ती पुरवली जातात. रात्र रात्र त्याच्या खोलीतला दिवा जळत राहतो. वाद्यांचे ध्वनी ऐकू येत राहतात. व्यापाऱ्याचं या सगळ्यावर बारीक लक्ष असतं. त्या तरुणाशी केलेल्या कराराची प्रत त्यानं तिजोरीत जपून ठेवली असते. जर तो तरुण ही पैज हरला तर ती मोठी रक्कम त्याला द्यावी लागणार नाही हे नक्की असतं.

मात्र हळूहळू परिस्थिती बदलत जाते. त्या तरुणाच्या मागण्या कमी कमी होत जातात. कित्येकदा जेवणाचं ताट जसंच्या तसं परत येतं. कथा-कादंबऱ्या नंतर संत साहित्य व मग तत्त्वज्ञानाची पुस्तकं ही मागणी कमी कमी होत जात थांबते. खोलीतून वाद्यांचे आवाज होत नाहीत, रात्री दिवे जळत नाहीत. त्या माणसाचा आवाज तर अजिबात येत नाही. एक विलक्षण शांतता त्या घराला वेढून राहते. तरीही तो तरुण जिवंत आहे असं सिद्ध करणाऱ्या काही हालचाली मात्र तिथं निश्चित होतात.

इथे बाहेरच्या जगात व्यापाऱ्याची परिस्थिती बदलत जाते. भरभराटीला आलेला धंदा डबघाईला येतो व बक्षीसपात्र रक्कम देता येईल अशी स्थिती मुळीच राहत नाही. सुटकेचा दिवस तर जवळ येत चाललेला असतो. अशा वेळी एक दुष्ट विचार व्यापाऱ्याच्या मनाचा ताबा घेतो. सुटकेच्या आदल्या दिवशी चोर पावलांनी जवळच्या चावीचा वापर करत अंधारात त्या घरात जावं, त्या तरुणाचं बरं-वाईट करावं व तो कराराचा कागद नष्ट करावा असा बेत आखून व्यापारी आदल्या रात्री त्या घरात शिरतो. पाहतो तो काय...

घराच्या एका खिडकीचे गज वाकवलेले असतात. दहा वर्षांचा बंदीवास सोसलेला तो तरुण निघून गेलेला असतो. टेबलावर त्यानं लिहिलेलं पत्र फडफडत असतं.

त्या पत्रात तो तरुण म्हणतो, 'उद्या माझी या घरातून सुटका होणार. शरीरानं मी या घरातून सुटणार. करार पूर्ण केल्याबद्दल मला भली मोठी रक्कम मिळणार. पण मला या कशाचाच उपयोग नाही. माझ्या लेखी या कशालाच अर्थ नाही. पैसे, तथाकथित स्वातंत्र्य, सामाजिक जीवन यातलं वैयर्थ्य मला या बंदीवासानं शिकवलं. या बंदीवासानं मला एकांतवासाचा लाभ मिळवून दिला. मी विचार करू लागलो. प्रारंभी मी वाचत असे, लिहीत असे, चित्र काढत असे, वाद्य वाजवित असे. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे पुढील भविष्याची सुरम्य स्वप्नं बघत असे. हळूहळू या कशालाच काही अर्थ राहिला नाही. माझं प्राण पाखरू संपूर्ण स्वातंत्र्याच्या दिशेनं उडू पाहत आहे. कोणत्याही करार मदाराची मला आता गरज नाही. म्हणून मी आदल्या दिवशीच निघून जात आहे.

इतक्या अर्थपूर्ण कथेवर काही बोलावं असं वाटत नाही.

■



## कैद्याचं मन

भिंतीला घडवतं मन
गजातून डोकावतं मन
डोळ्यातून वाहतं मन
माझं कैद्याचं मन
आई वडिलांसाठी तरसतं मन
गाव पिंपळासाठी तरसतं मन
रडणारं मन, विरघळणारं मन
माझं कैद्याचं मन
पत्नीच्या प्रेमानं तरसतं मन
पोरांच्या लाडानं तरसतं मन
स्वप्नामध्ये आपल्यांना शोधतं मन
माझं कैद्याचं मन
कधी वर्तमान पाहतं मन
कधी भविष्य पाहतं मन
कधी भूतकाळ विसरतं मन
माझं कैद्याचं मनं मन
आपल्या आपल्यात अडकतं मन
स्वतः स्वतःत हरवणारं मन
या नात्यात सुसंगती शोधणारं मन
माझं कैद्याचं मन
तुटणारं मन, जुळणारं मन
कोसळणारं मन, सावरणारं मन
आशा आकांक्षा जागवणारं मन
माझं कैद्याचं मन


**मनोज डी. पवार**
नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*

## नाते रक्ताचे संपले

बंदीगृहातून ज्ञान मिळाले... पण
फार उशीर जाहले
नाते रक्ताचे संपले...
मरणापूर्वी मरतोस का रे?
दुसऱ्यांना दुःख देतोस का रे?
भोगल्याविना भोग संपत नाही
तुझ्या मरणाने जग सुधारत नाही
व्यर्थ तू देह जाळिले
नाते रक्ताचे संपले...
स्वार्थासाठी बंदीवान जगतो
कारागृहातील दिवस मोजतो
रामाच्या वनवासाप्रमाणे
चौदा वर्षे भोग समजतो
पण उत्तर चुकले
नाते रक्ताचे संपले....
रात्र होता बंदी झोपतो
स्वप्नी रोज घरी वावरतो
उठूनि बघता डोळे भरूनी
प्रश्न पडले माझ्या अंगणी
हौद कुणी बांधिले
नाते रक्ताचे संपले...

*(या कवितेचे ७८ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात वाचन झाले.)*


**राजेंद्र मारोती उप्पलवार**
सी-४३००, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह

श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*




क्षणांना अर्थ द्यावा,
सण दीपावलीचा...आठवणीत रहावा
बँकेचे सर्व सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतकांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.
(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
जीवन करा समृद्ध!
रजिस्टर्ड ऑफिस : 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, आयसीएस् कॉलनी, युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००७.
कॉसमॉस व्यावसायिक कर्जे आता किफायतशीर व्याजदरामध्ये...
कॉस्मो उद्योग लोन 7.25%* पासून पुढे (नवीन ग्राहकांकरिता)
स्मॉल बिझनेस लोन 8.25%* पासून पुढे
प्रोफेशनल कम्फर्ट लोन 8.50%* पासून पुढे
प्रॉपर्टी मॉर्गेज लोन 8.75%* पासून पुढे
*व्याजदरात वेळोवेळी होणारे बदल लागू राहतील.
*नियम व अटी लागू ROI p.a.
Toll Free No. : 1800 233 0234 | E-mail : customercare@cosmosbank.in | https://www.cosmosbank.com |

# गजाआडचे जीवन...

**मितेश घट्टे**
**अपर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण**

**समाजातील अनेक धुरिणांनी असे कितीतरी वाल्याचे वाल्मिकी घडवले आहेत. त्यांच्या अंतर्मनातील जाणिवेला जागे करून त्यांना गुन्हेगारीच्या पटलावरून सामाजिक सुधारणेच्या व्यासपीठावर बसवले आहे. असे प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे. गजाआडचे जीवन हे आयुष्य उद्ध्वस्त करणारेच असते... तुरुंग हे गुन्हेगारीचे विद्यापीठ होऊ नये म्हणून पोलीस दल सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असते.**

'समाज' या तीन अक्षरांची न मोजता येणारी टोके आहेत. समाजाच्या प्रत्येक टोकावर प्रत्येक माणूस आपले आयुष्य अगदी वेगवेगळ्या पद्धतीने जगत असतो. सध्याचा सामाजिक विचार करता समाजाची दोन टोके विचार करायला लावणारी आहेत. यशस्वी होऊन समाज घडवण्याची आणि समाजातील कुप्रवृत्ती बदलवण्याचे ध्येय बाळगणारी नवी पिढी एका टोकावर आहे. दुसरे टोक समाजातील संवेदनशील मनाला हादरवणारे असून या टोकावरील नवी पिढी गुन्हेगारीत पुरती गुरफटली आहे. गुन्हेगारीचे आकर्षण निष्पापांना चक्रव्यूहात ओढते खरे, पण या चक्रव्यूहातून पुन्हा समाजात ताठ मानेने फिरण्यासाठी परतीचे दोर अनेकदा कापले जातात. हे कापलेले दोर अनेकांचे आयुष्य कायमचे समाजापासून हिरावतात... अन् हे गजाआडचे जीवन नको त्या वयात जगण्याचा दृष्टिकोन बदलून टाकते.

पोलीस दलात कर्तव्य बजावताना खून, प्राणघातक हल्ले, मारामारी, खंडणी, शस्त्रे बाळगणे, लूटमार करणे अशा एक ना अनेक गुन्ह्यांत युवकांसह अनेकांना अडकताना पाहिले. गजाआडचे जीवन अन् कायद्याच्या कचाट्यात अडकलेले अनेक चेहरे स्वतःला बदलवत समाजात उजळ माथ्याने वावरायला लागले तरी अनेक चेहऱ्यांवरील गुन्हेगारीचा कलंक आजही पुसला गेला नाही हे सामाजिक वास्तव आहे.

माझ्या लहानपणी मला पोलिसांच्या यशोगाथांची मनापासून उत्सुकता असायची. गुन्हेगारांच्या मुसक्या आवळणारे पोलीस आणि त्यांची डॅशिंग कार्यपद्धती मनात घर करून राहायची...पण मी स्वतः कधी पोलीस होईन अन् महाराष्ट्राची शान असलेली खाकी वर्दी घालेन असे वाटले नव्हते.

सन २००८ साली पोलीस उपअधीक्षक म्हणून निवड झाल्यावर नाशिक येथे प्रशिक्षण कालावधी पूर्ण केला. पोलिसाची वर्दी हे केवळ मिरवण्याचे नव्हे तर समाज घडवण्याचे, कुप्रवृत्तीला वठणीवर आणण्याचे एक जबाबदार माध्यम आहे याची जाणीव झाली. या जाणिवेनेच ठाणे येथे परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक म्हणून नियुक्ती झाली. अगदी त्याच वेळेस तात्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील (आबा) यांच्या सूचनेनुसार राज्यातील डान्सबारवर कारवाईचा धडाका सुरू होता. यावरून बरेच रणकंदन माजले होते. तेव्हाचे ठाण्याचे पोलीस अधीक्षक विश्वास नांगरे-पाटील साहेबांनी डान्सबारवर धाडी टाकत कारवाईची जरब बसवली होती. डान्सबारवरील कारवाईची मोहीम सुरू होती तेव्हा एका बाजूला डान्सबारमुळे बिघडलेली युवा पिढी होती... डान्सबारच्या वास्तूतील गुन्हेगारीत जात, पात, पक्ष, भेदाला अजिबात जागा नसते.

ठाण्यातील परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर खरी कसोटी पुढे लागणार होती. माझी नियुक्ती प्रथम चिपळूण व नंतर कराड (जि. सातारा) येथे झाली. या भागाचा विस्तार झपाट्याने होत होता. त्यामुळे आर्थिक गुन्ह्यांच्या वाढत्या घटना, खुनांच्या गुन्ह्यांचे सत्र आव्हानात्मक होते. प्रत्येक गुन्ह्याच्या तपासात मी स्वतः लक्ष घालून कायदेशीर बाजू ठासून मांडायचो. खून प्रकरणाचे नेमके कारण काय? खून करणाऱ्यांची मानसिकता काय? याची माहिती गुन्हेगाराशी बोलून घ्यायचो... प्रत्येक खुनाच्या मागे एक नवे धक्कादायक, तर कधी सामाजिक



संवेदनशीलता वाढवणारे वास्तव होते. प्रत्येक गुन्ह्याच्या वास्तवातून गुन्हेगारांची मानसिकता समजत गेली. गजाआडचे जीवन हे आपल्या स्वत:सह आपल्या कुटुंबाची किती मोठी हानी करते, मानसिक खच्चीकरण करते याची जाणीव या अजाणतेपणी गुन्हेगारीत अडकलेल्यांना होत असते. नवी पिढी गुन्हेगारीचे आकर्षण ठरत आहे हे लक्षात आल्यावर प्रत्येक शाळा, महाविद्यालयात जाऊन गजाआडचे जीवन अन् गुन्हेगारीचा कलंक नसलेले मनमोकळे जगणे यातील फरक समजवण्याचा प्रयत्न पोलिसांकडून वारंवार होत असतो.

सध्या सोशल मीडिया हा कळीचा मुद्दा बनला आहे. अल्पवयीन वयात मुलामुलींच्या हातात ॲन्ड्रॉईड फोन पाहायला मिळतात. सध्या धावपळीच्या जगात मोबाईल गरजेचा बनला असला तरी त्याचा वापर किती व कसा होतो यावर मुलामुलींचे भविष्य अवलंबून आहे. सोशल मीडिया हा वापरला तर चांगला आहे पण गैरवापर केला तर तो गुन्हेगारीला प्रवृत्त करू शकतो. अलीकडे आपण सोशल मीडियावर नको ते स्टेटस ठेवून भाईगिरीच्या मोहात अडकलेली युवा पिढी पाहतो. यासाठी आपला पाल्य कोणाच्या संगतीत आहे, त्याचा सोशल मीडिया हाताळण्याचा प्रयत्न कसा आहे याची माहिती ठेवण्यासाठी पालकांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद ठेवणे गरजेचे आहे. सोशल मीडियावरील पोस्टसुद्धा अनेकांना महागात पडू शकतात. सध्याचे सामाजिक वातावरण पाहता प्रत्येकानेच सोशल मीडियावर पोस्ट करताना भान बाळगणे आवश्यक आहे. आपल्या पोस्टने जातीय तेढ किंवा समाजात दुही माजणार नाही ना? याची काळजी घेतली पाहिजे. पालक जेव्हा मुलांच्या हातात मोबाईल देतात तेव्हा पालकांनीच मुलांशी संवाद ठेवून तो नेमका काय करतो? ही जबाबदारी पार पाडली पाहिजे. कारण सोशल मीडियावरूनच अनेकांना गुन्हेगारीच्या मोहपाशात अडकवले जात असल्याची उदाहरणे आहेत.

अल्पवयीन मुलींची छेडछाड, त्यांच्यावरील अत्याचार या घटना सामाजिक संताप वाढवतील अशा आहेत. यावर उपाय म्हणून किशोरवयातच आपल्या पाल्यांना योग्य त्या माणसांची, माहितीची जाणीव करून देणे काळाची गरज आहे. अल्पवयीन मुलींवर अत्याचार झाल्यास बाल लैंगिक अत्याचार कायद्यांतर्गत (पोक्सो) गुन्हा दाखल होतो. या गुन्ह्यात गजाआड गेलेल्यास लवकर जामीन मिळत नाही. त्यामुळे शालेय वयातील मुलामुलींना या कायद्याची जाणीव करून देण्यासाठी महिला पोलिसांचे पथक नियुक्त करण्यात आले आहे. या महिला पोलीस प्रत्येक शाळेत जाऊन 'गुड टच...बॅड टच' याची माहिती देऊन मुलामुलींना जागृत करत आहेत. त्यांचे कायद्याचे ज्ञान अल्पवयीन वयात वाढल्यास भविष्यात गुन्हा करताना ते नक्कीच या जनजागृतीचा, कायद्याचा विचार करतील हा प्रयत्न पोलिसांचा आहे.

सध्या आपल्या अवतीभोवती चोरी, मारामारी, मौजमजेसाठी दुचाकी चोरी, चॅनस्नॅचिंगचे गुन्हे घडतात. या गुन्ह्याचा तपास करून संशयितांना ताब्यात घेतल्यावर यातील बरेच संशयित हे विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याचे समोर येते. विधीसंघर्षग्रस्त बालक कौटुंबिक दुर्लक्षामुळे, परिस्थितीमुळे किंवा मौजमजेला पैसे मिळवण्यासाठी गुन्हा करण्यास प्रवृत्त होतात.


एखादा गुन्हा करून पश्चात्तापाच्या आगीत होरपळणारे कितीतरी युवक, नागरिक, महिला वेळीच त्या चक्रव्यूहाच्या दरवाजातून मागे फिरले तरच बरे... गुन्हेगारीचा मोहपाश कोणा एकाला जखडून टाकत नाही तर तो संपूर्ण कुटुंबाला बदनामीच्या कैचीत अडकवून जातो. सराईत गुन्हेगार हे समाजव्यवस्था



बिघडवण्यासाठीच काम करतात. असे ५ ते १० टक्के सराईत सोडले तर उर्वरित अनेक जण रागाच्या भरात, भावनेपोटी कळत नकळत गुन्हेगारीत अडकतात. अशा पद्धतीने गुन्हेगारीत अडकलेल्यांना अटक केल्यावर त्यांचा गुन्हा करण्याचा हेतू लक्षात येतो. असे संशयित अवघ्या सात ते चौदा दिवसांसाठी पोलिसांच्या ताब्यात असतात. ज्या वेळी ते पोलिसांच्या ताब्यात असतात तेव्हा त्यांना पश्चात्ताप झाला आहे हे दिसून येते. पश्चात्तापाच्या आगीत होरपळले तरी त्यांना त्यांच्या कृत्यामुळे गजाआड जावे लागते. हे गजाआड जाणे त्या एकट्याचे नव्हे तर संपूर्ण कुटुंबाच्या सामाजिक संस्काराचे बस्तान पुसट करते. अशा लोकांकडे आणि त्यांच्या कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून जातो. गजाआडचे जीवन काय असते? याची जाणीव होऊन परतलेले अनेक जण पुन्हा या मार्गाला जायचे नाही असा निश्चय करतात खरे पण अशांची संख्या कमी आहे. ती वाढण्याची गरज आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्य लढ्यासाठी गजाआड जाणे भूषणावह समजले जायचे... पण आता गजाआड जाणे म्हणजे माथ्यावर गुन्हेगारीचा कलंक लावून घेण्यासारखे आहे. सराईत गुन्हेगार गजाआड गेला तर समाजाची मानसिकता फारशी बदलत नाही कारण गुन्हेगारी ही या सराईताच्या स्वभावातच रुजलेली... वाढलेली दिसते. त्यामुळे या सराईतांना ना कुटुंबाचा विचार असतो ना समाजाचा... एक मात्र नक्की, त्यांच्या या गजाआडच्या जीवनाचा अंत अत्यंत दुर्दैवी आणि अकाली होतो. केवळ खुन्नस, वर्चस्ववादासह इतर कारणांनी एकमेकांचे जीव घेणारे आज ना उद्या स्वतःही हे जग सोडून अकाली जातात... सराईत, अट्टल गुन्हेगारांचे बरेचसे आयुष्य हे गजाआड जाते. कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी त्यांचा खटाटोप आयुष्यभर सुरू असतो. मात्र हा खटाटोप यशस्वी होत नाही. गुन्हेगारीच्या गर्तेत स्वतःहून अडकलेल्यांना काही काळासाठी दहशत माजवता येते. मात्र या दहशतीचा शेवट चांगला होत नाही. याचा फटका या गुन्हेगारांच्या कुटुंबासह मुलाबाळांनाही सोसावा लागतो.

यातून 'वाल्याचा वाल्मिकी' होण्याची संधी अनेकांना असते पण त्या संधीची जाणीव करून देणारा समाज किंवा व्यक्ती योग्य वेळी पुढे आले पाहिजेत. समाजातील अनेक धुरिणांनी असे कितीतरी वाल्याचे वाल्मिकी घडवले आहेत. त्यांच्या अंतर्मनातील जाणिवेला जागे करून त्यांना गुन्हेगारीच्या पटलावरून सामाजिक सुधारणेच्या व्यासपीठावर बसवले आहे. असे प्रयत्न होणे ही काळाची गरज आहे. गजाआडचे जीवन हे आयुष्य उद्ध्वस्त करणारेच असते... तुरुंग हे गुन्हेगारीचे विद्यापीठ होऊ नये म्हणून पोलीस दल सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असते. ज्याला खरेच जगायचे आहे... आपले उंच सामाजिक अस्तित्व तयार करायचे आहे... गुन्हेगारीत न भरकटता नकळत झालेल्या चुकीतून पुन्हा माघारी फिरायचे आहे अशांकडे पाहण्याची नजर फक्त बदलायला हवी... अन्यथा गजाआडचे जीवन या प्रवासाचा शेवट कसा होईल हे सांगता येत नाही. समाजाच्या या एका टोकावरील ही मानसिकता बदलण्यासाठी सर्व घटकांनी प्रयत्न करणे काळाची गरज आहे. अन्यथा या टोकावरील चक्रव्यूहात कधी कोण फसेल अन् अकाली संपेल हे सांगता येत नाही. त्यासाठी पालकांसह समाजानेही सावध पवित्र्यात राहणे अत्यंत आवश्यक आहे.

TRUSTED NAME IN DRYFRUITS®
DAGA
BROTHERS
- ESTD 1963 -
-www.dagabrothers.in-

# PREMIUM DRY FRUITS




Laxmi Road Shop :589, Laxmi Road, Near Shagun Chowk, Sadashiv Peth, Pune - 411030.
Contact No. : +91 8669684184

Aundh Shop : New S. No. 128/2, Seasons Business Square, Shop No. 3, Aundh, Pune - 07.
Contact No. : +91 87889 41683

ORDER ONLINE : www.dagabrothers.in

# दो आँखें बारह हाथ

**दीपा देशमुख**
**लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या**

*ऐ मालिक तेरे बंदे हम, ऐसे हो हमारे करम*
*नेकी पर चलें और बदी से टलें, ताकि हँसते हुये निकले दम*
*ये अंधेरा घना छा रहा, तेरा इन्सान घबरा रहा*
*हो रहा बेख़बर, कुछ ना आता नज़र, सुख का सूरज छुपा जा रहा*
*है तेरी रोशनी में वो दम, तो अमावस को कर दे पूनम....*
*बड़ा कमजोर है आदमी, अभी लाखों हैं इस में कमी*
*पर तू जो खड़ा, है दयालू बड़ा, तेरी क्रिपा से धरती थमी*
*दिया तूने हमें जब जनम, तू ही झेलेगा हम सब के गम....*
*जब जुल्मों का हो सामना, तब तू ही हमें थामना*
*वो बुराई करें, हम भलाई भरें, नहीं बदले की हो कामना*
*बढ़ उठे प्यार का हर कदम और मिटे बैर का ये भरम....*

वसंत देसाईंनी संगीतबद्ध केलेली आणि भरत व्यासांनी लिहिलेली ही प्रार्थना कुठल्याही माणसाच्या अंतःकरणाला स्पर्शून न जाईल तर नवलच! या प्रार्थनेतून माणसाच्या माणुसकीला साद घातली आहे. माणूस म्हणून आपलं जगणं कसं असावं याविषयी ही प्रार्थना बोलते. भरत व्यासांच्या शब्दांना जिवंत केलंय ते वसंत देसाई नावाच्या ग्रेट संगीतकारानं! प्रेम, करुणा व्यक्त करणारी ही प्रार्थना फक्त वसंत देसाईंनीच रचावी, ऐकणाऱ्याला नेकीचा मार्ग दाखवावा अशी! 'दो आँखें बारह हाथ' या व्ही. शांताराम दिग्दर्शित चित्रपटात 'ऐ मालिक तेरे बंदे हम....' ही प्रार्थना इतकी व्यापून गेलीये, की ही आळवणी नायकाच्या आवाजात, कैद्यांच्या सामूहिक आवाजात आणि नायिकेच्या आवाजात ऐकताना प्रत्येक वेळी वेगळा अर्थ आणि वेगळा आशय सांगत राहते. ही प्रार्थना इतकी गाजली की भारतातल्या अनेक शाळांमधूनच नव्हे तर पाकिस्तानमधल्या कारागृहात आणि तिथल्या एका शाळेतही प्रार्थना म्हणून म्हटली गेली.

या चित्रपटाचं कथानक ह्युमॅनिस्टिक सायकॉलॉजीविषयी बोलतं. तसंच या चित्रपटावर गांधीजींच्या विचारधारेचाही प्रभाव जाणवतो. या चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कारापासून अनेक पुरस्कारांनी गौरवलं गेलं. १९५७ साली तयार झालेला हा दोन तास तेवीस मिनिटं लांबीचा चित्रपट तमीळ, तेलुगु अशा अनेक भाषांमध्ये निर्माण केला गेला.

तरुण जेलर आदिनाथ हा कैद्यांना माणुसकीनं वागवावं या विचारानं (आज जी ओपन जेलची संकल्पना रुजतेय त्याचाच पुरस्कर्ता म्हणता येईल), सहा अट्टल गुन्हेगार असलेल्या कैद्यांना आपल्या प्रयोगासाठी निवडतो. हे सहा कैदी ३०२ कलम लागलेले खुनी असतात. ते तुरुंगात जन्मठेपेची शिक्षा भोगत असतात. वरिष्ठांच्या विरोधाला आव्हान देऊन आदिनाथनं या कैद्यांची जोखीम पत्करलेली असते. या अट्टल गुन्हेगारांवर आदिनाथनं दाखवलेला विश्वास कथेची पहिली गाठ बांधतो आणि त्याच्या या विश्वासाच्या धाग्यात तो सहा कैद्यांना बांधतो. दोन डोळ्यांतून बारा हातांना सुधारण्याचं आदिनाथनं पाहिलेलं स्वप्न या चित्रपटाची संकल्पना स्पष्ट करतं.

अतिशय क्रूर असलेले आणि माणुसकी हरवलेले हे कैदी बघून यांना माणूस तरी का म्हणावं असा प्रश्न पडतो. त्यांचे दहशतीनं भरलेले संवाद, त्यांची अस्वच्छ राहणी, त्यांचा





बेशिस्तपणा, त्यांचा वेळी अवेळी चाललेला धिंगाणा, त्यांच्यातलं रानटीपण हे सगळं अंगावर येतं. कथानक पुढे सरकत असतानाच त्यात अनेक बारकावे खूप सहजतेनं टिपले जातात. या सहा कैद्यांनी कुठला गुन्हा केला होता, त्यांच्याकडून तो गुन्हा का आणि कसा घडला, शिक्षा भोगत असताना होत असलेली उपेक्षा आणि अवहेलना आणि त्यातून त्यांच्या स्वभावात वाढलेला चिडचिडेपणा आपल्याला प्रेक्षक म्हणून कळत जातो. पण त्याचबरोबर आदिनाथमधला त्या कैद्यांच्या वागणुकीचा मुळाशी जाऊन विचार करणारा आशावादी आणि संवेदनशील माणूसही आपल्याला बघायला मिळतो.

माणुसकी हरवलेल्या सहा कैद्यांना घेऊन आदिनाथ एका बंजर, ओसाड अशा जमिनीवर जातो. या भागाला आझादनगर म्हणून ओळखलं जात असतं. इथे आदिनाथ कैद्यांना आणतो आणि त्यांना 'आपण आपल्या परिश्रमानं इथे शेती पिकवू' असं सांगतो. या सगळ्या प्रयत्नांमध्ये तोही त्यांच्यातला सातवा माणूस म्हणून बरोबर असणार असतो.

या कैद्यांना तो त्यांची नावं विचारतो. आपली ओळख म्हणजे आपल्या हातावरचे ठसे इतकंच त्या कैद्यांना ठाऊक असतं. एका मोठ्या कागदावर ते आपल्या दोन्ही हातांचे ठसे उमटवतात आणि आपल्याला शोधण्यासाठी नावापेक्षा हे ठसेच जास्त कामाला येतील असं कोरडेपणानं सांगतात. तरीही आदिनाथ त्यांना त्यांची नावं विचारतो, तेव्हा ते आपला कैदी क्रमांक अमुक अमुक असं सांगून मोकळे होतात. या प्रसंगातून गुन्हेगार बनलेल्या माणसातली माणूस म्हणून संपत चाललेली भीषणता आणि त्यांच्यातला यंत्रवतपणा प्रेक्षक म्हणून आपल्याला हलवून जातो. मात्र जेव्हा आदिनाथ त्यांच्याकडून मोठ्या खुबीनं त्यांची नावं काढून घेतो आणि त्यांना त्यांच्या नावानं हाक मारतो, तेव्हा पहिल्यांदा त्या कैद्यांचं अंतःकरण ढवळून निघतं आणि ते त्यांच्या चेहऱ्यावरून आणि डोळ्यांमधून दिसत राहतं.

सहा कैदी आणि सातवा जेलर असा त्यांचा रोजचा दिनक्रम सुरू होतो. माणसाच्या माणुसकीवर अतूट विश्वास असलेल्या आदिनाथला कैदी 'बाबुजी' या नावानं हाक मारत असतात. आदिनाथ 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या प्रार्थनेनं त्यांच्या या बदललेल्या दिनक्रमाची सुरुवात करतो. या प्रार्थनेतले शब्द आणि त्याचा अर्थ यातलं काहीही या कैद्यांच्या मनापर्यंत पोहोचू शकत नाही. ते फक्त 'एक आज्ञा' या भावनेतून ती प्रार्थना आदिनाथच्या पाठोपाठ निर्विकारपणे म्हणतात. त्यानंतर त्या ओसाड जमिनीतले दगड हटवणं, गवत काढणं, बांध घालणं आणि विहीर खोदणं अशी अनेक कामं त्या सहा कैद्यांना करावी लागतात. ती कामं करताना सहाही कैदी आदिनाथवर प्रचंड वैतागतात. हे कसलं स्वातंत्र्य, यापेक्षा तो तुरुंगच बरा होता, असं त्यांना वाटायला लागतं.

मात्र आदिनाथच्या वागणुकीनं त्यांच्यात हळूहळू बदल घडायला लागतो. आदिनाथ त्यांच्यासाठी स्वतः स्वयंपाक करून जेवण तयार ठेवतो, त्या वेळी तिखट आणि जहाल चवीचं खाणाऱ्या कैद्यांना हे मिळमिळीत जेवण नको वाटतं आणि ते चिडचिड करतात. मात्र जेवण कोणी बनवलंय हे समजल्यावर त्यांचा राग शांत होतो आणि रागाची जागा समंजसपणा घेतो. तो प्रसंग हलकीशी विनोदनिर्मिती करतो आणि कथेच्या गाभ्याला आणि पर्यायानं आदिनाथच्या विश्वासाला बळकटी देणारा ठरतो. एका कुटुंबात असल्याप्रमाणे कैदी हळूहळू आझादनगरच्या जीवनात समरस होऊ लागतात. त्यांच्या या एकलेपणात किंवा रूक्षपणात एखादी झुळूक यावी वा हिरवळ दिसावी तशी त्या रस्त्यावरून रोज जाणारी एक तरुण खेळणीवाली (चंपा) त्यांना भेटते. ते सगळे तिच्याकडे आकर्षिले जातात. स्वावलंबी, स्वाभिमानी आणि अतिशय कणखर, खंबीर असलेली ही तरुणी या सहाही कैद्यांना अतिशय व्यवस्थितपणे हाताळते. ही गावागावांत फिरून खेळणी विकणारी चंपा कथानकाचा एक अपरिहार्य हिस्सा बनते.

या सहा कैद्यांमधला शंकर नावाचा एक कैदी असतो. त्याची वृद्ध, थकलेली आई त्याच्या दोन छोट्या मुलांना घेऊन त्याला भेटायला येते. तेव्हा आदिनाथ त्या मुलांना इथेच

वडिलांजवळ राहू दे असं त्या वृद्धेला सांगतो आणि ती परत जाताना चंपाला तिला सुरक्षितपणे स्टेशनपर्यंत सोडायलाही सांगतो. चित्रपटातले असे अनेक छोटे छोटे प्रसंग अतिशय सकारात्मक संदेशाचं काम करत राहतात.

शंकरच्या मुलांना आदिनाथनं ठेवून घेतल्यामुळे इतर कैद्यांचा राग उफाळून येतो. आपणदेखील आपल्या कुटुंबाबरोबर राहू इच्छितो असे विचार त्यांच्या मनात वारंवार यायला लागतात. मग त्यांच्यातल्या वाईट वृत्ती अधूनमधून डोकं वर काढू बघतात. ते तिथून पळून जायचाही प्रयत्न करतात. एवढंच काय पण आदिनाथला ठार मारण्याचाही बेत आखतात. पण त्याच वेळी आदिनाथमधला चांगुलपणा त्यांच्या गुन्हेगारी वृत्तीवर मात करत राहतो. शंकरच्या दोन मुलांना जीव लावणारी चंपा त्या कैद्यांच्या कुटुंबातला एक भाग न बोलता बनून जाते. मात्र तसं न दाखवण्याचा संयम दिग्दर्शकानं दाखवला आहे. आईच्या प्रेमाला पारखी झालेली शंकरची दोन्ही मुलं तिला आई म्हणायला लागतात.

काहीच दिवसांत, महिन्यांत कैद्यांच्या कष्टाचं चीज होतं. त्या ओसाड, बंजर जमिनीवर नंदनवन फुलतं. फळं, भाज्यांनी सगळं रान हिरवंगार होतं. सरकारच्या वतीनं आदिनाथचा वरिष्ठ (बाबुराव पेंढारकर) तिथे काय चाललंय हे बघण्यासाठी येऊन जातो. मात्र कैदी बदलू शकतात यावर सुरुवातीपासूनच त्याचा विश्वास नसतो. हसणं, खेळणं, परिश्रमाचं महत्त्व कळणं, स्वच्छतेचं महत्त्व कळणं, आपल्या बाबुजीचं आपल्यावरचं प्रेम कळणं, चंपाशी तयार झालेलं निरपेक्ष नातं कळणं अशा अनेक गोष्टी सहाही कैद्यांमध्ये हळूहळू परिवर्तन घडवून आणतात.

एके दिवशी आदिनाथ शेतात तयार झालेली भाजी बैलगाडीत टाकून शेजारच्या गावात ती भाजी विकायला निघतो, तेव्हा उत्साही कैदी 'आम्ही ही भाजी गावात नेऊन विकतो', असा हट्ट धरतात. आदिनाथ त्यांना होकार देतो. कारण त्याच्या विश्वासाची ही एक परीक्षाच ठरणार असते. तो त्यांना 'फार नफा न घेता भाजी विका' असं सांगत भाज्यांचे भाव लिहून देतो आणि सूर्यास्त होण्यापूर्वी परतायला सांगतो. त्या वेळी इतकी स्वस्तात भाजी विकणाऱ्या कैद्यांना बघून भाजी विकणारा दलाल चिडतो आणि ते कैदी आणि दलाल यांच्यात थोडी बाचाबाची होते. पण नंतर तो दलाल धोक्यानं त्यांना दारू पाजतो. इकडे आदिनाथ कैद्यांची प्रतीक्षा करत असतो. रात्री खूप उशिरा दारूच्या नशेत परतलेले कैदी खूपच गोंधळ घालतात. दारूनं त्यांच्यातला सैतान जागा होतो. इतका की चंपासारख्या सरळमार्गी निरपेक्ष मदत करणाऱ्या मुलीवरही ते जबरदस्ती करण्याचा प्रयत्न करतात. पण चंपा त्यांचे प्रयत्न हाणून पाडते.



ते कैदी आदिनाथवरही जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. पण त्या वेळीही चंपा त्यांचा तो प्रयत्न हाणून पाडते. दुसऱ्या दिवशी शुद्धीवर आल्यावर सगळ्या कैद्यांना आपल्या कृत्याची लाज वाटते. ते चंपाजवळ माफी मागतात. पण त्यांना आदिनाथजवळ म्हणजेच त्यांच्या बाबुजीजवळ आपलं तोंड दाखवण्याची लाज वाटत राहते. चंपा आदिनाथला कैद्यांनी कमावलेले भाजीचे पैसे देत कैद्यांना दारू कोणी पाजली वगैरे सगळा वृत्तांत सांगते. आदिनाथ कैद्यांना माफ करतो. मात्र पुन्हा बाजारात भाज्या आणि फळं घेऊन जायचा प्रसंग येतो, तेव्हा मागचा अनुभव लक्षात घेऊन आदिनाथ स्वतःच निघतो. त्या वेळी कैदी पुन्हा आग्रह धरतात आणि आम्ही आता अशी चूक होऊ देणार नाही असंही आश्वासन देतात. पण आदिनाथला मात्र भीती वाटत असते. त्या दलालानं डिवचलं आणि कैद्यांनी हात उचलला तर अक्रीत घडेल आणि आपण इतके दिवस जे घडवून आणलं त्यावर पाणी फिरेल या भावनेतून तो 'आपणच जाऊन येतो' असं सांगत राहतो. पण कैदी त्याला मनवतात, त्याची शपथ घेतात आणि 'काहीही झालं तरी आमचा हात कोणावरही उचलला जाणार नाही' असं सांगतात. इथे कैद्यांमधला कसोटीचा प्रसंग दाखवला आहे.

सगळे कैदी उत्साहानं भाजी विकायला बाजारात पोहोचतात, तेव्हा मागच्या वेळेसारखीच लोकांची भाजी खरेदी करण्यासाठी झुंबड उडते. पण त्याच वेळी दलालानं गुंड माणसांना काठ्या-लाठ्यांसहित पाचारण करून ठेवलेलं असतं. तो त्यांना कैद्यांवर हल्ला करण्याचे आदेश देतो. आपल्या बाबुजीला आपण शपथपूर्वक सांगितलंय या शब्दांमुळे सहाही कैदी त्यांच्यावर जीवघेणा हल्ला होऊनही शस्त्र उचलत नाहीत. त्या वेळी इकडे त्यांची वाट पाहणारा आदिनाथ आणि पार्श्वभूमीवर 'ए मालिक तेरे बंदे हम' हे समूहानं गायलेलं गीत खूप काही बोलून जातं. आदिनाथमधली आई आपल्या

कैद्यांसाठी नव्हे तर आपल्या सहा मुलांसाठी व्याकूळ झालेली दाखवलीय. एकीकडे घड्याळाचा काटा पुढे पुढे सरकतोय आणि प्रतीक्षा मात्र संपत नाहीये ही सगळी आदिनाथच्या मनातली तगमग वाढतच गेलेली दिसते. तिकडे बाजारात कैद्यांना तशा जखमी आणि रक्तबंबाळ अवस्थेत चंपा बघते आणि त्या मारामारीत हस्तक्षेप करून ती त्यांना कसंबसं परत घेऊन येते. परत आल्यावर काय घडलं ते ती आदिनाथला सांगते. मात्र कैदी प्रचंड मारहाणीमुळे बेशुद्धावस्थेत असतात. आज आपला प्रयोग खरा ठरला. माणसातला माणूस अखेर जिंकला याचा आनंद आदिनाथला होतो.

शेवटच्या प्रसंगात त्याच रात्री चिडलेला दलाल माजलेली जनावरं घेऊन कैद्यांच्या शेताची नासधूस करतो. मोठी आग लावून सगळी पिकं जाळून टाकतो. सगळेच कैदी बेशुद्धावस्थेत असल्यानं प्रतिकार करायला फक्त आदिनाथ उरतो. अनेक दिवसांचे कैद्यांचे परिश्रम आणि पिकांनी उभं राहिलेलं हिरवंगार शेत वाईट प्रवृत्तीच्या उन्मादानं क्षणात उद्ध्वस्त होतं. बेशुद्ध कैद्यांवर चाल करून आलेल्या बैलाला आवरण्यासाठी आदिनाथ प्रतिकार करतो. पण बैलाच्या शक्तीपुढे त्याचा प्रतिकार कमी पडतो. अखेर आदिनाथ हे जग सोडून जातो. 'हमारे बाबुजी हमें छोड़के चले गये' या एका वाक्यातून कैद्यांचा आक्रोश व्यक्त होतो. संपूर्ण चित्रपटभर चंपा आणि आदिनाथमधलं मनातच दडून राहिलेलं नातं कुठेही व्यक्त झालेलं नसतं, पण आदिनाथच्या जाण्यानं उलगडलं जातं. चंपा आपल्या हातातल्या बांगड्या भिंतीवर फोडते आणि तिचं मूक दुःख त्या भिंतींजवळ व्यक्त करते.

कैद्यांच्या चांगल्या वागणुकीनं कैद्यांची जन्मठेपेची शिक्षा सरकारतर्फे माफ केली जाते आणि त्यांची सुटका होते. आदिनाथचा प्रयोग यशस्वी होतो. आता सगळे कैदी आपापल्या घरी जायला मोकळे असतात. मात्र ते जाऊ शकत नाहीत. त्यांना त्यांच्या बाबुजींचे त्यांच्याकडे आकाशातून पाहणारे दोन डोळे दिसत राहतात. ज्या डोळ्यांनी त्यांना दिशा दाखवली असते आणि त्यांच्यात चांगुलपणाचे अंकुर पेरले असतात, ते दोन डोळे या सहा कैद्यांकडे एका आशेनं बघत असतात आणि 'माझे डोळे आता तुम्ही व्हा' असंच जणू काही सांगत असतात. लता मंगेशकर यांच्या आवाजातल्या 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या अंतःकरणाला कापत जाणाऱ्या अखेरच्या प्रार्थनेनं डोळ्यांतून अश्रू वाहायला लागतात.

हिंसेकडून अहिंसेकडे जाण्याचा मार्ग कठीण असला तरी तो अशक्य नाही हे कैद्यांच्याच नव्हे तर प्रेक्षकांच्याही मनावर कोरलं जातं. जगण्यातला खरा आनंद त्यांना समजतो. स्वातंत्र्याचा नेमका अर्थ त्यांना कळतो. जबाबदारी आणि परिश्रम यांची जाणीव त्यांना होते. या चित्रपटातला नायक आदिनाथ अखेरपर्यंत माणसातल्या माणसाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करतो आणि त्यात तो यशस्वीही होतो. चित्रपटाचा शेवट हलवून सोडतो. मात्र एक आशावाद आणि जगण्याची दिशा देऊन संपतो. हा चित्रपट संपतो, पण तरीही हा चित्रपट संपत नाही. पुन्हा एक नवी सुरुवात हा चित्रपट करतो.

यात शेतकऱ्यांचे दलाल हेच काहीही श्रम न करता नफा कसा खातात आणि त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला भाव कसा मिळत नाही आणि त्याचबरोबर सामान्य ग्राहकांनाही शेतमालासाठी जास्त पैसे कसे मोजावे लागतात याचं विदारक चित्र या चित्रपटातून उभं केलंय. आश्चर्य म्हणजे हेच चित्र आजही जसंच्या तसं लागू पडतंय हे एक दुर्दैवच म्हणायचं!

राजकमल कलामंदिर निर्मित 'दो आँखें बारह हाथ' हा चित्रपट महाराष्ट्रातल्या एका सत्य घटनेवर बेतलेला आहे. त्या काळी सांगली जिल्ह्यात साताऱ्याजवळ औंध नावाचं संस्थान होतं. या संस्थानात आटपाडी तहसीलच्या अखत्यारीत स्वतंत्रपूर हा भाग यायचा. इथे घडलेल्या एका घटनेनं महाराष्ट्राचं वैभव असलेले कवी आणि साहित्यिक ग.दि.मा. (ग. दि. माडगुळकर) अस्वस्थ झाले. त्यांनी एकदा बोलत असताना ही घटना व्ही. शांताराम यांना सांगितली आणि व्ही. शांताराम यांनी ग.दि.मा. यांना आपल्या सशक्त लेखणीतून ही कथा पुन्हा एकदा जिवंत करावी अशी विनंती केली. अनेक दिवस ग.दि.मा. यांना या घटनेवर चित्रपट होऊ शकेल असं वाटत नव्हतं. एखादी लहानशी पुस्तिका फार तर होऊ शकेल असंच त्यांचं मत होतं. त्यांनी सुरुवातीला त्यावर लिहिलं, पण त्यांनाच ते आवडेनासं झालं. आपलं लिखाण रूक्ष, कंटाळवाणं होत असल्याचं त्यांनी व्ही. शांताराम यांना सांगितलं. तसंच मलाच जर हे कथानक वाचताना कंटाळा येत असेल तर इतरांना ते कसं गुंतवून ठेवू शकेल असा त्यांचा प्रश्नच होता. व्ही. शांताराम मात्र या कथानकानं झपाटून गेले होते. काहीही झालं तरी त्यांना याच कथेचा धागा पकडून चित्रपट बनवायचा होता. ग.दि.मा. यांना उत्साह का येत नसावा, त्यांचं लिखाण पुढे का सरकत नसावं यावर विचार करताना त्यांना कथानकापेक्षा दृश्यानुभव जास्त देण्याची गरज असल्याचं लक्षात आलं आणि त्या क्षणापासून व्ही. शांताराम यांच्या डोळ्यांसमोर कथेमधली प्रत्येक पात्राची दृश्यं एकापाठोपाठ एक सरकू लागली. ते त्यात इतके रममाण झाले की कधीकधी बाथरूममध्ये त्यांना ही दृश्यं

दिसत. आपण बाथरूमच्या बाहेर येऊन लिहायचं ठरवलं आणि ते विचार निसटले, तर या भीतीनं ते बाथरूममध्येच बसून ते दृश्य कागदावर उतरवत आणि मगच बाहेर येत. अशा प्रकारे दिवसरात्र जिथे आणि जेव्हा सुचतील आणि डोळ्यांना दिसतील ती दृश्यं त्यांनी कागदावर लिहून काढली आणि मग ग.दि.मा.ना तातडीचा निरोप पाठवून बोलावून घेतलं. ग.दि.मा. आल्याबरोबर व्ही. शांताराम यांनी ती दृश्यं वाचून दाखवायला सुरुवात केली आणि ग.दि.मा. यांच्या तोंडून 'वा' हे शब्द बाहेर पडले. त्यांच्यात एक वेगळाच उत्साह संचारला आणि त्यांनी त्यानंतरच्या केवळ एका महिन्यात संपूर्ण चित्रपटाचं कथानक लिहून काढलं. चित्रपटाची पटकथा, संवाद यांची जबाबदारी ग.दि.मा. यांनी उचलली आणि व्ही. शांताराम यांनी ही धुरा यशस्वीपणे दिग्दर्शक या नात्यानं पेलली.

यानंतरची गंमत म्हणजे या चित्रपटाबद्दल व्ही. शांताराम आपले सहकारी किंवा जो भेटेल त्याला कथाबीजाबद्दल सांगत, ऐकणारा मख्खपणे ऐकत असे आणि कुठलीच प्रतिक्रिया देत नसे. खूपच खोदून विचारल्यावर ऐकणारा 'हा चित्रपट चालणार नाही, तेव्हा या फंदात पडू नये' असंच सांगत असे. एकही जण त्यांना त्या बाबतीत अनुकूल मत देत नव्हता. अशा वेळी लोकांचा विरोध हेच एक आव्हान समजून व्ही. शांताराम यांनी हा चित्रपट करायचाच असा दृढनिश्चय केला. समजा आपलं आर्थिक नुकसान झालंच तरी आपल्या याआधीचा रंगीत चित्रपट 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटानं त्यांना भरपूर नफा मिळवून दिला होता. त्यामुळे नुकसान होण्याची चिंता करायची नाही असं त्यांनी ठरवलं. तसंच या कथेतल्या अनोख्या प्रयोगानं आणि मानवतेच्या संदेशानं ते इतके प्रभावित झाले होते की हा चित्रपट काढायचाच असं त्यांच्या मनानं पक्क ठरवलं होतं. सगळ्यांचा विरोध असल्यामुळे आता नायकाच्या भूमिकेसाठी कोणाला निवडायचं असा प्रश्न त्यांच्यासमोर होता. ज्याला या कथानकाविषयी आत्मीयता वाटत नाही, त्याची त्यात गुंतवणूक नसेल तर तो भूमिकेला न्याय कसा देऊ शकेल असा प्रश्न व्ही. शांताराम यांच्यासमोर उभा होता. त्यामुळे अखेर आपणच यातला नायक आदिनाथ याची भूमिका साकारायची त्यांनी ठरवली. चित्रपटातल्या खेळणीवालीच्या भूमिकेसाठी त्यांनी संध्याला विचारायचं ठरवलं. पण 'झनक झनक पायल बाजे'च्या चित्रीकरणाच्या वेळी संध्याला एका प्रसंगात दुखापत झाली होती. त्यामुळे पाठीचं दुखणं वाढलं होतं. अशा परिस्थितीत खेळणी पाठीवर टाकून ही भूमिका



संध्या कशी करू शकेल ही शंका त्यांना सतावत होती. संध्याला विचारण्याआधी त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतला. तेव्हा डॉक्टरांनी व्ही. शांताराम यांना संध्याला तिचं आवडीचं काम मिळालं तर तिचं दुखणं लवकर दूर पळेल आणि ती नैराश्यातून चटकन बाहेर येईल असं सांगितलं. त्यानंतर व्ही. शांताराम यांनी संध्याच्या कानावर या भूमिकेबद्दल घालताच संध्याला इतका आनंद झाला की ती लगेचच खेळण्यांनी भरलेली टोपली डोक्यावर घेऊन मोकळ्या जागेत सराव करायला लागली होती. डोक्यावर खेळणी आणि हातात कोका नावाचं वाद्य अशी कसरत संध्याला या चित्रपटात करावी लागणार होती. पण या सरावामुळे आपण ती सहजपणे करू शकतो असा विश्वास संध्यानं व्ही. शांताराम यांना दिला.

या चित्रपटातल्या सहा कैद्यांच्या भूमिकेसाठी व्ही. शांताराम यांनी उल्हास, बी. एम. व्यास, एस. के. सिंह, पॉल शर्मा, गणपत इंगवले आणि आपल्या स्टुडिओतल्या कँटिनचा मॅनेजर गजेंद्र यांची निवड केली. मुख्य जेलरच्या भूमिकेसाठी बाबुराव पेंढारकर यांची निवड केली. या चित्रपटाचं शीर्षक काय असावं याबद्दल गदिमा आणि व्ही. शांताराम यांची अनेकदा चर्चा झाली. सहा कैद्यांचे परिश्रम करून शेत कसणारे बारा हात आणि त्यांच्यावर कधी प्रेमाची तर कधी धाकाची नजर ठेवणारे दोन डोळे असा विचार करताच व्ही. शांताराम यांना 'दो आँखें बारह हाथ' हे शीर्षक सुचलं आणि तेच निश्चितही झालं.

या चित्रपटात व्ही. शांताराम यांना प्रार्थना हवी होती. त्यांनी पं. भरत व्यास यांच्यावर गीतांची जबाबदारी सोपवली होती. व्ही. शांताराम यांना प्रार्थनेचे बोल असे हवे होते की त्यात

कुठलाही धर्म, जात, भजन यांचा फील येऊ नये. ती कुठल्याही धर्माला आपली वाटावी आणि तिनं माणुसकीला हाक द्यावी. भरत व्यास यांना काही केल्या प्रार्थनेचे बोल सुचत नव्हते आणि व्ही. शांतारामांचे बोल रात्रभर त्यांच्या कानावर आदळत राहिले. पहाटे पहाटे त्यांना शब्दांनी साद दिली आणि बघता बघता 'ऐ मालिक तेरे बंदे हम' या प्रार्थनेचा मुखडा आणि एक अंतरा तयारही झाला. त्यांनी सकाळ होताच व्ही. शांताराम यांना तो एका लयीमध्ये म्हणूनही दाखवला. व्ही. शांतारामांच्या तोंडून नकळत 'वा, क्या बात है' हे शब्द बाहेर पडले. ते पंडित व्यास यांना म्हणाले, 'पंडितजी, मी आत्ताच भविष्यवाणी करतो. तुमची ही प्रार्थना अजरामर होणार' आणि व्ही. शांताराम यांचे शब्द खरे ठरले. या प्रार्थनेनं इतिहास घडवला.

वसंत देसाईंनी संगीतबद्ध केलेलं 'उमड़ घुमड़ कर आयी रे घटा', 'तक तक धूम धूम', 'सैंया झूठों का बड़ा सरताज निकला', 'मै गाऊं तू सो जा' ही लता मंगेशकर यांनी गायलेली गाणी अप्रतिम आहेत. यातला वाद्यांचा वापर अतिशय चपखलपणे केला आहे. 'सैंया झूठों का बड़ा सरताज निकला' या गाण्यात संध्या कोका नावाचं वाद्य वाजवताना दाखवली आहे. वसंत देसाईंच्या संगीतामधला ताजेपणा, उल्हसितपणा संपूर्ण वातावरणच बदलवून टाकतो. 'तक तक धूम तक तक धूम' या गाण्याचा ठेका आणि संगीत त्या कैद्यांमधला आनंद दाखवतं. 'उमड़ घुमड़ कर आयी रे घटा' या गाण्यानं तर बहारच आणलीये. पावसाळी वातावरण आणि फुलून आलेल्या चित्तवृत्ती या दोन्हींचा मिलाफ इथे घडलेला दिसतो.


या चित्रपटात व्ही. शांताराम, संध्या आणि सहा कैद्यांनी अतिशय चांगला अभिनय केला आहे. संध्या थोडी लाऊड वाटते. पण त्या काळाच्या पार्श्वभूमीवर जाऊन बघितलं तर ती नाट्यमयता स्वाभाविकही वाटते. व्ही. शांताराम दिग्दर्शक म्हणून जेवढे सरस ठरले आहेत, तेवढीच त्यांची भूमिकाही ते अक्षरशः जगले आहेत असंच म्हणावं लागेल. या चित्रपटातली शेवटच्या प्रसंगात बैलाबरोबरची आदिनाथची झुंज खूप परिणामकारक पद्धतीने चित्रित केली आहे. या प्रसंगाचं शूट करताना बैलाबरोबरच्या झटापटीत व्ही. शांताराम यांच्या डोळ्याला खूप मोठी जखम झाली आणि त्यांची दृष्टी जाईल अशी भीती डॉक्टरांना वाटत होती. पण त्यांच्यावरची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आणि त्यांना मिळालेल्या या नव्या दृष्टीमुळेच ते पुढे 'नवरंग', 'गीत गाया पत्थरों ने', 'आदमी' यासारखे चित्रपट बनवू शकले.

'दो आँखें बारह हाथ' या चित्रपटाच्या प्रिमियर शो ला खूपच थंड प्रतिसाद होता. चित्रपट बघायला आलेल्या प्रेक्षकांपैकी कोणीही व्ही. शांताराम यांचं अभिनंदन करायला थांबलं नाही. पण जेव्हा हाच चित्रपट सर्वत्र प्रदर्शित झाला, तेव्हा सर्वसामान्य प्रेक्षकांनी मात्र तो उचलून धरला. आणि तो मुंबईच्या ऑपेरा हाऊसमध्ये तब्बल ६० आठवडे चालला! या चित्रपटाला सॅम्युअल गोल्डविन इंटरनॅशनल फिल्म अवॉर्डनं (ज्याला आज गोल्डन ग्लोब पुरस्कार असं म्हणतात) सन्मानित केलं गेलं. आंतरराष्ट्रीय स्तरावरचा हा सन्मान मिळवणारे व्ही. शांताराम हे पहिले भारतीय होते. याशिवाय बर्लिन फिल्म फेस्टिव्हलमध्ये या चित्रपटाला सिल्व्हर बेअर पुरस्कार मिळाला. तसंच राष्ट्रपती सुवर्ण पदकही या चित्रपटानं पटकावलं. व्ही. शांताराम यांच्या चित्रपटानं चार्ली चॅप्लिनसारखा अभिनेताही भारावून गेला होता आणि त्यानं मुक्तकंठानं व्ही. शांताराम यांची प्रशंसा केली होती. फक्त मनोरंजन हा एकमेव उद्देश न ठेवता मूल्यांची रुजवणूक करण्याचा जणू काही व्ही. शांताराम यांनी आपल्या चित्रपटांतून विडा उचलला होता.

एक क्लासिक सिनेमा म्हणून १९५७ साली प्रदर्शित झालेला 'दो आँखें बारह हाथ' हा चित्रपट भारतीय चित्रपटाच्या इतिहासात आपला ठसा उमटवून जाणारा असाच आहे.

('डायरेक्टर्स' या आगामी पुस्तकातून)

adipaa@gmail.com



# शिक्षेतून सुधारणेचा प्रवास

**डॉ. हेमंतकुमार पवार**
संशोधन अधिकारी, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे - १

**बंद्यांना विविध कामे उपलब्ध करून दिली जातात, त्यात स्वयंपाक बनविणे, स्वच्छता करणे, दुरुस्ती व सुरक्षाविषयक कामे देऊन त्यांना मजुरीच्या स्वरूपात वेतन दिले जाते. यामुळे कारागृह प्रशासनावरील ताण कमी होऊन शासनाचा खर्च कमी होतो. ही एक चांगली पुनर्वसन कार्यपद्धती आहे.**

महाराष्ट्रातील बहुतांश कारागृहांची स्थापना ही स्वातंत्र्यपूर्व काळातील असून महाराष्ट्रातील सर्वांत पुरातन भायखळा जिल्हा कारागृह सन १८४० साली बांधण्यात आलेले आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात जवळपास २६ कारागृहे अस्तित्वात होती. या कारागृहांमध्ये स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेल्या सेनानी व क्रांतिकारकांना ठेवण्यात आले होते. महाराष्ट्रातील येरवडा, नागपूर व ठाणे या मध्यवर्ती कारागृहात तसेच धुळे जिल्हा कारागृह येथे फाशी यार्ड आहे व सद्यस्थितीत पुणे व नागपूर येथे ते कार्यान्वित आहे.

**कारागृहात वास्तव्य असणाऱ्या प्रख्यात / थोर व्यक्ती** -

महाराष्ट्रातील विविध कारागृहांत स्वातंत्र्य सेनानी, थोर व्यक्ती, आंदोलक यांचे वास्तव्य होते. येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे भारतीय स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतलेल्या चाफेकर बंधू व इतर १२ स्वातंत्र्य सेनानींना फाशी देण्यात आली असून याच कारागृहात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी यांचेबरोबर पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, मनीभाई देसाई यांनीदेखील कारावास भोगलेला आहे. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आणीबाणी कालखंडात बाळासाहेब देवरस व इतरांना स्थानबद्ध करण्यात आले होते. २४ सप्टेंबर १९३२ रोजी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेमध्ये पुणे करार/ ऐक्य करार झाला आहे. सदरची वास्तू गांधी यार्ड म्हणून ओळखली जात असून ती संरक्षित करण्यात आली आहे. माजी दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुढाकाराने १९५६ साली येरवडा मध्यवर्ती कारागृहाच्या परिसरात महाराष्ट्रातील बंदिस्त पुरुषांसाठी पहिले खुले कारागृह सुरू करण्यात आले व दुसरे खुले कारागृह औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथे सुरू करण्यात आले आहे. सदर कारागृहातील बंद्यांच्या श्रमदानातून जायकवाडी धरणाचा बंधारा बांधण्यात आला आहे. अमरावती मध्यवर्ती कारागृहात आणीबाणीच्या काळात व्ही. व्ही. गिरी हे त्यांचे ४० आंदोलकांसह बंदिस्त होते. त्यांना बंदिस्त केलेल्या बराकी जतन करून ठेवण्यात आलेल्या आहेत. वर्धा जिल्हा कारागृहात महात्मा गांधी तसेच विनोबा भावे हे काही कालावधीसाठी बंदिस्त होते. ठाणे मध्यवर्ती कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर हे काही काळ बंदिस्त होते. महाराष्ट्रातील रत्नागिरी विशेष कारागृहात स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यवीर सावरकर व सेनापती बापट इत्यादी थोर राष्ट्रीय पुरुषांना स्थानबद्ध करण्यात आले होते. धुळे जिल्हा कारागृहात विनोबा भावे, साने गुरुजी व जमनालाल बजाज यांना कारावासात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांचे स्मारक जतन करण्यात आलेले आहे. याच कारागृहात विनोबा भावे यांनी 'गीताई' हा ग्रंथ लिहिला आहे. नाशिक मध्यवर्ती कारागृहात साने गुरुजी यांना ठेवण्यात आले होते. या कारागृहात त्यांनी 'श्यामची आई' हे पुस्तक लिहिले आहे.

**कारागृहात वास्तव्य असणाऱ्या कुख्यात व्यक्ती** -

ज्याप्रमाणे कारागृहात प्रख्यात किंवा थोर व्यक्तिमत्त्व यांचे वास्तव्य होते, त्याचप्रमाणे कारागृहात कुख्यात गुन्हेगार, आतंकवादी व गाजलेल्या खून खटल्यातील आरोपींनीदेखील शिक्षा भोगली आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे पुणे शहराला हादरवून टाकणारे हत्याकांड १९७६ साली झाले होते त्यामधील कुप्रसिद्ध गुन्हेगार जक्कल, सुतार, मुनव्वर यांना फाशी देण्यात आली. 'येस, आय ॲम गिल्टी' हे पुस्तक त्यांनी कारावासात लिहिले होते. या पुस्तकावरून 'माफीचा साक्षीदार' हा चित्रपट

बनविण्यात आला. जनरल अरुणकुमार वैद्य यांचे मारेकरी जिंदा व सुखा यांनादेखील येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे फासावर लटकविण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रातील कुप्रसिद्ध दरोडेखोर बापू विरू वाटेगावकर याने पूर्ण शिक्षा येरवडा मध्यवर्ती कारागृहात भोगली. बापू विरू वाटेगावकर याचेवर आधारित मराठी चित्रपट बनवण्यात आला आहे. तसेच धुळे जिल्हा परिषदेतील गाजलेल्या घोटाळ्यातील आरोपी भास्कर वाघ यानेदेखील शिक्षा भोगली आहे. त्याच्यावरदेखील 'जिल्हा परिषद' (ZP) हा चित्रपट काढण्यात आला आहे. महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय गँगवारमधील गुन्हेगार अरुण गवळीदेखील येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे काही काळ बंदिस्त होता. भारतावरील दहशतवादी हल्ल्यातील जिवंत पकडण्यात आलेला एकमेव आतंकवादी अजमल कसाब यास येरवडा मध्यवर्ती कारागृहात फाशी देण्यात आली. प्रसिद्ध अभिनेता संजय दत्त यानेदेखील येरवडा कारागृहात शिक्षा भोगली आहे. आंतरराष्ट्रीय गुन्हेगार चार्ल्स शोभराज, नटवरलाल हेदेखील मुंबई मध्यवर्ती कारागृहात बंदिस्त होते.

**ऐतिहासिक वास्तू जतन करण्यात आलेली कारागृहे –**

**१) येरवडा मध्यवर्ती कारागृह :**
भारतीय स्वातंत्र्य संग्रामात ज्यांनी बंदिवास भोगला व हौतात्म्य पत्करले त्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ येरवडा कारागृहाच्या प्रांगणात स्मारक उभारण्यात आले आहे. येरवडा मध्यवर्ती कारागृहात महात्मा गांधी यार्ड हे स्मारक म्हणून जतन करण्यात आलेले आहे. तसेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, पंडित जवाहरलाल नेहरू यांना ठेवण्यात आलेली बॅरकदेखील स्मारक म्हणून जतन करण्यात आलेली आहे.

**२) ठाणे मध्यवर्ती कारागृह :**
स्वातंत्र्यवीर सावरकर, त्यांचे बंधू बाबाराव सावरकर, वासुदेव बळवंत फडके, आदिवासी क्रांतिवीर रामोजी भांगरा, स्वातंत्र्यवीर अनंत कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे यांना १९ एप्रिल १९१० रोजी या कारागृहात मृत्युदंड देण्यात आला आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात ज्यांनी बंदिवास भोगला व हौतात्म्य पत्करले, त्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ ठाणे मध्यवर्ती कारागृहात स्मारक उभारण्यात आले आहे.

**३) नाशिक मध्यवर्ती कारागृह :**
नाशिकरोड मध्यवर्ती कारागृह येथे परमपुज्य साने गुरुजी यांचे वास्तव्य ९ ते १३ फेब्रुवारी १९३३ या कालावधीत पाच दिवस होते. 'श्यामची आई' या पुस्तकाची सुरुवात याच कारागृहातून करण्यात आली आहे. ज्या बराकीत साने गुरुजींना ठेवण्यात आले होते ती बॅरक जतन करण्यात आलेली असून त्यामध्ये साने गुरुजींची मूर्ती ठेवण्यात आली आहे.

**४) धुळे जिल्हा कारागृह :**
भारतरत्न आचार्य विनोबा भावे हे धुळे कारागृहात दिनांक १८.१.१९३२ ते १४.७.१९३२ पर्यंत स्थानबद्ध होते. याच कारागृहात त्यांनी 'गीताई' हा ग्रंथ लिहिला आहे. धुळे कारागृहात विनोबांची गीतेवरची जगप्रसिद्ध गीता प्रवचने झाली. श्री. विनोबांच्या सोबत जमनालालजी, पूज्य साने गुरुजी, खान्देश गांधी, बाळुभाई मेहता, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हेदेखील होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांनादेखील धुळे येथील कारागृहात ठेवण्यात आले होते. या महापुरुषांच्या बराकी, स्मारक म्हणून जतन करण्यात आलेल्या आहेत.

**५) रत्नागिरी विशेष कारागृह :**
स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यवीर सावरकर व सेनापती बापट इत्यादी थोर राष्ट्रीय पुरुषांना या कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले होते. या कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना दिनांक १६.५.१९२१ ते ३.९.१९२३ व सेनापती बापट यांना






दिनांक २४.११.१९३१ ते ३१.१२.१९३५ पर्यंत ठेवण्यात आलेल्या कोठडीची जागा त्यांचे स्मारक म्हणून सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे. सदरची वास्तू शासनाने राष्ट्रीय स्मारक म्हणून जाहीर केलेली आहे. या कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची चित्रफीत बनविण्यात आलेली आहे व ती भेट देणाऱ्या व्यक्तींना दाखविण्यात येते. तसेच या बराकीमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पेंटिंग्ज लावण्यात आलेली आहेत.

**स्वातंत्र्यानंतर कारागृह विभागाचा दृष्टिकोन :**

महाराष्ट्र राज्यात सध्या ६० कारागृहे असून त्यामध्ये ९ मध्यवर्ती व २८ जिल्हा कारागृहे, महिला कारागृह, १ विशेष कारागृह, १ किशोर सुधारालय, १९ खुले कारागृह व १ खुली वसाहत आहे. महाराष्ट्र राज्यातील पहिले खुले कारागृह येरवडा, पुणे येथे सन १९५६ साली स्थापन करण्यात आले. भारतातीलच नव्हे, तर जगातील पहिले महिला खुले कारागृह १४ मार्च २०१० रोजी येरवडा, पुणे येथे सुरू करण्यात आले. कारागृहातील गुन्हेगारांच्या वैचारिक व वर्तणुकीत सुधारणा करून समाजात त्यांचे योग्य प्रकारे पुनर्वसन करणे हे ध्येय ठरवून सन १८९४च्या तुरुंग कायद्यानुसार महाराष्ट्रातील कारागृहांची स्थापना झाली आहे. कारागृहांची स्थापना करण्यामागील महत्त्वाचा उद्देश म्हणजे कायद्याच्या विरुद्ध वर्तन करून गुन्हा करणाऱ्या गुन्हेगारांना समाजाच्या शांतता व स्वास्थ्यतेच्या दृष्टीने काही काळ एकांतवासात ठेवणे हा होय. तसेच गुन्हेगारांचे सुधारणा व पुनर्वसन करणेबाबत योजनाबद्ध कार्यक्रम तयार करणे हा आहे. कारागृहातील अपराध्यांना कायद्याचा सन्मान करणाऱ्या चांगल्या नागरिकांत रूपांतरित करण्यासाठी चाललेले प्रबोधनाचे कार्य पाहून शासनाने दि.०१.१२.२०१५ रोजी कारागृह विभागाचे नामकरण 'कारागृह व सुधारसेवा' केल्याची अधिसूचना काढली आहे. सुरक्षितता, शिस्त, सुधारणा, पुनर्वसन, शिक्षण व बंदींचे कल्याण ही 'कारागृह व सुधारसेवा' विभागाची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. कारागृहातील बंदी सतत सकारात्मक कामामध्ये गुंतून राहावेत व त्यांच्यामध्ये असलेल्या कौशल्याचा विकास होत राहावा, यासाठी 'कारागृह व सुधारसेवा' विभागामार्फत सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येतात. गुन्हेगारांच्या वागणुकीत सुधारणा होईल हे गृहीत धरून त्यांना शिक्षण व मार्गदर्शन करणे, तसेच हे शिक्षण घेण्यास त्यांचे मन तयार करणे, त्याप्रमाणे बंदींचे कौशल्य, आवड व कार्यक्षमता ओळखून त्यांना विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने कारागृह विभागातील विविध उद्योगांत व शेतीत रोजगार उपलब्ध करून दिला जात असल्याने बंदिवासातून सुटका झाल्यावर त्यांची उपजीविका करण्यासाठी बंदींना व्यवसायाबाबतचे ज्ञान उपयोगी पडते. त्यामुळे बंदींचे खऱ्या अर्थाने 'सुधारणा व पुनर्वसन' होत आहे.

**बंद्यांच्या सुधारणा व पुनर्वसनासाठी कारागृह विभागाकडून राबविण्यात येणारे उपक्रम –**

सेवाभावी आणि विश्वस्त संस्था यांची मदत घेऊन बंदींसाठी योगासने व ध्यानधारणेचे उपक्रम चालविले जातात तसेच विपश्यना शिबिरे घेतली जातात.

विविध संघटनांद्वारे बंदींसाठी प्रबोधनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. प्राथमिक शिक्षण, प्रौढ शिक्षण व संगणक प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले जाते. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत बंदींचे नाटक, बंदी कलारजनी इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मैदानी व बंदिस्त खेळांच्या सुविधा उपलब्ध केल्या जातात. बंदींना संगणक प्रशिक्षित करून संगणकाच्या परीक्षांना बसण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. बरॅकमध्ये दूरदर्शन संच बसवून बंदींना राष्ट्रीय कार्यक्रम पाहण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येते. बंदींकरिता वर्तमानपत्रे, पुस्तके (धार्मिक, सामाजिक, समाज प्रबोधनपर, आत्मचरित्र इत्यादी) उपलब्ध

करून देण्यात येतात. बंदींना माफीची सवलत, रजा देणे तसेच बंदींची खुले कारागृहासाठी निवड करून देण्यात येते.

सिद्धदोष बंद्यांची मुदतपूर्व सुटका, रात्र पहारेकरी व बंदी अन्वेषक म्हणून संधी करून देण्यात येते.

बंद्यांना विविध कामे उपलब्ध करून दिली जातात, त्यात स्वयंपाक बनविणे, स्वच्छता करणे, दुरुस्ती व सुरक्षाविषयक कामे देऊन त्यांना मजुरीच्या स्वरूपात वेतन दिले जाते. यामुळे कारागृह प्रशासनावरील ताण कमी होऊन शासनाचा खर्च कमी होतो. ही एक चांगली पुनर्वसन कार्यपद्धती आहे.

कारागृहात बंदींकरिता 'बंदी पंचायत' घेऊन चांगल्या बंद्यांना प्रशासनात समाविष्ट करून कारागृहातील धान्य, शिजविलेल्या अन्नाचा दर्जा, स्वयंपाक व इतर बाबींवर नियंत्रण ठेवण्यात मदत घेतली जाते.

बंद्यांना व्यवसाय प्रशिक्षणात मोटार दुरुस्ती व वॉशिंग सेंटरवर काम उपलब्ध करून देण्यात येते. बंद्यांना कारागृह उद्योगात व शेतीत जास्तीत जास्त काम दिल्यामुळे उत्पादनात वाढ झाली. त्यामुळे बंदींचे दरडोई उत्पन्न वाढले. बंदींना कारागृह उपाहारगृह सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे बंदी आपल्या गरजेनुसार वस्तू व बेकरीचे पदार्थ खरेदी करू शकतात. कारागृहात कुशल बंदी कामगारांना स्वतंत्ररीत्या पेंटिंग, जरीकाम, कलाकुसरीची कामे दिली जातात, त्यांना याबाबत मोबदला दिला जातो. सेवाभावी संस्था व खाजगी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कारागृह उद्योग चालवून बंदींना काम दिले जाते. त्याबद्दल त्यांना मजुरी दिली जाते.

कारागृहातील प्रत्येक बॅरकमध्ये तक्रार निवारण पेटी ठेवली असून ती फक्त कारागृह उपमहानिरीक्षक यांचे उपस्थितीत उघडली जाते. तसेच न्यायालय पेटी ही कारागृहात न्यायाधीशांसमोर उघडली जाते. महिला बंद्यांच्या मुलांसाठी महिला कारागृहात बालवाडी चालू आहे.

कारागृहातील बंदी समाजाचा एक घटक असून प्रसंगी क्षणिक, मोहापायी, रागाच्या भरात, वाईट संगतीमुळे किंवा भावनेच्या भरात घडलेले गुन्हे हे सुधारण्याच्या दृष्टीने अनुकूल असतात. यातून त्यांना मानसिकदृष्ट्या बाहेर काढण्यासाठी ग्रंथालये व चांगली पुस्तके ही महत्त्वाची भूमिका बजावत असतात. कारागृहात बंद्यांना मिळणारा वेळ वाचनात खर्च झाला तर त्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांचे मनोविचार बदलण्यासाठी याचा मोठा परिणाम होतो, यास्तव बहुतांश कारागृहात वाचनालये आहेत. कारण पुस्तकांचा मोठा परिणाम माणसांच्या मनावर होत असतो.

मा. उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार तसेच कारागृह नियमावलीतील तरतुदीनुसार भारतातल्या इतर राज्यांमधील कारागृहांमध्ये उपाहारगृह सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता स्मार्टकार्ड, इतर आधुनिक साधने वापरून उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व कारागृहांमध्ये उपाहारगृह सुविधा प्रभावीपणे आणि पारदर्शी पद्धतीने बंद्यांना उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बँक ऑफ महाराष्ट्र यांचेमार्फत येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे प्रथमच कारागृह उपाहारगृहासाठी प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प राबविण्यात येत आहे. यानुसार कारागृहातील सर्व बंद्यांना प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत बँकेमध्ये खाते उघडता येणार आहे. कारागृहातील बंद्यांना उपाहारगृह सुविधेसह इतर बाबींकरिता पोस्ट ऑफिसमार्फत मागवण्यात येणाऱ्या मनिऑर्डरऐवजी बंद्यांच्या नातेवाइकांकडून त्या बंद्यांच्या बँक खात्यावर थेट रक्कम जमा होईल. बँक ऑफ महाराष्ट्रद्वारे पुरविल्या जाणाऱ्या (Aadhar Linked Banking) बायोमेट्रिक मोबाईल मशीन (Biometric Mobile Machine)द्वारे उपाहारगृह सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बंद्यांच्या उपाहारगृह सुविधेसाठी कारागृहाकडे बंद्यांच्या बँक खात्यातून वजा झालेली रक्कम जमा होण्यासाठी कारागृहाचे यासाठी एक स्वतंत्र खाते बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने उघडण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य कारागृह विभाग व अन्नामृत फाउंडेशन, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने येरवडा खुले जिल्हा कारागृह येथे नंदनवन हा कृषी आधारित प्रकल्प सुरू करण्यात आलेला आहे. या प्रकल्पामुळे देशी गोधनापासून तयार करण्यात येणाऱ्या वस्तू व सेंद्रीय शेतीद्वारे मिळणारे उत्पन्नाचे स्त्रोत यामध्ये वृद्धी होणार आहे. या प्रकल्पामुळे बंद्यांना कृषी व विज्ञानाचे शिक्षण मिळणार असून त्याद्वारे विषमुक्त अन्न तयार करण्यासंदर्भात तंत्रज्ञान / प्रक्रियेची माहिती बंद्यांना आत्मसात करता येईल.

सदर कार्यक्रमाद्वारे बंदी पुनर्वसनाचे रोल मॉडेल तयार होऊन भूमाता, गोमाता व अध्यात्म या भक्तीभावाने या प्रकल्पाची गेली तीन ते चार महिन्यांपासून पूर्वतयारी करून त्याद्वारे बंद्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षण, प्रशिक्षणाचा उपयोग करून बंदी स्वतःच्या पायावर उभे राहणार आहेत. सदरचा प्रकल्प महाराष्ट्रभर राबविण्याचा मानस असून देशी गोधनपासून तयार करण्यात येणाऱ्या वस्तू सेंद्रीय शेतीद्वारे मिळणारे उत्पन्नाचे स्त्रोत तीन पट किमतीने बाजारात विकले जाईल. या प्रकल्पामुळे बंद्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होणार असून सर्व साधने उपलब्ध करून देण्यात आलेले असल्याने बंदी बांधवांच्या जीवनाचा सांधा बदलायला मदत या प्रकल्पाद्वारे होणार आहे.

श्री कृष्ण भगवानांचा जन्म कारागृहात झाला. कारागृह हे

कारागृह नसून कार्यगृह आहे आणि बंद्यांमध्ये या प्रकल्पाद्वारे परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न होणार आहे. मी काय करू शकतो, या संकल्पनेतून सेंद्रीय शेतीद्वारे कृषी क्षेत्राचे संवर्धन होऊन बंदी बांधवांचे जीवन सुंदर करण्यासाठी अध्यात्म आधारित हा प्रकल्प येरवडा खुले कारागृह येथे सुरू केला आहे. भारत ही कृषी भूमी आहे त्यामुळे बंद्यांना कृषी व विज्ञानाचे शिक्षण विषमुक्त अन्न तयार करून सर्व बंद्यांचे मन परिवर्तन करण्याकरिता हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे.

**बंद्यांचे शारीरीक आरोग्यासोबत मानसिक आरोग्य सांभाळणे –**

गुन्हा करणे किंवा गुन्ह्याची प्रवृत्ती असणे हे मानसिक रोगांच्या लक्षणांपैकी एक लक्षण आहे. व्यक्तीच्या शारीरिक आरोग्याइतकेच महत्त्वाचे मानसिक आरोग्यदेखील आहे. कारागृहातील बंद्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राखणे ही कारागृहातील वैद्यकीय अधिकारी यांचेबरोबरीने कारागृहातील अधिकारी-कर्मचारी यांचीदेखील जबाबदारी आहे. कारागृहात प्रवेश केल्यापासून ते सुटकेपर्यंत बंद्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे कारागृह प्रशासनाला क्रमप्राप्त आहे. प्रवेशाच्या वेळी बंद्याला काही शारीरिक बाह्य किंवा अंतर्गत दुखापत आहे किंवा नाही हे तपासण्यात येते. त्याकरिता बंद्यांच्या प्रवेशाच्यावेळी हिंसाचाराच्या अलीकडील खुणा असल्यास वैद्यकीय अधिकारी ताबडतोब अधीक्षकांच्या निदर्शनास आणून देतात व पुढील कार्यवाही करण्यात येते. बंद्यांच्या वैद्यकीय तपासणी उपचाराबाबत त्रुटींचा अभ्यास करणे, त्यामध्ये योग्य सुधारणा करणे, शिफारशी सुचविणे आणि अंमलबजावणीकरिता उपाययोजना करणे याबाबत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या समन्वयाने मुख्यालयाच्या स्तरावर एक समितीचे गठन करून या समितीच्या बैठका घेण्यात येतात. कारागृहाबाहेरील शासकीय रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये यामध्ये बंद्यांना आंतररुग्ण म्हणून दाखल करण्याबाबत मानक प्रणाली तयार करण्यात आली आहे. व त्याबाबत आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना सूचनादेखील देण्यात आलेल्या आहेत. बंद्यांच्या आरोग्य तपासणीबाबत वैद्यकीय अहवाल सादर करण्यासंदर्भात मा. राष्ट्रीय मानवीहक्क आयोग व मा. उच्च न्यायालय यांनी एक नमुना ठरवून दिला असून त्या नमुन्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येते. सर्व जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांकडून आरोग्य विभागाने बंद्यांवर करण्यात आलेल्या औषधोपचाराबाबत मासिक अहवाल कारागृह अधीक्षकांना पाठवण्याबाबतदेखील सूचना करण्यात येतात. विशेष उपचार तज्ज्ञ, वैद्यकीय अधिकारी कारागृहात भेटीस पाठवण्याबाबत आरोग्य विभागास कळवण्यात येते. तसेच बंद्यांच्या मानसिक नैराश्यासाठी व समुपदेशनाकरिता शासकीय रुग्णालयातील मानसोपचार तज्ज्ञ किंवा समुपदेशक यांचेमार्फत बंद्यांच्या मानसिक आरोग्यासाठी उपाययोजना करणेबाबत सूचना करण्यात येतात. जिल्हा सामान्य रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांची रुग्णालये यामधील प्रिझन वॉर्ड, बंद्यांसाठी राखीव ठेवण्यात येतात.

**कारागृहातील महिला बंदी व त्यांच्या लहान मुलांकरिता कल्याणकारी उपक्रम –**

स्त्री आणि पुरुष असा भेदभाव आधुनिक समाजात राहिलेला नाही. पुरुष व महिला यांना समान हक्क प्राप्त आहेत. कारागृहात असणाऱ्या महिला बंद्यांनादेखील त्यांचे मूलभूत अधिकार प्राप्त होत असतात. त्या दृष्टीने कारागृह विभागाकडून प्रयत्नदेखील करण्यात येतात. कारागृहात दाखल पुरुष व महिला बंद्यांच्यापासून विभक्त असलेल्या मुलांच्या भेटी, लहान मुलांना नियमानुसार बालसंगोपन योजनेचा लाभ, शिक्षा भोगून मुक्त होणाऱ्या बंद्यांचे पुनर्वसनासाठी दिले जाणारे आर्थिक साहाय्य यासारख्या बाबींसाठी कारागृह विभागाकडून महिला व बाल विकास विभागाशी संपर्क साधून त्या योजनांचा लाभ कारागृहातील महिला बंद्यांना देण्याकरिता प्रयत्न करण्यात येतात. कारागृहातील शिक्षा भोगून मुक्त होणाऱ्या बंद्यांच्या पुनर्वसनाकरिता आर्थिक साहाय्य मिळणेसाठी सदर योजनेचा बंद्यांना लाभ घेता येणार आहे.

कारागृहातील बंदी प्रथम एक माणूस आहे हा दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवून कारागृह आपले ब्रीदवाक्य 'सुधारणा व पुनर्वसन' राबवित असतो. कारागृहातील बंदी परत गुन्ह्याकडे वळू नये याकरिता कारागृह विभाग हा नेहमीच प्रयत्नशील असतो, पण समाजानेदेखील अशा सुधारणेकडे वळणाऱ्या बंद्यांच्या प्रती आपला दृष्टिकोन बदलणे गरजेचे आहे. बंद्यांमध्ये साधारणपणे वैचारिक सुधारणा घडवून आणणे, सुयोग्य वर्तणुकीबाबत मार्गदर्शन व प्रबोधन करणे, शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षणाद्वारे बंद्यांमध्ये सतत सुधारणा घडवून शिक्षा उपभोगल्यानंतर समाजात एक चांगला नागरिक म्हणून पाठविण्याची तसेच पुनर्वसन करण्याची जबाबदारी 'कारागृह व सुधारसेवा' विभाग पार पाडत असतो. त्यामुळेच कारागृहे ही जणू एक प्रकारची सुधारगृहेच झाली आहेत.

■


चांगुलपणाची चळवळ दिवाळी अंकास
आमच्या हार्दिक शुभेच्छा !
भविष्याच्या आव्हानासाठी सज्ज करणारे
गुरुकुल समूहाची दोन परिपूर्ण शैक्षणिक संकुल
GURUKUL SCHOOL
GURUKUL ACADEMY
विद्यार्थ्यांची आवड व पालकांची नंबर 1 निवड असलेले शैक्षणिक संकुल.
GURUKUL SCHOOLS
IIT & MEDICAL ACADEMY
SCHOLAR ACADEMY
ENGLISH MEDIUM SCHOOL
PRE-SCHOOL
COMMERCE ACADEMY
OLYMPIAD SCHOOL
VIDYALAYA (SEMI-ENGLISH)
JUNIOR COLLEGE
मेरीट देणारा कॅम्पस्
राष्ट्रीय स्तरावरील अनुभवी प्राध्यापक
शिक्षणासह पालकत्वाची जबाबदारी
मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह
Gurukul
ABDUL LAT CAMPUS,
HERWAD ROAD, ABDUL LAT.
ICHALKARANJI CAMPUS,
Near Shahu Putala, Kayzen Honda Building,
ICHALKARANJI - 416 115.
गणेश नायकुडे
चेअरमन - गुरुकुल स्कूल
अध्यक्ष - पश्चिम महाराष्ट्र,
महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्टीज असो. (MESTA)
8793505266, 7385680566
www.gurukulschools.org
www.facebook.com / gurukulschoolinfo
HOSTEL FOR BOYS & GIRLS

# दोष हा कुणाचा!

## शिक्षा भोगलेल्या एका कुंटणखान्याच्या मालकिणीची ही कथा व व्यथा

**दलितमित्र प्रा. साधना झाडबुके**
सामाजिक कार्यकर्त्या

खरे तर मी कर्नाटकातील हुबळीची. वडील महाराष्ट्रातले, आई तेलुगु आणि शाळा इंग्रजी. त्यामुळे मला हिंदी, मराठी, कानडी, इंग्रजी, तेलुगु आणि बंगाली भाषा पण येते. त्यामुळे पुण्याच्या बुधवार पेठेतील एड्स समुपदेशन केंद्रामध्ये येणाऱ्या विविध प्रांतातल्या कुंटणखान्याच्या मालकिणींशी, वेश्यांशी मी चांगली बोलू शकते. त्यांच्या मनात प्रवेश करून त्यांच्या अडचणी समजून त्यांना निरोध कसा वापरावयाचा, गिऱ्हाइकापासून आपले संरक्षण कसे करायचे, टग्या गिऱ्हाइकाला कसा इंगा दाखवायचा हे मी त्यांच्या भाषेत सांगू शकते. इथे वेश्या वस्तीत नेपाळ, आंध्र, कर्नाटक, बंगालच्या भरपूर मुली आहेत. माझ्या अनुभवाने मी शहाणी होऊन चांगली सोशल वर्कर म्हणून नाव कमावले आहे. पण त्याचा मागचा इतिहास मोठा आहे.

हुबळीत माझ्या वडिलांचा मोठा व्यापार होता. आई गृहिणी. श्रीमंती असल्यामुळे खूप लाड व्हायचे. वडिलांना इंग्रजी येत नसल्याने त्यांनी मला इंग्रजी शाळेत पाठवले. नाच, नकला, भाषण, खेळ या सर्वांत मी भाग घ्यायचे. बक्षिसे मिळवायचे.



त्यामुळे सर्वांची मी लाडकी होते. आईचे देखणे रूप मला आले होते. वयाच्या १२व्या वर्षीच मी १६ वर्षांच्या मुलीसारखी उफाड्याची दिसायचे. तरुण मुले घराभोवती घिरट्या घालायची. मी पण नटायचे. सिनेमातील नटीसारखा साजशृंगार करून कंबर लचकवित रस्त्यातून चालायचे. मुले गाड्या घेऊन मागे लागायची. मनातून आनंद वाटायचा. पुरुषाचे खूप आकर्षण वाटायला लागले होते.

हुबळीच्या एका राजकीय पक्षाच्या धनाढ्य व्यापाऱ्याचा मुलगा मोठी चारचाकी गाडी घेऊन माझ्या मागे लागायचा. देखणा होता. बोलायला हुशार होता. त्याच्यावर मी भाळले. आमच्या भेटी-गाठी होऊ लागल्या. सिनेमा, फिरणे वाढू लागले. लॉजमध्ये जाऊन एकमेकांच्या मिठीत शिरून संभोगाचा आनंद घेऊ लागले. मग ती सवयच लागली. शेवटी मी त्याला लग्न करण्याची मागणी केली, कारण मला दिवस गेले होते. त्याचा नकार होता. पण मी चिठ्ठी लिहून आत्महत्या करण्याची धमकी देताच तो तयार झाला. मग घरातील थोडे दागिने-पैसे घेऊन मी त्याच्याबरोबर पळून बेळगावला आले. तेथून विमानाने मुंबई व मुंबईहून कलकत्त्याला विमानाने पोहचले. प्रदेश नवा पण त्याला तिथली सर्व माहिती होती. एका डॉक्टरच्या मदतीने माझा गर्भपात केला. तोपर्यंत आम्ही ऐषारामात हॉटेलमध्ये राहत होतो. त्याचे घरचे सारखे फोन करत होते म्हणून मला एका कलकत्त्यातील 'सोनागाची' भागात त्याने एका मावशीकडे ठेवले. मला भाषा, प्रदेश काहीच माहीत नाही, पुन्हा येतो असे सांगून तो जो निघून गेला, तो आयुष्यात पुन्हा मला कधीच भेटला नाही.

माझ्या एका चुकीमुळे माझे पूर्ण आयुष्य बरबाद झाले. मावशीकडे येणारे लोक, त्यांचे वागणे, माझ्याकडे विचित्र नजरेने पाहणे मला आवडत नव्हते. पण माझा नाइलाज होता. शेवटी मला कळले की 'सोनागाची' म्हणजे वेश्यावस्ती आहे. मावशीने मला मारून, उपाशी ठेवून, मानसिक त्रास देऊन वेश्याव्यवसायाला प्रवृत्त केले. माझे देखणे रूप, पुरुषांना

आकर्षित करणारी अंगकाठी आणि विविध भाषा सराईतपणे बोलू शकत असल्याने भरपूर गिऱ्हाईक माझ्याकडे यायची. मला पण भरपूर पैसे मिळायचे. मावशी पण माझ्यावर खूश असायची. तेथेच मला दारूचा व मटण खाण्याचा नाद लागला. सवयीने मला बंगाली येऊ लागले. आता आपले हेच जीवन समजून मी जगू लागले. तेवढ्यात एका बंगाली बाबूवर माझे मनापासून प्रेम जमले व त्याच्याबरोबर मी मुंबईला पळून आले.

पण तो मित्र नव्हता, तर भडवा होता. मुली पळवून आणणे, विकत घेणे, विकणे, त्यांना वेश्याव्यवसायाला लावणे, हाच त्याचा व्यवहार होता. मुंबईच्या एक आलिशान फ्लॅटमध्ये आम्ही कुंटणखाना सुरू केला. माझ्याकडे अगदी तरुण, सुंदर, कोवळ्या १०-१२ मुली होत्या. त्यांची नावे मी बदलली होती. प्रत्येकीच्या नावाचा एक अल्बम ज्यामध्ये फोटो, कमीतकमी कपडे घातलेले ठेवले होते. गिऱ्हाइकाला तो अल्बम दाखवायचा. गिऱ्हाईक एखादी मुलगी पसंत करायचा. पैसे माझ्याकडे देऊन त्याला दिलेल्या खोलीत तो जायचा. खोल्या पण आलिशान होत्या. टीव्ही, फ्रिज, फॅन, एसी, स्वच्छ टॉयलेट अशा सर्व सोयी होत्या. त्यामुळे पैसेवाले गिऱ्हाईकच आमच्याकडे येत होते. भरपूर सोने, पैसा मी त्या ४-५ वर्षांत कमावला, तसाच दारूचा नाद पण वाढला. पण एड्सचा रोग झाला आणि गिऱ्हाईक यायचीच बंद झाली. एखाद-दुसरे गिऱ्हाईक यायचे. ज्याच्याकडून मुली विकत घेतल्या होत्या त्याचे पैसे द्यायचे होते. पैशाची चणचण भासू लागली.

एके दिवशी एका हातात सोन्याचे कडे, हिऱ्याच्या अंगठ्या घातलेला तरुण आमच्याकडे आला. कितीही पैसे द्यायची त्याची तयारी होती. पण मुलगी चांगली व सुख देणारी पाहिजे हा त्याचा आग्रह होता. मी खूश झाले. डॉली तशी हुशार मुलगी होती, तिलाच मी त्याच्याबरोबर रूममध्ये पाठवले. इतक्यात शिट्ट्यांचा आवाज ऐकू आला. मी घाबरले. बाहेर पाहिले तर पोलिसांचा वेढा पडला होता. दार ढकलून स्त्री पोलीस आत आल्या. त्यांनी पहिले मलाच पकडले. नंतर सर्व फ्लॅटची झडती घेतली. सर्व कुंटणखान्यातील मुलींना पोलीस व्हॅनमधून घेऊन गेले. मला मात्र पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले. माझ्या लक्षात आले तो श्रीमंत दिसणारा गिऱ्हाईक पंटर होता. पोलिसांनी आमच्या कुंटणखान्यावर रेड टाकली होती. मला वाटले माझ्याबरोबर तो बंगाली बाबू पण पोलीस स्टेशनमध्ये आला असेल. पण त्यानंतर तो कधी दिसला नाही. तो कायमचाच बेपत्ता झाला होता.

पोलीस स्टेशनमध्ये मला कोठडीत ठेवण्यात आले. तेथे इतके डास, उंदीर होते. फक्त एकच छोटी खिडकी, मुंबईचा उकाडा, मला तर एसीमध्ये राहायची सवय. रात्र तशीच न झोपता कोठडीत काढली. सकाळी पोलीस व्हॅनमधून न्यायालयात नेले. तेथे बंगाली बाबूने परस्पर पैसे देऊन वकील नेमला होता. वकिलाने माझी बाजू मांडली व पोलिसांच्या वकिलाने त्यांची बाजू मांडली. मला पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. मी निराश झाले. संध्याकाळी दारू व मटणाची सवय. पोलीस स्टेशनची भाजी-भाकरी मला आवडली नाही. जवळ-जवळ ४-५ दिवस मी उपाशीच राहिले. रोज रात्री पोलीस मारहाण करायचे. दरडावयाचे. त्या माराच्या भीतीने मी खरे ते सांगितले. त्यामुळे गिऱ्हाईक आणून देणारे एजंट व ज्यांच्याकडून मी पोरींना विकत घ्यायचे ते भडवे या सगळ्यांनाच पोलीस स्टेशनमध्ये पकडून आणले. प्रत्येकाला वेगवेगळे बोलावून प्रश्न विचारायचे आणि नंतर तिघांना समोर आणून पोलिसांनी अनेक प्रश्न विचारले. प्रत्येकाचे उत्तर वेगळे असायचे. पाचव्या दिवशी पुन्हा जज्जसाहेबांसमोर उभे केले. जज्जसाहेब यांनी मला आर्थर रोडच्या जेलमध्ये ठेवण्याचा आदेश दिला. एजंट व भडव्यांची पोलीस कस्टडी मात्र पाच दिवस वाढविली.

पोलीस व्हॅनमधून मी आर्थर रोड जेलमध्ये आली. जेलमध्ये येण्याचा तो पहिलाच प्रसंग. माझी न्यायालयीन बंदी (कच्चा कैदी) म्हणून नोंद केली गेली. तिथे मला माझा १९ नंबर दिला गेला. सकाळी पाच-साडेपाचलाच वॉर्डन जोरात ओरडून, घंटा वाजवून उठवायचे. मग सार्वजनिक बाथरूममध्ये अंघोळ, संडास आवरून चहाचे पाणी प्यायचे. माझ्या बराकीत ८-१० बायका होत्या. बरॅक लहान होती. माझी कोणाशीच ओळख झाली नव्हती. दिवस-रात्र दारू-मटण खाण्याची सवय असल्याने मला तिथले पांचट जेवण आवडायचे नाही. सकाळ-संध्याकाळ बंदी नं. १९ म्हणून माझी हजेरी घेतली जायची. सकाळी दहा वाजता जेवण व संध्याकाळचे जेवण सहा वाजता. कुंटणखान्यात आमचे जेवण रात्री दोनला व्हायचे व दिवसा बाराला आम्ही झोपून उठायचो. मग अंघोळ वगैरे आटोपून दुपारी दोन वाजता जेवलो की पुन्हा विश्रांती. संध्याकाळपासून मात्र मग नटण्या-मुरडायची सुरुवात व्हायची. तिथला धंद्याचा टाइम आणि जेलमधला खाण्या-जेवण्याचा टाइम मला कधीच सूट झाला नाही. रात्री २-३ पर्यंत मी जागी असायचे. सकाळी अर्धवट झोपेत उठावे लागायचे. मनात यायचे, आपली येथून कधी सुटका होणार? या एड्स रोगामुळे आम्ही व इतर वेश्या बायका खरोखरीच अडचणीत आलो होतो. एड्स होईल म्हणून घाबरून गिऱ्हाईक यायचेच बंद झाले होते. मलाही मनात भीती बसली होती.

आम्ही एका बराकीत ८-१० बायका. प्रत्येकीचे वागणे वेगळे. भांडण तर कायमचेच. एकमेकींना शिव्या देणे, झिंज्या ओढणे, चावणे, चिमटे काढणे, टोमणे मारणे चालू असायचे. मी आपले देवाचे स्तोत्र म्हणत वेळ काढायचे. सकाळी ८ ते ९ अशी वकिलांना भेटायची वेळ असायची. बंगाली बाबूच वकिलांना पैसे द्यायचा. पण दुसऱ्यामार्फत. कारण आपल्यालाही पोलीस पकडतील अशी भीती त्याला वाटत असल्याने तो बेपत्ताच राहिला. वकिलाला मी येथून लवकर सोडवा म्हणून विनंती करायचे. कोर्टाची ऑर्डर घेऊन पोलीस पण माझ्याकडे चौकशीला जेलमध्ये यायचे. उलट-सुलट प्रश्न विचारायचे. आठवड्यातून एकदा आमच्या कुंटणखान्यासमोरचा चहा-वडेवाला मला भेटायला यायचा. त्याचेकडून इतर माहिती समजायची. आमच्या कुंटणखान्यातील १०-१२ मुलींना महिला सुधारगृहात व १८ वर्षांच्या आतील मुलींना बालगृहात ठेवल्याची माहिती त्याच्याकडूनच मिळाली. वकिलाला मी म्हणाले, ''अहो, त्या मुली धंदा करतात त्यांना शिक्षा नाही, मलाच का?'' तेव्हा वकील म्हणाला, ''अहो, त्या 'पिटा' कायद्यानुसार कुंटणखान्याची मालकीण, एजंट, भडवे यांना शिक्षा होते. पण या मुलींना परिस्थितीचे बळी मानून शिक्षा होत नाही. तर सुधारण्याची संधी देऊन त्यांना स्वावलंबी बनण्यासाठी विविध कौशल्ये शिकवतात.'' एवढे सांगून वकिलाने वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर माझा फोटो व आलेली बातमी दाखवली. मुलींचे तोंडावर मात्र बुरखा होता. इंग्रजी, हिंदी, मराठी सर्व वर्तमानपत्रात पहिल्या पानावर ही बातमी. माझा फोटो व पोलीस अधिकारी बाईचा फोटो होता. 'पॉश एरियातील कुंटणखान्यावर पोलिसांची धाड, १६ मुलींची सुटका, कुंटणखान्याच्या मालकिणीला अटक' अशी वाचलेली बातमी रात्रभर माझ्या स्वप्नात येत होती.

शेवटी एकदा कोर्टाच्या ऑर्डरनुसार मला जज्जसाहेबांसमोर उभे केले गेले. वकिलाने माझी बाजू मांडली, पोलिसांनी त्यांची बाजू मांडली. मला जज्जसाहेबांनी प्रश्न विचारताच जसे वकिलाने मला शिकवले होते, तशी उत्तरे दिली. त्या दिवसानंतर आर्थर रोड जेलमधून माझी सुटका झाली. पण प्रत्येक आठवड्याला पोलीस स्टेशनमध्ये हजेरी लावायची असा आदेश कोर्टाकडून देण्यात आला. त्यामुळे मुंबई सोडणे मला शक्य नव्हते. शेवटी धारावी झोपडपट्टीमध्ये माझ्या एका मैत्रिणीकडे मी राहिले. माझ्याकडे पैसा-अडका, दाग-दागिने भरपूर होते. त्यामुळे मैत्रिणीने मला ठेवून घेतले. तिची आई पण प्रेमळ होती. पोलीस स्टेशन आणि जेलच्या वाऱ्यांमुळे मी पूर्णत: खंगले होते. मैत्रिणीची आई रोज तेल लावून मला अंघोळ घालायची. पोलिसांनी मारल्यामुळे पाठीवर मोठे वळ होते. गुडघे दुखत होते. रोज तीच मला दुखदबाव लेप लावायची. शेवटी डॉक्टरांकडे जाऊन शक्तीची इंजेक्शने घेतली. माझी अवस्था मरणासन्न झाली होती. पण मैत्रीण व तिच्या आईच्या प्रेमामुळे मी तग धरू शकले. आपण केलेल्या कृत्याचा मला वारंवार पश्चात्ताप होत होता.

कोर्टात केस ३-४ वर्षे चालू होती. सतत मनाला हुरहुर लागायची. आपले जगात कोणी नाही. चांगले घरदार, शिक्षण सोडून आपण प्रेमात पडलो. एका कर्नाटक्याने फसवले नंतर बंगाली बाबूने. कोर्टाने ७ वर्षांची शिक्षा सुनावली. एजंटला २ वर्षे व भडव्याला ४ वर्षे शिक्षा झाली. माझी पुण्याच्या 'येरवडा' जेलमध्ये रवानगी झाली. शिक्षा झाल्याचे कळताच मला अश्रू अनावर झाले. आपण केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. मला भेटायला माझी मैत्रीण व तिची आई आली होती. त्यांच्या गळ्यात पडून मी रड-रड रडले. पोलीस व्हॅनमधून येरवडा जेलमध्ये रवानगी झाली. तेव्हा लक्षात आले की पुण्याला तर आता आपल्याला कोण भेटायला येणार?

येरवडा जेलमध्ये माझी 'शिक्षाधीन' बंदी म्हणून नोंद झाली. म्हणजे 'पक्का कैदी'. मला बंदी नं. १११ देण्यात आला. एक छोटीशी दहा बाय दहा ची बरॅक होती. त्यात आम्ही ८-१० जणी होतो. कोणी चोरी, कोणी हाफ मर्डर, कोणी सुनेचा छळ, कोणी प्रियकराच्या प्रेमात पडून नवऱ्याला मारहाण, कोणी फसवाफसवी करून दुसऱ्याच्या बँकेतून पैसे काढलेले, तर कोणी सायबर क्राइममध्ये अडकलेल्या, कोणी 'हनी ट्रॅपच्या' जाळ्यात पुरुषाला अडकवून त्याची बदनामी करणाऱ्या, कोणी प्रथितयश माणसाची बदनामी केलेल्या, असे विविध गुन्हे केलेल्या स्त्री कैदी तेथे होत्या. पण सर्वांत जास्त म्हणजे ७ वर्षांची शिक्षा मलाच झाल्याने सर्वजण मला वाईट नजरेने, तुच्छतेने बघायच्या. त्यांचेकडून टोमणे मारणे, माझे कपडे लपवणे, सतत क्षुल्लक गोष्टीवरून भांडण काढणे, वॉर्डनला माझ्या चहाड्या करणे, धंदेवाली बाई म्हणून हिणवणे, कधी केस ओढणे, चिमटे काढणे, पोटात लाथा मारणे अशा गोष्टी घडायच्या. कोणीही नातेवाईक भेटायला येत नसल्याने हिणवणे, धंदेवाली बाई म्हणून शिव्या देणे, हे सतत चालू असायचे. केवळ माझ्याशीच त्यांचे भांडण होते असे नव्हे तर नैराश्याच्या पोटी सगळ्याच एकमेकींशी भांडून झिंज्या ओढायच्या. त्यातल्या त्यात सायबर क्राइम करून आलेली हिंदी, इंग्रजी, मराठी बोलणारी लिनू माझी बऱ्यापैकी मैत्रीण झाली होती. आम्ही एकमेकींना दु:ख सांगायचो.

सकाळी सहाला बंदी नंबर सांगून हजेरी, मग प्रातर्विधी

आटोपणे, कपडे धुणे, चहा, १० वाजता जेवण व संध्याकाळी पुन्हा सहा वाजता जेवण मग बरॅकीमध्ये बंद असा दिवस चालायचा. दर १५ दिवसांनी प्रत्येकाचे नातेवाईक, आईवडील, मित्र भेटायला यायचे. त्या दिवशी मग खूप वाईट वाटायचे. या जगात मला कोणीच नाही या भावनेने नैराश्य यायचे. बऱ्याच वेळा मला माझ्या कृत्याचा पश्चात्ताप व्हायचा. बंगाली बाबू पळवून, विकत घेऊन तरुण, देखण्या, कोवळ्या मुली आणायचा व प्रत्येकीची किंमत किती दिली आहे मला हे सांगून, ''तुला त्यांना धंद्याला लावून पैसे कमवायचे आहेत,'' अशी तंबी द्यायचा. मुलींना मारहाण, उपाशी ठेवून, चटके देऊन, कोंडून ठेवून मी त्यांना धंद्याला प्रवृत्त करायचे. एकदा धंद्याला तयार झाल्या की मात्र मी त्यांचे सर्व लाड पुरवायचे. पण येथून कोठे पळून जायचे नाही, गिऱ्हाइकाला खूश करायचे, त्याच्याकडून जास्तीत जास्त पैसे वसूल करायचे व तो पुन्हा पुन्हा परत इकडे कसा येईल यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करायचे, त्याला शय्यासुख द्यायचे ही माझी त्यांना तंबी असायची. आमच्या कुंटणखान्याच्या बाहेर मिशीवाले तगडे दोन दरवान ठेवले होते. मुलींना बाहेर कोठेही जायची परवानगी नव्हती. कोणीही गिऱ्हाइकाच्या प्रेमात पडून पळून लग्न करायचे नाही. कारण त्यांना विकत घेताना खर्च झालेला पैसा वसूल केलाच पाहिजे असा बंगाली बाबूचा दंडक होता.

रोज संध्याकाळी कुंटणखान्यात मेकअप करणारा, फुलवाला, वेगवेगळे ड्रेस, साड्या भाड्याने देणारा अशी मंडळी यायची. त्यांना फक्त आत हॉलमध्ये येण्यास परवानगी होती. मुली हॉलमध्ये येऊन रोज वेगवेगळे ड्रेस निवडायच्या. रोज नवीन नवीन फॅशनचे कपडे



घालायच्या. ड्रेस, साडीची किंमत १०-१५ हजार रुपये असायची. पण भाड्याने घेतल्याने तेवढे पैसे गुंतवावे लागायचे नाहीत आणि मुली फॅशनेबल दिसल्याने श्रीमंत चांगले गिऱ्हाईक यायचे. रात्री दोन-अडीचनंतर धंदा बंद व्हायचा. मुलींना त्यांच्या आवडीचे मांसाहारी जेवण, दारू भरपूर मिळायची. हेच आपले जीवन म्हणून त्या आपण खूश आहोत असे दाखवायच्या.

आता मात्र जेलमध्ये मला या गोष्टीचा पश्चात्ताप होतो. आपण किती तरुण मुलींचे नुकसान केले म्हणून देवाने आपल्याला शिक्षा दिली असे कधी कधी वाटते. ह्या एड्स रोगामुळेच आपल्या धंद्याला उतार आला. कधी वाईट वाटते, कधी राग येतो. कधी रडायला येते, तर कधी एड्सच्या नावाने बोटे मोडते. मुख्यत: जेवताना आमटीचे पाणी, कधी भाकरी, भाजी खाताना राग येतो. मग एड्सला शिव्या देत मी जेवण फेकून देते. रोज सकाळ-संध्याकाळ दारू आणि मटणाची सवय असल्याने इथले हे जेवण जाता जात नव्हते, अजून ७ वर्षे इथे कशी काढायची; या कल्पनेने तर मी अधिकच दु:खी व्हायचे.

रोज सकाळी व संध्याकाळी मी रामरक्षा, अथर्वशीर्ष म्हणायचे. शनिवारी हनुमान चालिसा म्हणायचे. मनाला समाधान वाटायचे. एकदा जेलरने बोलावून विचारले की कोणते काम करायला तुला आवडेल? शेती काम, विणकाम, शिलाई, लाडू-चिवडा करणे, बेकरी, कापड तयार करणे की स्वयंपाक करणे? कोणते तरी काम तुला करावेच लागेल ही तंबी द्यायला जेलर विसरला नाही. मी त्याला स्वयंपाकाचे काम आनंदाने करते असे सांगितले. दुसऱ्या दिवसापासून सकाळी माझी स्वयंपाकाची ड्युटी सुरू झाली. मी कर्नाटकी पद्धतीने तुरडाळीचे सार, भाज्या करू लागले. भाकरी मात्र इतर

बंदी बायका करायच्या. त्यांनाही मी पातळ भाकऱ्या कशा करायचे ते शिकविले. पहिल्या पहिल्यांदा त्या दुर्लक्ष करायच्या, मला शिव्या द्यायच्या. तुझे तू काम कर, असे सांगायच्या. पण मी त्यांना समजावून सांगायचे की, ''सगळे पक्के बंदी घरापासून लांब आहेत. त्यांना चांगले अन्न मिळाले तर ते खूश राहतील. तुम्हाला आशीर्वाद देतील, पोट शांत तर डोके शांत.'' माझे सांगणे त्यांना अनेक दिवसांनी पटले. आम्हा स्वयंपाक करणाऱ्या चौघींचा चांगला ग्रुप झाला. मला व त्यांना घरात असल्यासारखे समाधान मिळू लागले. माझ्या बँकेतील पैशातून मी १५ दिवसांतून त्यांना जेलमधल्या दुकानातून खाऊ पण आणून द्यायचे. कारण त्यांचेकडे पैसे नसायचे. दिवस चांगले चालले होते. माझ्याबरोबरची लिनू हिंदी व इंग्रजीत बोलायची. त्यामुळे बॅरेकमधल्या दुसऱ्या बायकांना आम्ही त्यांच्या चहाड्या, कागाळ्या करतो, असा संशय यायचा. त्या चिडायच्या. माझ्याबरोबर स्वयंपाक करणाऱ्या बायकांच्या नावावर स्वयंपाकाचे पैसेही जमा होत होते. त्यामुळे त्या खुशीत होत्या. इतर बायकांना दर १५ दिवसांनी कोणी ना कोणी भेटायला यायचे. हळूहळू एकेकीची सुटका झाली की मला रडू यायचे. त्याही जाताना रडायच्या.

एकदा जेलरने मला येऊन सांगितले की पुढच्या आठवड्यात जेलमधून तुझी सुटका होणार. मला आनंद झाला. पण दुसऱ्याच क्षणी रडू कोसळले. मी एकटी-दुकटी बाई. इथे मला संरक्षण होते, जेवण-खाणे मिळत होते, डोक्यावर छप्पर होते. आता जगात मी एकटीच. मुंबईला मैत्रिणीशी काही संपर्क नव्हता. अंगात शक्ती नव्हती. कोणतीही कला अवगत नव्हती. जेलमधल्या सगळ्यांचा निरोप घेऊन मी बाहेर पडले. निराश होऊन स्वारगेट एसटी स्टँडवर आले. कोठे जायचे कळत नव्हते. तशी अजूनही मी देखणी होते. अंग उफाड्याचे होते. पुरुषांच्या विखारी नजरा माझा वेध घेत होत्या. दिवसभर मी स्टँडवर बसूनच होते. रात्री एका पोलिसाने मला दरडवले, ''इथे दिवसरात्र काय करतेस?'' मी सांगितले, ''माझे नातेवाईक मला न्यायला स्टँडवर येणार आहेत.'' पोलीस प्रेमळ होता, म्हणाला, ''झोप येथेच फळकूटावर. मी आहे संरक्षणाला, घाबरू नकोस.'' ४-५ दिवस मी स्टँडवरच होते. पाचव्या दिवशी एका पोलिसाने एका समाजकार्यकर्तीची मला ओळख करून दिली. तिने मला नोकरीचे आश्वासन दिले आणि मला पुण्याच्या बुधवार पेठेत घेऊन आली. तिथला सगळा माहोल बघितल्यावर ही वेश्यावस्ती आहे हे लक्षात आले. पुन्हा आपण त्या उकिरड्यात जाणार का अशी भीती वाटू लागली. पण तिथल्या एड्स समुपदेशन केंद्राची प्रमुख महिला यांच्याबरोबर माझी ओळख करून दिली. माझी मुलाखत तिने घेतली. मला बहुतेक सर्वच भाषा येत असल्याने ती खूश झाली. महिन्याला पाच हजार पगार, जेवण-खाण व राहण्याची जागा मोफत असे ठरले.

मला एक महिन्याच्या ट्रेनिंगसाठी मुंबईला महाराष्ट्र एड्स कंट्रोल सोसायटीच्या कार्यालयात पाठवले. तेथे कुंटणखान्याच्या मालकिणींना, मुलींना एड्स म्हणजे काय, त्याची काय लक्षणे, औषधे याविषयी कशी माहिती द्यायची याचे प्रशिक्षण दिले. गिऱ्हाइकाला निरोध वापरण्यासाठी कसे पटवायचे, निरोधचा पुरवठा मालकिणींना करावयाचा, वापरलेले निरोध कोठे टाकावयाचे, निरोध वापर न करणाऱ्या गिऱ्हाइकाला सगळ्यांनी मिळून कसे वस्तीबाहेर काढावयाचे याची पुरेपूर माहिती आम्हाला दिली गेली.

मला दिलेले प्रशिक्षण मी कुंटणखान्याच्या मालकिणींना देते. मला प्रश्न पडतो. ''कायद्याने कुंटणखाना चालविणे गुन्हा आहे. त्याची शिक्षा मी भोगली आहे, मग महाराष्ट्र एड्स कंट्रोलला कुंटणखान्याच्या मालकिणींकडून एड्स प्रबोधनाचे काम कसे केलेले चालते?'' खूप विचार करते, पण प्रश्नाचे उत्तर मिळत नाही.

*(कथा सत्य असली तरी वरील कथेतील नाव, गाव, स्थळ बदललेले आहे.)*

■

With
Best Compliments
From
BG "ASSOCIATES"
STRESS ASSETS MANAGEMENT
&
NPA RECOVERY SERVICES
Pankaj Bhave 99230 15379 | Vijay Gomte 98239 29989
pbhave69@gmail.com
816, M-2, Adarsh Colony, Main Road,
ST Colony, CIDCO, N-2, Aurangabad

JettMe
Stories that connect

**Daigo - 9764148789**

# कैदी पुनर्वसन आणि सामाजिक संस्था

**सौ. विद्या विठ्ठलराव जाधव**
अध्यक्षा, शांतीदूत परिवार

**शेवटी आपल्याच देशातील, राज्यातील, समाजातील व कुटुंबातील महत्त्वाचा घटक असलेले कैदी बांधव यांना खंबीरपणे माणुसकीचा, सहानुभूतीचा व मदतीचा हात दिल्यास समाज स्वास्थ्यासाठी त्याचा खूप प्रभावी, चांगला उपयोग होऊ शकतो व पर्यायाने कैदी बांधवांसाठी व समाजासाठी सामाजिक सेवेच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलून त्यांच्या पुनर्वसनासाठी अमूल्य मदत होऊ शकते, याचे समाधान वाटले.**

समाजातील आपल्यापैकीच काही जणांना विविध कारणांमुळे चुकीच्या मार्गाचा अवलंब केल्यामुळे कारागृहात जीवन व्यतीत करावे लागते. कारागृहामध्ये बरेच बंदी बांधव निराशेच्या व वैफल्याच्या मन:स्थितीत जीवन जगत असतात. बहुतेकांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होतो. परंतु वेळ निघून गेलेली असल्यामुळे शिक्षेचा कालावधी संपेपर्यंत नाइलाजाने तुरुंगात राहावेच लागते. तेव्हा मानसिकदृष्ट्या खचलेल्या कैदी व त्यांच्या कुटुंबाचे अतोनात हाल व नुकसान होते.

अशा पार्श्वभूमीवर बंदीजनांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी कारागृह व सुधारसेवा प्रशासन आपल्या परीने कर्तव्य पार पाडत असतात. परंतु त्याचबरोबर समाजातील अनेक सेवाभावी संस्थांनी पुढाकार घेऊन त्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केल्यास त्यांचे कारागृहातील दैनंदिन जीवन सुसह्य होऊ शकते.



विशेषत: योगा, ध्यान, मनोरंजनासाठी विविध साहित्याचा पुरवठा, लायब्ररीसाठी विविध विषयांवरील प्रेरणादायी पुस्तकांचे वाटप. राष्ट्रपुरुष, संत, महात्मे व आपल्या कुटुंबातील सदस्यांचे वाढदिवस अशा प्रसंगी खाद्यवस्तू, फळे, पुस्तके, मनोरंजनाचे साहित्य विविध कारागृहांत भेट म्हणून दिल्यास त्यांची मदत खूपच उपयुक्त ठरू शकते.

या संदर्भात शांतीदूत परिवाराकडून राज्यभरातील कारागृहांतील कैदी बांधवांसाठी योगा शिबिरे तसेच त्यांच्या मानसिक परिवर्तनासाठी विविध विचारवंतांची प्रेरणादायी व्याख्याने आयोजित केली गेली. कारागृहांचे शेती विभागासाठी केळी, आंबे यासारख्या फळझाडांची रोपे देण्यात आली. विविध ठिकाणी बंदी बांधवांसाठी उपयुक्त पुस्तके भेट देण्यात आली. त्याचप्रमाणे बंदीजनांसाठी शारीरिक स्वास्थ्यासाठी आरोग्य शिबिरे आयोजित केली व तसेच कला क्षेत्रातील दिग्गजांचे मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजनही केले. प्रामुख्याने राज्यातील सर्व कारागृहांमध्ये कैदी बांधवांसाठी विविध धर्माच्या प्रमुखांची प्रबोधनपर प्रवचने, व्याख्याने आयोजित केली. त्याचा परिणाम म्हणून अनेक कैदी बांधवांनी आम्ही आयुष्यात या पुढे गुन्हे करणार नाही. तुरुंगाबाहेरचे उर्वरित आयुष्य समाजाच्या भल्यासाठी शांतीदूत बनून जीवन जगू, असा संकल्प करून आपल्या भावना व्यक्त केल्या. ही खूप समाधानाची व सुखावह बाब आहे. सामाजिक स्वास्थ्यासाठी तर खूपच उपयोगी आहे.



दुसरा महत्त्वाचा प्रश्न अनेक कैदी बांधवांच्या मनात सतत भेडसावत असतो तो म्हणजे शिक्षा भोगून जेव्हा मी समाजात परत जाईन तेव्हा कुटुंब, नातेवाईक, मित्र परिवार मला पूर्वीप्रमाणे स्वीकारेल काय? तसेच बऱ्याच गरीब कुटुंबातील कैदी बांधवांसमोर जीवन जगण्यासाठी रोजगार / व्यवसाय / नोकरी करण्यासाठी अनेक समस्या उद्भवतात तेव्हा अशा प्रसंगी त्यांना समाजाकडून व सेवाभावी संस्थांकडून मानसिक आधार व आर्थिक आधाराची खूप गरज असते. त्यांना माणूस म्हणून पुन्हा समाजात जगण्यासाठी सहानुभूतीपूर्वक व्यवहार करण्याची गरज असते. तसेच यथाशक्ती त्यांचे आवडीनुसार, अनुभवानुसार व कौशल्यानुसार त्यांना नोकरी, रोजगार व व्यवसायासाठी सर्वतोपरी मदतीचा हात देण्याची गरज असते.

शांतीदूत परिवारातील काही सदस्यांनी काही कैदी बांधवांना त्यांचे स्वत:चे व्यवसाय करण्यासाठी आवश्यक ती मदत केली आहे. त्यांना नवीन आयुष्यात उभारी घेण्यासाठी मानसिक व आर्थिक पाठबळ दिले आहे. अनेक सामाजिक सेवाभावी संस्था त्यांच्या जामिनासाठी, रजेसाठी मार्गदर्शन व मदत करतात तर आवश्यकतेनुसार त्यांच्या कुटुंबीयांनाही त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी, रोजगार व्यवसायासाठी मदत करतात. या पुनर्वसनाच्या क्षेत्रात आपापल्या कार्यक्षेत्रात सामाजिक सेवासंस्था अधिक मोठ्या प्रमाणावर व चांगल्या प्रकारे मदतीचे कार्य करू शकतात. तुरुंगातून सुटून आलेल्या कैदी बांधवांची माहिती घेऊन त्यांचे समुपदेशन करून त्यांच्या आवडीनुसार त्यांना रोजगार, व्यवसाय-उद्योगासाठी प्रवृत्त करून व आवश्यक ती मदत करून पुनर्वसनासाठी मोलाची भूमिका बजावू शकतात.

खरे तर शांतीदूत या सेवाभावी संस्थेचे औपचारिकपणे कारागृहातूनच काम करायला सुरुवात झाली. तसे 'गरज असेल तिथे, होईल तेवढी मदत करणे' आमच्या स्वभावातच असल्यामुळे आधीपासून सेवा होत होतीच.

माझे यजमान विठ्ठलराव जाधवसाहेब यांची कारागृह विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून बदली झाली. आणि कारागृहात जाण्याचा मलाही योग आला. असे वाचले होते की कारागृहात अनेक मोठे गुन्हे करून आलेले गुन्हेगार असतात. खून, दरोडे असे भयानक गुन्हे केलेले लोक असतात नि ते निर्दयी, रागीट असतात असे वाटायचे.

कारागृहाच्या बाहेरूनसुद्धा जाताना त्या उंचच उंच काळ्या दगडाच्या भिंती पाहून मला भीती वाटायची. कधी तिकडून समोरून गाडी सावकाश जात असेल तर तेथील सुरक्षारक्षक लगेच शिट्टी वाजवत असत व तेथून गाडीला लवकर जायला सांगत. त्यामुळे त्या आवारातही जायला नको असेच वाटायचे.

पण आता इथे आतील परिस्थिती कशी असेल हे पाहण्यासाठी जायचे ठरवले. त्या उंचच उंच भक्कम भिंतीत असलेला भला मोठ्ठा दरवाजा करकरत उघडला गेला. तसा इतर वेळी बाजूला असलेला चार फुटाचा बुटका दरवाजाच उघडायचा. इथे येताना कुणीही मान वर करून येऊच नये हा शिरस्ता इंग्रज अधिकाऱ्याने घालून ठेवला असेल का? असेही वाटले.

बाहेर कितीतरी कैदी बांधवांचे नातेवाईक त्यांच्या भेटीची वाट पाहत बसले होते. गजापलीकडील दोन मिनिटांची ती भेट कीव करण्यासारखी वाटली. कैद्यांचे आप्तेष्ट कधी आपला नंबर येईल यासाठी किती वेळ पाहत राहणार कोणास ठाऊक.

वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीच हा मोठा दरवाजा उघडला जायचा. दुसऱ्या कोणासाठीही नाही. मग लगेच दुसऱ्या मिनिटाला तो करकरत लावला गेला आणि आतून भले मोठे कुलूप लागले.

येरवडा हे स्वातंत्र्यपूर्व काळातील सर्वांत मोठे कारागृह. इथेच महात्मा गांधी, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र




बोस, बाळ गंगाधर टिळक, सावरकर अशा कितीतरी व्यक्तींनी शिक्षा भोगली.

कारागृह म्हटले की माझ्या डोळ्यापुढे कृष्णाचे आईवडील देवकी व नंद यांच्यापासून अनेक नावे येतात. भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांनाही कारागृहातच फाशी देण्यात आली होती. सावरकरांना अंदमान येथील कारागृहात ठेवले होते. असंख्य स्वातंत्र्यवीरांना कारागृहवारी करावी लागली होती. पण ती स्वातंत्र्य लढ्यासाठी होती!

'इथे नावं लिहा...' सुरक्षारक्षकांनी सांगितल्यावर, सर्वांची नावे नोंदवहीत लिहिली गेली. मोबाइल जमा करून घेतले गेले व आम्ही आत निघालो. इथलाही अजून एक मोठा दरवाजा आवाज करत उघडला आणि आम्ही आत जाताच तो लगेच बंद करण्यात आला. आपण सहज भेटण्यासाठी, परवानगी काढून आलोय तरी लगेच अडकून राहिलो असे वाटत होते.

या गुन्हेगारांचे काय? आतमध्ये आलेले यातील काहीजण अजून गुन्हेगार असल्याचे सिद्धही झाले नसतील. त्यांनी केव्हा बाहेर जायचे ते नशीबच ठरवत असेल.

तरीही पहिल्यांदा आत गेल्यानंतर गजाआड असलेल्या त्या डोळ्यांतील नजरा भेदक वाटू लागल्या. (पण नंतर दोन-तीन वेळा गेले व ते आता ओळखीचे वाटू लागले. आपल्यातीलच हे आहेत. ते आत असले तरी खरी परिस्थिती वेगळी असू शकते असे वाटू लागले.) आत रस्त्यात कुठेही कचरा दिसत नव्हता, दोन्ही बाजूला असलेल्या भिंतींवर सुंदर चित्रे काढली होती. सुरेख असे सुविचार लिहिले होते.

याच काळातच जाधवसाहेब घरी ज्ञानेश्वरी वाचत होते. त्यात कितीतरी वेळ तल्लीन होऊन अर्थ वाचत असायचे. तेव्हा कैदी बांधवाने हे वाचले तर त्यांचा तेथील काळ सुसह्य जाईल का? हा विचार मनात आला.




अशा प्रकारचे सर्व धर्मांतील ग्रंथ, ज्ञानेश्वरी, कुराण, बायबल इत्यादीच्या अनेक प्रती दिल्या गेल्या. तसेच पंधरा दिवसांचे ज्ञानेश्वरीवरील पारायण ठेवले गेले. यातूनही प्रेरणा मिळण्याची उदाहरणे द्यावीत असे सांगितले. प्रेरणा व परिवर्तन शिबिर घेण्याचा प्रयत्न शांतीदूत परिवाराच्या वतीने कारागृहात केला गेला. यानंतर परिवाराने महाराष्ट्रातील अनेक कारागृहांना भेटी दिल्या व तिथेही अशी शिबिरे घेतली. जेणेकरून पुन्हा त्यांच्या हातून अशी चूक, असे गुन्हे होऊ नयेत व येथे यायची वेळही येऊ नये.

आधीच्या काळात कैद्यांना खूप कष्टाची कामे करावी लागायची असे ऐकले होते. पण आता त्यांच्यात असलेली कौशल्ये पाहून त्यांच्याकडून तशा प्रकाराचीच कामे करवून घेतात.

कोल्हापूर येथील कारागृहात भेट दिली तेव्हा महिला बंदी सुंदर, गोड आवाजात अभंग म्हणत होत्या. आत जाऊन पाहिले तर त्या देवी महालक्ष्मीच्या प्रसादाचे लाडू वळत असल्याचे दिसले.

पैठण येथील कारागृहात बंदी बांधव गुऱ्हाळात गूळ ढेपी मोजताना दिसले. नाशिक येथील कारागृहातील बंदी गणेश मूर्ती बनवण्यात तल्लीन असलेले दिसले व त्या मूर्ती बाहेर विकावयास ठेवतात असे कळले. सिंधुदुर्गच्या किल्ल्यात असणाऱ्या कारागृहातील कैदी तिथल्या नारळांना पाणी देते होते.

अशातच एका बंदी बांधवाने जाधवसाहेबांचे सुरेख असे पेन्सिलने स्केच काढून त्यांना भेट दिले.

येरवडा येथील खुल्या कारागृहात शांतीदूत परिवाराकडून केशर आंब्याची व केळीची अनेक रोपे दिली. हे बंदीजन त्यांची काळजी घेत होते.

गुन्हेगार असले तरी कौतुकाची थाप पाठीवर पडण्यासारख्या गोष्टीही असायच्याच. श्री. उपाध्याय सरांनी केलेला गळाभेट उपक्रमही वाखाणण्यासारखाच आहे. माणुसकी दाखवत कुठेतरी परिवर्तनाला सुरुवात व्हावी हाच अशा कार्यक्रमांचा उद्देश असायचा.

कैदी बांधव खचून न जाता तेथील वेळ सत्कारणी लावतील व आयुष्याची उलटतपासणी करत बसणार नाहीत हीच अपेक्षा असे.

अनेक मान्यवरांच्या भेटींमुळे, त्यांच्या संवादामुळे प्रेरणा घेऊन परिवर्तन घडावे म्हणून शांतीदूत परिवारानेही अनेक कार्यक्रम घेतले. असा कार्यक्रम झाल्यानंतर, पुढचे काही दिवस या सुखद आठवणीत जात असतात असेही बंदी सांगतात.


अनेक बंदी शिक्षा भोगून बाहेर पडल्यानंतर स्वतंत्र व्यवसायही करू लागले आहेत.

बघता बघता तीन वर्षे सरली; होईल तेवढा प्रयत्न आम्ही शांतीदूतच्या माध्यमातून केला. हा खारीचा वाटा सत्कारणी लागला असेल असेच वाटले.

शेवटी आपल्याच देशातील, राज्यातील, समाजातील व कुटुंबातील महत्त्वाचा घटक असलेले कैदी बांधव यांना खंबीरपणे माणुसकीचा, सहानुभूतीचा व मदतीचा हात दिल्यास समाज स्वास्थ्यासाठी त्याचा खूप प्रभावी, चांगला उपयोग होऊ शकतो व पर्यायाने कैदी बांधवांसाठी व समाजासाठी सामाजिक सेवेच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलून त्यांची पुनर्वसनासाठी अमूल्य मदत होऊ शकते, याचे समाधान वाटले.

चांगुलपणाच्या चळवळीच्या माध्यमातून डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुढाकारातून समाजातील महत्त्वाच्या परंतु दुर्लक्षित घटकांवर, त्यांच्या जीवनावर या विशेष अंकांच्या माध्यमातून प्रकाश टाकला. कैदी बांधवांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व शांतीदूत परिवारातर्फे खूप खूप शुभेच्छा!

या पुढेही शांतीदूत परिवार समाजातील वंचित, गरीब व गरजू घटकांसाठी यथाशक्ती मदत करण्यासाठी कटिबद्ध आहे. यासोबत राज्यातील अनेक चांगल्या सेवाभावी संस्था उद्योगसमूह व वैयक्तिक मान्यवरांनीही आपले सक्रिय योगदान या चळवळीमध्ये सहभागी होऊन द्यावे हीच अपेक्षा! ■




# भोई प्रतिष्ठान, पुणे

**अभय नलगे**
सामाजिक कार्यकर्ते

**पुष्कळ माणसं समाधान शोधण्याचा प्रयत्न करतात पण काही केल्या त्यांना ते मिळत नाही. कारण समाधान आपल्या आत असतं आणि आपण ते जगाच्या बाहेर शोधत असतो. डॉक्टरांना आपल्या आतलं समाधान सापडलंय. त्यामुळे स्वत:साठी किती आणि जगासाठी किती हा हिशोब त्यांना पक्का जमलाय खरं म्हणजे बाकी इतर घटकांसाठी काम करणारी मंडळी पुष्कळ आहेत. पण असा विचार लोकांच्या मनात सहज येतो की बापरे तो जेलमध्ये होता... नको त्याच्या नादाला लागायला... उद्या त्याला सुधरवायला गेलो आणि आपणच बिघडलो तर? असेही समाजातले काही घटक आहेत की जे बंदीवानांना सुधरवायचा तर विषय सोडा पण त्यांच्या जवळही जायला घाबरत आहेत. नको म्हणत आहेत. वास्तविक पाहता तीही माणसं आहेत हे लोक विसरत आहेत. आणि हीच जाणीव प्रेरणापथच्या माध्यमातून करून देण्याचं काम डॉ. मिलिंद भोई आणि त्यांचे सर्व सहकारी करत आहेत.**

नमस्कार...

"जे जे भेटे भूत । ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ॥"

श्रीमद् भगवत गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, 'हे अर्जुना, या प्राणिमात्रांमध्ये तुला जो जो भेटेल, त्या प्रत्येकामध्ये ईश्वराचा म्हणजेच माझा अंश आहे. त्याच्याप्रती प्रेम, आदर, सन्मान हा भाव व्यक्त करणे म्हणजेच माझी भक्ती करणे होय.' आणि नेमकी भगवान श्रीकृष्णांनी सांगितलेली ही ओवी किंवा हा श्लोक आपल्या आचरणामध्ये आणणारे डॉ. मिलिंद भोई यांच्याबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत. डॉ. मिलिंद भोई हे नाव महाराष्ट्राला नवीन नाही.

एखादं झाड असतं, त्या झाडाला वेगवेगळ्या फांद्या असतात आणि प्रत्येक फांदीला गोड फळं लागलेली असतात, तसेच डॉ. भोई यांचं व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या जीवनामध्ये अनेक प्रकल्प आहेत, अनेक सत्कार्य आहेत, त्या प्रकल्पांना सत्कार्याच्या फांद्या आहेत आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रकल्पांच्या माध्यमातून त्यांना यशप्राप्तीही झाली आहे. खरं म्हणजे हे यश त्यांचं नाही, तर समाजाचं आहे कारण त्यांच्या यशाच्या माध्यमातून यश त्यांना मिळतं पण कल्याण मात्र समाजाचं होतं. असाच त्यांनी मनापासून, अगदी अंत:करणापासून राबविलेला सुंदर प्रकल्प म्हणजेच 'प्रेरणापथ'. आपण मघाशी म्हटल्याप्रमाणे जे जे भेटे भूत ते ते मानिजे भगवंत । हा भक्तियोगु निश्चित जाण माझा ।" जर ईश्वर सर्वांमध्ये आहे तर तो मग गुन्हेगारांमध्ये का नसेल? साधारणत: समाजातल्या प्रत्येकाला जगण्याचा तितकाच अधिकार आहे. जगत असताना हा नीचवर्ण आणि तो उच्चवर्ण हा भेद संतांना ज्याप्रमाणे मान्य नाही तीच दिशा ओळखून ज्याप्रमाणे डॉ. मिलिंद भोई आपलं कार्य करत आहेत. त्याचप्रमाणे

- प्रेरणापथ' ह्या प्रकल्पासाठी विशेष सहभाग, सहकार्य
  आदर्श मंडळ, पुणे.
  उदय जगताप (गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड)
  महाराष्ट्र कारागृह प्रशासन
- प्रेरणापथ प्रकल्प हा पंतप्रधान कार्यालयाकडे संपूर्ण देशभरातील कारागृहात राबविण्यासाठी विचाराधीन आहे.
- प्रेरणापथ - संकल्पना व प्रेरणा
  मा. डॉ. भूषणकुमार उपाध्याय IPS
  (तत्कालीन अपर पोलीस महासंचालक, कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य)

समाजातला असा एक घटक की ज्याच्यासाठी काम करताना लोक दोन पावलं पुढे नाही तर मागं सरकतात, तो म्हणजे कारागृहात असलेले बंदीवान. या बंदीवानांच्या माध्यमातून मी जेव्हा पहिल्यांदा त्यांना भेटलो की बाबा तुमचा प्रेरणापथ प्रकल्प काय आहे? त्यावेळेस मी गुन्हेगार हा शब्द वापरत होतो. तेव्हा त्यांनी सांगितलं की गुन्हेगार हा शब्द चुकीचा आहे. माणूस आवेगाच्या परिस्थितीमध्ये एखादी चूक करतो आणि ती त्याच्या आयुष्याचा पश्चात्ताप म्हणून कारणीभूत ठरते. एकीकडे तो

**'प्रेरणापथ' वारीचे वारकरी**

- मा. डॉ. भूषणकुमार उपाध्याय IPS (तत्कालीन अप्पर पोलीस महासंचालक, कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य)
- उस्ताद झाकीर हुसेन
- शंकर महादेवन
- सुरेश वाडकर
- शिवमणी
- ईक्बाल दरबार
- पद्मविभूषण बाबासाहेब पुरंदरे
- डॉ. रघुनाथ माशेलकर
- डॉ. जयंत नारळीकर
- डॉ. शां. ब. मुजुमदार
- खा. डॉ. नरेंद्र जाधव
- विचारवंत - मा. खा. विनयजी सहस्त्रबुद्धे
- मा. दादासाहेब ईदाते
- राष्ट्रीय कीर्तनकार - चारुदत्त आफळे
- अभिनेते - विक्रम गोखले
- पद्मश्री कै. सिंधुताई सपकाळ
- अभिनेत्री - सौ. अलका कुबल
- अभिनेत्री - श्रीमती जयमाला इनामदार

पुण्यातील भोई प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने कारागृहातील बंदीजनांच्या पुनर्वसनासाठी गेली ६ वर्षे 'प्रेरणापथ' हा प्रकल्प सुरू आहे.

महाराष्ट्र कारागृह प्रशासनाचे ब्रीदवाक्य सार्थ ठरविणाऱ्या (सुधारणा व पुनर्वसन) या उपक्रमाविषयी या प्रकल्पाचे समन्वयक डॉ. मिलिंद भोई यांच्याशी सुप्रसिद्ध संवादक अभय नलगे यांनी संवाद साधला आणि आपल्यापर्यंत भोई प्रतिष्ठानच्या 'प्रेरणापथ' हा प्रकल्पाचे कार्य पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे.

जीवन पश्चात्तापात घालवत असतो आणि आपण त्याला गुन्हेगार म्हणून टोचत असतो. अशा दुहेरी कात्रीत सापडलेलं त्याचं जीवन अधिक होरपळून जातं. त्याच्यावर आपण प्रेमाचा गारवा सोडण्याऐवजी त्याची आग अधिक बळकट करतो. हे न होता त्याला प्रेमाची गरज आहे, त्याला समाजात पुन्हा उभं राहण्याची गरज आहे. त्याची वैचारिकता, त्याचं प्रेम हे समजून घेण्याची गरज आहे आणि तीच गरज ओळखून डॉ. मिलिंद भोई यांनी प्रेरणापथ हा प्रकल्प सुरू केला.

त्यांना अनेक जेल प्रशासनातील मोठ्या मोठ्या अधिकाऱ्यांची खूप साथ लाभली आणि त्यांच्या माध्यमातून हा प्रकल्प सुरू झाला. डॉ. भोईंनी कैद्यांमधले विशेष सुप्त गुण ओळखण्याच्या प्रयत्न केला आणि त्या त्या पद्धतीने जो चांगलं वागणारा कैदी किंवा बंदीवान आहे तो बाहेर आल्यावर काय व्यवसाय करू शकतो, त्याचा उदरनिर्वाह तो कसा करू शकतो, किंबहुना त्याची जी गुन्हेगार म्हणून जुनी ओळख आहे ती पुसून टाकून त्याला परत त्याच्या जीवनामध्ये नवनिर्मिती कशी करता येईल, एक चांगला माणूस कसा बनेल यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले. अनेक मोठमोठ्या अधिकाऱ्यांनी त्यामध्ये त्यांना साथ दिली. खरं म्हणजे बऱ्याचदा शासकीय प्रकल्पात जेव्हा खाजगी माणसं काम करायला येतात, त्यावेळेस नाराजीच त्यांच्या हातात येते. कारण अधिकाऱ्यांना मान्य नसतं की प्रकल्पामध्ये बाहेरची माणसं येऊन काम करत आहेत. मात्र आपले जे पोलीस व जेल प्रशासन आहे, खरोखर त्यांना मानावं लागेल. कारण बाहेरून कुणी येऊन एखादा प्रकल्प जेलमध्ये राबवतो आणि त्याला इतका उत्तम प्रतिसाद मिळतो.

त्यांच्याशी बोलताना असं लक्षात आलं की काही दिवसांपूर्वी जेलमध्ये वेगवेगळे कलावंत लोक घेऊन आले होते. जेलच्या प्रशासनासाठी नाही तर तिथल्या बंदीवानांसाठी, आणि विशेष म्हणजे डॉ. उस्ताद झाकीर हुसेन, ज्यांना आपण जागतिक कीर्तीचे तबलावादक म्हणतो असे झाकीरभाई आले. त्यांनी बंदीवानांसाठी तबलावादन केलं. स्वतः झाकीरभाईंनी कधी स्वप्नातही पाहिलं नसेल किंवा त्यांना वाटलं नसेल की आपल्या तबलावादनाचा कार्यक्रम कारागृहात होईल आणि त्याचे श्रोते हे बंदीवान असतील. आणि जेव्हा झाकीरभाई तबला वाजवू लागले, त्यांची बोटं वीज असल्यासारखी चालू लागली, तबल्याचे एकएक रेले ते वाजवू लागले तसे सगळे बंदीवान मंत्रमुग्ध झाले, आणि झाकीरभाईंच्या वादनानंतर टाळ्यांचा जो कडकडाट होऊ लागला त्यावरून असं लक्षात आलं की हे गुन्हेगार नाहीयेत. ही जगातली उत्तम माणसं आहेत. त्यांच्यावर जर हे योग्य संस्कार केले आणि त्यांच्या जीवनाला जर योग्य



दिशा मिळाली तर हेच गुन्हेगार किंवा बंदीवान गुन्हेगारीकडे न वळता त्यांची positivity चांगल्या कामाकरता वळवली तर यांचा समाजाला उपयोग होऊ शकतो. जे गुन्हेगार किंवा बंदीवान समाजाचा उपद्रव म्हणून आत आलेत तेच समाजाचे उपयुक्त घटक म्हणून बाहेर पडू शकतात.

त्यासाठी त्यांना योग्य दिशा मिळायला हवी, त्यांचं जीवन परिपूर्ण व्हायला हवं. कारण एक बंदीवान आत येतो पण त्याच्यामागे त्याचं कुटुंब उद्ध्वस्त होतं. पोटाची खळगी भरण्यासाठी त्याच्या पत्नीला दारोदार फिरावं लागतं. कष्टाची कामं करावी लागतात. मुलांचं शिक्षण बंद पडतं आणि शिवाय इतर कुटुंबाला आपला घरातला माणूस कारागृहात आहे याबद्दल सोसावी लागणारी प्रत्येक ठिकाणची मानहानी त्यांनी लक्षात घेतली आणि त्याप्रमाणे प्रत्येक बंदीवानातला एक सुप्त गुण ओळखायला सुरुवात केली. आधी त्याला नीट समजून घेतलं, त्याची मानसिकता समजून घेतली. स्वतः झाकीरभाई असं म्हणतात की, 'तुमच्यापुढे कार्यक्रम करत असताना मला एवढा आनंद झाला की एखाद्या जागतिक कीर्तीच्या, आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यासपीठावर मी तबला वाजवतोय आणि सगळे संगीत क्षेत्रातील दिग्गज माझ्यासमोर बसलेत आणि त्या माध्यमातून हा कार्यक्रम वाजवायला मिळतोय. इतका सुंदर प्रतिसाद मला तुम्हा सगळ्यांकडून मिळालाय! जेव्हा इथून पुढे तुम्ही या कारागृहातून बाहेर पडाल तेव्हा जिथे जिथे माझा कार्यक्रम असेल तिथे या आणि मला हात मिळवून सांगा की आपण येरवड्याच्या कारागृहात भेटलो होतो. आता मी सुधारलोय. मी माझा स्वतःचा व्यवसाय सुरू केलाय, मी नोकरीला लागलोय, माझं कुटुंब उत्तम आहे. मी समाजात चांगलं स्थान निर्माण केलंय.' ही झाकीरभाईंची असलेली प्रतिक्रिया आणि मग आले सुरेशजी वाडकर साहेब. सामान्यातल्या अतिसामान्य अशा जेलमध्ये ज्याचं आयुष्य चाललं होतं त्या कैद्याला वाटलंही नसेल की आपल्यासाठी गायला सुरेश वाडकर साहेब येतील. नंतर मग यातलाच एक कैदी उत्तम गाणारा, त्या बंदीवानांचे गायन ओळखून डॉक्टरांनी त्याला स्वत:चा ऑर्केस्ट्रा सुरू करून दिला आणि या ऑर्केस्ट्राच्या उद्घाटनासाठी सुरेश वाडकर साहेबांनी यावं हा केवढा मोठा योगायोग आहे. वास्तविक पाहता ही मंडळी अतिशय प्रोफेशनल आहेत. त्यांच्या क्षेत्रात मातब्बर आहेत आणि खूप प्रोटोकॉल फॉलो करणारी पण आहेत.

जेव्हा डॉक्टरांनी सुरेश वाडकरांना येण्याची विनंती केली तेव्हा डॉक्टरांचं सत्कार्य त्यांच्या लक्षात आलं. तिथे एक रुपयाही मानधन न घेता वाडकर साहेब आले. त्यांनी त्या बंदीवानाच्या ऑर्केस्ट्राचे उद्घाटन केलं आणि सांगायला आनंद वाटतो आजही तो ऑर्केस्ट्रा मोठ्या दिमाखात सुरू आहे. चांगले कार्यक्रम, सणावाराच्या व लग्नकार्याच्या माध्यमातून ते समाजाला देत आहेत आणि त्या कलावंताबरोबरच इतरही चार-सहा वादकांचं कल्याण होतंय.

अहमदनगर जिल्ह्यातून आलेले एक बंदीवान होते. ते म्हणाले, मला कुठलीच कला येत नाही मी साधा शेतकरी आहे. मी गुरं सांभाळणारा, गुरं वळणारा. मला काय तुम्ही धंदा टाकून देणार? माझ्याकडे काहीच नाही. डॉक्टर म्हणाले, 'तुला कुठे कामाला लावले तर?' 'छे हो, मला पैसे साधे मोजता येत नाहीत, मी काय काम करणार?' 'तुला काय काम येतं? तू काय करत होता?' आणि मग त्याने सांगितले, 'मी धारा काढायचं काम करत होतो.' मग डॉक्टरांनी त्याला एक उत्तम गाय दिली.

दु:खितांच्या सेवेमध्ये देव शोधणारे असे आपले डॉ. भोई. जगतगुरू तुकाराम महाराज म्हणतात, 'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा. देव तेथेचि जाणावा.' अनेक संस्थांच्या माध्यमातून अंध, अपंग मुलांना जी डॉक्टरांनी मदत केली आहे ती वाखाणण्यासारखीच आहे. पण ज्यांचा हा समाज स्वीकारच करत नाही असाही एक वर्ग या जेलच्या माध्यमातून आपणाला पाहायला मिळतो आणि त्यांच्यासाठी काम करणे ही महत्त्वाची गोष्ट होती. आदरणीय पोलीस आयुक्त

असतील, जेल प्रशासन अधिकारी असतील, त्यांचं योगदान खूप मोठं आहे. मला वाटतं काही दिवसांपूर्वी रविवार पेठेजवळ एका बंदीवानाला चहाचं दुकान उघडून दिलंय, मस्त दिमाखात त्याचा हा व्यवसाया सुरू आहे आणि एखाद्या चहावाल्याच्या उद्‌घाटनाला इतक्या मोठ्या माणसांनी यावं हाही एक मोठा योगायोग आहे. म्हणजे चहाची प्रतिष्ठा किती वाढते. किंबहुना त्या बंदीवानाची प्रतिष्ठा किती वाढते? त्यालाच इच्छा जरी झाली चुकीचं वागायची तरी तो वागू शकणार नाही. हे जे मनपरिवर्तन आहे हे झालं पाहिजे.

मनपरिवर्तन झालं की माणूस आपोआप चांगल्या कामाला लागतो. चांगल्या सुधारणेला लागतो. प्रसंग माणसाचं मन घडवतो. व्यासंग माणसाची बुद्धी घडवते, पण सत्संग माणसाचं जीवन घडवतं हे डॉक्टरांनी या माध्यमातून दाखवून दिलं. एखादा वाईट प्रसंग आपल्यासोबत जीवनात आला की त्याचा वाईट परिणाम आपल्या मनावर होतो. व्यासंग म्हणजे एखाद्या गोष्टीची सखोलता आणि त्यामुळे आपल्या बुद्धीची पातळी वाढत जाते. प्रसंगाचा माणसाच्या मनावर परिणाम होतो. तर व्यासंग माणसाच्या बुद्धीवर परिणाम करतो. पण एखाद्याला चांगला सत्संग मिळाला तर तो सत्संग माणसाचं जीवन परिपूर्ण केल्याशिवाय राहत नाही आणि असंच समाजातल्या एका घटकाचं जीवन परिपूर्ण करण्याचं स्वप्न प्रेरणापथच्या माध्यमातून डॉक्टरांनी पाहिलं. अनेक मंडळींची साथ त्यांना त्या बाबतीत लाभली आहे. मला सांगायला आनंद वाटतो की ज्यांना प्रत्यक्ष ऐकणं दुर्मीळ आहे, असे शंकर महादेवन साहेब आले आणि यायच्या अगोदर त्यांच्या मनात खूप सारे प्रश्न होते. आल्यानंतर, कार्यक्रम केल्यानंतर ते म्हणाले की माझं खूप मोठं भाग्य आहे की मला या व्यासपीठावर गायला मिळालं आणि ते माझे मित्र डॉ. मिलिंद भोईंच्यामुळे मिळालं. नाहीतर मला हे सगळं पाहायला मिळालं नसतं.

खरं म्हणजे मला तर असं वाटतं की खूप लोकांच्या मनामध्ये कारागृहातील बंदीवानांबद्दल असलेले प्रश्न डॉक्टरांच्या कार्यांच्या माध्यमातून आपोआप सुटतात. फक्त प्रत्येकाने यायला हवं. या प्रकल्पाच्या माध्यमातून मला आपल्याशी जोडलं जायचंय, मी आपल्यासाठी काय करू शकतो अशी भावना ठेवावी. प्रत्येकाने पैसाच द्यावा असं नाही. काही जण वेळ देऊ शकतात. काही कला देऊ शकतात. काही सेवा देऊ शकतात. काही श्रम देऊ शकतात. कुठल्या ना कुठल्या माध्यमातून आपण जर या समाजातला घटक बदलायचा असं ठरवलं तर समाजात असे अनेक घटक आहेत की ज्यांच्याबद्दल या समाजात तिरस्कार आहे. या तिरस्काराचं रूपांतर पुरस्कारात कसं होईल यासाठी डॉ.चे प्रयत्न आहेत आणि म्हणूनच खरं म्हणजे समाजामध्ये अशा प्रकारचा बदल घडविणं फार कठीण आहे. कारण या घटकाला कायमस्वरूपी वाईट म्हणण्याची समाजाला सवय लागलेली आहे. शेकडो वर्षं जुनी असलेली ही जी समाजव्यवस्था आहे ती बदलण्यासाठी एकटे डॉ. भोई पुरेसे नाहीत. त्यांना अनेक हातांची गरज आहे. माणूस वाईट नसतो, परिस्थिती त्याला कधी कधी तसा निर्णय घ्यायला भाग पाडते आणि कधी रागाच्या भरात तर कधी भावनेच्या भरात माणसाकडून चुकीचे निर्णय घेतले जातात. पण हे चुकीचे निर्णय दुरुस्त करण्याची त्यांना संधीच द्यायची नाही का? त्यांना माणूस म्हणून परत जगण्याची संधी प्राप्त करून द्यायचीच नाही का? कदाचित एकदा चुकेल, दोनदा चुकेल. तिसऱ्यांदा तरी ताळ्यावर येईल अशी आशाच सोडून द्यायची का? नाही. समाज हा परिपूर्णपणे जगला पाहिजे. विचारांची देवाणघेवाण झाली पाहिजे, त्यांना आपल्यासारखंच सन्मानाने जगता आलं पाहिजे.

ही बंदीवानांसाठीची डॉ. भोई ह्यांची धडपड या माध्यमातून आपल्याला दिसून येते. एक बंदीवान होता. कारागृहात तो म्हणायचा मला कसलंच काम येत नाही. वागायला चांगला. सद्‌विचारी, सद्‌गुणी कुठल्याशा अविचारातून त्याच्याकडून एक दुष्कृत्य घडलं. त्याची शिक्षा संपल्यानंतर

**भोई प्रतिष्ठानची थोडक्यात माहिती**

- डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या 'VISION INDIA 2020' मध्ये त्यांच्या नेतृत्वात ६ वर्षे कार्य
- भारत सरकारचा राष्ट्रीय पुरस्कार (२०१७)
- महाराष्ट्र शासन राज्य पुरस्कार (२०१३)
- महाराष्ट्र शासन महात्मा गांधी पुरस्कार (२०१३)

**डॉ. मिलिंद भोई** M.S. (ENT)

- असोसिएट प्रोफेसर, एम.यू.एच.एस.
- राष्ट्रीय युवा पुरस्कार - भारत सरकार २००२
- मानद सदस्य - महाराष्ट्र राज्य युवा धोरण समिती
- नेहरू युवा केंद्र संगठन (भारत सरकार)
- उपसमिती सदस्य - केंद्रीय नियोजन आयोग (भारत सरकार २००९)
- अभिविक्षण समिती सदस्य - येरवडा म. कारागृह
- झी मराठी झी अनन्य सन्मान ॲवॉर्ड (२०१८)

त्याच्या वागणुकीत खूप आमूलाग्र असा बदल घडून आला होता. सर्व आपले जे समन्वयक आहेत त्यांनी त्याचं अतिशय चांगलं समुपदेशन केलं होतं. त्याच्या चांगल्या वर्तणुकीबद्दल त्याची शिक्षाही कमी झाली होती. पण बाहेर पडल्यावर परत काय करावं हा प्रश्न पडला होता, कारण गुन्हेगार म्हणून शिक्षा भोगून आलेला कैदी किंवा बंदीवान, त्याला कुणी कामही देत नाही. मला कुणी काम देणार नाही. मी कितीही चांगलं वागण्याचा प्रयत्न केला तरी माझ्या वागण्याचा स्वीकार होणार नाही याबद्दलची वाच्यता तो पुन्हा पुन्हा करू लागला. मग डॉक्टरांनी त्याला जवळ बसवलं. 'अरे, असू दे. कोणी कदर करत नाही म्हणून आपण चांगलं वागणं सोडून देऊन चालेल का? तुला कोणी कामावर घेतलं नाही तरी चालेल. मी तुला एक गाय आणि एक वासरू घेऊन देतो. दुभती गाय तुला रोज दूध देईल. तू तिला चारा पाणी दे. तुम्हा दोघांच्या एकमेकांच्या देवाणघेवाणीतून तिचं दूध निघेल. ते तू बाजारात विक. तुला पैसे मिळतील. एक गाय व एक वासरू सांभाळल्याचं पुण्य मिळेल. दोघांची गरज भागेल, शिवाय तुझा त्यातून उत्तम व्यवसाय निर्माण होईल. हीच गाय तुला पुन्हा त्यातून अजून दोन गायी निर्माण करता येतील.' मोठ्या आनंदाने अहमदनगर जिल्ह्यातील तो बंदीवान गाय आणि वासरू घेऊन आपल्या मूळ खेड्यात परतला. आज मोठ्या दिमाखात तो दुग्ध व्यवसायात मोठी प्रगती करत आहे. किती आनंददायी गोष्ट आहे. माणसात बदल होऊ शकतो, फक्त त्याला जगण्यातला आनंद समजावून सांगण्याची गरज अहे.

पुष्कळदा स्वप्नपूर्तीसाठीही गुन्हे घडतात. गुन्हा झाल्यावर शिक्षा भोगून झाल्यानंतर परत त्याचा स्वीकार तेवढ्याच आनंदाने व्हायला हवा जेवढा पूर्वी होत होता. पण समाजात असं होत नाही. हे व्हावं असं डॉक्टरांना तळमळीने वाटतं. कोणताही कैदी मूळचा वाईट नसतो हे समजावून सांगताना समाजात अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे हे लोकांना समजावून सांगायचं कसं, असं त्यांना वाटतं. पण ते हार पत्करत नाहीत. त्यांच्यातला चांगुलपणा ते दाखवून देतात. बंदीवानांमध्ये काही सुप्त गुण आहेत. परमेश्वराने प्रत्येकाला घडवताना एक सद्‌गुण दिलाय की ज्याच्या माध्यमातून त्याला आपली प्रगती करता येईल. आपल्याला फक्त तो ओळखून त्याला त्या दिशेने जाण्याकरताच प्रोत्साहन देण्याची गरज आहे. डॉक्टर समाजात हेच काम करत आहेत.

डॉ. मिलिंद भोई यांच्या माध्यमातून या प्रेरणापथ प्रकल्पात अनेक माणसं, विद्वान, कलावंत, विचारवंत, बुद्धिवंत, ज्ञानवंत, गुणवंत अशी माणसं जोडली जाऊ लागली



आहेत, ज्यांच्या माध्यमातून हा प्रकल्प अधिकाधिक चांगला होत चालला आहे. आनंद या गोष्टीचा वाटतो की ज्या पद्धतीने एखादा प्रकल्प एखाद्या कारागृहात राबवला जातो आणि त्याची यशस्वी पद्धत बघून त्या पद्धतीने तोच प्रकल्प भारतातल्या आणि महाराष्ट्रातल्या इतर कारागृहातही राबवले जात आहेत.

खरं म्हणजे एखादं रोपटं लावलं जातं पण त्याचे अनेक ठिकाणी वटवृक्ष उभे राहतात, त्याच्या फांद्या पसरतात, वृक्ष बहराला येतात, त्याला फळं-फुलं लागतात तेव्हा तो वृक्ष वाढत नाही तर जमिनीला त्याच्या फळांच्या, फुलांच्या, पानांच्या ओझ्याने तो जमिनीला टेकतो. ''का फळलिया तरुची शाखा । सहजे भूमीसी उतरे देखा । तैसे जीवमात्रां अशेखां । खालावती ते'' ज्ञानेश्वर महाराज म्हणतात की एखादं झाड फुलांनी, पानांनी, फळांनी बहरून यावं. खरं म्हणजे बहरलेलं झाड हे किती श्रीमंत आहे. त्याने उंच आणि ताठ उभं राहावं पण नाही उलट फुलांच्या, फळांच्या पानांच्या ओझ्याने ते झाड वाकतं, नम्र होतं, किती नम्र होतं तर त्या ओझ्याने ते जमिनीला टेकतं. डॉक्टरांसारखी काही व्यक्तिमत्त्व समाजात आहेत की ज्यांना ज्ञान, भक्ती, विवेक, विचार आणि सेवा यांची फळं लागली आहेत... ही माणसं समाजात अशीच नम्र राहतात. त्यांना




**जन्मठेपेची शिक्षा भोगून बाहेर आलेला बंदी बांधव श्री. बालाजी मोरे याला भोई प्रतिष्ठानच्या वतीने नवीन आयुष्य सुरू करून देण्यासाठी चहा व स्नॅक्सचा स्टॉल सुरू करून देण्यात आला.**

आपल्या कर्माचा अभिमान नसतो आणि म्हणूनच परमेश्वर केलेल्या कर्माचं त्यांना खऱ्या अर्थाने व्यापक असं फळ देतो. हे व्यापक फळ काय असतं? हे व्यापक फळ आपल्या जगण्यातलं समाधान असतं.


पुष्कळ माणसं समाधान शोधण्याचा प्रयत्न करतात पण काही केल्या त्यांना ते मिळत नाही. कारण समाधान आपल्या आत असतं आणि आपण ते जगाच्या बाहेर शोधत असतो. डॉक्टरांना आपल्या आतलं समाधान सापडलंय. त्यामुळे स्वत:साठी किती आणि जगासाठी किती हा हिशोब त्यांना पक्का जमलाय खरं म्हणजे बाकी इतर घटकांसाठी काम करणारी मंडळी पुष्कळ आहेत. पण असा विचार लोकांच्या मनात सहज येतो की बापरे तो जेलमध्ये होता... नको त्याच्या नादाला लागायला... उद्या त्याला सुधरवायला गेलो आणि आपणच बिघडलो तर? असेही समाजातले काही घटक आहेत की जे बंदीवानांना सुधरवायचा तर विषय सोडा पण त्यांच्या जवळही जायला घाबरत आहेत. नको म्हणत आहेत. वास्तविक पाहता तीही माणसं आहेत हे लोक विसरत आहेत. आणि हीच जाणीव प्रेरणापथच्या माध्यमातून करून देण्याचं काम डॉ. मिलिंद भोई आणि त्यांचे सर्व सहकारी करत आहेत. मला सांगताना विशेष आनंद होतो की सर्व प्रकल्प आता व्यापक स्वरूपात सुरू आहेत. वेगवेगळ्या जेलमधून ते राबविण्याची मोहीम सुरू झाली आहे.

खरं म्हणजे मी मघाशी म्हणालो की जगद्गुरू संत तुकाराम महाराजांचा एक अभंग आहे ... तुका म्हणे अणू रेणूच थोकडा.. तुका आकाशाएवढा... तुका म्हणे आता उरलो उपकारापुरता. की आता मला जे मला जगायचं होते ते जगून झालंय, आता या नंतरचं जे जगणं आहे ते जगासाठी जगायचं आहे. स्वत:साठी जगून झालं, ज्या गरजा स्वत:च्या होत्या, त्या प्राप्त करून झाल्या. आताच्या ज्या गरजा आहेत, त्या माझ्या नाही या समाजाच्या असणार आहेत. आपण जे काही मिळवतो ते सगळंच आपलं नसतं यातला काही भाग देवाचा, देशाचा, धर्माचा आणि समाजाचाही असतो. तो द्यायला आपण चुकलो तर समाधान नावाची गोष्ट आपल्या आयुष्यात कधी सापडणार नाही आणि असमाधानी असलेला माणूस, माणूस म्हणून कधी जगत नाही. तो हव्यासांच्या मागे लागतो आणि म्हणून डॉ. मिलिंद भोई हे एक समाधानी व्यक्तिमत्त्व आहे की ज्यांनी समाजाच्या कल्याणासाठी आपलं संपूर्ण जीवन वाहिलं आहे. आजही त्यांचे कार्य वेगवेगळ्या प्रकल्पांच्या माध्यमातून प्रेरणापथ हा एक प्रकल्प आहे त्यांच्या कार्यातला...

अशा अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून सुरू आहे. राबविले जात आहेत. माझ्या या प्रेरणापथ प्रकल्पाला, डॉ. मिलिंद भोई आणि त्यांच्या सर्व सोबत काम करणारे अनेक हात आहेत की जे त्यांना वेगवेगळ्या प्रकारे मदत करतात. अशा हातांना, सर्व कार्यकर्त्यांना, सर्व माता-भगिनींना मी मन:पूर्वक, विनम्र वंदन करतो आणि प्रेरणापथ या प्रकल्पामध्ये आपण सर्वांनी सामील व्हावं अशी मी आपल्या सर्वांना विनंती करतो. कारण समाजातल्या प्रत्येक घटकाने जर ठरविलं की आपलाही खारीचा वाटा यामध्ये असावा, तर ते लाख मोलाचे ठरेल... डॉ. भोई मला असं म्हणाले की, प्रेरणापथ हा प्रकल्प आम्हाला लवकरात लवकर बंद करायची वेळ यावी अशा तुम्ही शुभेच्छा द्या जेणेकरून ह्या जगतामध्ये कोणाकडूनही वाईट गोष्ट घडणार नाही आणि आम्हाला त्याला सुधरवण्याची वेळच येणार नाही. अशी परिस्थिती जेव्हा निर्माण होईल त्या दिवशी खऱ्या अर्थाने प्रेरणापथ हा प्रकल्प पूर्ण झाला असं आम्ही म्हणू.

मी मिलिंद भोई सरांना व त्यांच्या सर्व प्रेरणापथ टीमला मनापासून शुभेच्छा देतो. त्यांनी आपलं कार्य असंच अखंड सुरू ठेवावं.

■



# युवक गुन्हेगारी आणि पुनर्वसन

**चंद्रकांत शिंदे**
**सामाजिक कार्यकर्ता, प्रयास - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा प्रकल्प**

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या प्रयास या प्रकल्पात मला काम करण्याची संधी मिळाली आणि न्यायव्यवस्था प्रणालीचे कार्य मला जवळून पाहता आले. माझ्या आजवरच्या सामाजिक कार्यातून मला अशा युवकांच्या प्रश्नांवर जे अनुभव आले आहेत ते ध्यानात घेऊन मी हा लेख लिहीत आहे. युवक गुन्हेगारीत का येतात व कसे येतात याची बहुतेकांना माहिती असते. पण गुन्हेगारीतून बाहेर पडण्याचा मार्ग किती अवघड व खडतर आहे याची कल्पना अनेकांना नसते. युवक गुन्हेगारांचे पुनर्वसन होऊ शकते व पुन्हा समाजात एक नागरिक म्हणून ते सन्मानाने जगू शकतात. याचे सविस्तर विवेचन या लेखात केले आहे.

**'प्रयास'बद्दल :**

'प्रयास' हा सेंटर फॉर क्रिमिनोलॉजी अँड जस्टिस, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचा एक अग्रगण्य सामाजिक कार्य प्रात्यक्षिक प्रकल्प आहे, जो १९९० मध्ये फील्ड ॲक्शन प्रोजेक्ट म्हणून स्थापित केला गेला. प्रयासचे लक्ष्य हे सेवा वितरण, नेटवर्किंग, प्रशिक्षण, संशोधन आणि दस्तऐवजीकरण आणि भारतीय फौजदारी न्याय प्रणाली (CJS)च्या थेट संपर्कात आलेल्या सामाजिक-आर्थिकदृष्ट्या असुरक्षित व्यक्ती आणि गटांचे संरक्षण / संस्थात्मक अधिकार आणि पुनर्वसन यांच्या संदर्भात धोरण बदल यावर आधारित आहे. यासाठी, प्रयास महाराष्ट्र आणि गुजरातमधील पोलीस स्टेशन, कारागृह आणि सरकारी निवासी संस्थांमध्ये बंदिस्त असलेल्या व्यक्तींसोबत, फौजदारी न्याय किंवा कोठडी संस्थांना भेटी देणे आणि बाहेर पडलेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी कार्य करते. प्रयासच्या सेवांचा भर हा कायदेशीर मार्गदर्शन आणि मदत व पुनर्वसन, कायदेशीर जागरूकता, वैयक्तिक आणि कौटुंबिक समुपदेशन, कौटुंबिक मदत, आपत्कालीन मदत, वैद्यकीय मदत, मुलांच्या शिक्षणाचे प्रायोजकत्व, व्यावसायिक प्रशिक्षण, सरकारी योजना आणि सेवांची माहिती, मार्गदर्शन यावर आहे.

**पुनर्वसन भूमिका :**

आपल्याला आज समाजात अनेक दिशाहिन युवक गुन्हेगारीकडे वळताना दिसतात. गुन्हेगार हा नुसतेच मानसिक संतुलन बिघडल्यामुळे गुन्हे करत नाही तर तो त्याच्या भोवतालच्या वातावरणामुळे तसा वागतो. त्याला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, आसपासची परिस्थिती जबाबदार असते. कैदी हा रुग्ण आहे व गुन्हेगारी हा त्याचा रोग आहे व तो रोग बरा होण्यासाठी त्याला तुरुंगात ठेवले जाते. कारागृहातून जरी तो निर्दोष बाहेर आला तरी समाजाच्या दृष्टीने त्याला लागलेला गुन्हेगारीचा कलंक (गुन्हेगारीचा डाग) सहसा नाहीसा होणार नाही. कारण अद्याप भारतामध्ये तुरुंगातून सुटून आलेल्या गुन्हेगारांचे भावी आयुष्य व्यवस्थित जावे याकरता परिणामकारक योजना आखलेल्या दिसून येत नाहीत. सध्याच्या कारागृहांची परिस्थिती पाहता हा रोग अनेकपटीने बळावण्याची शक्यता जास्त दिसते. कारागृहातील वाईट प्रवृत्तीच्या संपर्कात येऊन त्यात अधिकपटीने वाढ झालेली दिसते. म्हणून पुनर्वसन प्रक्रियेत हा बळावलेला आजार दूर करण्यासाठी विविध कल्याणकारी सेवांची फारच आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यामुळे एखाद्या आजारी माणसाप्रमाणे त्याला उपचाराची गरज निर्माण होते व असे उपचार ताबडतोब करायला पाहिजेत. म्हणजेच एखादा गुन्हेगार व्यक्ती जेव्हा कारागृहाबाहेर येतो तेव्हा सर्वप्रथम त्याला तातडीची मदत मिळणे फार महत्त्वाची गोष्ट बनते.

तातडीची मदत मिळणे हा सुटून आलेल्या कैद्याचा हक्क समजायला हवा. उदाहरणार्थ, वैद्यकीय मदत, उपचार, तात्पुरती राहण्याची व्यवस्था, परिवाराशी संपर्क साधणे, समुपदेशन, कायदेविषयक सल्ला व मदत, मार्गदर्शन इत्यादी तातडीची मदत त्याला जर मिळाली नाही, तर त्यांचा कल पुन्हा मागच्या गुन्हेगारी मार्गावर जाण्याचा अधिकपटीने वाढतो. याकरता प्रयास संस्था युवा विकास केंद्राच्या माध्यमातून अनेक वर्षे प्रयत्न करत आहे. सरकारी शेल्टर होम्स मध्यवर्ती कारागृहाजवळ किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी असणे फार आवश्यक आहेत. तेथे २-३ दिवस राहून त्यांना आपल्या गावी परत जाता येईल याकरता प्रयास संस्था पाठपुरावा करत आहे.

**सामाजिक स्थिती व त्याचे परिणाम :**

मुंबईसारख्या शहरात काम करताना आम्हाला दोन गट प्रामुख्याने दिसतात.

१) ज्यांचे येथे कोणी नाही व जे परप्रांतातून आलेले आहेत व निराधार झालेले आहेत.

२) ज्यांचे येथे कुटुंब आहे, नातेवाईक आहेत व जे पुन्हा कुटुंबात परत जाण्यासाठी इच्छुक आहेत.

अलीकडील सामाजिक स्थिती पाहता वाढते शहरीकरण व औद्योगिकीकरण यामुळे सर्वसाधारण कुटुंबाचे दैनंदिन जीवन फार हलाखीचे आहे. पालकांचे पाल्यावर नियंत्रण नाही. त्यामुळे तरुण मुले सहजपणे गुन्हेगारीकडे वळू लागली आहेत. समाजात पैशाला महत्त्व आले आहे. त्यामुळे प्रतिष्ठा पैशावर मोजली जात आहे. राजकारणी झटपट श्रीमंत होत आहे. सरपंचापासून ते खासदारांपर्यंत राजकारणी आज करोडो रुपयांची संपत्ती बाळगून आहेत.

तरुणांना शिकून नोकऱ्या नाहीत. प्रचंड बेकारी आहे. बेसुमार स्पर्धा वाढलेली आहे. त्यात अनेक जण उच्चशिक्षित आहेत. खेडेगावात मागासलेल्या जमातीत अंधश्रद्धा, जादूटोणा, दारूचे अतिप्रमाणात सेवन करणे या साऱ्या प्रथा चालू आहेत. लुटालूट, बलात्कार, अपहरण इत्यादी घटना वारंवार होताना दिसतात. शेतकरी देशोधडीला लागून आत्महत्या करत आहेत व अनेक जण विस्थापित होत आहेत व शहराकडे वळत आहेत.

अपराधाची सर्व कारणे आर्थिकच नाहीत तर ती अनेक आहेत.

- सांस्कृतिक व धार्मिक कलह
- दाट लोकसंख्या असलेल्या वस्त्या
- कौटुंबिक वातावरण
- विभक्त कुटुंब पद्धती, नियंत्रणाचा अभाव
- वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण
- बेरोजगारी, गरिबी
- प्रसारमाध्यमे, चित्रपट यांचा परिणाम
- नैतिक मूल्यांचा अभाव
- झटपट श्रीमंत होण्याची लालसा, फसवणूक
- शिक्षण पद्धतीतील दोष
- कौशल्यांचा अभाव
- व्यक्तिगत सवयी किंवा वर्तणूक दोष
- भ्रष्टाचार, काळाबाजार, अफरातफर इत्यादी

तसेच विविध सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विषमतेच्या परिणामांमुळे आजचा युवक गुन्हेगारीकडे वळताना आपल्याला दिसतो. या भयानक परिस्थितीचा विचार करताना



काही तरुण नाइलाजास्तव गुन्हेगारीकडे वळताना आपल्याला दिसतात. गुन्हेगारीचा असणारा कलंक, सामाजिक आणि पारिवारिक बहिष्कृत जिणे, नाकारलेपणा, या निराशेमुळे बहुतांश युवक गुन्हेगारी विश्वात अडकून पडतात.

आजचा युवक हा उद्याचा भविष्यकाळ ठरवतो. परंतु दिशाहिन झालेल्या युवकांना आज गुन्हे करण्याकरता समाजात कायदे असूनही सहज मार्ग उपलब्ध होत आहेत. गुन्हा करण्याचे नवनवीन तंत्रज्ञान आज विकसित होत आहे. गुन्हेगारी उपजत येत नाही, तर ती पाहून, ऐकून, प्रलोभनांनी मोहित होऊन व त्यासारखे गुन्ह्यांचे अनुकरण करूनच येत असते. काही ठिकाणी असे दिसून येते की युवक सामाजिक परिस्थितीचे शिकार ठरले असून विशिष्ट परिस्थितीमुळे ते टोळ्यांमध्ये सामील झालेले आहेत. अशा टोळ्यांमध्ये गुन्हा कसा, कोठे व केव्हा करायचा हे नियोजन करण्यात ते माहीर होतात व सराईत गुन्हेगारीकडे वळतात. काही जण अशिक्षित न्यूनगंडाने पछाडलेले असतात. अशा वेळेप्रसंगी कडक शिक्षा आवश्यक ठरते, येथे मानसिक आरोग्य उपचाराची आवश्यकता अधिक असते व जे प्रथम गुन्हा करणारे असतात अशांना उपचाराची, सुधारण्याची एक संधी देणे व त्यांना ताकीद देऊन देखरेखीखाली ठेवणे आवश्यक असते.

**पुनर्वसन प्रक्रिया व सुधार कार्यक्रमाबाबत :**

गुन्हेगारी विश्वात असताना या युवकांना विविध अडचणी असतात. त्यांना सामाजिक, आर्थिक अडचणींचा सामना करताना खूप आव्हानांना तोंड द्यावे लागते. त्यावेळी सामाजिक कार्यकर्त्यालासुद्धा काही बाबी लक्षात घेऊन काम करावे लागते. कारागृहातून सुटून आल्यानंतरचा जपणूक Aftercare (नंतरची काळजी) ही गुन्हेगारी न्यायपद्धतीतील आवश्यक भाग आहे. प्रयासच्या अनुभवानुसार पुनर्वसन प्रक्रियेतील पुढील टप्पे फार महत्त्वाचे ठरतात. एखाद्याचे पुनर्वसन करत असताना या टप्प्यांच्या आधारे कार्य करणे आवश्यक ठरते.

- अशिलाची निश्चित ठिकाणी निवासाची सोय करणे किंवा अशिलाने एके ठिकाणी स्थिर आसरा घेणे.
- अशिलाचा चरितार्थ निवडलेला पर्याय हा बेकायदेशीर

मार्गाचा नसावा, वैध कमाई असावी.

- कुसंगतीपासून दूर राहून, अशिलांनी सुयोग्य नातेसंबंध प्रस्थापित करणे.
- प्रलोभनांच्या आहारी न जाता व्यसनांपासून दूर राहणे.
- अशिलांनी स्व-प्रतिमा बदलण्याकरता केलेले सुयोग्य प्रयत्न.
- अशिलांनी आपल्या कार्याद्वारे स्वत:ची नवीन ओळख प्रस्थापित करणे.

पुनर्वसन ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

गुन्हेगारी वातावरणातून त्यांना बाहेर काढणे, त्यांना सुजाण नागरिक बनवणे ही त्यांच्या परिवाराची जबाबदारी आहे, असे न पाहता एक सजग नागरिक म्हणून आपण या समस्येकडे पाहिले पाहिजे.

**१. कुटुंबासोबत पुन्हा जोडणे :**

कुटुंब हा व्यक्तीचा जीवन आधार आहे. कुटुंब व्यक्तीला समाजात ओळख देत असतो व पुनर्वसनाचा मुख्य पाया हा व्यक्तीला पुन्हा कुटुंबात स्थान मिळवून देणे हाच आहे. पण कुटुंबाकडून अशा व्यक्तींना प्रवेश मिळणे हे अत्यंत कठीण काम आहे, कारण गुन्हेगारीचा सामाजिक कलंक, पोलिसांचा त्रास आणि मागील गुन्हेगारीची पार्श्वभूमी, तसेच व्यक्तीची कुटुंबातील गैरवर्तणूक, परिसरातील, समाजातील कुटुंबाचे स्थान इत्यादी गोष्टी पाहता परिवाराकडून त्यांना कुटुंबात घेतले जात नाही. अशा वेळी कुटुंबाचे समुपदेशन करून वारंवार त्या व्यक्तींना पुन्हा जोडण्याचा प्रयत्न करणे व कुटुंबाच्या समस्या सोडवण्यास मदत करणे या गोष्टी करणे आवश्यक आहे. हे कार्य कारागृहात काम करत असताना तसेच बाहेर सुटून आलेल्या बंदी बांधवांसोबत प्रयास संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते निरंतर करत आहेत.

**२. अस्थिरता आणि एकटेपणा दूर करणे :**

काही व्यक्ती ह्या आपल्या पालकांपासून आणि नातेवाइकांपासून दूर राहणेच पसंत करतात कारण त्यांच्या गैरवर्तणुकीमुळे समस्या निर्माण झालेल्या असतात, तर काहींचे जीवन विस्कळीत झालेले असते आणि त्यांचे पालक हयात नसतात. आई-वडील वेगळे राहत असतात अगर घटस्फोटित असतात. पुष्कळशा अशा गुन्हेगारांना त्यांच्या लहानपणी शारीरिक शिक्षा पालकांनी दिलेल्या असतात व त्यामुळे त्यांना त्यांच्या कुटुंबाबद्दल अनादर असतो. अशा व्यक्तींना मानसिक आधाराची गरज निर्माण होते. जर योग्य व्यक्तींशी त्यांचे नाते जोडले गेले तर समाजविघातक व्यक्तींपासून त्यांना दूर ठेवता येईल. त्यांना चांगले नातेसंबंध जोडण्याकरता शिकवले पाहिजे. त्यांच्यातील एकटेपणा दूर करण्यासाठी त्यांना विविध कामांमध्ये ओढले पाहिजे. विविध कला, क्रीडा, कौशल्यांमध्ये व्यस्त ठेवले पाहिजे. याकरता युवक कल्याण कार्यक्रमांची फार आवश्यकता आहे. अशा अशिलांना, प्रयास सामाजिक कार्यकर्ते डे केअर सेंटरमध्ये आणून व्यक्तिमत्त्व विकास, जीवन कौशल्यावर आधारित कार्यक्रमात सहभागी करून घेतात.

**३. शिक्षण, प्रशिक्षण, कामाचा अनुभव अर्थात कार्यानुभव :**

ज्या व्यक्तींनी औपचारिक शिक्षण पद्धतीतून फारकत घेतलेली आहे, शालेय शिक्षण अर्धवट सोडलेले आहे, ज्या व्यक्ती समाजाच्या नियमामध्ये स्वत:ला बांधून घेत नाहीत, मुक्तपणे जगण्याची ज्यांना सवय जडलेली आहे, ज्या व्यक्तींकडे कौशल्याचा अभाव आहे व बाहेरील जगाच्या ज्ञानाची ओळख नाही आहे अशा व्यक्तींकरता अनौपचारिक शिक्षणाद्वारे, कौशल्यावर आधारित विविध प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देऊन त्यांना विविध व्यवसायास उपयोगी साहित्य मिळवून देणे हे गरजेचे आहे. विविध सामाजिक संस्थांच्या व्यावसायिक प्रशिक्षण कोर्सेसना प्रवेश मिळवून देणे, त्याद्वारे त्यांना साहित्य उपलब्ध करून देणे व ज्यांना अर्धवट राहिलेले शिक्षण पूर्ण करावयाचे आहे अशांसाठी मार्ग उपलब्ध करून देणे हे काम प्रयास संस्थेद्वारे केले जाते व ते फार आवश्यक आहे.

**एन.जी.ओ.प्लेसमेंट कार्यक्रम :** अशा युवकांसोबत काम करताना इतक्या सहजपणे हे कार्य घडेल हे शक्य नाही. कारण अशा युवकांच्या आयुष्यातील बराच कालावधी हा निरुपयोगी कामात गेलेला असतो. त्यांना कामाची सवय नसते. असली तरी ती कारागृहात गेल्यामुळे सुटलेली असते. वर्तणुकीच्या अनेक समस्या असतात. कामाची आवड निर्माण होण्यासाठी कार्यानुभवाची आवश्यकता आहे. हे ध्यानात घेऊन सामाजिक संस्थांमध्ये ह्या युवकांना काम करण्याची संधी प्रयास संस्थेने दिली. सामाजिक संस्थांमध्ये विविध प्रकारची कामे जसे की माळीकाम, स्वयंपाक मदतनीस, वॉचमन, ड्रायव्हर, रुग्णवाहिका मदतनीस, केअर टेकर, पॅरामेडिकल स्टाफ, फिल्डवर्क मदतनीस, शिपाई अशा अनेक कामांकरता कर्मचाऱ्यांची गरज असते. या कामासाठी कौशल्यांची गरज असते व अनेक संस्थांमध्ये हे काम शिकण्याची पुरेशी संधी व वेळ या सामाजिक संस्था देतात. इथे प्रायव्हेट क्षेत्राइतकी स्पर्धा नसते, चुका झाल्या तरी सुधारण्याची संधी दिली जाते. हे ध्यानात घेऊन प्रयास संस्थेकडून अशा युवकांना सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्यांच्या

मार्गदर्शनाखाली सामाजिक क्षेत्रात कार्यानुभव घेण्याचा अनुभव एन.जी.ओ. प्लेसमेंट या कार्यक्रमातून २००३ सालापासून देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. प्रयासने अशा व्यक्तींच्या अडचणी काय आहेत, हे पाहून त्यांच्या सवयी जाणून घेतल्या व त्यांची आवड व कल तसेच शिक्षण लक्षात घेऊन त्यांची प्लेसमेंट केली व दर महिना मानधन त्यांना देण्यात आले. त्यांच्यामध्ये त्यांचे सामाजिक कौशल्य वाढवण्याकरता प्रयत्न केला गेला व पुन्हा शिक्षणासोबत जोडून कामाचा अनुभव देत त्यांना सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची प्रेरणा देऊन अनेकांना रोजगार मिळवून दिला गेला. प्रत्यक्ष काम करताना प्रशिक्षण दिले गेले आणि वेळोवेळी मार्गदर्शन करत असताना स्थिर निवारा, स्थिर उत्पन्न, स्थिर नातेसंबंध जोपासणे आणि चुकीची संगत व सवयी यापासून दूर राहणे यावर भर दिला गेला आहे. आज काही युवक ह्या सामाजिक संस्थेत प्रशिक्षण घेऊन काम करत आहेत. एन.जी.ओ. प्लेसमेंट या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रयास अशा युवकांना समाजासोबत जोडण्याचा प्रयत्न करत आहे. त्याचसोबत त्यांना आवश्यक असणारी प्रमाणपत्रे जसे की रेशन कार्ड, आधार कार्ड, बँक खाते, जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला इत्यादी मिळवण्याच्या कामात मदत करत आहे, जेणेकरून ते सरकारी योजनेपासून वंचित राहणार नाहीत. एक नागरिक म्हणून ही कमतरता होती, ते समाजात सन्मानाने जगावेत व समाजाच्या मुख्य प्रवाहात जोडले जावेत हाच प्रयत्न या कार्यक्रमाच्या माध्यमातून केला जात आहे व त्यात यश येत आहे.

**सारांश :**

युवकांनी पुन्हा गुन्हेगारीत जाऊ नये व समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावे याकरता येणाऱ्या अडचणीत मदत करणे व त्याच्या समस्या सोडवणे हे जरी प्रमुख उद्देश्य असले तरी तो युवक हा एक स्वाभिमानी व स्वावलंबी व्यक्ती बनेल आणि गुन्हा न करता प्रभाविपणे तो कसा नागरिक बनेल हे पाहणे महत्त्वाचे ठरते. समाजाची अशी धारण आहे की गुन्ह्याला प्रतिबंध करणे आणि गुन्हेगारांचे पुनर्वसन करणे ही जबाबदारी पोलिसांची, कारागृहाची आणि सामाजिक संस्थांची आहे, असे असले तरी खरी परिस्थिती अशी आहे की सामाजिकीकरणाची प्रक्रिया अत्यंत जटिल असून ती व्यक्तींनी निवडलेल्या पर्यायावर अवलंबून असते आणि म्हणून गुन्हा प्रतिबंधासाठी व पुनर्वसन प्रक्रियेची संपूर्ण जबाबदारी पोलीस, कारागृह व एकट्यादुकट्या संस्थेची ठरत नसून ती प्रशासकीय व संपूर्ण समाजाची ठरते. सभ्य समाज या कामी पुढे येऊन गुन्हा प्रतिबंध व पुनर्वसनाची जबाबदारी घेत नाही तोपर्यंत समाजात




समाजविघातक कृत्य व प्रवृत्तींना आळा बसणार नाही.

याकरता युवक ही राष्ट्रीय संपत्तीचा भाग मानून युवकांमध्ये राष्ट्रप्रेम वाढीस लागण्याकरता विशेष अशा गोष्टींवर भर द्यावा लागेल. राष्ट्रीय युवा धोरणांमध्ये युवकांचे शिक्षण, प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी इत्यादी विकसित करून विशेष लक्ष द्यावे लागेल. नुसत्या स्वयंसेवी संस्थांची ही जबाबदारी नसून प्रशासनाला यात प्रमुख भूमिका घ्यावी लागेल.




We are delighted to inform you that our veteran, worthy, learned, kind hearted & gentle leader **Mr. Sunil Ramtekeji** was retired on 31st August 2022 as Chief Manager from Central Bank of India, Mumbai. He served Central Bank as Agriculture Finance Officer (1990 batch). Since 32 years he offered his dedicated services to Central Bank of India. Prior to joining Central Bank, he has worked in Ministry of Agriculture & cooperation, GOI, New Delhi.In addition to that, he had also contributed as one of the mentor of Mumbai unit. He honestly provided his services and helped hundreds of employees and tried to give justice to all category employees successfully. Hence, his contributions will be always memorable and significant in the history of Central Bank of India. He served as President of All India Federation, New Delhi and in his tenure he has done wonderul work for downtrodden people of our society. We salute his dedication and his honest contribution given to our welfare federation spread over pan India. On behalf of M.P. Central Bank Welfare Association, Bhopal unit.

*We wish him a very happy, peaceful and prosperity life.*

Happy Diwali

**M.P. Central Bank SC/ST/OBC Employess Welfare Association, Bhopal unit.**

# व्यथा...

**सुप्रिया बडवे**
**एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, बडवे इंजिनिअरिंग, पुणे**

खरं तर स्त्री कैद्यांसाठी आजवर बऱ्याच जणांनी लिखाण केले आहे, काही काल्पनिक तर काही वास्तववादी. परंतु स्त्री कैद्यांची मानसिकता अधिक सखोलतेने जाणून घेण्यासाठी, त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी मागील काही दशकांमध्ये प्रशासनाने बरेच धोरणात्मक निर्णय व बदल अवलंबिले आहेत. त्या बदलांबद्दल जाणून त्यावर लिखाण करण्याचा माझा हा अल्पसा प्रयत्न.

स्त्री कैद्यांसाठी, जेलमधील अधिकाऱ्यांपासून ते समाजसेवक, समाजसुधारक, समुपदेशक, वैद्यकीय सेवा देणारे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कायद्याच्या नियमानुसार स्त्री कैद्यांच्या पुनर्वसनासाठी काम करणाऱ्या विविध क्षेत्रांतील लोकांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कारण हे काम नि:स्वार्थी भावनेने करत असताना एक माणूस म्हणून स्त्री कैद्यांच्या व्यथा समजून त्या विषयावर जोमाने काम केले जाते. नकळत केलेल्या गुन्ह्यासाठीदेखील शिक्षा भोगली जाते, असे खूप कैदी असतात. गरजू कैदींना वकिलांची मोफत सुविधा पुरवली जाते. कायद्याचे पाठबळ ज्यांना मिळाले ते सुटून जातात. स्त्रीची खरी व्यथा चालू होते जेव्हा गरोदरपणात तिचा तुरुंगवास सुरू असतो. विविध भावनिक टप्प्यांवर ती हिंदोळत असते. स्वत:ची झालेली फसवणूक, दुसरीकडे कोमल मनाच्या स्त्रीचा मातृत्वाचा कठोर प्रवास अशा दुहेरी मानसिक द्वंद्वाला ती सामोरी जात असते.

स्त्री कैदी म्हणून शिक्षा भोगत असताना त्यांना त्यांच्या आप्त कुटुंबीयांची पण काळजी वाटत असते. एक स्त्री म्हणून त्यांच्या सहनशीलतेच्या मर्यादा संपतात आणि बरेचदा अशा स्त्रिया आत्महत्येसाठी प्रवृत्त होतात.

हे स्त्री कैद्यांचे दु:ख सामाजिक संस्था, प्रशासन, समाजसुधारक यांना विचार करायला भाग पाडते आणि म्हणूनच समुपदेशनाद्वारे त्यांना अधिक खंबीर करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातूनच त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकारकडून विविध स्तुत्य उपक्रम राबवले जातात. उदाहरणार्थ, गरोदर स्त्रियांसाठी पोषक आहार दिला जातो, सोबतच विविध वैद्यकीय सेवा दिल्या जातात. निरोगी समाजाची स्थापना होण्यासाठी प्रशासनाने एक खूप चांगले पाऊल उचलले आहे, ते म्हणजे स्त्री कैद्यांच्या पोटी जन्मणाऱ्या मुलांचे तपशील इतर सर्वसामान्य मुलांप्रमाणेच नोंदवले जातात.



आई गुन्हेगार असली तरी मुलाला मात्र सामान्य जीवन कसे जगता येऊ शकेल यासाठी आपले प्रशासन, अधिकारी वर्ग, निगडित मानद संस्था असे सर्वजण प्रयत्न करत असतात. उदाहरणच सांगायचे झाले, तर कैदी मातांची मुले जेव्हा सरकारी दवाखान्यामध्ये जन्माला येतात तेव्हा त्यांना कैद्यांची मुले असे अजिबात दाखवले जात नाही. पुढे जाऊन समाजात या बाळाला चांगले जगता यावे व चांगले संस्कार व्हावेत यासाठी छोटेखानी नामकरण सोहळाही केला जातो. साधारणत: बाळ दीड वर्षाचे झाल्यानंतर कारागृहाबाहेर अंगणवाडीत पाठवले जाते, तसेच चाइल्ड डेव्हलपमेंट स्कीमनुसार आहारही दिला जातो. मूल सहा वर्षाचे झाले की, त्यानंतर त्याला त्याच्या जवळच्या नातेवाइकांकडे सुपुर्त केले जाते, जर ते तयार नसतील तर आश्रम शाळेत पाठवले जाते. अर्थातच या मुलांवर चांगले योग्य संस्कार व्हावेत तसेच योग्य शिक्षण आणि पोषक वातावरण मिळावे हीच धडपड असते. मूल जेव्हा आजारी पडते तेव्हा गरज असल्यास त्याच्या आईलाही त्याच्यासोबत दवाखान्यात पाठवले जाते.

मातृत्व आणि जबाबदारी ही एक नैसर्गिक आणि मनाला ओलावा देणारी गोष्ट आहे. कैदी आई आपल्या मुलाला योग्य ते चांगले जीवन मिळावे यासाठी धडपडताना दिसते. अर्थात बाहेर असणारे नातेवाईक व परिजन बऱ्याचदा मुलांवर चुकीचे विचार लादतात तरीही आई मात्र जेलमध्ये काम करून पैसे कमवते व आपल्या मुलाला पोसते. उदाहरणार्थ, स्वयंपाक काम, शिवणकाम, भाजीपाला शेती, इत्यादी कामे ह्या स्त्रिया करतात. अशा वेळेस जेल अधिकारी जणू यांचे पालकच असतात.

कारागृहात विविध सणवार साजरे केले जातात. उदाहरणार्थ, नागपंचमीला कैदी स्त्रिया सर्वांसाठी पुरणपोळ्या बनवतात, उत्साहपूर्वक वातावरण ठेवायचा प्रयत्न केला जातो. कमी शिक्षित पण संस्कृतीची जाण असणाऱ्याही बऱ्याच जणी हिरिरीने सहभागी होतात.

८ मार्च महिला दिनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जातात, तसेच अनेक नामवंत कलाकारांचे सादरीकरण आयोजित केले जाते. उदाहरणार्थ, पं. झाकीर हुसेन, शंकर महादेवन, सुरेश वाडकर, स्व. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचे व्याख्यान, या कैद्यांच्या पुनर्वसनासाठी जे अहोरात्र कार्यरत आहेत असे भोई फाउंडेशनचे संस्थापक डॉ. मिलिंद भोई यांचे व्याख्यान, योगगुरू रामदेव बाबांचे योग शिबिर, ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह, असे नानाविध कार्यक्रम आयोजिले जातात.

हे असे जीवन जगत असताना आपले सरकार ह्या स्त्री कैद्यांच्या पुनर्वसनासाठी आणि त्यांच्या लहान मुलांना देशाचा चांगला नागरिक बनवण्यासाठी, अंगणवाडी, बालवाडी, वैद्यकीय सुविधा, समुपदेशन, तसेच बाहेरील जगात यशस्वी होण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील व्यावसायिक शिक्षण, अशा नानाविध योजना राबवित असते. तेव्हा सरकारी उपक्रमांची आणि अशा व्यक्तींच्या कार्याची सामाजिक जाणीव होणे गरजेचे आहे, त्यांचे कार्य अभिमानास्पद आहे. म्हणून नानाविध प्रशासकीय उपक्रम, सामजिक संस्था, वैद्यकीय अधिकारी, विविध विषयांतील पारंगत डॉक्टर्स, परिचारिका, समुपदेशक, सोशल वर्कर्स या सर्वांच्या कार्याला माझा सलाम!!

**विशेष आभार** –

- श्री. यू. टी. पवार - मुंबई, अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, महाराष्ट्र राज्य
- श्री. भगवंतराव मोरे, माजी अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य आणि महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे सदस्य.
- श्री. विठ्ठलराव जाधव - पुणे (से. नि. पोलीस महानिरीक्षक) बंदीवान




# हृदय परिवर्तन

**सायली सत्यजीत वैद्य**
**लेखिका**

"नमस्कार जेलर साहेब, आम्हाला बापूराव गावडे यांना भेटता येईल का? माझ्या बायकोला त्याला राखी बांधायची आहे. जरा वेळ भेटायची परवानगी मिळेल का साहेब?" सदाशिव आपली डोक्याची टोपी नीट करत म्हणाला.

"हो हो! भेटता येईल ना सदाशिवराव! बापूराव सकाळपासून तुमची दोघांची वाट पाहतो आहे. थोड्या वेळापूर्वीच तो मला विचारून गेला तुमच्याबद्दल!" जेलरसाहेब उत्तरले.


"एका कैद्याची मन:स्थिती कशी असते व स्वातंत्र्याविषयी त्याला किती अप्रूप वाटते, मनात त्याच्या किती घालमेल असते व पदरी पडलेल्या भयाण वास्तवाची अवस्था त्याच्या हृदयात किती सलत असते हे मला चांगले माहीत आहे साहेबा, म्हणून तर वेळात वेळ काढून आम्ही येतो बापूरावाला भेटायला!" सदाशिवने आपला भूतकाळ आठवत म्हटलं. तेवढ्यात जेलरनी धाडलेल्या निरोपानुसार बापूराव आले. जेलमध्ये राहून वयापेक्षा अधिक म्हातारे ते दिसत होते. एक प्रकारचा हताशपणा चेहऱ्यावर होता. मात्र सदाशिव व कुसुमताईला पाहून त्याच्या चेहऱ्यावर खूप मनापासून झालेला आनंद दिसत होता. कुसुमताई त्याची मानलेली बहीण. तिने त्याला राखी बांधली, गोड बर्फी खायला दिली. तसं दोन्ही हात जोडून तो हतबलपणे डोळ्यांत पाणी आणून म्हणाला, "अगं ताई, भाऊलोक आपल्या बहिणींना काय काय देतात पण मी तुला काय ग दिलं?" असं म्हणून तो हमसून हमसून रडायला लागला तशी कुसुमताई त्याला म्हणाली, "अरे बापूदादा, तू जे काही मला दिलं आहेस त्यासाठी तुझे अनंत उपकार आहेत. नाहीतर माझ्या जगण्याला काही अर्थ तरी होता का?" असं म्हणत असतानाच तिला तो दिवस आठवला जेव्हा तिला पाच वर्षांनंतर त्यांच्या आयुष्यात गोड बातमी कळली होती. सदाशिव कामावरून आला आणि तिने त्याला बाळ होणार असल्याचं सांगताच त्याने विठ्ठलाला नमस्कार करून त्याचे आभार मानले. 'नवस फेडायला यंदा वारीला येईनच भेटायला!' असं मनातल्या मनात त्याने आपल्या विठूरायाला म्हटलं!

तीन महिन्यांनी वारी निघणार होती तेव्हा कुसुमने काय काय बनवून दिलं होतं आपल्या लाडक्या रखुमाईसाठी आणि विठ्ठलासाठी!

ठरल्याप्रमाणे सदाशिव आपलं गाठोडं व काठी घेऊन निघाला. सदाशिव एक साधा, शांत व नम्र माणूस व त्याची पत्नी कुसुम ही एक आज्ञाधारक व सुस्वभावी अशी त्याची अर्धांगिनी होती. दोघांनाही नातेवाईक, आई-वडील हे नव्हतेच.

दोघेही अनाथ आश्रमात वाढले असल्याने त्यांना काटकसरीने राहणं, खडतर परिस्थितीचा सामना करणं चांगलंच माहीत होतं!

एका किराणा दुकानात काम करणारा सदाशिव वर्षातून एकदाच वारीला जाण्यासाठी सुट्टी घ्यायचा. त्याची विठ्ठलावर नितांत श्रद्धा होती. त्यांच्या खोलीच्या बाजूला एक विधवा आजी एकट्याच राहायच्या. त्यांना सदाशिव व कुसुम सर्वतोपरी मदत करायचे. वारीला निघताना सदाशिव त्या आजीच्या पाया पडला व कुसुमची अशा अवस्थेत तो येईस्तोवर काळजी घ्यायला सांगून निघाला. त्यांनीही त्याला काळजी न



करता दर्शन घेऊन यायला सांगितलं. आपल्याला मुलगा झाला तर त्याचं नाव 'विठ्ठल' ठेवायचं व मुलगी झाली तर 'रुक्मिणी' असं त्या दोघांचं एकमताने ठरलं होतं!

थोडक्यात काय तर 'आपण भलं व आपल काम भलं' असं चालणारं सुखी जोडपं होतं सदाशिव आणि कुसुम! कुसुमला सदाशिव वारीला गेल्यावर करमतच नव्हतं, पण वारीला तर जायलाच हवं ना!

असा विचार करून ती कशात कशात मन रमवू लागली. सदाशिव मजल दर मजल करत सगळ्या वारकऱ्यांबरोबर पांडुरंगाला आळवत निघाला होता. एका ठिकाणी वारकरी मुक्कामाला थांबले होते आणि सदाशिव लघवीसाठी म्हणून उठला आणि पाहतो तर काय? एका वारकऱ्याने त्याच्या पिशवीत ठेवलेली सोन्याची विठ्ठलाची मूर्ती एक चोर चोरत होता. त्या वारकऱ्याला त्याच्या गावातल्या शेठने ही सोन्याची विठ्ठलाची मूर्ती मंदिरात अर्पण करावयाची विनंती केली होती. सदाशिवने त्या चोराचा हात इतका घट्ट पकडला की त्याला काहीच हालचाल करायला जागा नव्हती. विठ्ठलाला चोरतोस? असं म्हणून सदाशिवने त्याला लांब ढकलला. त्या दिवशी तर तो चोर वाचला पण तेव्हापासून तो वारकऱ्यांच्या मागावरच होता. आळंदीहून प्रस्थान केल्यानंतर ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी सोहळ्यात सारे वारकरी तल्लीन झालेले असताना गर्दीचा गैरफायदा घेत अनेक चोर, पाकीटमार व बॅगा चोरणारे आपला मतलब साधून घेत होते. आत्ताच्या वारीमध्ये अशा गोष्टी घडू लागल्या होत्या. अशा चोरणाऱ्या लोकांची एक गँगच तिथे कार्यरत होती. बापूराव गावडे हा त्यातलाच एक होता. विठ्ठलाच्या सोन्याच्या मूर्तीवर त्याची भेदक नजर होती. त्याआधी त्याने दोन दिवसांपूर्वी केलेला प्रयत्न सदाशिवमुळे फसला होता. त्यामुळे यावेळी तो अधिक सावधगिरी बाळगत काम करत होता. त्याने मूर्ती तर चोरली, परंतु पोलिसांनी त्या दिवशी ती गँग पकडायचं ठरवलं होतं. त्यांनी प्रत्येकाचं चेकिंग करायला सुरुवात केली. आता मात्र बापूरावाचं धाबं दणाणलं!

काय करावं? या विचारात असतानाच त्याला तल्लीन होऊन भजन करत नाचणारा सदाशिव दिसला. त्याने झटकन त्याच्या झोळीत ती मूर्ती टाकली व पसार झाला. मात्र बेसावध असलेल्या सदाशिवला पोलिसांनी ताब्यात घेतलं.

किती किती विनवण्या त्याने पोलिसांना केल्या व समजावलं की त्याने हा गुन्हा केलेला नाहीये, पण कोणीच त्याचं काहीच ऐकत नव्हतं. त्याआधी दोन दिवसांपूर्वी ही घडलेली घटना सांगण्याचा तो आटोकाट प्रयत्न करत होता, पण म्हणूनच काहीच उपयोग होत नव्हता. सगळ्यांच्या दृष्टीने तो 'चोर' म्हणून पक्का बसलेला होता.

कोर्टात सदाशिव विरुद्ध केस सिद्ध झाली व त्याला सात वर्षांचा कारावास झाला तेव्हा सदाशिवचं जगच बदलून गेलं. निघालो कशासाठी, झालं काय व पुढे बायकोचं काय होणार असं सगळं ब्रह्मांड आठवून तो फक्त आणि फक्त रडत होता. विठ्ठलावरसुद्धा रागवला. पण काहीच करू शकत नव्हता. इतकी असहाय्य स्थिती त्याने जीवनात कधीही अनुभवलेली नव्हती.

इकडे बापूराव विजयी मुद्रेने घरी आला व आपल्या बायकोला, कसं त्याने स्मार्टली पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पलायन केलं, हे अगदी रंगवून रंगवून सांगू लागला. सदाशिवच्या झोळीत मूर्ती टाकल्याचं त्याने सांगितल्यावर, धार्मिक प्रवृत्तीच्या व वारकरी घरात जन्मलेल्या बायकोला हे सगळं खूप मनाला लागलं!

तिने बापूरावला समजावलं की हे असं केलं तर आपल्याला त्याचा कुठे ना कुठे त्रास होत असतो त्यामुळे तू आता हे सगळं सोडून दे. पण एकदा जेलची हवा खाऊन आलेल्या बापूरावाला इमानेइतबारे पैसे कमावण्यासाठी कोणीही काम देईना, त्यामुळे शेवटी तो चोरीलाच जवळ करून आपला उदरनिर्वाह भागवायला लागला. बायको नेहमीच त्याला असलं 'लेक्चर' देते म्हणून तो सरळ तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायला लागला.

बापूरावाच्या बायकोकडेही गोड बातमी होती. त्यामुळे त्याच्या डोक्यात आता पुढच्या महिन्यात जन्माला येणाऱ्या बाळाचं कसं स्वागत करायचं, तयारी काय करायची, पैशांची जमवाजमव कशी करायची हे सगळं आलं. माळावरचं गाठोडं काढून, बायकोचा डोळा चुकवून गुपचूप ते बघितलं. मागच्या आठवड्यात चोरलेले दोन लाख रुपये त्याने सांभाळून ठेवलं होते ते आपल्या बाळाच्या स्वागतासाठीच. दुसऱ्या दिवशी त्याने वारीत पकडलेल्या चोरांची खबरबात घेतली. त्यात त्याचे काही साथीदार जेलमध्ये गेल्याचं कळलं आणि सदाशिवला कसं आपण गंडवलं असं मनातल्या मनात म्हणत तो घरी आला. देवासमोर उभं राहून बायकोचं बाळंतपण सुखरूप होऊ दे म्हणून प्रार्थना करताना, उगीचच तो नजर चोरत होता. पांडुरंगापेक्षा मनातला 'चोर' त्याला पुन्हा पुन्हा अस्वस्थ करत होता.

असे तीन आठवडे गेले आणि एक दिवस त्याला बायकोला धावपळ करत हॉस्पिटलला न्यावं लागलं, कारण बायकोला खूप भयंकर कळा येत होत्या. घामाघूम होत तो तिला डॉक्टरकडे घेऊन गेला. तिची अवस्था गंभीर होती. देवाला प्रार्थना करत तो ऑपरेशन थिएटरच्या बाहेर उभा होता. थोडा

वेळ जाताच नर्सने त्याला बोलावलं व सांगितलं की काही कॉम्प्लिकेशन्स असल्याने आम्ही बाळाला वाचवू शकलो नाही व बायकोही शेवटच्या घटका मोजते आहे. बापूरावाच्या जिवाचा थरकाप झाला! धावतच जाऊन बायकोचा हात हातात घेतला. तेव्हा ती म्हणाली, ''आता माझ्या दोन घटकाच बाकी आहेत, पण मला वचन द्या की विनाकारण अडकवलेल्या त्या माणसाला सोडवून तुम्ही आपल्या गुन्ह्याचं प्रायश्चित्त कराल म्हणून! इथल्या गुन्ह्यातून सुटलात तरी तुम्हाला वरच्या न्यायालयातून (देवाच्या) नाही सुटता येणार तेव्हा आपला गुन्हा मान्य करा व साधं आयुष्य जगून तिथे या! मी तुमची तिथे वाट पाहत असेन!'' असं म्हणून तिने प्राण सोडला, बापूरावने टाहो फोडला. एवढी तयारी, स्वप्नं, योजना आखलेल्या क्षणात नाहीशा झाल्या. पदरी पडलं ते दुःख, नैराश्य व करुणा! एकदम दयनीय अवस्था झाली बापूरावाची! मग काही दिवसांतच बापूरावने आपला गुन्हा कबूल केला व सदाशिवला तो सन्मानाने सुटल्याचं समजलं तेव्हा त्याला फक्त हर्षवायूच होणं बाकी राहिलं कारण असं काही होईल असं त्याला स्वप्नातही वाटलं नाही! बापूरावाचं गुन्हा कबूल करण्याचं त्याला खूप आश्चर्य वाटलं!

सदाशिव आपल्या बायकोच्या काळजीने त्या दिवसांत झुरत होता व विठुराया त्याला न्याय देतो आहे असं त्या क्षणी त्याला वाटलं.

आपल्या काही दिवसांच्या सहवासात त्याने आपल्या अनेक गुन्हेगार मित्रांना भजन ऐकवून, वारीचे नृत्य शिकवून, ध्यानधारणेचं महत्त्व पटवून देऊन त्यांच्यापैकी अनेकांच्या मनावर फुंकर घातलेली होती. अगदी



जेलरसुद्धा त्याच्या सज्जनतेवर खूश होते. सदाशिव घरी आला तेव्हा त्याची बायको 'रुक्मिणीला' आपलं गाऱ्हाणं सांगत बाळाला (चार महिन्याच्या) झोपवत होती. सदाशिवला तिला सरप्राईज द्यायचं होतं म्हणून त्याने जेलर साहेबांना तिला काहीही निरोप पाठवायला सांगितलं नाही. दरवाजा वाजवला तेव्हा कुसुम दरवाजा उघडायला आली व तिचा थोडावेळ विश्वासच बसला नाही. प्रेमाच्या विरहामध्ये घायाळ झालेल्या त्या दोघांनी अश्रूंना वाट मोकळी करून दिली. आता त्यांच्या संसाराला विठुरायाने ताऊन सुलाखून आदराने मिळवून दिलेला विश्वास होता! भक्कम सामर्थ्य होतं.

डोळे भरून सदाशिवने आपल्या गोड बाळाला बघितलं. शेजारच्या आजींचे खूप आभार मानले एवढी बायकोची मदत केल्याबद्दल! दुसऱ्याच दिवशी कुसुम व सदाशिव बापूरावला जेलमध्ये भेटले व त्याचे शतशः आभार मानले.

बापूरावाची करुण कहाणी ऐकून दोघांचाही उर भरून आला आणि त्याच दिवसापासून बापूरावाला एक जिवापाड प्रेम करणारी बहीण व सदाशिवसारखा गुणी मित्र मिळाला.

सात वर्षं जेलमध्येच राखी पौर्णिमा साजरी झाली. मात्र आठव्या वर्षी आपल्या बहिणीच्या घरी त्याने गोडाधोडाच्या जेवणाने राखीपौर्णिमा साजरी केली. बहिष्कृत केलेल्या समाजातून आपल्याला माणुसकीचं स्थान मिळावं यासाठी सदाशिव व कुसुमने सर्वतोपरी मदत त्याला केली, मानव अधिकार व वंचितांचा विकास या माध्यमांच्या मदतीने बापूरावने सामाजिक स्वास्थ्य मिळवलं. आज स्वावलंबन, स्वाभिमान व स्वत्वाच्या बळावर बापूराव स्वतःचं फुलांचे गुच्छ बनवण्याचं दुकान चालवून एक संतुलित व समाधानाचं जीवन जगत आहे. यालाच म्हणतात ना खरी माणुसकी!

धन्यवाद!


लकी ऑटो तर्फे
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
मधील एकमेव अधिकृत डीलर
लकी ऑटो
ASHOK LEYLAND
9922909173
Mahindra
Rise.
7722093098
PIAGGIO
Ape
ELECTRIK
9143472472
हेड ऑफिस : पुणे-बेंगलोर हायवे, कोंडुसकर पेट्रोल पंपासमोर, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर

# प्ली बार्गेनिंग - प्रलंबित खटल्यातील बंदींसाठी एक संधी

**ॲड. डॉ. सुचित्रा घोगरे-काटकर**
कायद्याच्या अभ्यासक

**फौजदारी खटल्याच्या अनुषंगाने 'प्ली बार्गेनिंग'चा शब्दशः अर्थ 'विनंती सौदा' हा होय. याचिका किंवा विनंती यासाठी न्यायालयात 'प्ली' हा इंग्रजी शब्द वापरला जातो. तर 'बार्गेनिंग' म्हणजे सौदा करणे होय. 'प्ली बार्गेनिंग' म्हणजे अगदी सोप्या भाषेत सांगायचे म्हटले तर आरोप असलेला गुन्हा कबूल करून शिक्षेत तडजोड करण्याची विनंती करणे होय. यास 'सौदा याचिका' किंवा 'सौदा करण्याची विनंती' असेही म्हणतात.**

आजमितीस भारतातील विविध न्यायालयांमध्ये चार कोटींहून अधिक प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये तीन कोटींहून अधिक फौजदारी खटले आहेत. फौजदारी खटल्यांमध्ये न्यायालयीन यंत्रणेच्या जोडीला पोलिस, तुरुंग, आरोपी, पीडित असे अनेक घटक येतात. पोलिसांपुढे दररोज नव्याने दाखल होणारे गुन्हे याचबरोबर गुन्ह्याचा तपास याचा प्रचंड ताण आहे. तर क्षमतेपेक्षा जास्त कैदी हे तुरुंग व्यवस्थापनापुढील आव्हान आहे. याच वेगाने हे सर्व चालत राहिले तर एक दिवस सर्वच यंत्रणा कोसळतील.

लोक न्यायालय, मध्यस्थ, लवाद, समुपदेशन, तडजोड या माध्यमांतून दिवाणी दावे जलद गतीने निकाली काढण्यासाठी यशस्वीपणे प्रयत्न केले जात आहेत. पण ते पुरेसे नाही. फौजदारी खटल्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. बाल लैंगिक अत्याचारसारखे काही विशिष्ट खटल्यांमध्ये जलदगतीने निकाल लागतात. याव्यतिरिक्त लाखो खटले आणि लाखो कैदी वर्षानुवर्षे निकालाच्या प्रतीक्षेत आहेत.

प्रलंबित खटल्यातील लाखो न्यायालयीन कैदी तुरुंगात असल्याने फौजदारी खटल्यांचा ताण प्रत्यक्षपणे तुरुंग विभागावर आहे. राष्ट्रीय अपराध नोंद यंत्रणेच्या (NCRB) सन २०२१च्या अहवालानुसार भारतात एकूण १३१९ तुरुंग आहेत. यात ४,२५,६०९ कैदी ठेवण्याची क्षमता असून प्रत्यक्ष ५,५४,०३४ कैदी ठेवण्यात आले होते. यात शिक्षा झालेले - १,२२,८५२, अटक केलेले - ३४७० आणि इतर कैदी - ५४७ असून सर्वांत जास्त संख्या ४,२७,१५६ ही प्रलंबित खटल्यातील कैद्यांची आहे. याचाच अर्थ न्यायालयीन सुनावणीच्या प्रतीक्षेत लाखो कैदी वर्षानुवर्षे तुरुंगात अंधारात बंद आहेत. न्यायालयीन यंत्रणेवरील सध्याचा ताण पाहता हे न्यायालयीन बंदी अजून किती वर्षे तुरुंगात राहतील हे अनिश्चित आहे.

कमीत कमी पाच ते जास्तीत जास्त कितीही वर्षे तुरुंगात



राहिलेल्या आणि न्यायालयाच्या प्रदीर्घ लढाईनंतर निर्दोष सुटलेल्या अनेक घटना सातत्याने समोर येत असतात. कधी न्यायालयाने सुनावलेल्या शिक्षेपेक्षा कितीतरी अधिक कालावधी या कैद्यांनी तुरुंगात घालवलेला असतो. हा सर्व बाबींचा परिणाम म्हणजे केवळ लाखो कैदीच नव्हे तर कैद्यांचे कुटुंबीय आणि पीडित व त्यांचे कुटुंबीय वर्षानुवर्षे न्यायाच्या प्रतीक्षेत मानसिक दबावाखाली त्यांचे आयुष्य व्यतीत करत आहेत. न्यायास विलंब म्हणजे न्याय नाकारण्यासारखेच (Justice delayed is justice denied) हे कायद्यातील तत्त्व आपण प्रत्यक्षात अनुभवत असून वर्षानुवर्षे खटले चालून शेवटी आरोपीस शिक्षा वा सुटका असा काहीही निकाल लागला तरी शेवटी पीडितांच्या हाती काहीच लागत नाही. एकूणच चार कोटींहून अधिक प्रलंबित खटले, न्यायाच्या प्रतीक्षेत असलेली सामान्य जनता, आणि निकालाच्या प्रतीक्षेत कारागृहातील लाखो कच्चे कैदी हे भारतीय न्यायव्यवस्थेचे भयानक वास्तव आहे. यावर भाष्य करताना पाच वर्षांपूर्वी तात्कालीन सरन्यायाधीशांच्या डोळ्यांत पाणी आले होते. सरन्यायाधीशांची ही अगतिकता पाहता भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील आव्हानांचे गांभीर्य किती मोठे आहे हे आपल्या लक्षात येईल.

तुरुंग व्यवस्थापनेत सुधारणा करण्यासाठी अनेक आयोगांनी ब्रिटिश काळापासून वेळोवेळी अनेक सुधारणा सुचवल्या आहेत. काहींची अंमलबजावणी झाली आहे, काहींची नाही. तुरुंग व्यवस्थापनाव्यतिरिक्त काही सुधारणा या इतर व्यवस्थेला सुचवल्या आहेत. तुरुंगातील एक मुख्य समस्या म्हणजे प्रलंबित खटल्यातील कैद्यांची मोठी संख्या. ही एक समस्या कमी झाली तर इतर अनेक समस्या सोडविणे अधिक सोयीचे होईल.

म्हणूनच या समस्येवर एक उपाय म्हणजे 'प्ली बार्गेनिंग' पद्धती होय. 'बार्गेनिंग' हा शब्द सर्वांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. अगदी मंडईत भाजी खरेदी करण्यापासून प्रत्येक जण वेगेवेगळ्या व्यवहारांत बार्गेनिंग करत असतो. काहीतरी देण्याच्या बदल्यात काहीतरी घेणे. त्या देण्याघेण्यामध्ये पैसे वा इतर स्वरूप मोबदला कमीजास्त करून व्यवहार करणे असा सौदा सगळीकडे चालतो. दैनंदिन व्यवहारात चालणारा हा सौदा फौजदारी खटल्यांमध्ये वापरण्याची पद्धत अमेरिकेत शंभरहून अधिक वर्षांपासून वापरली जात असून त्यास 'प्ली बार्गेनिंग' असे म्हटले जाते. भारतात बऱ्याचदा दिवाणी दाव्यांमध्ये असा सौदा करून तडजोड केली जाते. पण फौजदारी खटल्यांमध्ये अजून ही पद्धत प्रचलित नाही.

फौजदारी खटल्याच्या अनुषंगाने 'प्ली बार्गेनिंग'चा शब्दशः अर्थ 'विनंती सौदा' हा होय. याचिका किंवा विनंती यासाठी न्यायालयात 'प्ली' हा इंग्रजी शब्द वापरला जातो. तर 'बार्गेनिंग' म्हणजे सौदा करणे होय. 'प्ली बार्गेनिंग' म्हणजे अगदी सोप्या भाषेत सांगायचे म्हटले तर आरोप असलेला गुन्हा कबूल करून शिक्षेत तडजोड करण्याची विनंती करणे होय. यास 'सौदा याचिका' किंवा 'सौदा करण्याची विनंती' असेही म्हणतात. शिक्षेत तडजोड, अपराधांच्या चार्जमध्ये तडजोड, आणि अपराधातील तथ्यात तडजोड या तीन प्रकारे प्ली बार्गेनिंगमध्ये तडजोड करता येते.

प्ली बार्गेनिंगचे प्रसिद्ध उदाहरण म्हणजे डेव्हिड हेडलीचा खटला: मुंबईतील २६/११ च्या प्रकरणानंतर अमेरिकेच्या पोलीस यंत्रणेने हेडलीला अटक केली. अतिरेकी कारवायांसाठीच्या अपराधासाठी अमेरिकेच्या न्यायालयात खटला दाखल केला. या खटल्यात हेडलीने प्ली बार्गेनिंग ही पद्धत स्वीकारली. हेडलीने सरकारी यंत्रणांना अतिरेकी कारवायांविषयी सर्व माहिती सांगायची, यासंबंधीच्या तपासात विश्वासपूर्ण सहकार्य करायचे, विविध कागदपत्रे, विविध पुरावे गोळा करण्यास मदत करायची आणि या बदल्यात सरकारकडून त्याला शिक्षेत सूट द्यायची अशी तडजोड झाली. त्याप्रमाणे मृत्यूदंडाच्या शिक्षेऐवजी हेडलीला ३५ वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली.

प्ली बार्गेनिंग पद्धत वापरल्याने तपासात गती आली, सरकारी यंत्रणांना संबधित गुन्ह्यातील पुरावे मिळाले. इतर अनेक अमेरिकी कारवायांची माहिती कळाली आणि हेडलीला मृत्यूदंडऐवजी तुरुंगवास. अमेरिकेत ९०% खटल्यांमध्ये ही पद्धत वापरली जाते. केवळ १०% खटले हे नियमित सुनावणीद्वारे निकाली काढले जातात. याचा परिणाम म्हणजे अमेरिकेत शिक्षा होण्याचे प्रमाण ९०% हून अधिक आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे यामुळे प्रलंबित प्रकरणांची समस्या तिथे भेडसावत नाही आणि अर्थातच प्रलंबित खटल्यातील कैदी अनावश्यक तुरुंगात खितपत पडत नाहीत.

भारतीय विधी आयोगाने अमेरिकेतील या पद्धतीचा अभ्यास करून तीस वर्षांपूर्वी १४२व्या अहवालात प्ली बार्गेनिंगचा फौजदारी खटल्यामध्ये अवलंब करण्याविषयी पहिल्यांदा शिफारस केली होती. भारतीय न्यायव्यवस्थेसमोरील प्रलंबित खटले आणि तुडुंब भरलेले तुरुंग या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी विधी आयोगाने वेळोवेळी विविध शिफारशी केल्या असून १४२ (१९९१), १५४ (१९७३) आणि १७७ (२००१) या अहवालांमध्ये 'प्ली बार्गेनिंग' चा समावेश करण्याची शिफारस केली आहे.

याशिवाय २००३ मध्ये माजी न्यायमूर्ती डॉ.व्ही.एस. मलीमाठ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या 'फौजदारी न्यायव्यवस्थेचे पुनरावलोकन समिती'ने केलेल्या विविध शिफारशींपैकी 'प्ली बार्गेनिंग' ही एक महत्त्वपूर्ण शिफारस होती. मलीमाठ समितीच्या शिफारशीनुसार संसदेने फौजदारी कायदे सुधारणा बिल, २००३ मध्ये प्ली बार्गेनिंगचा समावेश केला. त्यानुसार फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये सुधारणा करण्यात येऊन २००५ मध्ये 'प्ली बार्गेनिंग'चा समावेश करण्यात आला आहे.

या सुधारणेनुसार फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये 'प्रकरण २१-अ प्ली बार्गेनिंग' या नव्या प्रकरणाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रकरणात कलम २६५- ए ते २६५- एल अशा एकूण १२ कलमांमध्ये प्ली बार्गेनिंग पद्धतीसंबंधित तरतुदी देण्यात आल्या असून ५ जुलै २००६ पासून ही अमलात आली आहे.

फौजदारी खटल्यांमध्ये न्यायालयात चार्जशीट दाखल केल्यावर आरोपीला गुन्हा कबूल आहे का? असे विचारले जाते. त्याने गुन्हा कबूल केल्यास शिक्षा सुनावली जाते. तर नाकबूल केल्यावर पुढील सुनावणी होऊन खटला निकाली काढला जातो. या पारंपरिक पद्धतीव्यतिरिक्त 'प्ली बार्गेनिंग' मध्ये 'मी गुन्हा कबूल करतो पण मला देण्यात येणाऱ्या शिक्षेत तडजोड करायची आहे' असा अर्ज स्वइच्छेने आरोपीस न्यायालयात दाखल करता येतो. त्याप्रमाणे आरोपी, फिर्यादी आणि सरकारी पक्ष यांच्यात करार होऊन हा खटला निकाली काढला जातो.

आरोपीला शिक्षेत सूट, पीडित व्यक्तीला नुकसानभरपाई, तक्रारदाराला खर्च, तसेच त्या प्रकरणातील आवश्यक असणारे इतर मुद्दे नमूद करून सर्वांच्या सहीने हा करार न्यायालयात सादर केला जातो. सर्वांच्या संमतीने करार झाला आहे का? कोणावर काही दबाव / प्रलोभन नाही ना? याची खात्री करून न्यायाधीश अंतिम आदेश देतात. या पद्धतीत आरोपीला शिक्षा होते आणि पीडितांना नुकसानभरपाई मिळते. पीडित, सरकारी पक्ष, न्यायालय, आरोपी या सर्वांनाच याचा विविध प्रकारे फायदा होतो. मुख्य म्हणजे दीर्घकाळ चालणाऱ्या खटल्यांसाठी जो वेळ, पैसा, क्षमता मोठ्या प्रमाणात खर्ची पडतो त्याची प्ली बार्गेनिंग पद्धतीमध्ये बचत होते.

अमेरिकतील प्रचलित तरतुदीपेक्षा भारतातील तरतुदी थोड्या वेगळ्या आहेत. अमेरिकेत त्या त्या खटल्यातील तडजोडीवर शिक्षेचे प्रमाण ठरते. मात्र आपल्याकडे फौजदारी प्रक्रिया संहितामधील तरतुदीनुसार शिक्षेत तडजोड करताना काही मर्यादा घातल्या आहेत. त्या म्हणजे ज्या अपराधासाठी संबंधित कायद्यात कमीत कमी शिक्षा नमूद आहे त्या शिक्षेच्या अर्धी शिक्षा, तर ज्या अपराधात कमीत कमी शिक्षा नमूद नाही त्या अपराधात एक चतुर्थांश शिक्षा या दोन प्रकारे तडजोड करता येते. म्हणजे एखाद्या अपराधासाठी कमीत कमी ६ महिने ते ३ वर्षे अशी शिक्षा सांगितली असेल त्या अपराधात दीड वर्षे शिक्षा आणि एखाद्या अपराधामध्ये ३ वर्षांपर्यंत शिक्षा नमूद असेल तर त्यात ९ महिने शिक्षा तडजोड करता येईल, त्यापेक्षा कमी कालावधीची तडजोड करता येत नाही.

दुसरे म्हणजे अमेरिकेत सर्वच अपराधांमध्ये प्ली बार्गेनिंग लागू आहे. मात्र भारतात ७ वर्षांपर्यंत शिक्षा असलेल्या अपराधांमध्येच प्ली बार्गेनिंग करता येते. त्यातही देशाविरुद्ध, महिला व मुलांविरुद्ध अपराधांमध्ये प्ली बार्गेनिंग लागू नाही. तसेच सराईत गुन्हेगार व बाल न्याय अधिनियम २०१५ मधील बालक किंवा मुले यांना ही पद्धत लागू नाही. २००६ च्या सुधारणा होण्यापूर्वी प्ली बार्गेनिंग ही पद्धती अनेक प्रकरणांत वापरली गेली होती. पण कायदेशीर तरतुदींअभावी सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणांत प्ली बार्गेनिंग घटनाबाह्य व बेकायदेशीर ठरवली होती. मात्र फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये ही तरतूद आल्याने आता त्यास घटनात्मक वैधता मिळाली आहे.

भारतात प्ली बार्गेनिंग स्वीकारून आज तब्बल पंधरा वर्षे झाली आहेत. जलद गतीने खटले चालविणे, प्रलंबित खटल्यांचे प्रमाण कमी करणे, न्यायालयावरील कामाचा ताण कमी करणे, तुरुंगात प्रमाणापेक्षा जास्त असलेले कैद्यांचे प्रमाण कमी करणे या उद्देशाने ही सुधारणा करण्यात आली आहे. परंतु हे उद्देश एक टक्काही पूर्ण झाल्याचे दिसून येत नाही. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोने प्रसिद्ध केलेल्या अहवालांमध्ये प्ली बार्गेनिंग पद्धतीने खटले निकाली काढण्याचे प्रमाण देशभरात फारच कमी आहे आणि महाराष्ट्रात तर अगदीच अल्प आहे.

प्ली बार्गेनिंग ही संकल्पना यशस्वी न होण्यास जनजागृतीचा अभाव, यंत्रणांमध्ये अंमलबजावणीसाठीची अनास्था, निर्दोष मुक्ततेसाठी वाट्टेल ते करण्याची समाजाची मानसिकता, तपासातील त्रुटी इत्यादी कारणे आहेत. शिवाय प्ली बार्गेनिंगमध्ये तडजोड झाली तरी थोडी शिक्षा होत असल्याने आपल्याकडे ही पद्धत स्वीकारली जात नाही. अमेरिकेत पोलीस तपास जास्तीत जास्त निर्दोष असल्याने सबळ पुरावे असतात. त्यामुळे निर्दोष सुटण्याची शक्यता नसल्याने बहुतांशी खटल्यात आरोपी स्वतःहून प्ली बार्गेनिंग स्वीकारतात. भारतातील परिस्थिती अगदी याच्या विरुद्ध आहे. पोलीस तपासातील असंख्य त्रुटींचा फायदा मिळून 'पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता'

होत असेल तर आरोपी प्ली बार्गेनिंग का स्वीकारतील?

याचबरोबर गरीब आरोपींवर यासाठी जबरदस्ती केली जाईल, श्रीमंत लोक पैशाच्या जोरावर याचा गैरफायदा घेतील, कायदा व न्यायव्यवस्थेचा लोकांवर प्रभाव राहणारा नाही, आपल्या देशातील आर्थिक व सामाजिक परिस्थितीला ही पद्धत उपयुक्त व पूरक नाही, यासारख्या मुद्द्यांवर काही लोकांचा प्ली बार्गेनिंगला विरोध आहे.

मात्र प्ली बार्गेनिंग ही पद्धती न्यायव्यवस्थेबरोबरच कारागृह व्यवस्थेसाठीसुद्धा अत्यंत उपयुक्त आहे. या दृष्टिकोनातून याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण प्ली बार्गेनिंग पद्धती स्वीकारल्यास प्रलंबित खटल्यातील कैद्यांच्या समस्येला याचा निश्चितच फायदा होणार आहे. दुसरी गोष्ट म्हणजे तुरुंगात असलेल्या कैद्यांची वयानुसार वर्गवारी केली तर तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. सन २०२१ च्या अहवालानुसार ४३.६% कैदी १८ ते ३० वयोगटातील, ४३.३% ३० ते ५० वयोगटातील आणि १३.२% कैदी हे ५० पुढील वयाचे आहेत. या तरुणांच्या जीवनातील उमेदीची कित्येक वर्षे निकालाच्या प्रतीक्षेत जातात. निर्दोष सुटका होऊन आल्यावर त्यांच्या हाती काहीच लागत नाही. किमान या समस्यांकडे गांभीर्याने बघून प्ली बार्गेनिंग पद्धतीचा जास्तीत जास्त वापर ही काळाची गरज आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर केवळ न्यायालयीन यंत्रणाच नव्हे तर तुरुंग व्यवस्थापन, कैदी आणि पीडित या सर्वांसाठीच प्ली बार्गेनिंग ही एक चांगली पद्धत ठरू शकते. प्रत्येक पद्धतीला फायदे तोटे असतातच. परंतु काळाची गरज, अनेक समस्यांवरील एक उपाय म्हणून 'प्ली बार्गेनिंग'च्या सध्याच्या तरतुदींमध्ये सुधारणा करून, त्यातील त्रुटी दूर करत ही पद्धत स्वीकारणे व्यवहार्य आणि शहाणपणाचे ठरेल. अन्यथा भविष्यात 'न्याय' हा शब्द केवळ कागदावरच राहील. ना न्यायालयाच्या हाती काही लागेल, ना पीडितांच्या, ना कैद्याच्या आणि प्रलंबित खटल्यातील कैदी निकालाअभावी वर्षानुवर्षे तुरुंगात खितपत पडतील. लाखो तरुण कैद्यांच्या भवितव्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्ली बार्गेनिंगकडे समाज, सरकार आणि न्यायालयीन यंत्रणेने सकारात्मकतेने पाहायला हवे.

## मनुष्य जन्म हाच जणू गुन्हा

*गुन्हा काय ठाऊक नाही*
*शिक्षा मात्र नशिबी आहे*
*इथे या धरतीमायच्या कुशीत*
*जन्म घेतलाय माणसाने*
*की चार भिंतीच्या कुठल्याशा कोपऱ्यात*
*कुठल्या जातीत की धर्मात?*
*या विशाल ब्रह्मांडातून उतरलो आणि*
*धुळीचा कण कसं आणि कधी झालो*
*कळलेसुद्धा नाही*
*हजारों नियमांनी जखडल्या गेलोय*
*दास्याच्या बेड्यांनी वेढलोय*
*सवाल करतो तर गुन्हेगार ठरवतायत*

*जरा पाऊल पिंजऱ्याच्या बाहेर टाकलं*
*तर हजारों नजरा प्रश्न करतायत*
*भूख कायम उभी उंबरठ्यावर*
*गरिबीशी नातं जन्मोजन्मीचं*
*दिवस परीक्षेचे*
*अन् रात्री जीवघेण्या*
*वेळ वैरी, दुनिया अपरिचित अनोळखी*
*शब्दांचे भाले अन् नजरेचे बाण*
*घर म्हणावे की शस्त्रागार*
*हे जग जणू कैदखाना*
*त्याचा विस्तार अफाट*
*हे कारागृह सोबतच आणलंय*
*सोबतच घेऊन जायचंय*
*स्वातंत्र्य आता कदाचित आभाळातच....*



**- प्रशांत डोळे**
मुख्य प्रबंधक, विधी विभाग
सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पुणे

# गजाआडची शेती

**संजय फडतरे**
**से.नि. तंत्र अधिकारी (कारागृह शेती)**

**वास्तविक कारागृहात सुतारकाम, लोहारकाम, बेकरी, छपाईकाम, धोबीकाम, भटारखाना इत्यादी विभागांत बंद्यांना बरीच कामे उपलब्ध असतात. मात्र शेतीकामासाठी सर्वांची पसंती व आपसात चढाओढ पाहायला मिळते. मोकळ्या वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात अंग मोडून काम करण्यासाठी बंदीजन हिरिरीने तयार असतात. त्याचबरोबर शेतीकामासाठीच सर्वांत जास्त म्हणजे दिवसाला दिवस अशी शिक्षा सवलतही उपलब्ध आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागांतर्गत पोलीस व कारागृह हे गुन्हेगारी क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे विभाग आहेत हे आपण सारे जाणतोच.

कारागृह विभागाची शेती कशी केली जात असावी? असा सर्वसामान्यांना भेडसावणारा प्रश्न मलाही जून २०१३ मध्ये पडला होता. कारण तत्पूर्वी कारागृह विभागाशी माझा तसा काडीमात्र संबंध आलेला नव्हता. मात्र कृषी खात्यातून माझी कारागृह मुख्यालयात तंत्र अधिकारी (कारागृह शेती) या पदासाठी प्रतिनियुक्तीचे आदेश प्राप्त झाले होते. मुख्यालय स्तरावर सर्व कारागृह शेतीचे सनियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरावर तंत्र अधिकारी (कारागृह शेती) असे पद आहे. या पदावर रुजू झाल्यापासून ते जून २०१९ पर्यंतच्या माझ्या कार्यकाळात मी कारागृह शेती पद्धती जाणून तर घेतलीच, शिवाय शेती विकासासाठी कारागृह वरिष्ठ अधिकारी व संबंधित सहकारी यांच्या सहकार्याने मी योगदान देण्याचा प्रयत्नदेखील केला. अन् त्यात आम्ही यशस्वीही होऊ शकलो.

साधारणपणे बंद्यांना कारागृहात केवळ स्थानबद्ध करून ठेवत असावेत असा बऱ्याच लोकांचा समज असावा. मात्र याच समजास या विभागात छेद दिला जातो. कारण कारागृह विभागाच्या 'सुधारणा व पुनर्वसन' या ब्रीद वाक्यानुसार तेथे शिक्षाधीन बंद्यांना कौशल्य, आवड व कार्यक्षमता विचारात घेऊन त्यांना कारागृहाकडील विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जाते. यामध्ये प्रामुख्याने शेतीसोबत इतर विभागांतील उद्योगातही बंद्यांना रोजगार उपलब्ध करून दिला





जातो. यामुळे बंद्यांचे खऱ्या अर्थाने 'सुधारणा व पुनर्वसन' होण्यास मदत होते.

महाराष्ट्रात कारागृह विभाग हा अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा यांच्या नियंत्रणाखाली कामकाज करतो. त्यांचे अधिनस्त दक्षिण (मुंबई), पश्चिम (पुणे), मध्य (औरंगाबाद) व पूर्व (नागपूर) अशी विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालये कार्यरत आहेत. सदर विभागीय कार्यालयांच्या अधिपत्याखाली सद्यस्थितीत एकूण ६० कारागृहे असून त्यामध्ये मध्यवर्ती कारागृह, जिल्हा कारागृह, पुरुष व महिला खुले कारागृह व किशोर सुधारगृह आणि खुली वसाहत अशा प्रकारच्या कारागृहांचा समावेश होतो. सदर कारागृहांपैकी महाराष्ट्रात सध्या एकूण ३१ कारागृहात शेती क्षेत्र आहे. सदर शेती क्षेत्राचे व्यवस्थापन ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासन कृषी विभागाकडील एकूण १५ कारागृहांकरिता प्रतिनियुक्तीवर ९ कृषी पर्यवेक्षक तर १५ कृषी सहायक पदे मंजूर आहेत. तर उर्वरित १६ कारागृहांत संबंधित कारागृह अधीक्षक, तुरुंग अधिकारी, रक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील बंदीजन शेतीकाम करतात. तसेच मुख्यालय स्तरावर सर्व कारागृह शेतीचे सनियंत्रण व मार्गदर्शन करण्यासाठी राज्यस्तरावर तंत्र अधिकारी (कारागृह शेती) मार्फत केले जाते.



शेतीक्षेत्र असलेल्या ३१ कारागृहांत एकूण ८४७.३८ हेक्टर जमीन उपलब्ध आहे. त्यापैकी शेती उपयोगी क्षेत्र ३३०.८८ हेक्टर आहे. या क्षेत्रापैकी १८७.५२ हेक्टर क्षेत्र बागायती तर १४३.३६ हेक्टर जिरायती क्षेत्र आहे. तसेच वनीकरणाखाली १८२.६५ हेक्टर तर ८३.०६ हेक्टर पडीक क्षेत्र आहे. उर्वरित २५०.७९ हेक्टर क्षेत्रात कारागृह इमारत, कर्मचारी / अधिकारी निवासस्थाने, अंतर्गत रस्ते, मैदान इत्यादींचा समावेश आहे.

कारागृह शिक्षाधीन बंदीवानांकरवी दैनंदिन आहारासाठी लागणारा भाजीपाला, अन्नधान्य उत्पादित करून वापरला जातो. अतिरिक्त शेती उत्पादन नजीकच्या कारागृहास त्यांच्या मागणीनुसार पुरवठा केला जातो किंवा स्थानिक पातळीवर विक्रीदेखील करण्यात येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात विविध प्रकारच्या फळभाज्या, पालेभाज्या, भात, गहू, तूर, सोयाबीन व इतर पिकांचे उत्पादन घेण्यात येते.

कारागृहात शिक्षा कालावधीत ज्या बंदीवानांचे वर्तन चांगले आहे, त्यांची कारागृह समिती मार्फत शेतीकामासाठी निवड केली जाते. कारागृह विभागात शेतीसोबत उपलब्ध साधन सामग्रीचा वापर करत शेतीपूरक जोडधंदे घेण्यात येतात. यामुळे कारागृह बंदीवानांना शिक्षा समाप्तीनंतर स्वयंपूर्ण होण्यासाठी व जोडधंद्याविषयी त्यांना ज्ञान मिळून खऱ्या अर्थाने पुनर्वसन होण्यास निश्चित मदत होते. कारागृह विभागात महिला खुले कारागृहातदेखील शेती केली जाते. वैशिष्ट्य म्हणजे महिला बंद्यांच्या व्यवस्थापनासाठी तुरुंग अधिकारी ते रक्षक हे सर्व कर्मचारी जाणीवपूर्वक महिलाच असतात. पण त्यांच्या मार्फत केली जाणारी शेती ही पुरुषांची मक्तेदारी मोडणारी असते. कारण जमीन मशागतीपासून पीक तयार करण्यापर्यंत उत्कृष्ट नियोजनासह सर्व कामे महिलाच करतात.

**पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय :**

कारागृह विभागात २५९ गाई व वासरे तर ३३७ बैल व खोंड आणि इतर अशी एकूण १२४७ जनावरे साधारणत: २०१९सालाच्या सुमारास होती. शेतीच्या मशागतीची कामे, दूध उत्पादन व शेतीसाठी शेणखत, गांडूळखत तयार केले जाते. यामुळे सेंद्रिय शेतीपद्धतीचा अवलंबसुद्धा केला जातो.

**शेळीपालन :**

सन २०१४ पर्यंत केवळ स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाटी येथेच शेळीपालन सुरू होते. तत्कालीन परिस्थितीत आटपाडी येथे दुष्काळी परिस्थिती होती. त्यामुळे तेथील कळपातील प्रायोगिक तत्त्वावर केवळ १० शेळ्या व बोकड येरवडा कारागृहात संगोपनासाठी आणण्यात आले. वैशिष्ट्य



म्हणजे येरवडा खुले कारागृह येथे शेळीपालन यशस्वी ठरले. मग तेथूनच विसापूर, पैठण व इतर कारागृहांतदेखील टप्प्या-टप्प्यात शेळीपालन यशस्वीपणे सुरू झाले यामुळे बंदीजनांना नवीन शेतीपूरक जोडधंद्याबाबतचे ज्ञान व काम उपलब्ध झाले. कारागृहाकडे शेळीपालनासाठी मोकळ्या रानात चराई क्षेत्र असल्याने त्याचबरोबर बोकडांना उत्तम मागणी असल्याने हा शेतीपूरक व्यवसाय किफायतशीर ठरला. शिवाय बोकड विक्रीतून महसूलही मिळू लागला. सन २०१९ पर्यंत एकूण ३७४ शेळ्या व बोकडांचा कळप तयार झाला.

मत्स्यपालन : ठाणे, येरवडा, नागपूर, भंडारा कारागृह प्रक्षेत्रावरील नैसर्गिक तलावात मत्स्योत्पादन केले जाते. सन २०१९ मध्ये सेवाभावी संस्थेच्या मदतीने तलावातील गाळ काढून शेतजमिनीवर पसरण्यात आला यामुळे तलावाची पाणी क्षमता वाढली.

**आळंबी उत्पादन :**

येरवडा खुले कारागृहात 'महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ पुणे' अंतर्गत राष्ट्रीय फलोत्पादन अभियान योजनेतून १००% अनुदानावर (रु. २० लक्ष) 'आळंबी उत्पादन प्रकल्प' सन २०१५ मध्ये सुरू करण्यात आला.

शेती क्षेत्र जास्त असलेल्या काही कारागृहांत केवळ अन्नधान्य उत्पादन न घेता महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाच्या मार्फत भात-गहू-सोयाबीन पिकाचे बीजोत्पादन कार्यक्रमदेखील घेण्यात येऊन बियाणे उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमास हातभार लावण्यात आला.

**कुक्कुटपालन :**

येरवडा कारागृहात प्रथमतः अंडी उत्पादनासाठी कुक्कुटपालन करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी ठरताच मांसल कोंबडी उत्पादन सुरू करण्यात आले. याच धर्तीवर विसापूर खुले कारागृहातदेखील हा उपक्रम राबविण्यात आला.

**गुऱ्हाळ घर :**

पैठण खुले कारागृहात ऊस क्षेत्र जास्त असल्याने गूळ उत्पादनासाठी बंद्यांच्या मदतीने पहिले गुऱ्हाळ घर सुरू करण्यात आले. उत्पादित गुळाचा इतर कारागृहांना पुरवठा करण्यात आला.

**फळबाग लागवड :**

कारागृह क्षेत्रात आंबा २३०२, चिंच ४८७९, नारळ ६९१ संत्रा, मोसंबी, केळी (ऊती संवर्धन) या फळपिकांची लागवड करण्यात आलेली आहे. साधारणपणे प्रामुख्याने कारागृह आवारातील चिंच, आंबा, फळाची लिलाव पद्धतीने विक्री करण्यासाठी लिलाव प्रक्रिया कार्यपद्धती तयार करण्यात आली. फळ विक्रीतून कारागृह महसूल वाढीस हातभार लागतो. याशिवाय कारागृह प्रक्षेत्रावर वनीकरणाखाली सागवान ३८०७०, निलगिरी ३५५५ व इतर झाडांसह एकूण १,२७,०७८ वृक्ष संपदा जोपासली आहे.

**बायोगॅस :**

येरवडा मध्यवर्ती कारागृहासाठी पुणे महानगरपालिका यांच्या १००% अनुदानातून अंदाजे रु. ९० लक्ष रकमेचा प्रतिदिन १४० किलो बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला. या प्रकल्पात कारागृहातील ओला कचरा तसेच मनपाकडील ओला कचरा वापरून बायोगॅस निर्मिती करून प्रदूषण टाळण्यास हातभार लागतोच, शिवाय इंधन खर्चात बचत होते.





सेंद्रिय शेती पद्धतीच्या अंमलबजावणीसाठी दशपर्णी, जीवामृत, गांडूळ खत अर्क इत्यादी उत्पादन करून त्याचा क्षेत्रात वापर सुरू केला.

कारागृह शेती उत्पादनाचा जास्तीत जास्त वापर कारागृहात केल्याने कारागृह आहार खर्चात बचत होते. यासाठी उत्पादित शेतमालास महाराष्ट्रातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समितीचे कमाल व किमान दर विचारात घेऊन सरासरी दर निश्चित करण्यात आले.

कारागृह शेतीस आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून राज्य योजनेअंतर्गत कारागृह शेतीच्या आधुनिकीकरणासाठी ट्रॅक्टर, ट्रॅक्टर चलीत औजारे, वि. पंप इत्यादी उपलब्ध करून दिल्याने जमिनीची योग्य व वेळेत मशागत पूर्ण करणे शक्य झाले आहे. याचा शेती उत्पादन वाढीसाठी चांगला फायदा झाला.

कारागृह शेतीत कृषी विद्यापीठ, कृषी खाते व सेवाभावी संस्थांच्या समन्वयातून विविध योजनांची अंमलबजावणी केली जाते. काही कारागृहांत झाडू, खराटे, डालगे, गणेश मूर्ती इत्यादी तयार केले जातात. या सर्व बाबींमुळे बंदीजनांना काम उपलब्ध होते. नवनवीन व्यवसायाची माहिती होते त्याचबरोबर महसूल वाढीस मदत होते.

कृषी खात्यामार्फत कारागृह जमिनीचे मोफत माती परीक्षण करून 'जमीन आरोग्य पत्रिका' तयार करून शिफारशीप्रमाणे खत व्यवस्थापन केले जाते. तसेच कृषी विभागाच्या कीटकनाशके चाचणी प्रयोगशाळेत तपासणीसाठी आलेले वैध नमुने विनामूल्य प्राप्त करून कारागृह शेतीसाठी वापर केल्याने उत्पादन खर्चात बचत करता आली.

कारागृह शेती उत्पादन वाढीसाठी चुरस निर्माण व्हावी म्हणून सर्वाधिक शेती उत्पादन काढणाऱ्या कारागृहांची निवड केली जाते. शेती उत्पादनात विशेष योगदान देणाऱ्या कारागृहास व संबंधितांना बक्षीस, प्रशस्तीपत्र देण्यात येते.



शेती संबंधित सुधारित तंत्रज्ञानाची माहिती व प्रशिक्षण, अधिकारी व कर्मचारी वर्गास वेळोवेळी दिले जाते. यामुळे काही बंदीजनांना शेती क्षेत्राचे ज्ञान किंवा पार्श्वभूमी नसली तरी त्यांना माहिती उपलब्ध होते. कारागृह विभागात एकूण ८५१ पुरुष तर ३३ महिला बंदीवानांना कारागृह शेतीमध्ये काम उपलब्ध झाले. शेतीत काम केल्याने अकुशल बंदीवानास रु. ४८/-, अर्धकुशल बंदीवानांस रु. ६१/- तर कुशल बंदीवानास रु. ६७/- शासकीय दराने बंदी मजुरी देण्यात येते. स्वतंत्रपूर खुली वसाहत आटपाडी येथील बंदीजनांना रु. ८५/- बंदी मजुरी देण्यात येते.

गृह मंत्रालयाच्या मंजुरीनुसार कृषी विद्यापीठ, शासकीय कार्यालयात बंदी मजुरी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

वास्तविक कारागृहात सुतारकाम, लोहारकाम, बेकरी, छपाईकाम, धोबीकाम, भटारखाना इत्यादी विभागांत बंद्यांना बरीच कामे उपलब्ध असतात. मात्र शेतीकामासाठी सर्वांची पसंती व आपसात चढाओढ पाहायला मिळते. मोकळ्या वातावरणात, निसर्गाच्या सान्निध्यात अंग मोडून काम करण्यासाठी बंदीजन हिरिरीने तयार असतात. त्याचबरोबर शेती कामासाठीच सर्वांत जास्त म्हणजे दिवसाला दिवस अशी शिक्षा सवलतही उपलब्ध आहे.

**कारागृह शेती उत्पादन व खर्च (रु. कोटी)**

| वर्ष | उत्पादन | खर्च |
|---|---|---|
| २०१२-१३ | २.१७ | १.०७ |
| २०१३-१४ | २.५४ | १.१४ |
| २०१४-१५ | ३.३४ | १.६३ |
| २०१५-१६ | ३.६३ | १.६० |
| २०१६-१७ | ३.४८ | १.७३ |
| २०१७-१८ | ३.८६ | २.२७ |
| २०१८-१९ | ४.०९ | २.४४ |

कारागृहात शिक्षा भोगताना बंदीजन कामात व्यग्र असल्याने त्यांचे मन कामात व्यस्त राहते. ते ज्या कारणाने कारागृहात दाखल झाले त्याबाबत राग, लोभ, बदला किंवा सूड या त्यांच्या भावना नाहीशा होतात. त्यांचे मनपरिवर्तन होण्यास नैसर्गिकरीत्या मोलाचा हातभार लागतो. त्यांच्याकडून कारागृहात कोणतेही गैरवर्तन होत नाही. कारागृह विभागाचे सन २०१३ मध्ये असलेले रु. २.१७ कोटी उत्पादन सन २०१९ मध्ये रु. ४.०९ कोटीपर्यंत वाढ करण्यात आम्ही यशस्वी झालो. अशा प्रकारची ही नाविन्यपूर्ण 'गजाआडची शेती' हळूहळू विकसनशील शेतीकडे निश्चितच वाटचाल करीत राहील.

# समता फाउंडेशन - मुंबई


## नीना भेडसगांवकर

**सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका**


**शेवटी आपल्याच देशातील, राज्यातील, समाजातील व कुटुंबातील महत्त्वाचा घटक असलेले कैदी बांधव यांना खंबीरपणे माणुसकीचा, सहानुभूतीचा व मदतीचा हात दिल्यास समाज स्वास्थ्यासाठी त्याचा खूप प्रभावी, चांगला उपयोग होऊ शकतो व पर्यायाने कैदी बांधवांसाठी व समाजासाठी सामाजिक सेवेच्या माध्यमातून खारीचा वाटा उचलून त्यांची पुनर्वसनासाठी अमूल्य मदत होऊ शकते, याचे समाधान वाटले.**

सामाजिक जाणिवेने दारिद्र्य रेषेखालील गरजूंसाठी काम करणाऱ्या ज्या संस्था आपल्या समाजात कार्यरत आहेत त्यात 'समता फाउंडेशन – मुंबई' या श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या संस्थचे नाव काहीसे वेगळेपणाने घ्यावे लागेल.

कारण ग्रामीण-आदिवासी समुदायासाठी ही संस्था गेली ११ वर्षे सातत्याने आणि विपुल प्रमाणावर काम करते आहे. परंतु संपूर्ण महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील कारागृहातील 'बंदींसाठी' - त्यांचे आरोग्य, औषधे, नेत्रतपासण्या, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, शिक्षण, व्यवसाय-शिक्षण, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम असे बहुविध काम सातत्याने सुरू आहेत. आज आपण 'समता फाउंडेशन' आणि त्याचे संस्थापक अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्याबद्दल थोडेसे जाणून घेऊ या.

श्री. पुरुषोत्तम अग्रवाल आणि त्यांचे बंधू श्री. मधुसूदन अग्रवाल यांच्यावर लहानपणापासून त्यांच्या आईने समाजसेवेचे संस्कार केले होते. त्या आपल्या मुलांना सांगत की, ''फळांनी लगडलेले झाड जसे विनम्र होऊन खाली झुकते तसे माणसाने आर्थिक समृद्धी आल्यावर खाली झुकून वंचितांना मदत करणे, त्यांना तळातून वर येण्यासाठी हात देणे हेच खरे माणूसपणाचे लक्षण आहे. किंबहुना आपल्या आर्थिक समृद्धीचा हाच प्रमुख उद्देश प्रत्येकांनी मानला पाहिजे.''




अग्रवाल बंधूंच्या मनात समाजाप्रति आपल्या कर्तव्याची ही जाण लहानपणापासून रुजली होती. हळूहळू ही मुले मोठी झाली, कर्तबगार झाली. फार्मा कंपनी, अजंठा फार्मा या कंपन्या स्थापन करून आपल्या प्रामाणिक कष्टाने त्यांनी त्या खूप उंचीवर नेल्या. यशस्वी उद्योजक झाल्यावर २०१२ मध्ये श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांनी आपल्या स्वर्गवासी पत्नीच्या नावाने 'समता फाउंडेशन' या सामाजिक सेवाभावी संस्थेची स्थापना केली, तर त्यांचे बंधू मधुसूदन यांनीही सेवाभावी कामासाठीच्या दुसऱ्या एका संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. पण मघाशी म्हटले तसे आज मी पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या 'समता फाउंडेशन'ने उभे केलेले काम आपल्यापुढे ठेवणार आहे.

कोणतीही जात, पात, धर्म याच्या पलीकडे जाऊन सामाजिक समता व परिवर्तन या मूल्यांवर विश्वास ठेवून 'समताचे' काम सुरू झाले.

कारागृहातील बंदींसाठी त्यांनी सुरू केलेल्या या कामाविषयी सांगण्यापूर्वी त्यांच्या कामाची सुरुवात त्यांनी ग्रामीण, आदिवासी दुर्गम भागातील लोकांसाठी कशी केली आणि आजही मोठ्या प्रमाणावर हे काम जोडीने कसे सुरू आहे याविषयी थोडेसे प्रथम जाणून घेणे योग्य होईल.

महाराष्ट्रातील दुर्गम वस्तीतील भागांची पाहणी करून जिथे

अधिक निकड आहे अशा महाराष्ट्रातील व मध्य प्रदेशातील दुर्गम आदिवासी भागात त्यांच्या कामाची सुरुवात होऊन समर्पित भावाने काम करणारे सहकारीही त्यांना मिळाले.

या भागातील ग्रामीण आणि आदिवासी माणसांची जगण्यासाठीची कष्टमय आणि खडतर परिस्थिती जेव्हा त्यांनी पाहिली तेव्हा या समाजाला निरोगी, साक्षर आणि स्वावलंबी बनवण्यासाठी जणू त्यांनी कामाचा विडा उचलला.

सुरुवातीला आरोग्य प्रकल्पावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. अज्ञान आणि अनारोग्य यावर काम करताना त्यांच्या असे लक्षात आले की, या लोकांच्यामध्ये दृष्टिदोषाच्या तक्रारी खूप आहेत. दृष्टिदोषामुळे आपल्याला कमी दिसते हे त्यांच्या गावीही नव्हते. त्यामुळे सामान्य दृष्टिदोष आणि मोतीबिंदू विकारावर मग उपाय सुरू झाले. यासाठी उत्तम नेत्रतज्ज्ञांची 'टीम' तयार झाली. नेत्रतपासणी, डोळ्यांची औषधे आणि नंतर १० दिवसांत संबंधितांना योग्य नंबर्सचे चष्मे पुरवणे, ज्यांना मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेची गरज होती त्यांच्या शस्त्रक्रिया करणे अशी कामे विनाविलंब सुरू झाली. शस्त्रक्रियेसाठी 'समता'ने त्या त्या जिल्ह्यातील इस्पितळांसाठी बोलणी व करार केले.

आता समताच्या डॉक्टर्सची टीम नेहमीच वस्ती पाड्यांवर जाऊन एकूणच आरोग्य आणि डोळे यांची तपासणी करते. मोतीबिंदू शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णांना इस्पितळात नेणे, योग्य रीतीने शस्त्रक्रिया झाल्यावर त्यांना पुन्हा घरी सोडणे व नंतरचा सर्व पाठपुरावा व त्यासाठीचे चष्मे इत्यादी काम सातत्याने चालते.

फाउंडेशनच्या कामाची अशी माहिती घेत असताना मला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या एका लेखातले वाक्य आठवले, 'कोणतेही काम उभे करायचे असेल तर भान ठेवून योजना आखायच्या असतात आणि बेभान होऊन त्या राबवायच्या असतात!' समताचे काम पाहून याच वाक्याचा प्रत्यय आला, कारण लाभार्थींच्या हिताचा पूर्ण विचार करूनच समताच्या सर्व योजना आखल्या जातात आणि मग त्या काटेकोरपणे आणि सातत्याने पार पाडल्या जातात, डोळ्यांसाठीचे किंवा कुपोषित माता व बालके यांच्यासाठीचे सकस आहाराचे काम काय किंवा कुटुंबनियोजनाची माहिती-शिबिरे व शस्त्रक्रिया, समताचे सर्वच काम नियोजनबद्ध चालते. असे हे काम पाहून, चंद्रपूर जिल्ह्यात काम सुरू असताना एक महत्त्वाची घटना घडली. त्याची गोष्ट अशी –

चंद्रपूर येथील मध्यवर्ती कारागृहाच्या आरोग्य अधिकाऱ्यांना 'समता'च्या या सर्व आरोग्यासंबंधित यशस्वी उपक्रमांबद्दलची माहिती समजली आणि त्यांनी समताच्या




कार्यकारी अध्यक्षांना विचारले की, तुमचा हा सर्व ग्रामीण व आदिवासींसाठीचा उपक्रम तुम्ही आमच्या जेलच्या बंदींसाठी करू शकाल का? कारण बंदींना त्याची खूप गरज आहे...

हे ऐकल्यावर समताचे प्रतिनिधी गोंधळले, कारण जेल आणि कैदी यांच्याविषयी ऐकले की, कोणाच्याही मनात प्रथम भीतीची भावना येणार. कारागृह म्हटले की तिथे अट्टल गुन्हेगार असणार आणि त्यांच्यात काम करताना आपल्याला कदाचित काही धोका होऊ शकतो, अशी शंका मनात येणे साहजिक होते. पण कारागृहाच्या अधिकाऱ्यांनी जेव्हा फाउंडेशनच्या मंडळींना समजावून सांगितले की, तुम्हाला वाटते तसे जेलमध्ये सारेच अट्टल गुन्हेगार नसतात, किरकोळ गुन्हा किंवा त्या गुन्ह्याचा दंड गरिबीमुळे भरता न आल्यामुळेही ज्यांना 'जेल' होते असेही खूप लोक असतात. आणि गुन्हेगारही शेवटी मुळात माणसेच असतात.

कारागृह अधिकाऱ्यांचा हा प्रस्ताव जेव्हा प्रतिनिधींनी श्री. अग्रवाल यांना सांगितला तेव्हा त्यांना ही कल्पना खूप आवडली आणि विचार पटला!

आणि कारागृहातील बंदींसाठी 'समताचे' काम सुरू झाले. पूर्वीच्या अनुभवामुळे सुरुवात नेत्रतपासणी आणि मोतीबिंदू तपासणीपासून झाली. शेकडो बंदींच्या तपासण्या, त्यांना योग्य चष्मे व अनेकांच्या नेत्रशस्त्रक्रिया या शिस्तबद्ध आणि काळजीपूर्वक केलेल्या कामामुळे उपक्रम यशस्वी झाला.

बंदींची दृष्टी सुधारल्यामुळे परिणाम असा झाला की, त्यांना वाचता येऊ लागले. बंदींना वाचण्यासाठी निवडक पुस्तकांचा एक छोटा संग्रह प्रत्येक मध्यवर्ती कारागृहात असतो, तसेच अशा कारागृहात एक दूरचित्रवाणी संचही असतो. हे कारागृह 'सेंट्रल जेल'च असल्यामुळे या दोन्ही सोयी इथे होत्या. कारागृहात निवडक कार्यक्रम अथवा बातम्या दूरचित्रवाणीवर लावल्या जातात. त्या कार्यक्रमांचा आनंद आता त्यांना चांगल्या पद्धतीने घेता येऊ लागला. आणि एक विशेष गोष्ट अशी घडली




की, बंदींचा मोकळा वेळ कमी झाल्यामुळे त्यांच्यातील परस्पर तंटे कमी झाले. वाचणे आणि पाहणे यामुळे त्यांना एकमेकांशी बोलायला विषय मिळाले आणि कारागृहात एक सकारात्मक वातावरण तयार झाले.

या वेळी कारागृहातील अधिकाऱ्यांनी सांगितलेला अनुभव असा की, आजपर्यंत अनेक संस्था आमच्याकडे बंदींचे जेमतेम डोळे तपासून गेल्या पण योग्य नंबरचे शेकडो चष्मे शेकडो बंदींना प्रथमच मिळाले.

हे दोन्ही प्रकल्प यशस्वी झाल्यावर अग्रवाल यांनी कारागृहासाठी अन्य सेवेबद्दल विचारले असता कारागृह अधिकाऱ्यांनी आपली दुसरी समस्या त्यांना सांगितली. ती ही की बहुसंख्य 'बंदींना' त्वचारोगाचा त्रास होतो. त्याचे कारण कमी जागेत अधिक जणांना राहावे लागते. काही कैदी अनेक दिवस अंघोळ करत नाहीत, खेरीज परस्परांचे कपडेही ते वापरतात.

समताने मग या विषयाचा कॅम्प आयोजित केला. आणि बंदींना स्वच्छतेचे धडे देण्यास सुरुवात केली. त्वचाविकारावर योग्य उपचार, औषधे देऊन त्यांची जाणीव जागृती सुरूच ठेवली. आता पुढचे पाऊल होते महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन्सची गरज भागवणे. यासाठी प्रथम महिला डॉक्टरची नेमणूक करून या बाबतीतील स्वच्छतेची माहिती बंदी स्त्रियांना दिली, कारण हा उपक्रम सुरू होण्यापूर्वी या महिलांचे या बाबतीतील वास्तव फार भयानक होते. झाडाच्या पानापासून ते अस्वच्छ कपड्यापर्यंत अनारोग्यकारक वस्तूंचा वापर त्यांना करावा लागत होता. तो आता बंद झाला.

चंद्रपूरच्या कारागृहात हे तिन्ही उपक्रम यशस्वी झाल्यावर 'समताचे' प्रतिनिधी महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक श्री. भूषणकुमार उपाध्याय यांना भेटले. त्यांना या सर्व उपक्रमाचा वृत्तांत कळल्यावर अत्यंत आनंद झाला आणि त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील सर्वच कारागृहांचे काम करण्याची परवानगी त्यांना दिली.

पुरुषोत्तम अग्रवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा हुरूप वाढला, आणि त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील कारागृहांच्या गरजेची पाहणी करून आखणी केली. आज ४६ कारागृहांमध्ये अत्यंत शिस्तबद्ध रीतीने कामे सुरू आहेत. प्रत्येक कारागृहावर समताने उपक्रमांवर लक्ष ठेवण्यासाठी उत्तम क्षमता असलेला एक एक अधिकारी नेमला आहे. कुठे कामात चूक किंवा अडचण असेल तर त्याबद्दल समताचे ट्रस्टी श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्याकडे लगेच त्याचे वृत्त पोचते आणि अडचण दूर केली जाते.

आता त्यांच्या पुढच्या सर्व उपक्रमांवर एक धावती नजर टाकू या. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे किरकोळ गुन्ह्याचा दंड भरू न शकल्यामुळे कारागृहात अडकलेले शेकडो बंदी असतात, तर काही आपल्या मित्रांनी किंवा नातेवाइकांनी काढलेल्या कर्जाला जामीन राहिलेले असतात. कर्ज ज्याने काढले तो ते फेडू शकत नाही व जामीन म्हणून यालाही रक्कम भरता येत नाही. त्यामुळे मूळ कर्जदाराबरोबर हेही कारागृहात अडकतात.

समताचे कार्यकर्ते या सर्व बंदींच्या नावांची यादी करतात. पोलिसांकडून आणि तुरुंग अधिकाऱ्यांकडून त्यांची माहिती घेतात. त्यांच्या घरी भेट देतात. घरची परिस्थिती, माणसे पाहतात. सत्य जाणून घेतात आणि वकिलाच्या साहाय्याने त्यांची सर्व कागदपत्रे करून त्यांचा दंड भरून 'पुन्हा अशा प्रकारची चूक किंवा गुन्हा करणार नाही' असे लिहून घेऊन त्याला घरी आपल्या कुटुंबात पाठवतात. कारावासातले 'बंदी' ही मूळची 'माणसे' शिक्षा भोगून झाल्यावर पुन्हा 'माणसे' बनून समाजात कशी मिसळावीत आणि समाजानेही त्यांचा स्वीकार करावा यावर 'समताने' लक्ष केंद्रित केले आहे. समता फाउंडेशनचे एक अधिकारी श्री. दीपक लोहिया म्हणाले, "बंदींच्या मनावर चांगले संस्कार व्हावेत यासाठी आम्ही प्रयत्न करीत असतो. निरनिराळ्या ज्या खेळांची कारागृहात परवानगी मिळते असे खेळ त्यांच्यासाठी सुरू केले आहेत. मैदानी, बैठे, फुटबॉल,

व्हॉलिबॉल, कॅरम बोर्डस्, इत्यादीचे साहित्य सर्व कारागृहांत नियमितपणे देतो.

उपक्रमांचे सातत्य हे खरोखरच 'समता'चे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्रातल्या ४६ जेलमध्ये 'बंदींचा सांस्कृतिक विकास' व्हावा या दृष्टीने प्रत्येक ठिकाणी उत्तमोत्तम लेखकांची निवडक व चांगले विचार देणारी पुस्तके पुरवली जातात. आणि ती त्यांच्याकडून वाचून घेऊन त्यांच्या निबंधस्पर्धा आयोजित केल्या जातात. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी यानिमित्ताने ठेवलेल्या निबंधस्पर्धेत काही जण अतिशय उत्तम लिहितात.

शालेय शिक्षण व ज्यांना हवे त्यांना पुढचे शिक्षणही घेण्यासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाशी आम्ही जोडले गेलो आहोत. वाचकहो, हे वाचून वाटते की देव नक्की कोठे आहे? तो देवालयात किंवा देव्हाऱ्यात असण्यापेक्षा सेवाभावी माणसांच्या मनात आहे, हे नक्की! नुकत्याच येऊन गेलेल्या कोविड १९च्या काळात आपण सगळ्यांनीच हा अनुभव घेतला. कोविड १९मध्ये समता फाउंडेशनने कारागृहात आणि बाहेरही मोठ्या प्रमाणात लसीकरण मोहीम राबवली. श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांचे एक अत्यंत जवळचे सहकारी श्री. दीपक लोहिया माहिती देताना म्हणाले की, ''सुरुवातीला कारागृहातील गंभीर गुन्हेगारांना (खून, दरोडा) आम्ही घाबरत होतो.'' पण आता त्यांना त्यांची भीती वाटत नाही. कारण त्यांच्या या सर्व उपक्रमांमुळे 'बंदीं'च्यात इतका बदल झाला आहे की, सुरुवातीला भेटलेला हाच तो माणूस का अशी शंका यावी! त्यांचे हसणे, बोलणे नॉर्मल झालेले असते. त्यांना घरच्यांची आठवण येऊन, त्यांच्या बाबतीत आपले काय कर्तव्य आहे हे जाणवू लागलेले असते. कधीकधी तर ते रडतात आणि पश्चात्ताप व्यक्त करतात. त्यांच्यातले परिवर्तन पाहून त्यांच्यासाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनाही एक आगळेच, शब्दांत व्यक्त न करता येणारे समाधान वाटते! 'गुन्हेगार प्रेमाने आणि विश्वासाने बदलू शकतात. वाचकांनाही इथे कविवर्य ग. दि. माडगूळकरांच्या 'दो आँखें बारह हाथ' या सत्यघटनेवर आधारित चित्रपट कथेची आठवण होईल.

कधीकधी मात्र काही बंदी पश्चात्तापाने नैराश्यग्रस्त होतात. अशा वेळी काउंन्सिलरकडून त्यांना निराशेतून बाहेर येण्यास मदत केली जाते. नाशिकच्या कारागृहातील एक अनुभव कार्यकर्त्यांनी सांगितला तो मोठा उत्साहवर्धक आहे. नाशिक कारागृहातील एक बंदी मूर्ती फारच छान बनवत असे. एकदा त्याने एक एकलव्याची सुंदर मूर्ती बनवली. (कारण त्याला महाभारतातील सर्व गोष्टी माहीत होत्या.) 'समता'च्या अधिकाऱ्यांनी ती मूर्ती ५००/- रु. देऊन विकत घेतली आणि




सांगितले की, 'तुझी शिक्षेची मुदत संपत आली आहे तू बाहेर पडल्यावर अशा मूर्ती बनव. यासाठी लागणारा कच्चा माल आम्ही पुरवू व तुझ्या मूर्ती 'गिफ्ट' देण्यासाठी विकत घेऊ, पण तू बाहेर पडल्यावर पुन्हा वाममार्गाने जायचे नाही.'

याच धर्तीवर तुरुंगात अजून ज्यांची बरीच शिक्षा राहिली आहे, त्यांना शिवणासारखे किंवा इतरही कामे आम्ही देतो. शिलाई मशिन तिथेच देतो. शिवणकाम येणाऱ्या अशा बंदी स्त्रीपुरुषांकडून आम्ही कपडे शिवून घेतो व 'दैनिक रोजा'प्रमाणे त्यांना पैसे देतो. ते त्यांच्या खात्यावर जमा होतात. हे पैसे ते त्यांच्या लहान मुलांसाठी पाठवू शकतात! नाशिकच्या जेलमध्ये हा प्रयोग खूप यशस्वी झाला! कारागृहातून बाहेर पडल्यावर पोट भरण्यासाठी काहीतरी व्यवसाय करणे बंदींना आवश्यक आहे. कदाचित काही बंदींना घरची माणसे स्वीकारतही नाहीत. त्यामुळे जेलमध्येच बंदींसाठी सर्व प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण सुरू करणे हे ध्येय सध्या 'समताच्या' अधिकाऱ्यांनी मनात ठेवले आहे आणि त्याप्रमाणे त्यांची तयारी सुरू आहे. या व्यावसायिक प्रशिक्षणात मग सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम इत्यादी सर्व प्रकारच्या कामाचे प्रशिक्षण आले. थोड्या शिकलेल्या 'बंदींसाठी' संगणक शिक्षण, ड्रेस डिझाईनिंग असेही कोर्सेस सुरू करण्याची तयारी सुरू आहे, शालेय व महाविद्यालयीन शिक्षण तर आहेच. पूर्वी म्हटल्याप्रमाणे या सर्व विषयांतील प्रशिक्षणासाठी 'यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची' त्यांना खूपच मदत होणार आहे.

श्री. दीपक लोहिया यांना जेव्हा विचारले की, सर्वसामान्य माणसांपैकी सेवावृत्ती असणाऱ्यांनी जर तुम्हाला मदत करायची इच्छा व्यक्त केली तुम्ही काय सांगाल? यावर ते म्हणाले, 'आम्हाला पैशांची मदत नको, कारण आमचा सगळा खर्च ट्रस्टचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांच्या 'फॅमिली फंड'मधून होतो. शिवाय काही वेळा शासकीय पातळीवरच्या

कामाला आम्ही जोडून काम करतो. पण प्रत्यक्ष कामे करताना जिथे जिथे आम्हाला मनुष्यबळ कमी पडते त्या त्या ठिकाणी गरजेप्रमाणे तुम्ही आम्हाला मदत करू शकता. साधं सांगायचं तर गावोगावच्या गृहिणींनी बंदी स्त्रियांना रांगोळी, मेंदी, गाणं अशा आपल्याला येणाऱ्या कला शिकवल्या, त्यांच्याशी गप्पा मारल्या तरी ते बंदीनींना स्फूर्तिदायक होते. तसेच तरुणांनी पुरुषांना चित्रकला, खेळ अशा गोष्टी शिकवाव्यात. बाहेरच्यांना कारागृहात प्रवेश नसला तरी आमच्यासारख्या संस्थांच्या माध्यमातून तो मिळतो.'

खरे तर ग्रामीण आदिवासी भागातील 'समता फाउंडेशन'च्या कामाची आकडेवारी खूपच मोठी आहे. पण गेल्या ११ वर्षांतील कारागृहातल्या कामावर नजर टाकायची तर आतापर्यंत –

४ लाख ८१ हजार ३३६ मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया.

२७ हजार ३४२ कारागृहातील नेत्रशिबिरांचे लाभार्थी.

१६ हजार ७३६ शिक्षण मिळालेले बंदी.

१२४८ बंदींचा दंड भरून त्यांची कायदेशीर सुटका.

ही यादीही खूप मोठी आहे. आणि बाहेरच्या मोकळ्या जगातल्या कामापेक्षा कारागृहात काम करणे म्हणजे डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवून कौशल्याने काम करणे आहे.

समता फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम अग्रवाल यांना आतापर्यंत त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत, भारताच्या उपराष्ट्रपतींच्या हस्तेही त्यांचा सन्मान झाला आहे.

श्री. अग्रवाल हे नि:स्वार्थी सेवेतून मानवतेच्या हितासाठी, समाजातील सर्व घटकांना समान स्तरावर एकत्रित आणण्याचे स्वप्न बाळगणारे समाजसुधारक आहेत असेच म्हणावे लागेल.

समाजातल्या सर्वांत तळातल्या माणसाचे आयुष्य किती खडतर आहे हे त्यांना व त्यांच्या समर्पित सहकाऱ्यांना समजते आणि डाचते यांतच समता फाउंडेशनच्या यशाचे रहस्य आहे, असे मला वाटते! शेवटी त्यांच्यासारखे समाजसेवक आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे काम बघून सोलापूरच्या एका कवीच्या एका सुप्रसिद्ध कवितेतल्या शेवटच्या चार ओळी सांगाव्याशा वाटतात.

*आभाळाएवढी ज्यांची उंची*
*त्यांनी थोडे खाली यावे*
*ज्यांचे जन्म मातीत मळले*
*त्यांना उचलून वर घ्यावे!*


**CENTRAL BANK DEPRESSED CLASS EMPLOYEES WELFARE ORGANIZATION MUMBAI MAJORITY (REGD.)**

**[ Affiliated to All India Central Bank SC/ST/OBC Employees' Federation, New Delhi & Replucan Employees' Federation - Mumbai ]**


**With Warm Greetings and Best Wishes on the Occasion of Publication of Diwali Issue On Movement of Positivity by Dnyaneshwar Mulay Foundation**

We wish to express gratitude towards 'Movement of Positivity', an initiative taken by Respected Dr. Dnyaneshwar Mulay and congratulate Dr. Dnyaneshwar Mulay Foundation for publishing a Dipawali Special Issue 2022 which is dedicated to 'Jails & prisoners Life'. We hope that this genuine subject will be an eye opening to all of us which will help us to understand the genuine problems and feelings of the prisoners and importance of our support for the upliftment of them.

We once again congratulate the entire team of the Movement of Positivity. We hope that the Festival of Light (Dipawali) will bring Light in the life of all prisoners & again they will positively fly in the sky freely and will be able to sketch new pictures on big Canvas.

*With Best Wishes & Regards.*


Happy Diwali


**Sudhir Surwade**
Chief Advisor


**Sanjay Jadhav**
Chairman


**Mahendra Ramteke**
President


**Rajendra Dange**
General Secretary


**Ajit Kamble**
Treasurer

Happy Diwali



Regd. No.: MSCS/CR/1282/2018 Dt. 27-03-2018 | Licence No.: UBD/MAH/1270P/09-08-1996
SANMATI SAHAKARI BANK LTD.
सन्मती सहकारी बँक लि; इचलकरंजी
(मल्टिस्टेट को-ऑप. बँक)
25th Silver Jubilee Year
अर्थप्रवास २५ वर्षांचा
तुमच्या व आमच्या सहवासाचा
७०० कोटी व्यवसायाकडे यशस्वी वाटचाल
सोने तारण कर्ज
९.५०% व्याजदर
तुमच्या सोन्याचं मोल आम्ही जाणतो
वाहन कर्ज
नवीन दुचाकी व चार चाकी
वाहन खरेदीसाठी
सर्व हप्ते नियमीत भरणाऱ्या ग्राहकास व्याज दरात
१% सुट मिळेल
११.0% व्याजदर
सुसाट होऊद्या जीवनाची गती करुया मनाची स्वप्नपूर्ती
बँकेचे प्रधान कार्यालय व शाखा
मुख्य शाखा, इचलकरंजी - ९११६०६३९६८
अब्दुल लाट शाखा - ९९२१३१२६२५
शहर शाखा, इचलकरंजी - ८८०५०२९७८४
रुई शाखा - ९८६०४४६५१२
शिरटी शाखा - ९०२८४६५५९१
खोतवाडी शाखा - ८८०५०२९७७८
वर्धमान चौक, इचलकरंजी - ८६६८२८८६९७
कोल्हापूर शाखा - ९६२३२४०६४४
सांगली शाखा - ८८०५०२९७८३
आळते शाखा - ९५१८५८६७८४
तळंदगे शाखा - ९६६५७१७०९५
हणगल शाखा (कर्नाटक राज्य) - ९९०११२३५४४

# कैद्यांमधला माणूस

**शिवानी सप्रे**
समुपदेशक

एखाद्या बेकायदेशीर कृतीला गुन्हा अशी संज्ञा देता येईल. गुन्हा सिद्ध झाला की शिक्षाही अपरिहार्यच. अर्थात कायदेशीररीत्या एखाद्या व्यक्तीवर गुन्हेगारीचा शिक्का बसला की अशा व्यक्तींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन संपूर्णतः बदलून जातो. अशा लोकांचा क्वचितच पुन्हा माणूस म्हणून समाज स्वीकार करतो. एक प्रकारे त्यांना सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागतो. केलेल्या गुन्ह्यासाठी बरेचवेळा कारावासही भोगायची वेळ येते. तुरुंगात ह्या गुन्हेगारांना कैद्यांचं जिणं जगावं लागतं आणि त्यांच्याकडे 'असामाजिक घटक', 'गुन्हेगार' म्हणूनच नेहमी पाहिलं जातं. गुन्हेगार जरी असला तरी तो प्रथम माणूस आहे आणि गुन्हा हा त्याच्या जीवनातला एक भाग आहे याचा समाजाला विसर पडतो. पण मुळात 'काही व्यक्ती गुन्हेगारीकडे का वळतात?' या प्रश्नाचं खरं उत्तर आपल्या समाजातच आहे. एमिल दारखिम (Emile Durkheime) या फ्रेंच तत्त्ववेत्त्याने सांगितलं की कोणतीही असामान्य वागणूक ही समाजाची उत्पत्ती आहे.

अलीकडेच जेव्हा मला एका प्रकल्पाअंतर्गत कैद्यांबरोबर काम करण्यासाठी विचारणा झाली तेव्हा मी प्रथम नकार द्यायचंच निश्चित केलं होतं. कैदी, गुन्हेगार यांच्याविषयी समाज मनात अशा काही संकल्पना आहेत की हे स्वाभाविकच होतं. आपले कुटुंबीय, मित्र आणि अन्य घटक कळत-नकळत आपल्या मनात त्याच संकल्पना रुजवत असतात आणि त्यांचा आपल्यावर खोल परिणाम होत असतो. यामुळेच माझी पहिली प्रतिक्रिया नकारात्मक झाली. मात्र थोडा विचार केल्यानंतर माझ्या मनात प्रश्न उमटला की गुन्हेगार, कैद्यांबरोबर कुणी काम करत नाहीत की काय? थोडा विचार करता लक्षात आलं की पोलीस, तुरुंग कर्मचारी, डॉक्टर्स, वकील अशा कितीतरी मंडळींचा कैद्यांशी सतत संपर्क होत असतो. मग मी मनात पक्कं केलं की कुठलाही पूर्वग्रह बाळगायचा नाही आणि स्वानुभव घ्यायचा. नंतरचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे घरच्यांची अनुमती



मिळवणं हा होता. अट्टल गुन्हेगारांसाठी असलेल्या मुंबईतल्या आर्थर रोड जेलमध्ये माझं पुरुष वॉर्डात पोस्टिंग होणार होतं. कुख्यात दहशतवादी कसाबला याच तुरुंगात अंडा सेलमध्ये ठेवलं होतं हे आपणा सर्वांना माहीतच आहे. थोडं धैर्य एकवटून माझ्या मनातला विचार आईवडिलांना सांगितला. अनपेक्षितपणे त्यांनी तो तत्काळ उचलून धरला. पुस्तकाबाहेरचं बरंच काही यातून शिकायला मिळेल अशी स्वागतार्ह भूमिका त्यांनी घेतली. ही गोष्ट माझ्यासाठी फारच उत्साहवर्धक ठरली. मी विनाविलंब प्रकल्प संचालकांना माझा होकार कळवला. ''जरी उद्धरणी व्यय न तिचा हो साचा, हा व्यर्थ भार विद्येचा'' ह्या विचाराचा संस्कार मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी होताच. आपल्याही शिक्षण, प्रशिक्षणाचा समाजाला थोडाफार तरी उपयोग व्हावा असं मनात होतंच. प्रकल्प धर्मार्थ असल्यानं अर्थप्राप्तीचा अर्थातच काही संबंध नव्हता. समाजऋणाची थोडीफार उतराई व्हावी हीच भावना माझीही होती.

प्रत्यक्ष काम सुरू करण्याचा दिवस उजाडला. आयुष्यात प्रथमच मी जेलमध्ये जाणार होते. तेही अट्टल गुन्हेगारांसाठी असलेल्या मुंबईतल्या आर्थर रोड जेलमध्ये. मी काहीशी नर्व्हस होते कारण समाजातल्या विविध घटकांबरोबर संवाद हा जरी माझ्या अंगवळणी पडलेला असला, किंबहुना माझ्या रुचीचा विषय असला, तरी इथे संवाद साधायचा होता तो समाजाने बहिष्कृत केलेल्या, न्यायपालिकेने दंडित केलेल्या अट्टल गुन्हेगारांबरोबर आणि हे मी प्रथमच करू जाणार होते. प्रामाणिकपणे सांगायचं तर, आर्थर रोड जेल आणि तेथील गुन्हेगार यांच्याविषयी आपणा सर्वांनाच माध्यमांतून जे काही ऐकायला, वाचायला मिळत असतं त्यावरून तिथलं वातावरण निश्चितच संवाद पूरक नसणार अशी माझी अटकळ होती.

कारागृहाच्या परिसरात प्रवेश केला तेव्हा तिथे लागलेली लांबच लांब रांग पाहून मनाला काहीशी विषण्णता आली.

सूर्य माथ्यावर होता. ऊन खूप कडक होतं. सर्व लोक खूप वेळ रांगेत उभे असल्याचं स्पष्टपणे जाणवत होतं. हे लोक कोण आहेत आणि रांगेत का उभे आहेत, याची चौकशी केली तेव्हा एका पोलीस कर्मचाऱ्याने शांतपणे उत्तर दिलं की ते कैद्यांचे नातेवाईक आहेत आणि त्यांच्या भेटीसाठी त्यांनी रांगा लावल्या आहेत. उत्सुकता आणि काळजी यांचा मिलाफ रांगेतील प्रत्येक चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. दुसऱ्या गेटपाशी गेलो, तिथे बरेच पोलीस आणि सुरक्षा कर्मचारी होते. एका मोठ्या दरवाज्याबाहेर आम्ही उभे होतो. कधीही न पाहिलेल्या एका वेगळ्याच जगात आपण प्रवेश करणार आहोत हे सतत जाणवत होतं. दरवाज्याच्या आत राहणारी लोकं समाजात कशा प्रकारे ओळखली जातात आणि एकाकीपणानी त्यांचं आयुष्य कसं व्यापून जातं याची जाणीव होऊ लागली. एक मोठी भिंत आणि एक मोठा लोखंडी दरवाजा, जो आतून बंद होता. दरवाज्यातून आत जाण्यासाठी कडक सुरक्षा आणि ओळखपत्र पडताळली जात होती. त्यातून प्रवेश केल्यावर पुन्हा मोठ्या भिंती, गेट आणि मोठी सुरक्षा व्यवस्था तैनात होती. मोबाइलसह सर्व सामान बाहेर ठेवण्यास सांगण्यात आलं. आम्हाला योग्य ती सुरक्षा प्रदान करण्यात आली होती. त्यात दोन पुरुष पोलीस आणि एक महिला पोलीस शिपाई देण्यात आले होते जे जेलमध्ये सतत आमच्यासोबत होते. आम्ही समुपदेशनासाठी नेमलेल्या ठिकाणी पोहोचलो तेव्हा माझ्यासह सर्व टीम सदस्यांच्या मनात अजूनही एक प्रकारची अस्वस्थता जाणवत होती. अखेरीस आमच्यातील एकाने आपण आधीच थोडं नर्व्हस होतो आणि आता प्रत्यक्षात जेलमध्ये दाखल झाल्यानंतर नर्व्हसनेस अधिकच वाढला असल्याची कबूली दिली. त्याच्या ह्या भावनेशी सर्वांनी लगेचच सहमती दर्शवली.

मी जेव्हा पहिलं सत्र सुरू केलं, तेव्हा काय ऐकायला मिळेल याची मला पुसटशीही कल्पना नव्हती आणि क्लायंटला समजून घेण्याच्या माझ्या क्षमतेवर मनात एक प्रकारचं प्रश्नचिन्ह होतं. अजय (नाव बदललं) ह्या माझ्या पहिल्या क्लायंटवर कलम ३०२ अन्वये खटला सुरू होता. गुन्हा अद्याप सिद्ध व्हायचा होता. खटला सुरू असल्याने तो दोन महिन्यांहून अधिक काळ तुरुंगात होता. प्रत्येक दिवस त्याच्यासाठी किती कठीण जातो आहे हे त्याने सांगितलं. गुन्हा दाखल होण्यापूर्वी तो दिवसभर काम करायचा. कुटुंबातला तो एकमेव कमावता होता. त्याने सांगितलं की त्याचा गुन्ह्याशी काहीही संबंध नाही. तो फक्त गुन्हा घडला त्या ठिकाणी उपस्थित होता आणि म्हणून तो संशयित होता. तो त्याचं निर्दोषत्व जोरकसपणे मांडत होता. अशा प्रकारची कहाणी असलेले काही अन्य कैदीही त्या ठिकाणी हजर होते. त्यापैकी बहुतेकांमध्ये अँग्झायटीची लक्षणं आढळून आली. बहुतेक जण निम्न सामाजिक-आर्थिक स्तरातले होते. भाषिक दृष्ट्याही ते प्रगल्भ नव्हते आणि कायदाव्यवस्था आणि प्रक्रियेबद्दल त्यांना फारसं ज्ञान नव्हतं. त्यापैकी काही चाळीत राहत होते. ते गटबाजी आणि गट संघर्षाचे शिकार होते. शत्रुत्वाच्या आहारी जाऊन ते गुन्हेगारी कृत्य करण्यास प्रवृत्त झाल्याचा आरोप त्यांच्यावर होता. आणि अन्य जणांवर घटनास्थळी उपस्थित असल्याने संशयाची सुई फिरत होती. संभाषणादरम्यान त्यांनी सांगितलं की त्यांना बॅरेक्समध्ये ठेवण्यात आलं आहे. प्रत्येक छोट्या बराकीत ५ ते ६ आरोपी राहतात. लहान जागा, तणावपूर्ण स्थिती आणि बराच मोकळा

वेळ यामुळे तुरुंगात लहानसहान गोष्टींवरून भांडण तंटे होत राहतात. अगदी माझी चप्पल अन्य कोणी का घातली, एकमेकांच्या कपड्यांचा वापर, ह्यासारखी क्षुल्लक कारणंही हाणामारीपर्यंत जायला पुरेशी होती. वर्तणुकीच्या कारणावरून आपल्याला वेगळ्या बराकीत हलवण्यात आल्याची अजयची तक्रार होती. तो त्याच्या त्रासाबद्दल बोलत असताना माझ्या असं लक्षात आलं की अशा छोट्या छोट्या गोष्टी ज्यांची आपण दखलही घेणार नाही, त्यांच्यासाठी मात्र फार महत्त्वाच्या होत्या. विचारांती मला असं जाणवलं की आयुष्यात आपणाला महत्त्व असलं पाहिजे अशी भावना प्रत्येक माणसाची असते आणि सामाजिक दर्जा मिळवण्याच्या अंतस्थ हेतूनीच आक्रमकतेचा आधार घेतला जातो.

आम्ही जसं जसं नवीन क्लायंट्सना भेटत होतो तसं तसं आम्हा सर्वांची एकत्रित आंतरिक समज वाढत होती. माझ्या इंटर्नशिपच्या दिवसांमध्ये मी मनोविकाराने ग्रासलेले क्लायंट्स पाहिले होते म्हणजे Psychosis आणि Hallucinations असलेले, पण बेकायदेशीर किंवा गुन्हेगारी कृतीत गुंतलेल्या क्लायंट्सबरोबर कधीही सामना झाला नव्हता. माझा दुसरा क्लायंट होता मनोहर (नाव बदललं). मनोविकृतींनी ग्रासलेला तो माझा पहिलाच क्लायंट होता. कलम ३०२ अन्वये (मानवी हत्या) तो शिक्षा भोगत होता. त्याला आधीपासूनच Schizophrenia Spectrum Disorder असल्याचं निदान झालं होतं. काही औषधंही लिहून देण्यात आली होती. त्याला Persecutory Delusions (आपणाला कोणीतरी इजा किंवा मारण्याचा प्रयत्न करतोय असं सतत वाटणं) होत असल्याचा वैद्यकीय इतिहास होता. त्याच्या स्थितीची कल्पना करून मलाच खूप जड वाटू लागलं. न केलेल्या गुन्ह्यासाठी आपल्याला शिक्षा देण्यात आली आहे असं तो सांगत होता आणि हे सर्व मला पटवून देण्यासाठी तो आटोकाट प्रयत्न करत होता. वडील आणि वहिनीच्या हत्येसाठी कलम ३०२, म्हणजेच खुनासाठी तो शिक्षा भोगत होता. त्यानी सांगितलं की त्याचं परिवारातील सदस्यांवर खूप प्रेम आहे आणि त्यांना अपाय करण्याचा तो विचारही करू शकत नाही. त्या दिवशी स्थावर मालमत्ता विक्रीच्या मुद्द्यावरून काही विवाद झाला.

सकृतदर्शनी मनोहरसाठी ही मालमत्ता अतिशय महत्त्वाची होती आणि तरीही त्याला न सांगता वडिलांनी ती विकली असं त्याचं म्हणणं होतं. या घटनेमुळे तो Active Psychosis Phase मध्ये गेला. कारण दोन दिवस तो त्याला दिलेली औषधंही घेत नव्हता. मनोहर सांगत होता की वडिलांचा खून कर असं सतत कोणीतरी सांगतंय असं वाटू लागलं. वडिलांनी आपली मालमत्ता आपल्यापासून बळकावली अशी भावना प्रकर्षाने झाल्यामुळे रागाच्या भरात त्याने वडिलांवर हल्ला केला आणि त्यांचा मृत्यू झाला. मारहाण सुरू असताना त्याची वहिनीदेखील घरी होती आणि तिने कुठल्याही सामान्य व्यक्तीप्रमाणे, मारहाण थांबवण्याचा प्रयत्न केला पण त्याने तिलादेखील ढकललं. तिच्या डोक्याला मार लागल्यामुळे तिचेही प्राण गेले. मनोहरचा ठाम समज आहे की त्याने आपल्या कुटुंबातील सदस्यांची हत्या केली नाही. त्याला ऐकू येत असलेल्या आवाजांनी त्याला चालना मिळाली. मला काय प्रतिक्रिया द्यावी हे कळत नव्हतं. मनातून मी हादरले होते पण स्वतःला सांभाळलं आणि त्याला तुरुंगातील त्याच्या अनुभवाबद्दल, होणाऱ्या त्रासाबद्दल, मनोविकृतीची काही लक्षणं आहेत का याबद्दल विचारायला सुरुवात केली. त्याने सांगितलं की काही वेळा जेव्हा तो औषधं घेत नाही, तेव्हा त्याला आवाज ऐकू येतात, जे त्याला सतत इतरांना मारून टाकायला सांगतात. तुरुंगातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी औषधं लिहून दिली होती, परंतु ॲन्टिसायकोटिक्सच्या परिणामामुळे (Antipsychotics Side Effects) त्याला त्रास होत होता. तो सांगत होता की दिवसभर त्याला सुस्ती राहते, त्यामुळे तो काही काम करू शकत नाही. साहजिकच जेलमध्ये थोडेफार पैसे मिळवण्याची संधीही हुकते. कौन्सिलिंगदरम्यान मी त्याच्या दैनंदिन अडचणींवर काही उपाययोजना सुचवल्या जेणेकरून त्याचा तणाव काही प्रमाणात कमी होईल.

समुपदेशन सत्र संपल्यानंतर माझ्या मनात विचार आला की मानवियतेच्या सिद्धांतानुसार (Humanistic School of Thought) प्रत्येक व्यक्ती ही एक चांगली व्यक्तीच असते. आता या व्यक्तींच्या हिंसक कृती ऐकल्यानंतर एक गोष्ट प्रकर्षानं जाणवली की एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत समाजाचा पाठिंबा किती महत्त्वाचा असतो. विशेषतः मानसिक आजारी व्यक्तीच्या बाबतीत. ज्या व्यक्ती तणावपूर्ण वातावरणात वाढतात त्या व्यक्ती तणाव कमी करण्यासाठी काही ना काही पर्याय, उपाय शोधून काढत असतात. यालाच मानसशास्त्रात डिफेन्स मेकॅनिझम (Defense Mechanism) असं म्हणतात.

या संरक्षण यंत्रणा व्यक्तीपरत्वे, तसंच आजूबाजूच्या परिस्थितीनुसार उपयोगी अथवा घातक असू शकतात. तणावपूर्ण परिस्थिती मानवी विकास प्रक्रियेवर परिणाम करत असते आणि एखाद्या व्यक्तीचा ट्रिगर पॉइंटदेखील ठरवते. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीचे ट्रिगर पॉइंट्स वेगवेगळे असू शकतात आणि त्याचे सामान्यीकरण केलं जाऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीची कारणं आणि वैयक्तिक प्रवास समजून घेतल्यास त्याच्या / तिच्यासाठी संभाव्य पूर्वगत गोष्टी काय

असू शकतात याची फक्त झलक मिळू शकते.

आयुष्य जगत असताना प्रत्येक जण सतत लहान-मोठ्या गोष्टींवर निर्णय घेत असतो आणि जो तो आपल्या निर्णयावर खूप ठाम असतो कारण तो जगाबद्दलच्या त्याच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून घेतलेला असतो. अनेकदा आपण इतरांचे दृष्टिकोन समजून घेण्यात आणि त्याबद्दल सहानुभूती (Empathy) दाखवण्यात अपयशी ठरतो. आपण आपल्या कल्पना आणि मूल्यं इतर प्रत्येकासाठी सामान्यीकृत करतो. यामुळे अगदी सामान्य माणसाच्या आयुष्यातही परस्पर संघर्ष निर्माण होतो. ही संपूर्ण प्रक्रिया अशा व्यक्तींसाठी मात्र अधिकच जटिल आणि त्रासदायक बनते, ज्या आयुष्यात आधीच कठीण गोष्टींना सामोऱ्या जात असतात. या क्लायंट्सना भेटून मला समजलं की मानसशास्त्र Empathy वर इतकं केंद्रित का आहे. मानसशास्त्राची एक नवशिक्षित विद्यार्थिनी या नात्याने, मला नेहमी वाटायचं की, दरवर्षी पाठ्यपुस्तकात Empathy, Unconditional Positive Regard इत्यादी मूल्यं का शिकवली जातात? त्यावर का विशेष लक्ष केंद्रित केलं जातं? मात्र आता हे कळून चुकलं की ही मूल्यं अत्यंत मूलभूत आहेत. ही सरासरी कार्यशील माणसातही परस्पर संघर्ष निर्माण करू शकतात. मात्र या अनुभवाने मला शिकवलं की ही मूल्यं सरसकट आणि सर्वकाळ अंगीकारली जात नाहीत. बरेचदा ती काही निवडक लोकांबाबतच दाखवली जातात आणि समाजातल्या मोठ्या वर्गाला या मूल्यांपासून वंचितच राहण्याची वेळ येते. मनोहरची कहाणी ऐकल्यावर माझ्या मनात सहजच विचार आला की मनोहर आणि त्याच्या वडिलांमधला संघर्ष, कुटुंबीयांची अथवा कुठल्याही एखाद्या व्यक्तीची हत्या करण्यासाठी उद्युक्त होण्याइतका खरंच मोठा होता का? एखाद्यावर हल्ला करण्याचा किंवा एखाद्याला साधी इजा पोहोचवण्याचा निव्वळ विचारही आपल्यापैकी बहुतेकांसाठी मनाला क्लेशकारक ठरतो तर मग काही लोक इतके अनियंत्रित कसे होतात? प्रदीर्घ काळ, प्रचंड तणावपूर्ण अवस्थेत जीवन जगत आल्यानेच मनोहरकडून अशी टोकाची कृती घडल्याचा माझा निष्कर्ष होता.

मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याचा पुनरुच्चार तत्त्ववेत्ते सतत करत असतात. याचा मतितार्थ असा की सामाजिक स्वीकृती आणि सामाजिक समर्थन ही प्रत्येकाची गरज आहे. तथापि, परस्पर सुदृढ मानवी संबंधांच्या अभावामुळे काही वेळा बालपणी मनावर झालेले परिणाम प्रौढावस्थेतही टिकून राहतात आणि सतत नकोशा भावनांचं ओझं मनात बाळगल्यामुळे कित्येकदा भावनिक संवेदना नियंत्रणात राहत नाहीत आणि यामुळे आगळीक घडू शकते. मनोहरबरोबरच्या सत्रानंतर मन-मस्तिष्क या विचारांत गुंतलं असतानाच पुढच्या सत्राची वेळ झाल्यानं हे सर्व मी अंतर्मनात नोंदवून ठेवलं.

कैद्यांबरोबरच्या या समुपदेशन सत्रांना मी आता सरावत होते. पुढचा पेशंट होता संतोष. तोही कलम ३०२ खाली म्हणजेच मानवी हत्येच्या गुन्ह्यासाठी शिक्षा भोगत होता. खुनाच्या आरोपाखाली चुकीच्या पद्धतीने आपणाला दोषी ठरवण्यात आल्याची त्याची भावना होती. तुरुंगातून सुटका होण्याबाबत तो आशावादी होता. भोगत असलेल्या शिक्षेबाबत त्याच्या मनात तीव्र संताप होता. संतोष एका गरीब कुटुंबातला होता. त्याच्या लहानपणीच वडिलांचं निधन झालं होतं. आई रोजंदारीवर काम करत असे. त्याचा भाऊ कुठल्याशा रेस्टॉरंटमध्ये वेटर होता आणि तो स्वतः वयाच्या १८व्या वर्षापासून दिवसा रिक्षा चालवत होता आणि रात्री अभ्यास करत असे. एकूणच कुटुंबाला आर्थिक संकटाशी दोन हात करावे लागत होते. यामुळे तो प्रचंड तणावाखाली होता. ग्रॅज्युएशन पूर्ण करण्याआधीच तो मद्यपींच्या संगतीत सापडला आणि नियमितपणे दारू पिऊ लागला. पुढे लवकरच ड्रग्जपर्यंत मजल गेली. अत्यंत नाजूक वयातच त्याला अमली पदार्थांच्या सेवनाची सवय लागली. एक दिवस त्याला अपघातही झाला आणि डोक्याला दुखापत झाली. परिस्थितीमुळे दुखापतीकडे दुर्लक्ष झालं. काही आठवड्यांनंतर त्याला आवाज ऐकू येऊ लागले आणि झोप न लागणं, चिडचिड होणं इत्यादी काही लक्षणं दिसू लागली. दारू आणि अमली पदार्थांचं सेवन न करण्याबद्दल आईनं दिलेल्या चेतावनीकडे त्यानं साफ दुर्लक्ष केलं. जसजसा वेळ निघून गेला तसतशी लक्षणं तीव्र होत गेली. त्यानं सांगितलं की एक दिवस त्याला अज्ञात नंबरवरून एका व्यक्तीच्या तपशिलासह लिखित संदेश आला की अमुक एका व्यक्तीला जिवानिशी मारलं तर त्याला मोठी रक्कम दिली जाईल. त्या दिवसापासून संदेश देणाऱ्या आवाजाचा पुनरुच्चार होऊ लागला. तो सांगत होता की त्याला ऑफर स्वीकारण्याचे निर्देश येऊ लागले. अखेरीस त्यानं ऑफर घेण्याचं ठरवलं आणि त्या व्यक्तीची हत्या केली. हा मेसेज कोणाला दाखवला होता का किंवा तो मेसेज मोबाईलमध्ये आहे का असं विचारलं असता, तो कोणताही मेसेज दाखवू शकला नाही. त्यानं मेसेजबद्दल कोणालाही काही सांगितलं नव्हतं. त्यानं मारलेल्या व्यक्तीचा तपशील संदेशाद्वारे पाठवला होता, तोदेखील उपलब्ध नव्हता. अखेरीस त्याला मनोविकार असल्याचं निदान झालं. अशा घटना संदेहास्पद भासतात. संतोषला Hallucinations होत होती. तो ह्या गुन्ह्यासाठी जबाबदार आहे हेच मुळी त्याला मान्य नव्हतं. त्यामुळे तो संतप्त, अस्वस्थ होता. आपण निर्दोष आहोत हे लोकांना कसं पटवून द्यायचं या विचारांनी त्याला रात्र रात्र झोपही लागत नसल्याचं त्यानं सांगितलं. अशी प्रकरणं मला अंतर्मुख करतात. अशा परिस्थितीत योग्य-अयोग्याचा नेमका निवाडा कसा करायचा असा प्रश्न मला पडतो. अशा


घटनांमध्ये आपण न्यायनिवाडा कसा करणार? मी ज्या ज्या कैद्यांशी संवाद साधला, त्या जवळजवळ सर्व कैद्यांच्या व्यक्तिगत कहाण्या अत्यंत व्यथित करणाऱ्या होत्या. ते मर्यादित जागेत बंदिस्त जीवन जगत होते, त्यांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा होत्या आणि सहकारी कैद्यांशी वारंवार त्यांचा शाब्दिक आणि प्रसंगी शारीरिक संघर्ष घडत होता.

मी कोव्हिड महामारीच्या काळात आर्थर रोड कारागृहात कैद्यांसाठी समुपदेशन सत्र घेत होते. कोव्हिडमुळे भेटीगाठींवर कठोर निर्बंध होते. कैदी प्रदीर्घ काळ आपल्या कुटुंबीयांना, प्रियजनांना भेटूही शकले नव्हते. त्यामुळे साहजिकच अधिक तणावाखाली होते. शिवाय कोर्टात हजर होऊन परत जेलमध्ये आल्यावर प्रत्येक वेळी तुरुंग अधिकारी त्यांना वेगळं ठेवत. त्यांच्या जीवनातला प्रचंड एकाकीपणा मला जाणवत होता. या एकाकीपणामुळेच की काय त्यांना बोलतं करण्यासाठी मला काही विशेष प्रयत्न, Rapport निर्माण करावा लागला नाही. मला मनापासून वाटलं की, सामाजिकदृष्ट्या बहिष्कृत असलेले हे लोकही सामान्य माणसांसारखेच बोलतात. ते इतके एकाकी होते की त्या त्या दिवशी त्यांना तुम्हाला कसं वाटतंय एवढंच विचारलं, तर त्यांनी इतकी सगळी खासगी माहिती सांगितली, जणू काही आम्ही एकमेकांना खूप वर्षांपासून ओळखत होतो. त्यांचा भावनिक कोंडमारा इतका जबरदस्त होता की कुणी ऐकतो आहे म्हटल्यावर ते काही गोष्टींबद्दल किंवा अयोग्य वर्तनाबद्दलही मोकळेपणाने बोलते झाले. काही दोषी ठरलेल्यांनी तर गुन्हा घडल्याबद्दल खेदही व्यक्त केला. आणि आता आपल्या कृत्याबद्दल ते पश्चात्ताप करत होते. जशी जशी मी अन्य कैद्यांना भेटत गेले आणि त्यांच्या जीवनातील दैनंदिन अशा समस्यांवर चर्चा करत गेले, उदाहरणार्थ, झोप न लागणं, भूक न लागणं इत्यादी, तेव्हा ह्या कैद्यांप्रती Empathy, Genuineness मी दाखवू शकणार नाही अशी सुरुवातीला मनात असलेली शंका हळूहळू नाहीशी होत गेली.

पुढे काही दिवसांनंतर, जेव्हा मी काही नवीन कैद्यांशी बोलले, तेव्हा त्यांची जरी गुन्हेगारी पार्श्वभूमी असली तरी त्या वातावरणाची सवय झाल्यामुळे म्हणा किंवा पहिल्या भेटीतला नवखेपणा सरल्यामुळे म्हणा, मला शांत झोप यायला लागली. खुनाचा दोषी ठरवण्यात आल्याबद्दल राग येतो. माझी काही चूक नव्हती वगैरे कोणी सांगू लागला की मी फक्त लक्षणांवर केंद्रित होऊ लागले. 'भावनिक अस्वस्थतेमुळे झोप येत नाही' हेच माझ्यासाठी महत्वाचं असे. त्यांच्या कहाणीतला गुन्हेगारीचा संदर्भ केंद्रस्थानी येत नसे. त्या संदर्भात आम्हा समुपदेशकांच्या गटचर्चेदरम्यान विचारविनिमय होत असे. एक गोष्ट नक्की की यांच्यापैकी कोणीही मूलतः वाईट नव्हतं. त्यांनी वारंवार चुकीचे निर्णय घेतले आणि अशा काही कृती केल्या, ज्यामुळे त्यांना आयुष्यभर नकारात्मक परिणामांना सामोरं जावं लागलं या बाबतीत मला कुठलीही शंका उरली नाही.

क्लायंट म्हणून मी पाहिलेले बहुतेक कैदी एकतर अल्कोहोल किंवा ड्रग्जचं सेवन करत होते आणि तुरुंगात गेल्यानंतर दारू किंवा दुसरे मादक पदार्थ न मिळाल्यामुळे त्यांच्यात विड्रॉवल सिम्प्टम्स (Withdrawal Symptoms) दिसायचे. नैतिक आधारावर समाजानं बहिष्कृत केलेल्या मात्र समाजाचेच एक घटक असलेल्या अशा सामाजिक घटकांशी समुपदेशनाच्या निमित्ताने मी व्यतीत केलेला वेळ माझं अनुभवविश्व समृद्ध करून गेला. ही फारच मोलाची मिळकत होती. या संपूर्ण प्रकल्पाने मला मानव आणि समाज घटक या नात्यानं काही मूलभूत मूल्यांची उजळणी करण्यास प्रवृत्त केलं. या लोकांना भेटल्यानंतर, माझ्याही नकळत असलेल्या माझ्या निर्णय प्रक्रियेतल्या पूर्वग्रहांचं दर्शन मला घडलं. या प्रकल्पानं मला दिलेली सर्वांत सुंदर भेट म्हणजे मी माणसाला माणूस म्हणून पाहायला शिकले.

■



# Shree Ravalnath Co-op. Housing Finance Society Ltd., Ajara (Multi-State)

**Head Office:** Doctors' Colony, Gadhinglaj, Dist. Kolhapur, Pin- 416 502

Website : www.ravalnathhousingfin.com | Email : ravalnath.hogadhinglaj@gmail.com

ठेवी 367 कोटी

## आम्ही साकारतो तुमचे स्वप्न...




## गृहकर्ज @ 8.75%

### वैशिष्ट्ये

- महिला व सैनिकांसाठी व्याजदरात 0.25% सवलत.
- घर बांधणी व N.A. प्लॉट खरेदीसाठी 1.50 कोटी पर्यंत कर्ज सुविधा.
- गृह कर्जाच्या मुद्दल व व्याजास आयकरात सवलत.
- कर्जासाठी प्रॉपर्टी व विमा पॉलिसी तारण आणि पगारातून वसुली असल्याने ठेवी 100% सुरक्षित.
- मोफत RTGS / NEFT सुविधा आणि स्वतंत्र IFSC Code.
- मोबाईल बँकिंग, मायक्रो ATM, डेबिट कार्ड व लॉकर सुविधा.
- कर्ज हस्तांतरणाची सुविधा. ● वीज बील भरण्याची सुविधा.
- गंभीर आजारी व वयोवृद्ध ग्राहकांना घरपोच सेवा.
- सोने तारण, गृहोपयोगी उपकरणे खरेदी व शैक्षणिक कर्ज सुविधा.

### सांपत्तिक स्थिती (दि. २४/०९/२०२२ अखेर)

| | | | |
|---|---|---|---|
| सभासद | : ९८४६ | वार्षिक व्यवसाय | : ६१५ कोटी |
| ठेवी | : ३६७ कोटी | गुंतवणूक | : १४३ कोटी |
| कर्जे | : २४८ कोटी | खेळते भांडवल | : ४०५ कोटी |
| स्वनिधी | : २५ कोटी | नफा (३१/०३/२०२२) | : १ कोटी ८८ लाख |

● ऑडीट वर्ग : स्थापनेपासून सतत 'अ' वर्ग

**श्री. डी. के. मायदेव** — सी. ई. ओ.

**प्रा. व्ही. के. मायदेव** — उपाध्यक्ष

**श्री. एम. एल. चौगुले** — संस्थापक अध्यक्ष

### आमच्या शाखा

| शाखा आजरा | शाखा गडहिंग्लज | सुविधा केंद्र, गडहिंग्लज | शाखा चंदगड | शाखा नेसरी |
|---|---|---|---|---|
| मायदेव बिल्डिंग, मेन रोड, आजरा. | पंचायत समिती समोर, गडहिंग्लज. | डॉक्टर्स कॉलनी, गडहिंग्लज. | मेन रोड, चंदगड. | बस स्टँड जवळ, नेसरी. |
| (02323) 246982 | (02327) 226094, 225741 | (02327) 222242 | (02320) 224512 | (02327) 272830 |
| **शाखा कोल्हापूर** | **शाखा जयसिंगपूर** | **शाखा बेळगांव** | **शाखा निपाणी** | **शाखा कुडाळ** |
| क्राऊन फर्निचर समोर, कोल्हापूर. | स्टेशन रोड, ६ वी गल्ली, जसिंगपूर. | खानापूर रोड, टिळकवाडी बेळगांव. | अशोकनगर, निपाणी. | पोलिस ठाणे शेजारी, कुडाळ. |
| (0231) 2534633 | (02322) 224293 | (0831) 2474071 | (08338) 224933 | 7448101139 |

नियोजित शाखा - सांगली । कराड । पुणे

# मी पण माणूस आहे

**दलितमित्र प्रा. साधना झाडबुके**
सामाजिक कार्यकर्त्या

**... शेवटी पोलीस गाडीतून जेलमध्ये आलो. त्यांनी मला प्रथम माझा नंबर दिला. डॉक्टरांनी मला तपासले. ''पोलिसांनी मारले असेल तर दाखव'' असे म्हणताच डॉक्टरांना काय सांगावे हे मला समजत नव्हते. कारण मारापेक्षाही भयंकर प्रकार माझ्याबाबत घडला होता. पण सांगायचे कसे? कोणी ऐकून पण घेतले नसते. जेलमध्ये मला पुरुषाचे कपडे दिले. मी सर्वांना विनंती करत होतो की मला स्त्रियांचे कपडे द्या. पण कोणीही माझे ऐकले नाही.**

त्या दिवशी मी एकदम दारू पिऊन फुल्ल होतो. जगणे नकोसे वाटत होते. मी ना धड बाई ना पुरुष! कोणी मला हिजडा म्हणायचे, तर कोण छक्का म्हणायचे! मी शरीराने जन्मत: पुरुष होतो. एकदम गोरापान, निळे डोळे, कुरळे केस, लालचुटूक ओठ त्यामुळे लहानपणी आई-बाबा, शेजारचे, नात्यागोत्याचे लोक फार लाड करायचे. मी सतत लहानपणापासून कुलकर्णी सरांच्या घरामध्येच असायचो. त्यामुळे माझी भाषा शुद्ध झाली. त्यांच्या मुलांबरोबर रामरक्षा, स्तोत्र, शुभंकरोती म्हणायचो. पण लहानपणापासून मुलींचे खेळ मला आवडायचे. आईदेखील बऱ्याच वेळा मुलींचे ड्रेस घालून माझे कौतुक करायची. चांगल्या शाळेत चांगले संस्कार घडले. पण वयात येताना १२व्या वर्षी काहीतरी वेगळेच वाटायला लागले. मुलींसारखे नटावे, मुरडावे, मुलींचे कपडे घालावेत अशी तीव्र इच्छा व्हायची. हळूहळू छातीचा आकार मुलींसारखा दिसू लागला. नितंब मोठे होऊ लागले. कंबर लचकवत चालायची सवय लागली, मग मोठ्या वर्गातील मुले हळूच माझ्या पार्श्वभागाला चिमटे काढत, माझ्याशी जवळीक साधायचा प्रयत्न करीत. मूत्रीत गेलो की पोरे अंगाला झोंबायची, मला काही समजायचेच नाही. आईला, शाळेतल्या शिक्षकांना तक्रार केली तर कोणी लक्ष द्यायचे नाही. घरी एकदा चोरून बहिणीची ब्रेसीयर घातली, तिचा परकर-पोलका, कानात डुल घालून नटून-सजून आरशात बघू लागलो. मी माझ्यावरच खूश होतो. इतक्यात माझे रागीट वडील खोलीत आले. त्यांनी काठीने झोड-झोड झोडपले. ''पुन्हा असं करशील तर घराबाहेर जा,'' अशी ताकीद वडिलांनी दिली. रात्री आईने जवळ घेऊन माया केली. मलम लावले. पण नटण्या-मुरडण्याची सवय गेली नाही. सतत मुलींचे कपडे घालावेत, साडी नेसावी अशी इच्छा व्हायची व तसे मी करू लागलो. शेवटी आईपण चिडली, तिने उपाशी ठेवले, भावा-बहिणींनी मारहाण केली. देव-देवस्की झाली. गावातल्या एका



डॉक्टरने शॉक पण दिले, पण माझ्यात बदल झाला नाही. शेजारी-पाजारी चिडवू लागले. मी कंबर लचकवत चालताना, आजूबाजूचे हसायचे, चेष्टा करायचे, कोणी अंगचटीला यायचे. याला कंटाळून मी ९वीला असताना घरातील कोणालाही न सांगता घर सोडले आणि सरळ ट्रेनने मुंबईला आलो. पिशवीत आई व बहिणीच्या दोन साड्या, ब्लाऊज, खोटे दागिने घेऊन आलो होतो. रेल्वेच्या गाड्या धुतात तिथे अंघोळ करायची, साडी घालायची, हमाली करायची, त्याच पैशात वडा-पाव खायचा, दिवस बरे चालले होते.

ट्रेनच्या फलाटावर टाळ्या वाजवून लोकांकडून पैसे मागणारे माझ्यासारखे हिजडे मला भेटले. त्यांनी मला घेरलेच. ''इथे एकटा काय करतोस? चल आमच्याबरोबर.'' असे म्हणताच मलाही बरे वाटले. मग त्यांचेबरोबर त्यांच्या गुरूकडे गेलो. त्यांनी मला दिक्षा दिली. मग मी त्याचा चेला म्हणून राहू लागली. ट्रेनमधून टाळ्या वाजवत फिरायचे, पैसे दिले की आशीर्वाद द्यायचे, पैसे नाही दिले तर शाप द्यायचे, नाहीतर साडी वर करायची भीती घालायची, असे दिवस चालले होते. कधी बधाई मागायची, कधी नवीन बाळ जन्माला आले की बाळाला हातात घेऊन नाचायचे, यातून साड्या, पैसे मिळायचे. पण हा आपला मार्ग चुकला असे सतत वाटायचे. मला शिकायची खूप इच्छा होती. अभ्यासात पण चांगला होतो. पण घरी-दारी दिलेल्या सततच्या वाईट वागणुकीमुळे, मी घर सोडून या मार्गाला लागलो होतो. शेवटी मी मनाचा हिय्या करून तो किन्नरांचा ग्रुप सोडला व मिळेल ती नोकरी करून जगायचे ठरवले.

एका छोट्याशा दुकानात मला नोकरी मिळाली. पगार पोटापाण्यापुरता होता. रात्री तिथेच झोपायचो. किराणा दुकान, मुंबईची गर्मी, उंदरांचा त्रास, त्यामुळे दुकानाची एक फळी उघडूनच झोपायचो. दुकानात येणारी बरीचशी गिऱ्हाइके ओळखीची झाली होती. रात्री गप्पा मारायला यायची. कधी-कधी पिंडके पण यायचे. त्यांचा त्रास व्हायचा. मग एका दारुड्याने मला पण दारूचा नाद लावला. दारू प्यायल्यावर सगळी दुःखे विसरायचो. आईवडील, बहीणभाऊ यांची आठवण यायची. सगळे दुःख दारूत बुडवून मी शांत झोपायचो. मग इंग्लिश दारू परवडेना. मग हातभट्टीची चपटी बाटली आणायचो. प्यायला बरोबर एक दोन पिंडके असायचेच. एके दिवशी दारू प्यायलेल्या स्थितीत त्याने माझ्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला. मी त्यांच्या शक्तीबरोबर कमी पडलो. खॅटमॅट पूर्ण झाल्यावर गडी निघून गेला. मी तसाच गप्प पडून राहिलो. मला बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नव्हता. माझे काम चोख होते. त्यामुळे किराणामालाचा दुकानदार माझ्यावर खूश होता. लांडी लबाडी मला जमत नव्हती व करावीशी पण वाटत नव्हती. इथेच मरेपर्यंत दिवस काढायचे मी ठरवत होतो.

पण एके रात्री मी फुल्ल हातभट्टीची प्यालो होतो. इतक्यात ३-४ नेहमी येणारे दारुडे आले आणि मला काही कळायच्या आतच त्यांनी माझ्यावर बलात्कार केला. मला असंख्य वेदना होत होत्या. गुद्द्वार दुखत होते. पण ते मला सोडायला तयार नव्हते. मी माझ्या खिशातली चपटी काढली आणि दारूच्या नशेतच एकाच्या डोक्यावर जोराने मारली. तो कण्हत ओरडला व विव्हळत पडला. बाकीचे तिथे पळून गेले. पुढचे मला काहीच आठवत नाही. मी बेशुद्ध होतो, की दारूच्या गुंगीत होतो, की बलात्कारामुळे गलितगात्र झालो होतो हे आता आठवत नाही. पण पोलिसांची गाडी मला कधी पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेली, तेही आता आठवत नाही.

जेव्हा शुद्धीत आलो, तेव्हा मी पोलीस कोठडीत होतो. अंगावरचा ब्लाऊज, साडी फाटलेली होती. अंगावर बऱ्याच चिमटे काढल्याच्या, बोचकारण्याच्या खुणा होत्या. सर्व ठिकाणी रक्ताचे डाग दिसत होते. पहिले दिवशी पोलिसांनी मला काहीच विचारले नाही. दोन्ही वेळा जेवण दिले. त्या दिवशी मी पूर्ण विश्रांती घेतली. पण रात्री मात्र झोप येत नव्हती. सतत दंडुक्याने इतरांना मारल्याचा, विव्हळण्याचा आवाज येत होता. कोपऱ्यात 'मेरी आवाज सुनो' नावाचा पट्टा होता. तो बघून भीती वाटत होती. माझ्या एवढ्याशा कोठडीत चार-पाच आरोपी होते. आपला मार खायचा कधी नंबर येणार? म्हणून ते धास्तावले होते. त्यांचेकडून पोलीस कसे मारतात, उलटे टांगतात, बर्फाच्या गादीवर झोपवतात, मिरचीची धुरी देतात याची इत्थंभूत माहिती मला मिळाली, आणि मार खायच्या आधीच माझे हातपाय लटपटायला लागले. माझी काही चूक नसताना मला पोलिसांनी पकडले आहे हे मी त्यांना सांगायचे ठरवले, पण माझे धाडस होत नव्हते. पोलीस स्टेशनमधील एका पोलिसानेच वर्तमानपत्रात माझ्या फोटोसह आलेली बातमी दाखवली. गुन्हेगार म्हणून माझे नाव छापून आले होते, पण ज्यांनी माझ्यावर जोर जबरदस्ती केली त्यांचे नाव नव्हते. मी आरोपी होतो. ''याने हाफ मर्डर केला होता.'' असे पोलीस कस्टडीतील सर्व आरोपी एकमेकांना माझी ओळख करून द्यायचे.

शेवटी पोलिसांनी मला राउंडात घेतले. त्यांच्या आवाजानेच मी घाबरलो. पहा, बर्फाची लादी तयारच होती. मी गयवया करून पोलिसांना माझी सर्व हकिकत सांगितली, गळ्यातले लाल-पांढऱ्या मण्याचे सुतातले दर्शन दाखवले, ''मी देवाचा माणूस आहे. मला देवाला सोडलेले आहे. मी ना पुरुष



ना बाई म्हणून सर्वजण माझी छेड काढतात. बलात्कारापासून माझ्या बचावासाठी मी खिशातली चपटी त्याला मारली. पुढचे मला काही आठवत नाही.'' तेवढ्यात मोठे साहेब आत आले. मला त्यांनी पाहिले. काय कोणास ठाऊक? पण त्यांना बघून मला माझ्या आईची आठवण झाली. त्यांनी एक नजर माझ्यावर फिरवली. ठाणे अंमलदाराला सांगितले, ''त्याला मारू नका. परत पोलीस कोठडीत टाका.'' माझा जीव भांड्यात पडला. मोठे साहेब देशभक्त होते, मला त्यांनी स्वतःच्या ऑफिसात बोलवले. माझी माहिती, माझ्या घरचा पत्ता घेतला. माझ्या गळ्यातले दर्शन बघून, त्यांनी मला 'देवमामा' म्हणून नमस्कार पण केला व ''तुझ्या घरी कळवतो, ते तुला वकील देतील, तेव्हा येथून तुझी सुटका होईल,'' असे सांगितले. खरे तर पोलीस स्टेशनमध्ये मी कोठडीतून बाहेर पडून तेथील साफ-सफाई, पाणी भरणे, मूत्रालय साफ करणे ही कामे करायचो. दोन वेळा चांगले जेवण मिळायचे. कोणाकडून मारही नव्हता. मी सुरक्षित होतो. इथला आपला मुक्काम वाढावा अशी मनोमन देवाला प्रार्थना करीत होतो. पण इथेही माझे स्त्रीत्व आड येत होते. तिथे एक साफसफाई करणारा मनुष्य माझ्याशी खूप प्रेमाने वागायचा, आपल्या डब्यातील जेवण द्यायचा, माझ्या अंगावरचे कपडे फाटल्याने त्याने आपल्या बायकोचे परकर, पोलके, साडी मला आणून दिली होती. तो आता मला 'देवमामा' म्हणायचा. पण हे सुख माझ्या नशिबी नव्हते. प्रेमाने बोलणाऱ्या त्या माणसाने माझ्याशी रात्री लगट करण्याचा प्रयत्न केला. पण माझी शक्ती कमी पडली. शेवटी पुन्हा एकदा बलात्कार होता होता मी वाचलो. मग पुन्हा येथून बाहेर पडण्याचे मला वेध लागले. एकदा पोलीस गाडी मला कोर्टात घेऊन गेली. तेथे नक्की काय झाले हे मला माहीत नाही. पण मोठ्या साहेबांनी सांगितले, ''आता तू येथून मॅजिस्ट्रेट कस्टडीत जाणार.'' मला समजले नाही. तेव्हा त्यांनी सांगितले, ''तू आता कच्चा कैदी म्हणून जेलमध्ये राहणार.''

मला खूप रडू कोसळले. माझ्यावर अन्याय झाला आणि मलाच जेलमध्ये राहावे लागणार. कारण पोलीस कस्टडीमध्ये असताना घरातले, किराणा दुकानाचा मालक, रात्री गप्पा मारायला येणारे ओळखीपाळखीचे मला कोणीच भेटायला आले नाहीत. जगात आपण एकटेच आहोत याची भावना होऊन रडू कोसळले.

शेवटी पोलीस गाडीतून जेलमध्ये आलो. त्यांनी मला प्रथम माझा नंबर दिला. डॉक्टरांनी मला तपासले. ''पोलिसांनी मारले असेल तर दाखव'' असे म्हणताच डॉक्टरांना काय सांगावे हे मला समजत नव्हते. कारण मारापेक्षाही भयंकर प्रकार माझ्याबाबत घडला होता. पण सांगायचे कसे? कोणी ऐकून पण घेतले नसते. जेलमध्ये मला पुरुषाचे कपडे दिले. मी सर्वांना विनंती करत होतो की मला स्त्रियांचे कपडे द्या. पण कोणीही माझे ऐकले नाही. वयाच्या १४व्या वर्षांपासून मी साडी घालत

होतो. आता पांढरा शर्ट व पायजमा व टोपी घालायला लागत होती. मन अस्वस्थ होते. त्यापेक्षाही मला इतरांबरोबर न ठेवता सर्वांपासून दूर एका खोलीत ठेवले होते. बरॅक एकदम घाण होती. डास, मुंग्या, झुरळे, उंदीर आणि मी मिळून-मिसळून राहत होतो. पहिले थोडे दिवस बरे वाटले. मनाला शांती वाटली. पण नंतर मला का वेगळे ठेवले? असे जेलरना विचारताच ते म्हणाले, ''तुला इतर पुरुषांपासून धोका होऊ शकतो किंवा तू इतर पुरुषांना धोका देऊ शकतोस. इतर सर्व पुरुष कैदी घरापासून दूर आहेत. त्यांच्या भावना दाबल्या गेल्या आहेत. तुझी कधी xxx मारून फडशा पाडतील सांगता येत नाही.'' त्यांनी असे सांगताच मला कळले की मला अशा खोलीत एकटेच राहावयाचे आहे. कोणीही सोबत नाही. दिवसाही अंधार. बाहेरचे काही दिसत नाही. या एकटेपणाचा फार कंटाळा यायला लागला. कधी-कधी मी मोठ्याने रडायचो, ओरडायचो. आईवडिलांची आठवण यायची. माझे भाऊ-बहीण काय करत असतील? त्यांची लग्ने झाली असतील का? त्यांना मुले-बाळे असतील का? घरी राहिलो असतो तर त्यांच्या मुला-बाळांचा सांभाळ केला असता. मला मुलांची फार हौस होती. किराणा दुकानात लहान मुलांना मी माझ्या पैशाने गोळ्या-बिस्कीटे द्यायचो. इथे कोणीच नाही. कधी-कधी आत्महत्या करावी वाटायची. पण करणार तर कशी? फास घ्यायला दोरी पण नाही. सगळ्यांचे जेवण झाले की मला थोडा वेळ जेवण्यासाठी बाहेर काढायचे. पण केवळ १० मिनिटे. असे एका खोलीत एकट्याने राहायचे, शिक्षेपेक्षा मरण आले तर बरे असे वाटायचे. आपण खुळे होणार, आपल्याला बोलायला पण येणार नाही. अशी भीती वाटायची. नैराश्य म्हणजे काय? याची मला खरीखुरी जाणीव झाली. माझ्यावर अन्याय झाला तरी मीच शिक्षा भोगतो आहे याचे सर्वांत वाईट वाटायचे. एकदा घराच्या पत्त्यावर आई-वडिलांना पत्र लिहिले. पण काहीच उत्तर नाही.

पत्राची वाट पाहत होतो. नंतर लक्षात आले जेव्हा मी मुंबईला गुरूचा चेला झालो, तेव्हा माझ्या गळ्यात गुरूने दर्शन (लाल-पांढऱ्या मण्याची माळ) घातली व माझे नाव बदलले. माझे मूळ नाव वसंता आत्माराम पाटील होते. गुरूने ते नाव वासंती बायाका भोसले असे ठेवले. सर्व रेकॉर्डला आता वासंती असेच नाव होते. नावातील बदलामुळे मला कोणीच गावाकडचे ओळखत नव्हते. कदाचित आईवडिलांना आपली मुलगी झालेला हा मुलगा आहे याची जाणीव झाली असेल पण त्यांना माझी ओळख दाखवायची नसेल, त्यामुळे माझ्या पत्राचे उत्तर आले नाही. इतर कैद्यांना भेटायला त्यांचे नातेवाईक, मित्र, ओळखीचे यायचे. मला लांबून ती मंडळी दिसायची. पण मला भेटायला कोणीच यायचे नाही. मी या जगात एकटाच आहे, हे जाणून मी रडू लागायचो. एकटेपणामुळे मी एककल्ली झालो. कधी शाळेतील कविता म्हणायचो. कधी रामरक्षा, परवचे म्हणायचो. देवीचा धावा करायचो. जेलमधला स्टाफ मला हाफ मर्डरवाला किन्नर म्हणायचे. पण कोणी मला त्रास दिला नाही. आपली खोली स्वच्छ ठेवणे, कपडे धुणे एवढेच काम असायचे. जेलर राउंडला आले की मी म्हणायचो, मला काहीतरी काम द्या. मी भाजी चिरतो, पीठ मळतो. स्वयंपाक करायला मला आवडतो. पण जेलर म्हणायचे, ''तू कच्चा कैदी आहेस, तुला आम्हाला काम देता येत नाही.'' मी त्यांना विचारायचो, मी पक्का कैदी केव्हा होणार? ते हसायचे, म्हणायचे, ''बाकी सगळे जामिनावर किंवा निर्दोष सुटायची वाट बघतात. तू मूर्ख आहेस, पक्का कैदी म्हणजे शिक्षा न्यायालयाकडून झाल्यावर त्याला जेलमध्येच राहावे लागते. तुला जामीन मिळाला तर तू जेलबाहेर जाऊ शकशील.'' कोर्टात जज्जसाहेबांनी विचारलेल्या प्रश्नाला घाबरून मी काहीच उत्तर दिले नाही. काळ्या कोटातील वकीलच सर्व बोलत होते. मला जामीन म्हणजे काय, तेच समजायचे नाही. आणि मला जामीन कोण देणार? ना कोणी नात्याचे, मैत्रीचे, ओळखीचे!

मला २-३ वेळा पोलीस व्हॅनमधून न्यायालयात नेण्यात आले होते. मी ज्या पोलीस कस्टडीत होतो, तिथले पोलीस पण न्यायालयात आले होते. वकील पण होते. मला काय चालले हेच समजत नव्हते. शेवटी वकिलांनी मला न्यायालयाबाहेर येऊन सांगितले की तुझी आता सुटका झाली आहे. आता जेलरना भेटून घरी जाऊ शकतोस.

पुन्हा पोलीस व्हॅनमधून जेलमध्ये आलो. काही कागदपत्रांची देवाण-घेवाण झाली. माझे पूर्वीचे कपडे मला दिले व जेलरने मला सांगितले, ''तुझी आता जेलमधून सध्या सुटका झाली. आता घरी जा.'' मला प्रश्न पडला आता कोठे जायचे? एवढे मोठे जग पण माझे येथे कोणीच नाही. उगीचच भरकटल्यासारखे फिरत राहिलो. विनातिकीट रेल्वेतून प्रवास केला. या गावातून त्या गावात! पण मनात वाटले जेलमध्ये होतो तेच बरे होते. जेवण-खाण मिळत होते. डोक्यावर छप्पर होते. मनात आत्महत्येचे विचार यायचे. एकदा जिवाला कंटाळून तलावात उडी मारली, पण इतर लोकांनी वाचवले. सहानुभूती दाखवली, पैसे दिले. पण ते सर्व तात्पुरतेच. गळफास लावण्याचा पण प्रयत्न केला. शेतात झाडाच्या फांदीला दोरी लावली, पण फांदीच तुटली. देवाच्या मनात मी मरू नये आणि असेच हलाखीत जीवन जगावे अशी इच्छा असावी. मला सतत वाटायचे, मला पण एक जोडीदार असावा. नवरा-बायको

रस्त्यातून चालले की मला हेवा वाटायचा. पण आपल्याशी कोण लग्न करणार? असा विचार करून निराश व्हायचो. लहान मुलांबद्दल मला ओढ, माया वाटायची. आपण पण एक मूल दत्तक घ्यावे असे वाटायचे. एक वकिलाला मी मूल दत्तक घेण्याविषयी विचारले तर तो हसायलाच लागला, म्हणाला, ''कायद्याने मूल तुम्हाला दत्तक घेता येत नाही.'' मला लग्न करता येत नाही, मूल दत्तक घेता येत नाही, बलात्कार झाला तरी कोणी दाद देत नाही म्हणजे आमचे जीवन माणसासारखे नाही तर पशूसारखेच आहे असे वाटायचे.

असेच भटकत एका दुसऱ्याच शहरात गेलो. तेथे मोठे देऊळ होते. आजूबाजूला नारळ-ओटी, कापूर-अगरबत्ती विकणाऱ्या बायका-पुरुष होते. तेथेच बाजूला इतर भिकारी पण होते. त्या भिकाऱ्यांच्या रांगेत मीही बसू लागलो. पोटापाण्यापुरते पैसे मिळायचे. हळूहळू आजूबाजूच्या बायकांची ओळख झाली. माझ्या गळ्यातील दर्शन बघून एका तरुण जोगतिणीने मला हाक मारली. तिच्या गळ्यात पण दर्शन (लाल-पांढऱ्या मण्याची माळ) होती. तिच्याशी माझी सलगी वाढत गेली. तिला तीन लहान मुली होत्या. घरी ती जेवायला जायची तेव्हा तिचा धंदा मी सांभाळायचो. माझ्यावर तिचा विश्वास वाढला. मीही प्रामाणिकपणे काम करू लागलो. आता देवाच्या सामानाबरोबर फुगे, खेळणी पण माझ्या मदतीने तिने विक्रीला ठेवली. व्यापार वाढला. माझ्याबद्दल तिला प्रेम, माया, आपुलकी वाटू लागली. आता ती माझ्यासाठी जेवणाचा डबा पण आणू लागली.

हळूहळू आम्ही दोघेही एकमेकांचे दु:ख एकमेकांना सांगू लागलो. लहानपणीच तिचे लग्न देवाबरोबर लागले. देव तिचा पहिला नवरा. त्यामुळे तिचा पाटलाच्या मुलाबरोबर झुलवा लागला. पाटील मोठा वजनदार. तो विवाहित, मुलेबाळे असणारा, त्याने तिचा उपभोग घेतला. ३-३ मुलींना जन्म दिला आणि त्याने तिला वेश्याव्यवसायात विकण्याचा प्रयत्न केला. तिथून ती पळून आली. आपल्या लहान लेकरांना घेऊन तिने मूळ गावच सोडले. दुसऱ्या गावात एका देवदासी कार्यकर्तीच्या मदतीने देवाचे सामान विकण्याचा धंदा सुरू केला. हळूहळू जम बसला.

तिच्या लक्षात आले की माझ्यापासून तिला काही धोका नाही. कारण मला बायकांपेक्षा पुरुषांचे आकर्षण. जरी मी शरीराने पुरुष असलो तरी मला तिने स्वत:च्या घरातच ठेवून घेतले. दोन उद्देश – माझ्यापासून धोका नाही आणि माझ्यामुळे इतरांपासून तिचे व मुलींचे संरक्षण. मला पण मुलांची आवड. आपले एखादे बाळ असावे असे वाटायचे. मग तिच्याच मुलींवर मी आपल्या मुली समजून मातेचे प्रेम देऊ लागलो. मला मातृत्व मिळाल्याचा आनंद झाला. त्या देवदासीच्या घरात मी स्वयंपाक, धुणे-भांडी, घर स्वच्छ करणे अशी सर्व बायकांची कामे करायचो. मुलींवर लक्ष ठेवायचो. त्यांचे केस विंचरायचो, वेण्या घालायचो. त्यांना शाळेला नेऊन सोडायचो. मुली पण मला देवमामा म्हणून खूप माया करायच्या. दुपारी देवळात जाऊन त्या देवदासीला ओटीचे सामान भरण्यास, कापूर, अगरबत्तीची पुडी, हळद, कुंकू भरण्यात मदत करायचो. आता जीवनाला स्थिरता लाभली आहे. मला तिचा आधार आहे आणि तिला माझा आधार.

पण सतत एकच गोष्ट आठवून वाईट वाटते. जेलमधून सुटल्यानंतर मी माझ्या गावी घरी गेलो. घराचे रूप बदलले होते. वाड्याऐवजी आता काँक्रिटची बिल्डिंग होती. मी दार ठोठावले. भाऊ बाहेर आला, मला पाहताच त्याने शिव्या द्यायला सुरुवात केली. म्हणाला, ''हाफ मर्डरवाला फालक्या आता वाटणी मागायला आला आहेस का? आमचे तोंड काळे केलेस आता इथे थांबायचे नाही, गाव सोडून बाहेर जायचे.'' तेवढ्यात पांढरे केस झालेली माझी कमरेतून वाकलेली आई बाहेर आली. तिच्या डोळ्यांत पाणी होते. पण ती काही करू शकत नव्हती. शेवटी रडत-रडत घराभोवती एक फेरी मारून मी निराशेने निघालो असताना अचानक खिडकीतून पांढरे केस दिसले. आणि माझ्या दिशेने एक कापडाची पुडी माझ्या अंगावर टाकली गेली. मी घाबरलो. तेवढ्यात आवाज आला, ''माझी शेवटची इच्छा'' आणि पांढरे केस खिडकीतून दिसेनासे झाले. आवाज आईचा होता. गावाबाहेर देवळात बसून मी कापडाची पुडी उघडली. ते आईचे ब्लाऊज होते. त्यात २००० रु. च्या १० नोटा होत्या. मला रडू कोसळले. तसेच रडत मी परत देवदासीच्या गावात आलो. पुडी तशीच जपून ठेवली. पुढच्या जन्मी हिजड्याचा जन्म येऊ नये म्हणून आपण मेल्यावर देवदासी, जोगतिणींना, हिजड्यांना जेवण, कपडे-साड्या द्यायच्या असतात. त्यासाठी मी ते पैसे जपून माझ्या पेटीत कुलूप लावून ठेवले आहेत. फक्त त्या देवदासीला हे माहीत आहे. कारण माझ्या मृत्यूनंतर सर्व सोपस्कार तीच करणार. मला खात्री आहे. निदान पुढचा जन्म तरी हिजड्याचा नको म्हणून मी सतत प्रार्थना करत असतो.

■


सर्वांत प्रथम
लाईफ इन्शुरन्स
100 वर्षांची योजना!
एलआयसीची
जीवन उमंग
UIN: 512N312V02 PLAN NO: 945
एक नॉन-लिंक्ड, सहभागी,
व्यक्तिगत जीवन बीमा बचत (आजीवन) योजना
मिळवा खात्रीशीर उत्तरजीवित्व लाभ, मूळ विमा रकमेच्या 8% एवढा,
अंतिम प्रिमियमनंतर दरवर्षी, वयाच्या 99व्या वर्षापर्यंत आणि
एकरकमी मुदतपूर्ती लाभ 100व्या वर्षी, उत्तरजिवित्वासाठी.
वैशिष्ट्ये :
पात्रता वय : 90 दिवसांच्या बाळापासून 55 वर्षांपर्यंतच्या व्यक्तिसाठी
किमान आधारभूत विमा रक्कम : रु 2,00,000/-
कमाल आधारभूत विमा रक्कम : मर्यादा नाही
प्रिमियम अधिदान कालावधी : 15, 20, 25 आणि 30 वर्षे
पॉलिसीची मुदत : (100 वजा प्रवेशाच्या वेळचे वय) वर्षे
वैकल्पिक रायडर्स :
एलआयसीचा अपघाती मृत्यू आणि अपंगत्व फायदा रायडर
एलआयसीचा अपघाती फायदा रायडर
एलआयसीचा नवीन टर्म ॲश्युरन्स रायडर
एलआयसीचा नवीन गंभीर आजार फायदा रायडर
एलआयसीचा प्रिमियम वेवर फायदा रायडर
खास वैशिष्ट्ये :
वयाच्या 100व्या वर्षापर्यंत आयुष्यभर जोखीम संरक्षण
संपूर्ण मुदतभर बोनस
अंतिम अतिरिक्त बोनस (जर असेल तर)
कर्ज सुविधा
तुमच्या एजंटशी/शाखेशी संपर्क साधा किंवा आमच्या वेबसाईटला www.licindia.in भेट द्या किंवा एसएमएस करा 'YOUR CITY NAME' आणि पाठवा 56767474 वर (उदा. 'Mumbai')
Follow us : YouTube LIC India Forever
बनावट फोन कॉल्स आणि खोट्या व फसवणूक करणाऱ्या ऑफर्स पासून सावध रहा. IRDAI जनतेला स्पष्ट कळवित आहेत की: • IRDAI किंवा तिचे अधिकारी हे कोणत्याही प्रकारच्या विम्याची किंवा वित्तीय उत्पादनांची विक्री किंवा प्रिमियमची गुंतवणूक अशा कामांमध्ये सहभाग घेत नाहीत. • IRDAI कोणताही बोनस जाहीर करत नाहीत. अशा प्रकारचे कॉल येणाऱ्या लोकांना अशी विनंती करण्यात येते की त्यांनी फोन कॉल, नंबर अशा तपशीलांसह पोलिसांकडे तक्रार नोंदवावी.
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
LIC/AR/20-21/17/MAR
विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी जोखमीचे घटक, अटी आणि शर्ती ह्याबाबतच्या अधिक तपशीलवार माहितीसाठी कृपया प्लॅनचे सेल्स ब्रोशर काळजीपूर्वक वाचा.
IRDAI Regn No.: 512
जीवनाच्या सोबतही, जीवनाच्या नंतरही.

# कारागृहातील महिलांची मुले

**श्रीमती सुरेखा साळे**
सामाजिक कार्यकर्त्या, प्रयास - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा प्रकल्प

**आम्ही आता पाहत आहोत की थोडीफार मदत केल्याने बरीच मुले त्यांचे शिक्षण घेऊ लागली आहेत. काही मुले घरातील काम करून बाहेरही कामे करत आहेत आणि रात्री शाळेत जात आहेत. यावर्षी आमची काही मुले बारावीची परीक्षा पास झाले आहेत. त्यातील एक मुलगा नेव्हीमध्ये जाण्याची तयारी करू लागला आहे. तो आता मर्चंट नेव्हीची ऑफिसर पदाची परीक्षा देत आहे. तर एक मुलगा हॉटेल व्यवस्थापनाच्या कोर्सला प्रवेश घेत आहे. तर एका मुलीने नर्सिंगचा फॉर्म भरला आहे. जी मुले दहावी पास झाली आहेत त्यांनी पुढील शिक्षणाकरता वेगवेगळ्या कॉलेजमध्ये डिग्रीकरता किंवा कोर्सकरता प्रवेश घेतला आहे.**

प्रयास (टाटा सामाजिक संस्थेचा प्रकल्प) सुरू होऊन ३२ वर्षे झाली आहेत आणि मला या संस्थेमध्ये काम करण्याची संधी २७ वर्षांपासून मिळाली आहे. न्यायव्यवस्थेमध्ये कारागृहामधील महिलांसोबत पुनर्वसनाचे काम करताना त्यांची मुले हा एक मुद्दा समोर आला. कारण बहुतेक महिलांचे म्हणणे होते की मी एकटी आहे, घराची जबाबदारी माझ्यावर आहे. सगळा खर्च मला करावा लागतो आणि माझ्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी मी हे कृत्य केले आहे किंवा करावे लागते आहे. त्यामुळे जर महिलांना पुन्हा समाजामध्ये आणायचे असेल तर



त्यांच्या मुलांसाठी काही व्यवस्था असावी याकरता आम्ही महिलांच्या घरी भेट देऊ लागलो आणि त्यामुळे आमच्यासमोर या मुलांचे प्रश्न येऊ लागले. त्यांना सहन करावा लागणारा त्रास समोर येऊ लागला. आई कारागृहामध्ये गेल्यानंतर घरी तिच्या मुलांना कोणत्या कोणत्या समस्यांचा सामना करावा लागतो हे दिसू लागले. आईने केलेली चूक किंवा चुकून झालेली घटना यांचा परिणाम आईपेक्षा मुलांना जास्त भोगावा लागतो हे समोर यायला लागले. ह्या परिणामांच्या यादीमध्ये भूक आणि शिक्षणासोबत अजूनही बरेच काही पुढे आले. तसेच मुलांचे वेगवेगळे प्रश्न समोर आले. जसे जसे काम करू लागलो तसे तसे या मुलांचे वेगवेगळे गट आहेत हे दिसून आले. ते म्हणजे,

१) कारागृहामध्ये आईसोबत असलेली मुले
२) आई कारागृहामध्ये असताना घरी असलेली तिची मुले आणि
३) आई कारागृहामध्ये असताना संस्थेमध्ये असलेली मुले.

अशा पद्धतीने त्यांना या तीन गटांमध्ये विभागले आहे. या तिन्ही गटांतील मुलांचे प्रश्न वेगवेगळे असल्याचे समोर आले आहे. आणि ते म्हणजे -

**१) कारागृहामध्ये आईसोबत असलेली (० ते ६ वर्षे) मुले** - कारागृह नियमावलीनुसार महिला (आई) तिच्या ६ वर्षांच्या आतील मुलांना तिच्यासोबत कारागृहामध्ये घेऊन येऊ शकते. त्यामुळे काही केसेसमध्ये महिला त्यांच्या मुलांना कारागृहामध्ये घेऊन येतात. जेव्हा मूल

आईसोबत कारागृहामध्ये असते तेव्हा त्याच्यावर होणारा परिणाम दिसून आला आहे तो म्हणजे –

अ) कारागृहामध्ये एकंदर वातावरण हे मुलाच्या शारीरिक आणि मानसिक वाढीसाठी पोषक नाहीये. कारागृहामध्ये मिळणारे जेवण आणि आजूबाजूला पूर्ण वेगवेगळ्या स्तरांतील महिला असल्याने तिथे असणारे वातावरण हे मुलांसाठी पोषक नाही हे दिसून आले आहे. (बालविकास प्रकल्प यांनी काही कारागृहांमध्ये अंगणवाडी सुरू केली आहे आणि त्याचा चांगला परिणामही दिसून येऊ लागला आहे. पण अंगणवाडीमध्ये मिळणारा खाऊ देण्यास नकार दिला आहे.)

आ) काही खटल्यांमध्ये आईला जास्त दिवस कारागृहामध्ये राहावे लागते. त्यावेळी मुले आपल्या कुटुंबामधील व्यक्तींना विसरले जाण्याची शक्यता असते. त्यामुळे जेव्हा मूल आईसोबत न्यायालयामध्ये जाते तेव्हा ते त्याच्या जवळच्या व्यक्तींना ओळखत नाहीत हे दिसून आले आहे. जसे भाऊ, वडील, आजी इत्यादी.

इ) कारागृहामध्ये महिलांसोबत मुलगा असेल तर त्याच्या वागण्या बोलण्यात, चालण्यात फरक दिसू लागतो.

ई) जर मुलाचा जन्म कारागृहामध्ये झाला असेल तर या मुलांच्या जन्म दाखल्यावर जन्म ठिकाण म्हणून कारागृहाचे नाव येते व त्यामुळे त्यांच्या पुढील आयुष्यावर त्याचा परिणाम दिसतो. (मुंबई महानगरपालिकेचे १० वर्षांपासूनचे सर्क्युलर आहे की कारागृहामध्ये जन्म झालेल्या मुलाच्या जन्म दाखल्यावर कारागृहाचे नाव देऊ नये, त्याऐवजी आई ज्या विभागातील आहे ते नाव द्यावे, पण हा आदेश अजूनही पाळला जात नाही.)

२) **कारागृहाबाहेर असलेली मुले (वय वर्ष ० ते १८)** – यामध्ये आई कारागृहामध्ये गेल्यानंतर कारागृह नियमाप्रमाणे आई स्वत:सोबत तिचे ६ वर्षांपर्यंतची मुले सोबत ठेवू शकते. पण मूल जर मोठे असेल किंवा ती महिला मूल आपल्यासोबत घेऊन नाही गेली तर ही मुले घरी असतात. बऱ्याच वेळा ही मुले एकटी म्हणजे कोणत्याही पालक किंवा नातेवाईक यांच्याशिवाय राहत असतात. काही मुले त्यांच्या आजी-आजोबा किंवा दुसरे कोणी नातेवाईक असतील तर त्यांच्याकडे जातात किंवा नातेवाईक या मुलांसोबत राहण्यासाठी यांच्या घरी येतात. या मुलांसोबत काम करताना पुढीलपैकी समस्या दिसून आल्या.

**अ) सगळ्यात मोठ्या मुलाला / मुलीला भूमिका स्वीकारावी लागते** – मोठ्या मुलाला किंवा मुलीला आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करण्यासाठी ही भूमिका घ्यावी लागते. मग तिचे वय १० वर्षं असो किंवा लहान असो वा मोठे असो. त्याला आपल्या छोट्या बहीण-भावाची काळजी घेण्यासाठी मोठ्या माणसाची भूमिका निभावावी लागते. त्याला अंघोळ घालणे, शाळेसाठी तयार करणे, जेवण बनवणे, घरामध्ये काय आहे काय नाही हे पाहणे, घरातील सगळी कामे करणे, हा सगळा खर्च भागवण्यासाठी पैशाची व्यवस्था पाहणे किंवा करणे, त्याचबरोबर स्वत:ची काळजी घेणे, वरील सगळे करून स्वत: शाळेत जाणे, आईला कारागृहामध्ये जाऊन भेटणे, तिच्या न्यायालयीन कामाकरता पोलीस, वकील यांना भेटणे व त्यांचे निरोप आईला देणे. या व्यतिरिक्तही खूप काही या मुलांना करावे लागते.

**आ) निवाऱ्याची भीती** – आमच्या आतापर्यंतच्या अनुभवातून दिसून आले आहे की बहुतेक मुले ही भाडे तत्त्वावर राहत आहेत. त्यामुळे आई कारागृहामध्ये गेल्यानंतर घराचे भाडे भरणे या मुलांना शक्य नसते. त्यामुळे घरमालक या मुलांना घर खाली करायला सांगतात. काही केसेसमध्ये स्वत:चे घर असले तरी मुले राहू शकत नाहीत. कारण शेजारी, विभागामधील लोक त्रास देऊ लागतात.

**इ) आर्थिक त्रास** – घरातील कमवणारी व्यक्ती नसल्याने तसेच आर्थिक बाबतीत मुलांचा सहभाग नसल्याने या मुलांना, आई कारागृहामध्ये गेल्यानंतर खूप त्रास सहन करावा लागतो. घरातील जेवणाचा खर्च, वीजबिल, पाणीबिल, अचानक येणाऱ्या आजारामुळे दवाखान्याचा, औषधाचा खर्च, शाळेसाठी लागणारा खर्च, आईला भेटण्यास जाण्याचा खर्च, वकील यांना द्यावी लागणारी फी, हे आणि बरेच काही. या सगळ्यांसाठी पैशाची व्यवस्था करणे खूप अवघड असते. नातेवाईक यांच्यापासून दूर असतात. जवळ असले तरी कोणत्याही प्रकारची मदत करण्यास तयार नसतात.




(त्यांच्या मते किती वेळा मदत करायची? आम्हाला पण मुले आहेत, कुटुंब आहे असा विचार नातेवाईक करतात.) काही मुलांच्या बाबतीत तर त्यांचे नातेवाईक त्यांच्याच घरी येऊन राहतात आणि हळूहळू संपत्तीवर हक्क दाखवतात.

ई) **कागदपत्रे हरवणे किंवा नसणे** – आमच्या अनुभवामधून असे दिसून आले आहे की बहुतेक मुलांकडे घरातील कागदपत्रे नसतात. म्हणजे आईने कुठे ठेवले आहेत हे माहीत नसते किंवा बनवलेलेच नसतात. तर कधी कधी मुलांकडूनही गहाळ होतात. कारण आईकरता न्यायालयीन आणि पोलीस कारवाईसाठी कागदपत्राची गरज असते. जसे रेशन कार्ड, आधार कार्ड, जन्म दाखला इत्यादी.

उ) **नैराश्य** – बहुतेक वेळा अशी मुले ही नैराश्यामध्ये गेलेली दिसून आली आहेत. आई कारागृहात गेल्यानंतर नातेवाईक, शेजारी यांचे टोचणारे बोल, पोलीस, वकील, आर्थिक विवंचना, शाळेत होणारा अपमान, शिक्षण सुटणे अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागल्याने मुले नैराश्याने ग्रासली जातात आणि याचा परिणाम त्यांच्या मानसिक आणि शारीरिक पातळीवर दिसू लागतो. परिणामी मुले आजारी पडू लागतात किंवा व्यसनाधीन होण्याची शक्यता निर्माण होते.

ऊ) **कुटुंब विखुरणे** – आईच्या कारागृहामध्ये जाण्याने कुटुंब विखुरले जाते. काही नातेवाईक घरातील मुलांना आपल्या घरी घेऊन जातात, पण ते सर्व मुलांना घेऊन न जाता कोणत्या तरी एकाच मुलाला घेऊन जातात. त्यामुळे मुले वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या नातेवाइकांकडे जातात. तसेच काही केसेसमध्ये मुले प्रत्यक्ष घटनेची साक्षीदार असल्याने या मुलांना पोलिसांमार्फत संस्थेमध्ये ठेवले जाते.

३) **आई कारागृहामध्ये असताना संस्थेमध्ये असलेली मुले** – काही केसेसमध्ये मुले ही घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार असतात अशा वेळी पोलीस या मुलांना संस्थेमध्ये ठेवतात किंवा जर पोलिसांच्या लक्षात आले की घरी या मुलांचा सांभाळ करणारे कोणी नाही अशा मुलांनादेखील पोलीस संस्थेमध्ये दाखल करतात किंवा आईने काही कारणाने मुलांना संस्थेमध्ये ठेवलेले असते. काही केसेसमध्ये आई मुलाला घेऊन कारागृहामध्ये आलेली असते आणि कारागृह नियमावलीनुसार मुले ६ वर्षांपर्यंत आईसोबत कारागृहामध्ये राहू शकत असल्याने, मूल ६ वर्षांचे झाल्यानंतर या मुलाला घरी सांभाळणारे घरी कोणी नसेल किंवा कोणते नातेवाईक या मुलाला घरी घेऊन जाण्यास तयार नसेल अशा मुलाला संस्थेमध्ये ठेवावे लागते. मुले संस्थेमध्ये सुरक्षित ठिकाणी असली तरी त्यांचेही काही प्रश्न, समस्या समोर आल्या आहेत.

अ) **भावंडांची ताटातूट** – कधी कधी दोनपेक्षा जास्त मुले असल्याने किंवा मुलगा आणि मुलगी असल्याने मुलांना वेगवेगळ्या संस्थेमध्ये ठेवावे लागते. अशा वेळी भावंडे एकमेकांना भेटू शकत नाहीत आणि त्यांची मन:स्थिती बिघडते. ते एकटे एकटे राहू लागतात. एकलकोंडे होतात.

आ) **संस्थेमधील मुलांची आईसोबत भेट होत नाही.** महाराष्ट्र सरकारने एक अध्यादेश दिलेला आहे की परिविक्षा अधिकारी यांनी ही भेट दर तीन महिन्यांनी घडून आणावी, पण यावर अंमल होत नाही. (ज्या जिल्ह्यांमध्ये संस्था आहेत त्यांनी जर याचा पाठपुरावा केला तरच वर्षातून एखादी भेट होते.)

इ) **संपत्तीवरील हक्क जाणे** – बऱ्याच केसेसमध्ये दिसून आले आहे की जेव्हा

आई कारागृहामध्ये जाते आणि मुले संस्थेमध्ये जातात अशा वेळी यांचे राहते घर किंवा जी इतर संपत्ती असेल ती नातेवाईक किंवा शेजारी हडप करतात. आणि जेव्हा ही मुले आणि आई संस्थेमधून, कारागृहामधून बाहेर येतात तेव्हा त्यांना ही संपत्ती ताब्यात घेण्याकरता खूप त्रास होतो.




वरील तिन्ही गटांमध्ये मुलांच्या समस्या या वेगवेगळ्या आहेत त्यामुळे या तिन्ही गटांसोबत काम होणे गरजेचे आहे. मूलभूत गरजा भागवणे खूप कठीण होत आहे. आम्ही अशा शाळादेखील पाहिल्या आहेत ज्या या मुलांना शाळेत प्रवेश देत नाहीत. फी भरू शकत नाही, हे कारण तर असतेच, पण आई कारागृहामध्ये आहे यामुळे बाकीच्या मुलांवर परिणाम होईल हे त्यांचे महत्त्वाचे कारण असते. तसेच आम्ही शाळेची फी भरू लागलो तर मागील वर्षांची थकलेली फीसुद्धा घेतात. आणि आता या कोविड काळामध्ये तर या शाळांनी त्यांची पूर्ण लॉकडाऊनची २ वर्षांची फी भरायला सांगितली आहे, आम्ही इतकी फी भरू शकत नसल्याचे सांगितले तर त्या एका मुलीचा शाळेचा दाखला आणि निकालही दिला नाहीये.

ही मुलेसुद्धा समाजाचे, देशाचे भविष्य आहेत. आईवडिलांनी केलेली चूक ही मुले भोगत असतात. यामध्ये यांचा काय दोष आहे? समाज आणि सरकारच्या नजरेत ही मुले अजून येत नाहीयेत. त्याचे कारण की या मुलांचा आकडा समोर येत नाही. कारण ही मुले अदृश्य आहेत. (कारण आई कारागृहात आहे हा या मुलांवर डाग आहे असे मानले जाते. त्यामुळे समाजासमोर ही मुले खूप कमी येतात. ज्याप्रमाणे अनाथ मुले, एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह मुले समाजासमोर दिसून येतात, त्याप्रमाणे ही मुले समाजामध्ये दिसून येत नाहीत. त्यामुळे यांचा आकडा नेमका किती आहे हे सांगणे कठीण आहे.) कोणत्याही सरकारी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी प्रयत्न केला तर ही मुले कोणत्या वर्गवारीमध्ये येतात हे आधी विचारले जाते. या मुलांना सरकारी योजनांचा लाभ मिळावा याकरता सरकारी कर्मचारी, अधिकारी यांची सकारात्मक भूमिका असणे गरजेचे आहे. सर्व जण नियमांवर बोट दाखवतात. (या मुलांचा उल्लेख कुठे आहे ते दाखवा, असे म्हणतात.) यामुळे यांच्या समस्या सरकारपर्यंत पोहचण्यास त्रास होतो, कारण सरकारला काही योजना किंवा सुविधा द्यायची असेल तर त्यासाठी त्यांना मोठा आकडा दिसावा लागतो. पण या मुलांबाबत आकडा नेमका सांगू शकत नाही.

या मुलांसोबत काम करणाऱ्या संस्थाही खूप कमी आहेत. ज्या व्यक्ती / कुटुंबासोबत गुन्हा घडला आहे त्यांच्याबद्दल सहानुभूती मनामध्ये असते. पण जर पालकाने गुन्हा केला किंवा घडला आहे त्यामध्ये या मुलांचा दोष काय आहे? ही मुलेदेखील उद्याचे भविष्य आहेत. यांचीदेखील दुसऱ्या मुलांइतकीच सरकारची जबाबदारी आहे. समाज म्हणून आपलीदेखील काही जबाबदारी आहे.

आम्ही आता पाहत आहोत की थोडीफार मदत केल्याने बरीच मुले त्यांचे शिक्षण घेऊ लागली आहेत. काही मुले घरातील काम करून बाहेरही कामे करत आहेत आणि रात्री शाळेत जात आहेत. यावर्षी आमची काही मुले बारावीची परीक्षा पास झाले आहेत. त्यातील एक मुलगा नेव्हीमध्ये जाण्याची तयारी करू लागला आहे. तो आता मर्चंट नेव्हीची ऑफिसर पदाची परीक्षा देत आहे. तर एक मुलगा हॉटेल व्यवस्थापनाच्या कोर्सला प्रवेश घेत आहे. तर एका मुलीने नर्सिंगचा फॉर्म भरला आहे. जी मुले दहावी पास झाली आहेत त्यांनी पुढील शिक्षणाकरता वेगवेगळ्या कॉलेजमध्ये डिग्रीकरता किंवा कोर्सकरता प्रवेश घेतला आहे.

या मुलांना मदतीचा हात मिळाला तर हीदेखील पुढे जातील. याकरता सगळ्यांनीच मदत केली पाहिजे. यामध्ये आपली म्हणजे समाजाची काही जबाबदारी आहे का आणि ती कोणती व किती आहे? सरकारची जबाबदारी कोणती आणि किती आहे? हा विचाराचा मुद्दा आहे आणि यावर विचार नक्कीच होणे गरजेचे आहे. तुम्ही सगळे ह्याचा अंतर्मुख होऊन विचार कराल आणि सकारात्मक पाऊल उचलाल ह्याची खात्री आहे. ■



## जन्मठेप

जन्मठेप शिक्षा भोगत
तिरडीवर जिवंत जाणं
अशा तिरडीवर बांधणारे बहू
पण सोडवणारे क्वचितच आहेत रे
कुणी शब्दांच्या प्रेमाची बेडी घालतो
कोणी शत्रू बळाचा उपयोग करतो
लोखंडी गजाआड नेऊनी ठेवती
क्षणात घात करून ठेवती
गुन्हा स्वत:च करून आव आणतात
समाजनेत्याचे सोंगही घेतात
धन, दौलत, न्याय तंत्राच्या हातात
बेड्या मात्र निरपराधांच्या हातात
खोटे साक्षीदार खरे ठरतात
नोटांचे बंडल काळ्या कोटांच्या खिशात
निरपराधी येती कारागृहात
अपराधी राहती समाजात

**रवींद्र संतोष बनसोडे**
औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह
श्री. उत्तम कांबळे संपादित
*'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून*

## नि:शब्द

कधी, कधी खूप काही सोसावं लागतं
व्यक्त कराव्या वाटतात भावना
पण नि:शब्द होऊन बसावं लागतं
कधी कधी खूप काही सोसावं लागतं
हातात बेड्यांचं बंधन
ओठांवर नियमांचा बांध
आणि तू म्हणतेस कविते
फाटकं आयुष्य सांध
असू दे ठिगळांची साथ
सोसेन मी हाही आघात
पण त्यासाठी नात्याच्या
विणेनं तरी घट्ट असावं लागतं.
व्यक्त कराव्या वाटतात भावना
नि:शब्द होऊन बसावं लागतं
विस्कटले स्वप्न सारे
राख झाली भावनांची
आशा निराशेच्या हिंदोळ्यावर
तगमग ही जगण्याची
दु:खावर घालून पांघरूण
अश्रू भरल्या नयनांनी
येथे हसावं लागतं
व्यक्त कराव्या वाटतात भावना
पण नि:शब्द होऊन बसावं लागतं
कधी, कधी खूप काही सोसावं लागतं

**राहुल मारुती मोरे**
सी-४५९ येरवडा ओपन प्रिझन, पुणे.
श्री. उत्तम कांबळे संपादित
'गजाआडच्या कविता' या कवितासंग्रहातून



# Madhya Pradesh Central Bank SC/ST/OBC Karmchari Kalyan Sangh, Bhopal Zone

[ Affiliated to All India Central Bank SC/ST/OBC Employees Welfare Federation (New Delhi) ]

**With Warm Greetings and Best Wishes on the Ocassion of Publication of Diwali Issue On Movment of Positivity by Dnyaneshwar Mulay Foundation.**

Many congratulations for commencing 'Movement of Positivity'. This kind of Social activity will be connecting wonderful persons for noble social cause and for spreading peace and happiness amongst our Indian society. This social connect will support to synchronise the social harmony in diversified practices and culture adopted in our country. We strongly believe that it is very positive, forward and progressive initiative taken by Dr. Dnyaneshwar Mulay Foundation for preserving the liberty, equality and fraternity of the democratic system, provided in the Constitution of our beloved country. We highly appreciate the most genuine subject ‘Jails & prisoners Life’ for this Diwali Anka 2022, which will definately help in bringing a positive transformation in the Society. We trust these efforts which will throw a light on completely neglected element that is ‘Prisoners’ by our society and will help to promote the value of ‘Human Rights’ reflected in the emergence of responsible and compassionate citizenry in India resulting in creation of a strong India.

*With Best wishes and Regards*



Shri. Prakash Gunjiyal (Chairman)



Shri. Avinash Bansode (President)



Shri. Lalit Tanwar (Acting General Secretary)



Shri. Santosh Kamble (Working President - Bhopal Unit)



Mrs. Ruby Waikar (Treasurer)

# सायबरस्पेस व गुन्हेगारी

**ॲड. वैशाली भागवत**
सिव्हिल व सायबर लॉयर

**सायबर गुंडगिरीची काही सामान्य प्रकरणे म्हणजे अपमानित करण्यासाठी किंवा शारीरिक लाज वाटेल अशा अश्लील टिपण्या लिहिणे किंवा अश्लील फोटो वा लैंगिक प्रतिमा तयार करण्यासाठी फोटो शॉपद्धारे चित्रे तयार केली जातात तसेच अपमानित करण्यासाठी किंवा ट्रोल करण्यासाठी मीम्स तयार केली जातात. याचा वापर त्या व्यक्तीचा छळ करण्यास केला जातो.**

गुन्हेगारांना वेगवेगळ्या गुन्ह्यांकरिता शिक्षा व कारावास भोगावा लागतो. त्यातील एक म्हणजे सायबर क्राइम. माहिती तंत्रज्ञान हे जसे प्रगतीसाठी वरदान आहे तसे काही वेळा ते शापही ठरू शकते. सध्या सायबर क्राइमचे प्रमाण खूप वाढलेले आहे. जसे इतर कैद्यांना त्यांच्या गुन्ह्याच्या तीव्रतेनुसार शिक्षा भोगाव्या लागतात, त्याचप्रमाणे या कैद्यांनादेखील शिक्षा होतात. दुर्दैवाने सर्वसामान्य माणसांना त्याविषयी फार कमी माहिती असते.

ऑनलाइन करण्यासारख्या बऱ्याच गोष्टी आहेत. हे लक्षात घेता, २०२१च्या इंटरनेट वापराच्या आकडेवारीचे अनेकांना आश्चर्य वाटू शकेल. इंटरनेट वापरकर्ते दररोज सरासरी ६ तास ५६ मिनिटे ऑनलाइनवर घालवतात. एखाद्याला असेही वाटेल की शहरी लोक ग्रामीण लोकांपेक्षा संगणक आणि स्मार्टफोनचा वापर अधिक करतात. पण सर्वेक्षणात असे निदर्शनास आले आहे की २०२१मध्ये शहरी भागातल्या २९.४ कोटी इंटरनेट वापरकर्त्यांच्या तुलनेत ग्रामीण भारतात ३५.२ कोटी इंटरनेट वापरकर्ते होते. बँडविड्थची वाढती उपलब्धता, परवडणारे डेटा प्लॅन आणि डिजिटल इंडिया मोहिमेंतर्गत विविध सरकारी उपक्रमांमुळे ग्रामीण इंटरनेट प्रवेशातील ही उडी होती. डिजिटल इंडिया हा भारत सरकारचा एक प्रमुख कार्यक्रम आहे. ज्यामध्ये भारताला डिजिटली सशक्त समाजात आणि ज्ञानाच्या अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याच्या दृष्टिकोनातून डिजिटल पेमेंट, ई-कॉमर्स, ई-शिक्षण आणि सरकारी सेवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध करून देणे हे आहे. २०२१ पर्यंत भारतात इंटरनेटचा वापर जवळपास ५१% टक्क्यांवर पोहोचला आहे.
(स्रोत *Statista. com*)

त्यामुळे आपण आता संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन आणि टॅब्लेट यांसारख्या विविध उपकरणांसह इंटरनेटचा व्यापक वापर करून नेटिझन्स झालो आहोत. आपण या जागेला - 'सायबरस्पेस' म्हणू या - जिथे लोकांची ई-मेल खाती, सोशल मीडिया खाती, डिजिटल पेमेंट खाती, ब्लॉग, आभासी ओळख आहेत. प्रश्न असा आहे की, सायबरस्पेसमधील धोके याबद्दल आपल्यापैकी कोणाला किती माहिती आहे, सायबरस्पेसमध्ये सुरक्षित कसे राहायचे आणि आपण सायबर गुन्ह्याचा बळी झाल्यास मदतीसाठी कुठे जायचे?

या लेखात मी या प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करेन जेणेकरून तुमचा सायबरस्पेस प्रवास सुरक्षित, संस्मरणीय आणि आनंददायी होईल.



**सायबर धोके**

सायबरस्पेस ही एक अशी जागा आहे जिथे माणसे एकमेकांशी संवाद साधतात आणि व्यवहार करतात आणि म्हणून जसे वास्तविक जगात आपल्याला भेटणारे चांगले आणि वाईट लोक असतात तसेच आभासी जगात चांगले आणि वाईट लोक असतात. किंबहुना सायबरस्पेस ऑफर करत असलेली अनामिकता ही वाईट प्रवृत्तीच्या लोकांना सायबरस्पेसमध्ये गुन्हेगारी कृती करण्यास अधिक आकर्षित करते. त्यामुळे सायबरस्पेसमध्ये सुरक्षित राहण्यासाठी, त्यातील जोखीम आणि गुन्हे समजून घेणे आवश्यक आहे ज्यामध्ये योग्य काळजी न घेतल्यास एखादी व्यक्ती अडकू शकते किंवा निष्पाप बळी जाऊ शकते.

सायबरस्पेस ही अशी जागा आहे जिथे सायबर गुन्हेगार, व्यक्ती किंवा संघटित गट असू शकतात. प्रगत तंत्रज्ञान आणि बोलण्याचे कौशल्य वापरून गळाला लागलेल्या व्यक्तींची पैशांसाठी फसवणूक करतात किंवा राजकीय सूड अथवा वैयक्तिक सूड घेण्यासाठी त्यांचा छळ करतात किंवा महिला आणि मुलांचा लैंगिक छळ करतात.

**सायबर क्राइमचे मुख्यत्वे आढळून येणारे पाच प्रकार पाहू.**

सायबर गुन्हेगार संगणकांना व्हायरस, मालवेअर किंवा स्पायवेअरने संक्रमित करू शकतात ज्यामुळे डिव्हाइसेस (संगणक, लॅपटॉप, स्मार्टफोन आणि टॅब्लेट) यांचे नुकसान होऊ शकते, डेटा खराब होऊ शकतो किंवा अनधिकृत प्रवेश (ॲक्सेस) मिळवू शकतो. सायबर गुन्हेगारदेखील सामान्यत: ओळख लपवून किंवा खोट्या ओळखीखाली काम करतात आणि फिशिंग हल्ल्यांद्वारे पीडितांना अडकवतात.

**१. आर्थिक फसवणूक किंवा डिजिटल पेमेंट फसवणूक**

बहुतेक आर्थिक फसवणूक ओळख चोरी, फिशिंग किंवा विशिंग हल्ले किंवा ई-मेल स्कॅमद्वारे केली जाते. फिशिंग ई-मेल हे स्पॅम ई-मेल असतात. जे प्राप्तकर्त्यांना 'मोफत' या शब्दाचे आमिष देऊन भुरळ घालतात आणि प्राप्तकर्त्याला दुव्यावर (लिंक) क्लिक करण्यास किंवा अटॅचमेंट डाउनलोड करण्यास भाग पाडतात जेणेकरून गुन्हेगार आयडी आणि पासवर्डसारखी मौल्यवान माहिती चोरू शकेल आणि नंतर बँक खात्यांमधून पैसे काढण्यासाठी त्यांचा वापर करू शकेल.

ओळख चोरीचे एक सामान्य उदाहरण म्हणजे जेव्हा लोक सोशल मीडिया प्लेटफॉर्मवर किंवा डेटिंग साइट्सवर महिलांना लग्नाचे आमिष दाखवण्यासाठी बनावट प्रोफाइल बनवतात आणि शेवटी त्यांची फसवणूक करतात आणि निष्पाप पीडितांकडून पैसे उकळतात.

आर्थिक फसवणुकीचा आणखी एक प्रकार सीईओ ई-मेल फसवणूक किंवा व्यवसाय ई-मेल घोटाळे या नावाने प्रसिद्ध आहे. जेथे एखाद्या कर्मचाऱ्याला त्याच्या बॉसकडून त्वरित पैसे हस्तांतरित करण्यास सांगणारा ई-मेल येतो. कर्मचारी सामान्यत: अशा ई-मेलवर विश्वास ठेवतो आणि फसवणूक करणाऱ्यांच्या खात्यात पैसे हस्तांतरित करतो.

पेमेंट फसवणुकीचे आणखी एक सामान्य उदाहरण म्हणजे अलीकडील वीज घोटाळा. जिथे एखाद्याला संदेश मिळतो की 'हा संदेश वीज विभागाचा आहे. तुमचे सध्याचे वीज बील भरलेले नाही आणि तुम्ही तात्काळ रक्कम न भरल्यास तुमचे कनेक्शन कापले जाईल. तुमचा वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी कृपया या नंबरवर कॉल करा.' तुम्ही या नंबरवर कॉल केल्यानंतर, फसवणूक करणाऱ्याला पैसे देण्यासाठी तुमच्यावर दबाव आणला जातो.

बऱ्याच वेळा लॉगिन आयडी आणि पासवर्ड चोरला गेल्यामुळे इंटरनेट बँकिंग करताना फसवणूक होऊ शकते आणि ग्राहक त्याच्या बँक खात्यातून पैसे गमावतो.

**२. रॅन्समवेअर हल्ले**

एक सामान्य मालवेअर हल्ला जो ठरावीक संगणकावरील सर्व डेटा एन्क्रिप्ट करतो आणि नंतर गुन्हेगार डिक्रिप्शन की देण्यासाठी खंडणी मागतो. अनेक लहान-मोठ्या व्यवसायांना रॅन्समवेअर हल्ल्याचा फटका बसला आहे. पहिला अहवाल २०१७ मध्ये WannaCry रॅन्समवेअर हल्ला म्हणून ओळखला गेला होता. WannaCry हे रॅन्समवेअर होते ज्याने मायक्रोसॉफ्ट विंडोज चालवणाऱ्या कॉम्प्युटरमधील असुरक्षिततेला लक्ष्य केले होते. यूजर्सचे संगणक लॉक केले गेले आणि पुन्हा प्रवेश मिळवण्यासाठी Bitcoin मध्ये खंडणीची मागणी करणारा संदेश पाठवला गेला.

**३. सायबर गुंडगिरी**

हा ऑनलाइन रॅगिंगचा एक प्रकार आहे जिथे मुलांचा ऑनलाइन छळ केला जातो. अलीकडील अहवालानुसार भारतातील दोन तृतीयांश (६६%) तरुणांना सायबर गुंडगिरीचा अनुभव आला आहे. ३६% तरुणांना स्वत:ला सायबर धमकी दिली गेली आहे. ज्यांनी प्रतिसाद दिला त्यांच्यापैकी ४६% मुलांनी प्रतिसाद दिला की दिसण्यामुळे त्यांचे bullying झाले, तर ४५% मुलांनी त्यांच्या बुद्धिमत्तेच्या पातळीमुळे असे उत्तर दिले. ४०% मुलांच्या मते धर्म / वंश हा प्रेरक घटक होता व त्यावरून त्यांना चिडवले गेले व मानसिक त्रास दिला गेला. अभ्यासातून असे दिसून आले आहे की सायबर गुंडगिरी



तरुणांसाठी एक गंभीर समस्या दर्शवत आहे. सर्वेक्षणात असेही आढळले आहे की ५७% तरुणांना ऑनलाइन छळ किंवा धमकावले गेल्यास काय करावे हे नीट माहीत नसते.

सायबर गुंडगिरीची काही सामान्य प्रकरणे म्हणजे अपमानित करण्यासाठी किंवा शारीरिक लाज वाटेल अशा अश्लील टिपण्या लिहिणे किंवा अश्लील फोटो वा लैंगिक प्रतिमा तयार करण्यासाठी फोटो शॉपद्वारे चित्रे तयार केली जातात तसेच अपमानित करण्यासाठी किंवा ट्रोल करण्यासाठी मीम्स तयार केली जातात. याचा वापर त्या व्यक्तीचा छळ करण्यास केला जातो.

विशिष्ट वंश, रंग, लिंग इत्यादी लोकांना लक्ष्य करण्यासाठी द्वेषगट (हेटग्रुप्स) तयार करणे.

**४. छेडछाड (Sextortion)**

जेव्हा एखादी व्यक्ती लैंगिक स्वरूपाची मागणी मान्य करत नसेल किंवा पैसे देऊ करत नसेल तेव्हा गुन्हेगार व्यक्तीने सोशल मीडियावर किंवा खाजगी व्हॉट्सॲप ग्रुपवर लैंगिक फोटो किंवा मजकुरासह खाजगी आणि संवेदनशील सामग्री वितरित करण्याची धमकी देणे तेव्हा त्याला ऑनलाइन लैंगिक शोषण झाले असे म्हणतात.

हनीट्रॅप - बरेचदा सायबर फसवणूक करणारे गुन्हेगार श्रीमंत वृद्ध पुरुषांकडून खंडणीसाठी नवीन पद्धती वापरत आहेत. फसवणूक करणारे प्रथम त्यांचे लक्ष्य काळजीपूर्वक निवडतात आणि नंतर व्हॉट्सॲपवर पुरुषांशी संबंध ठेवण्यासाठी मुलींचा वापर करतात. कॉलपासून सुरुवात करून, संभाषण हळूहळू मेसेज पाठवणे आणि व्हिडिओ चॅटिंगमध्ये बदलते. पुढे, व्हिडिओ चॅट रेकॉर्ड केल्या जातात आणि पुरुषांना ब्लॅकमेल करण्यासाठी प्रौढ क्लिपमध्ये मॉर्फ केले जातात. आरोपींनी त्यांच्या व्हॉट्सॲप डीपीमध्ये स्वत:ला पोलीस असल्याचे खोटे सांगितले जाते. व्हिडिओतील मुलींनी आत्महत्या केल्याचा खोटा दावा करून ते त्यांच्या कथनात खरेपणा दाखवण्यासाठी आत्महत्येचे प्रसंगही रचतात. पैसे न दिल्यास मॉर्फ केलेले व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल केले जाते. दुसऱ्या एका प्रकरणात, पीडितेला व्हॉट्सॲपवर छळ आणि मानसिक आघाताचा हवाला देत क्लिपमधील महिलेसाठी १ कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी करणारी बनावट पोलीस नोटीसदेखील पाठवण्यात आली होती. वरील दोन्ही घटनांमध्ये पीडितांनी पोलिसांकडे जाण्यापूर्वी ७-८ लाख रुपयांची उधळपट्टी केली होती.

**५. रिव्हेंज पोर्न (Revenge Porn)**

डिजिटल गैरवर्तनाचा आणखी एक प्रकार तुम्ही कदाचित ऐकला असेल तो म्हणजे असहमती पोर्नोग्राफी, ज्याला रिव्हेंज पोर्न व्हिडिओंचे डिजिटल वितरण समाविष्ट आहे. याला 'बदला' पोर्न म्हटले जाते कारण अशा प्रकारचे फोटो किंवा व्हिडिओ बरेचदा बदला म्हणून किंवा वर्तमान किंवा पूर्वीच्या पार्टनरकडून ब्लॅकमेल करण्यासाठी वापरले जातात.

वर सूचीबद्ध केलेल्या गुन्ह्यांव्यतिरिक्त कॉपीराइट आणि ट्रेडमार्क उल्लंघन, बेकायदेशीर जुगार आणि गेमिंग, बेकायदेशीर वस्तूंची ऑनलाइन विक्री, क्रिप्टोकरन्सी किंवा ब्लॉकचेन फसवणूक, लैंगिक शोषणासाठी महिला आणि मुलांची ऑनलाइन तस्करी, अवयव कापणी यासारखे इतर किंवा अधिक अत्याधुनिक गुन्हे आहेत.

**सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे**

आता तुम्हाला सायबर धोके आणि सायबर गुन्ह्यांचे प्रकार समजले आहेत. सायबरस्पेसमध्ये सुरक्षित राहण्यासाठी येथे काही सामान्य टिप्स आहेत.

इंटरनेटवर कोणताही व्यवहार करताना सावध आणि सतर्क राहणे ही सर्वांत महत्त्वाची सूचना आहे. अनोळखी लोकांवर विश्वास ठेवू नका. विश्वासार्हता नसलेल्या अविश्वसनीय साइट्स किंवा ई-कॉमर्स साइट्सवर कोणतेही आर्थिक व्यवहार करू नका. फसवणूक करणारे बळी शोधत आहेत.

दुसरी महत्त्वाची टीप म्हणजे तुमची संगणक प्रणाली सुरक्षित, अणि मालवेअरपासून मुक्त ठेवणे.

तुमची सॉफ्टवेअर आणि ऑपरेटिंग सिस्टीम अद्ययावत ठेवणे ज्यामुळे तुम्हाला तुमच्या कॉम्प्युटरचे संरक्षण करण्यासाठी नवीन सुरक्षा पॅचचा फायदा होतो.

अँटी-व्हायरस सॉफ्टवेअर वापरणे आणि ते अद्ययावत ठेवणे ज्यामुळे तुमची संगणक प्रणाली व्हायरस आणि मालवेअरने संक्रमित होणार नाही याची खात्री होते.

सहज ओळखता येणार नाही असा पासवर्ड वापरणे ज्यामुळे हॅकर्स तुमचा पासवर्ड तोडू शकत नाहीत आणि अनधिकृत प्रवेश मिळवू शकत नाहीत.

स्पॅम ई-मेलमध्ये अटॅचमेंट उघडू नये. मालवेअर अटॅक आणि इतर प्रकारच्या सायबर गुन्ह्यांमुळे संगणक संक्रमित होण्याचा अधिक संभव असतो आणि हे टाळण्याचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे तुम्हाला माहीत नसलेल्या प्रेषकाकडून आलेल्या ई-मेलची अटॅचमेंट कधीही उघडू नका.

स्पॅम ई-मेल किंवा अविश्वासू वेबसाइट्समधील लिंकवर क्लिक करू नका.

खात्री असल्याशिवाय वैयक्तिक माहिती देऊ नका. ईमेल सुरक्षित असल्याची तुम्हाला पूर्ण खात्री असल्याशिवाय फोनवर किंवा ई-मेलद्वारे वैयक्तिक डेटा कधीही देऊ नका. तुम्ही खरोखर त्याच व्यक्तीशी बोलत आहात याची खात्री करा.

तुम्ही कोणत्या वेबसाइट URL ला भेट देता याची काळजी घ्या. तुम्ही क्लिक करत असलेल्या URLवर लक्ष ठेवा. ते कायदेशीर दिसतात का? अपरिचित दिसणाऱ्या URLसह लिंकवर क्लिक करणे टाळा.

तुमच्या बँक स्टेटमेंटवर लक्ष ठेवा आणि बँकेतील कोणत्याही अपरिचित व्यवहारांची चौकशी करा. त्यांची फसवणूक झाली आहे का याचा तपास बँक करू शकते.

येथे काही अतिरिक्त टिप्स दिल्या आहेत.

**सुरक्षित इंटरनेट बँकिंगसाठी टिप्स :**

अ) एक स्ट्राँग पासवर्ड तयार करा. तुमचा बँकिंग पासवर्ड तुम्ही सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल मालमत्तेसाठी वापरत असलेल्या इतर कोणत्याही पासवर्डसारखा नसावा.

ब) असे खाते किंवा बँक निवडा जे दोन किंवा मल्टीफॅक्टर ऑथेंटिकेशनसह खातेसुरक्षा देते.

क) मालवेअर हल्ल्यांपासून तुमच्या संगणकाचे संरक्षण करा.

ड) तुमच्या बँकेतील तुमच्या खात्यात प्रवेश करण्यासाठी ई-मेल कोणत्याही लिंकवर क्लिक करू नका.

इ) बँकिंग APP वरून खाते ऍक्सेस केले जात असल्यास सुरक्षित संगणक किंवा सुरक्षित मोबाइल फोनचाच वापर करा.

**नेट वापरताना मुलांना सुरक्षित ठेवण्यासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी**

तुमच्या मुलाला कितीही राग येत असला तरीही पालकांनी मुलाच्या तंत्रज्ञानाच्या वापरावर लक्ष ठेवणे महत्त्वाचे आहे. तुम्ही पुढील गोष्टी करू शकता -

अ) तुमच्या मुलाला त्याच्या बेडरूममध्ये लॅपटॉप किंवा टॅबलेट वापरण्याची परवानगी देण्याऐवजी संगणक तुमच्या घराच्या दर्शनी भागात ठेवा जेणेकरून तुम्ही त्याच्या वापरावर सहज नजर ठेवू शकता.

आ) तुमच्या मुलाच्या स्मार्ट फोनचा डेटा वेबवर सर्फ करण्यासाठी वापरत असल्यास त्यावर मर्यादा घाला.

इ) तुमच्या मुलाच्या संगणकावर फिल्टर सेट करा. ट्रॅकिंग सॉफ्टवेअर अनुचित वेब सामग्री अवरोधित करू शकते आणि आपल्या मुलाच्या ऑनलाइन वापराची तपासणी करण्यात मदत करू शकते.

ई) तुमच्या मुलाचे पासवर्ड जाणून घेण्याचा आग्रह धरा आणि मुले ऑनलाइन आणि टेक्स्ट मेसेज संदेशांमध्ये वापरत असलेले सामान्य शब्द जाणून घ्या.

उ) तुमचे मूल कोणाशी ऑनलाइन संवाद साधते ते जाणून घ्या. तुमच्य मुलाचे ॲड्रेस बुक आणि त्याच्यासोबत इन्स्टंट मेसेंजर 'बडी लिस्ट' वर जा. प्रत्येक व्यक्ती

कोण आहे आणि तुमचे मूल त्यांना कसे ओळखते ते विचारा.

ऊ) तुमच्या मुलाला धमकी देणारे संदेश मिळाल्यास त्याला तुमच्याशी अथवा एखाद्या विश्वासू प्रौढ व्यक्तीशी मोकळेपणाने बोलण्यास प्रोत्साहित करा. जर त्याला सायबरबुलीजकडून लक्ष्य केले गेले असेल तर मुलाला आश्वासन द्या की असे केल्याने त्याचे संगणक किंवा सेल फोन काढून घेतले जाणार नाहीत.

तुमच्या सर्व प्रयत्नांनंतरही तुम्ही सायबर गुन्ह्याचे बळी ठरलात तर तुम्ही काय कराल? तपासासाठी आणि आवश्यक कारवाईसाठी सायबर गुन्ह्याची पोलिसांकडे तक्रार करणे हा सर्वोत्तम मार्ग आहे.

वरील विवेचनावरून आपल्या लक्षात आले असेलच की सायबर क्राइम हा इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्टखाली दखलपात्र गुन्हा आहे. तसेच इंडियन पिनल कोड अंतर्गत पण दखलपात्र गुन्हा आहे. गुन्ह्यांच्या तीव्रतेनुसार तीन वर्षे ते पाच वर्षे शिक्षा होऊ शकते.

सायबर गुन्ह्याची तक्रार कशी करावी?

अहवाल देण्यासाठी सर्वांत महत्त्वाची टीप आहे - जलद कृती करा आणि गुन्हा नोंदवा.

तसेच सर्व पुरावे जपून ठेवावेत. कोणत्याही गप्पा, संदेश, ई-मेल इत्यादी हटवू नका. तारीख आणि टाइम स्टॅम्पसह स्क्रीन शॉट्स घ्या.

जरी जटिल गुन्ह्यांसाठी अधिक तपशीलवार अहवाल आवश्यक असला तरी, येथे पाच सोपे मार्ग आहेत ज्याद्वारे तुम्ही सायबर गुन्ह्याची तक्रार करू शकता.

१. जवळच्या पोलीस ठाण्यात जा आणि तक्रार नोंदवा. सर्व समर्थन पुरावे द्या जसे की स्क्रीन शॉट्स घ्या.

२. तुम्ही २४*७ चालणाऱ्या राष्ट्रीय हेल्पलाइन नंबर '१९३०' वर डायल करून कोणत्याही प्रकारच्या सायबर गुन्ह्याची तक्रार करू शकता. (पूर्वी ही संख्या १५५२६० होती)

३. तुम्ही महाराष्ट्राचे रहिवासी असाल, तर तुम्ही खालीलपैकी कोणतेही तपशील वापरून पोलिसांची संपर्क साधू शकता.

**MAHARASHTRA**

Grievance Officer
Landline Number - 022-22160080
Email ID - ig.cbr-mah@gov.in

**PUNE**

- WhatsApp / Phone numbers - 7058719375 / 7058719371
- Pune City Police Women Helpline - 1091
  Address - Revenue Colony, Shivaji Nagar, Pune, Maharashtra 411005
- Cyber Police Station, Pune City
  Landline Number - 020-29710097
  Email ID - crimecyber.pune@nic.in
  Address - Near Police Headquarter, Police Ground, Shivaji Nagar, Pune City - 411005
- Pimpri-Chinchwad Cyber Cell
  Landline Number - 020-27350939
  Email ID - cybercell.pcmc-mh@mahapolice.gov.in
  Address - Premlok Park, Behind SKF Company, Chinchwad
- Pune Rural (Gramin) Cyber Cell
  Landline Number - 020-25654616
  Email ID - cybercell.pnr@mahapolice.gov.in
  Address - Pashan Road, Near Rural SP Office, Pune

**MUMBAI**

- Landline Number - 022-26504008
  Email ID - cyberpst - mum@mahapolice.gov.in
  Address - Cyber Police Station, Crime Branch, C.I.D. Mumbai 1st Floor, Bandra Kurla Complex, Police Sation. B.K.C, Bandra (E), Mumbai 400051.

४. तुम्ही www.cybercrime.gov.in या नॅशनल सायबर क्राईम पोर्टलवरदेखील सायबर गुन्ह्याची तक्रार करू शकता.

५. फेसबुक, यूट्यूब, ट्विटर किंवा इंस्टाग्राम यांसारख्या घटना ज्या साइटवर घडल्या त्या साइटवर तुम्ही गुन्हा नोंदवू शकता. ते वापरकर्त्यांना त्यांच्या समुदाय मार्गदर्शक तत्त्वांनुसार आक्षेपार्ह किंवा अश्लील सामग्री काढून टाकण्याचे आदेश जारी करणे यासारखी तातडीची पावले उचलू शकतील.

तुम्ही सायबर क्राइमचे बळी असाल तर घाबरू नका. तातडीच्या कारवाईसाठी बँका, क्रेडिट कार्ड कंपन्या, मोबाइल नेटवर्क कंपन्या किंवा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म यांसारख्या सेवा प्रदात्यांसह योग्य अधिकाऱ्यांकडे शक्य तितक्या लवकर त्याची तक्रार करा. गुन्ह्याचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्यास किंवा नुकसानीचे प्रमाण लक्षणीय आणि आवर्ती असल्यास कायदेशीर सल्ला घ्या.

# या परिस्थितीला जबाबदार कोण?

**विकास कदम**
**सामाजिक कार्यकर्ता, प्रयास - टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा प्रकल्प**

त्या दिवशी सकाळी सगळे जण त्याच्याभोवती जमा झाले आणि एका मागोमाग एक प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. ''सर, आप मेरे घर गये थे क्या?'', ''मेरे घरवाले सब कैसे हैं?'', ''मेरे कोर्ट के तारीख का क्या हुआ?'', ''सर, मेरा वकील तारीख पर नहीं आया?'' अशा एक ना अनेक प्रश्नांची सरबत्ती सुरू होती. पण तो शांतपणे प्रत्येकाशी त्याचे समाधान होईपर्यंत बोलत होता. दोन तास बोलून झाल्यावर आता नवीन लोक त्याच्याभोवती जमा झाले आणि विनंती करू लागले, ''जरा माझ्या घरी जाल का? माझी आई आजारी होती तिची काहीच खुशाली समजली नाही.'' एकजण आला, ''सर, मला घरून कोणी भेटायला येत नाही.''

त्याची सविस्तर माहिती लिहायला घेतली. तर सांगणाऱ्याच्या डोळ्यांची धार कमी होत नव्हती, शब्द फुटत नव्हते. कसाबसा बोलत होता. त्याच्या दिसण्यावरून तरी तो बऱ्या घरातला दिसत होता, शिकलेलासुद्धा वाटत होता. थोडा संवाद साधल्यावर तो म्हणाला, ''मला येथे येऊन तीन महिने झाले, पण माझे घरचे मला भेटायला कोणी आले नाही. मला थोडी काळजी वाटते. त्यांचे काही बरे-वाईट तर नसेल ना झाले? मला वाटते त्यांनी मला येथून बाहेर जायला काही मदत केली नाही तरी चालेल पण त्यांची खुशाली मला एकदा कळावी.''

पुढे त्याने सांगितले की, त्याचे एका मुलीवर खूप प्रेम होते, त्याच्या विभागातच ती राहत होती. याला पक्की नोकरी नव्हती आणि मुलगी ११वीत शिकत होती. तिच्या घरच्यांना माहिती मिळाली की, आम्ही जातीतले नव्हतो त्यामुळे ते अधिकच चिडले होते. त्यांनी मुलीला मामाच्या गावी पाठवले. तिने आमच्या ग्रुपमधल्या एका मैत्रिणीला फोन करून सांगितले की, तिचे लग्न ठरवत आहेत. मग ती परत घरी मुंबईत आली, तेव्हा सोडणार नाही अशी धमकी दिली, त्यामुळे मी तिच्यासह पोलीस स्टेशनला हजर झालो. पोलिसांनी मला खूप मारले, तेव्हा ती सांगत होती.... पण तिचे कोणीच ऐकले नाही. आणि माझ्यावर गुन्हा दाखल झाला. ती अल्पवयीन असल्यामुळे तिला घरी पालकांच्या ताब्यात दिले. पण मला मात्र बलात्कार, अपहरण अशा केसमध्ये अडकवले आहे. तीन महिने झाले मला येऊन. त्याने विचारले, ''मग तू इतका वेळ का लावलास मला सांगायला'', तर तो म्हणाला, ''एक तर मी खूप घाबरून गेलो होतो. जेलमध्ये आल्यापासून मला इथले अन्नपाणी गोड लागत नाही. आमच्या एरियातला एकजण भेटला तो म्हणाला, इथे

**यातून कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवून ठेवणे हेदेखील अतिशय महत्त्वाचे काम आहे. अनेकदा अधिकाऱ्यांची बदली होते, नवीन अधिकारी येतात त्यांना सगळ्या कार्याची पुनः माहिती द्यावी लागते. 'प्रयास'चे कार्य कायद्याच्या चौकटीत बसू शकते. परंतु कधी कधी शासकीय अनास्थेचे परिणाम दिसून येतात. संस्था चालविण्यासाठी संसाधनांची आवश्यकता असते, ते मिळविणे एक अतिशय कठीण काम आहे.**





सोशल वर्कर येतात त्यांना भेट ते तुला नक्की मदत करतील.'' म्हणून मग आज तो सामाजिक कार्यकर्त्याला भेटला आणि त्याने त्याची व्यथा त्यांना सांगितली. त्या कार्यकर्त्याने त्याला धीर दिला आणि आश्वासित केले की, तो त्याच्या घरी जाऊन माहिती घेईल.

असे एक ना अनेक युवक कारागृहामध्ये खितपत पडलेले आढळतात. कधी कधी कळत-नकळतपणे चूक झालेली असते. कधी कायदाच माहीत नसतो आणि रेल्वे रूळ ओलांडताना पोलिसांनी पकडलेले असते. एकजण गाडी चालवायची हौस, पण घ्यायची ऐपत नाही, फक्त गाडी उचलायची, पेट्रोल असेपर्यंत चालवायची. जिथे पेट्रोल संपेल तिथेच सोडून द्यायची अशा गुन्ह्यात अडकलेला.

१८ ते २३ वयोगटातील हे युवक, सामान्यपणे करिअरचे स्वप्न पूर्ण करायचे वय, तर हे या दुष्टचक्रात अडकले आहेत. काहीजण शिकलेत, १०वीपर्यंत का होईना गेले होते शाळेत. काही चांगले कलाकार आहेत. काहीजणांकडे चांगले कामाचे कौशल्य आहे. पण यांना चांगली दिशा मिळाली नाही, तरुण वयात सळसळत्या रक्ताला योग्य मार्गदर्शनाची जोड मिळाली नाही त्यामुळे हा तरुणवर्ग वाममार्गाला लागला. एका टप्प्यापर्यंत त्यांचे पालक प्रयत्न करतात त्यांना पोलिसांपासून सोडवूनही आणतात. परंतु काही मुले या दुष्टचक्रात अशी काही अडकतात की त्यांना सांभाळणे त्यांच्या पालकांच्या आवाक्यात राहत नाही. मग त्यांचादेखील नाइलाज होतो. तेसुद्धा एकटे पडतात. मुलांचे अवगुण, व्यसनाधीनता, पोलिसांचा ससेमिरा, वकिलांची न परवडणारी 'फी', कामाचे खाडे, आणि पदोपदी अपमान, अवहेलना, समाजाची जळजळीत नजर अशा परिस्थितीपुढे ते लाचार झालेले असतात.

अशा वेळी काही सामाजिक संस्था 'विशेष प्रावीण्य' असलेल्या संस्था या युवकांना सुधारण्यासाठी धडपड करीत असतात. संस्थेचे कार्यकर्ते नियमित कारागृहात युवा बंदींच्या बराकीत जातात. तेथे त्यांच्याबरोबर विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विश्वास संपादन करतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ते त्यांना विविध सेवा पुरवतात आणि त्याद्वारे त्यांच्या परिवारापर्यंत पोहोचण्याचे कार्य या संस्था करीत असतात.

'प्रयास'ही अशीच एक संस्था. १९९० साली 'टाटा सामाजिक विज्ञान' संस्थेच्या प्राध्यापिका डॉ. सरनोबत सहानी ह्यांना 'कारागृहातील बंदिस्त महिलांच्या समस्यांचा मागोवा' घेत असताना ही संकल्पना सुचली. त्यांनी विद्यार्थी सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून या समस्येच्या खोलात शिरून त्याचे निराकरण करण्याचा चंगच बांधला आणि त्यातून प्रयास संस्थेच्या कार्याला सुरुवात झाली.

सुरुवातीला एक पूर्णवेळ कार्यकर्ता हाताशी घेऊन त्यांनी या कार्याचा शुभारंभ केला. सुरुवातीला कारागृहात येणाऱ्या प्रत्येक युवा बंदीला सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे आणि त्याला समाजाकडे बोट दाखवण्याचे कारण मिळू नये 'की, मला योग्य वेळी संधी मिळाली नाही किंवा मला कोणी मदत केली नाही, म्हणून मी असा आहे!' असे खापर दुसऱ्यावर फोडण्यापेक्षा आम्ही ती संधी म्हणून तुमच्यासमोर उभे आहोत आणि तुम्हाला समाजात परतण्याचे मार्ग आम्ही खुले करू. या सद्भावनेने कार्याची सुरुवात केली. ते करीत असताना अनेक अडचणी आल्या आणि अनेक हातदेखील मदतीकरिता पुढे आले. त्यात प्रामुख्याने महाराष्ट्र राज्य कारागृह विभागाने दाखविलेला विश्वास, मुंबई पोलीस, विधी आणि न्याय विभाग न्यायालये आणि सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि त्यांच्या इतर ट्रस्टी यांनी 'प्रयास'च्या कामाच्या उभारणीच्या कालावधीत केलेले योगदान विसरणे केवळ अशक्य. डॉ. अरमायथी देसाई यांचे सहकार्य आणि मार्गदर्शन अतिशय मोलाचे ठरले. या धुरीणांच्या विश्वासामुळे 'प्रयास'च्या कार्याला गती मिळाली. अनेक छोटे छोटे अभ्यास करीत 'प्रयास'च्या कार्याचा पाया भक्कम होत गेला. त्यावेळचे पोलीस अधिकारी श्री. रामचंद्रन, श्री. इनामदार, श्री. अहमद, श्रीमती मीरा बोरवणकर, मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश मा. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी या कार्याच्या वृक्षाची खूप मन:पूर्वक आणि नि:स्वार्थपणे जोपासना केली. त्यांनी वेळोवेळी केलेल्या सूचना, मार्गदर्शन यामुळे प्रयासकडून कधीही चुका झाल्या नाहीत.

न्यायव्यवस्था, कारागृह, पोलीस आणि न्यायालये यांच्याबरोबर कार्य करीत असताना शासकीय व्यवस्थेत राहून व्यवस्थेबरोबर समन्वयाने कार्य करण्याचे धोरण प्रयासने

जोपासले. त्यामुळे शासकीय व्यवस्था, अधिकारी यांच्यामध्ये विरोधाभास नसतो. त्यांच्यात लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी एकवाक्यता असते. म्हणजे 'प्रयास'ची समज अशी आहे की, गुन्हेगारी विश्व आणि त्यात अडकलेले लोक, त्यांच्या समस्या या अतिशय क्लिष्ट आणि गंभीर स्वरूपाच्या आहेत. या सोडविण्यासाठी एक अधिकारी, एक शासकीय विभाग, एक सामाजिक कार्यकर्ता अथवा एखादी संस्था पुरेशी नाही. याकरिता अतिशय व्यापक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे, अतिशय व्यापक प्रयत्न आणि खूप साधन संपत्तीची, मनुष्यबळाचीही आवश्यकता आहे. त्यामुळे व्यवस्थेत एखादी दुर्घटना घडली तर एखाद्या व्यक्तीला जबाबदार ठरवून शिक्षा देऊन प्रश्न सुटणार नाही. त्याचा सामोपचाराने सांगोपांग विचार करून दूरदृष्टीने निर्णय घेणे, कार्यक्रम आखणे आवश्यक आहे.

सध्या 'प्रयास'चे कार्य महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, औरंगाबाद, नाशिक आणि नागपूर या जिल्ह्यातील कारागृहामधील महिला आणि युवा विभागात सुरू आहे. या उपक्रमांतर्गत बंदींकरिता समुपदेशन मार्गदर्शन, विधी सेवा आणि सहाय्यता, गृहभेटी, कौशल्य प्रशिक्षण, जन जागरूकता कार्यक्रम, नागरिकता अधिकार माहितीसत्र आणि काही ठिकाणी रोजगार उपलब्ध कार्यक्रमाचे प्रयोग सुरू आहेत. यावेळी परिवारास भेटी दिल्यावर अत्यावश्यक सेवा, वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात.

बंदी कारागृहातून मुक्त झाल्यावर त्याला समाजातील मुख्य प्रवाहात सामील होताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते त्यावेळी 'प्रयास' त्या व्यक्तीला पुनः स्वबळावर उभे



राहण्यासाठी सर्वतोपरी मदत करते. त्यांचे अपूर्ण राहिलेले शिक्षण पूर्ण करणे, प्रमाणपत्र कौशल्य विकास कार्यक्रमास जोडणे, नोकरीसाठी प्रयत्न करणे. त्यांच्या परिवारास पुनः विश्वास देऊन परिवाराबरोबर जोडण्याचे कार्य प्रयास करीत आहे. गुन्हेगारी आणि न्यायव्यवस्थेच्या संपर्कात आल्यामुळे बंदींना एक प्रकारच्या बदनामीला सामोरे जावे लागते. समाजात धुळीला मिळालेली पत परत मिळवण्यासाठी यांना खूप कष्ट सोसावे लागतात. या त्यांच्या लढ्यात 'प्रयास' त्यांना उभे राहण्यासाठी मदत करते.

हे अतिशय जिकिरीचे आणि दीर्घ काळ चालणारे कार्य आहे. या प्रक्रियेमध्ये गळतीचे प्रमाणदेखील आहे. यातून कार्यकर्त्यांचे मनोबल टिकवून ठेवणे हेदेखील अतिशय महत्त्वाचे काम आहे. अनेकदा अधिकाऱ्यांची बदली होते, नवीन अधिकारी येतात त्यांना सगळ्या कार्याची पुनः माहिती द्यावी लागते. 'प्रयास'चे कार्य कायद्याच्या चौकटीत बसू शकते. परंतु कधी कधी शासकीय अनास्थेचे परिणाम दिसून येतात. संस्था चालविण्यासाठी संसाधनांची आवश्यकता असते, ते मिळविणे एक अतिशय कठीण काम आहे. विविध बंदिस्त संस्थांमधून सुटणाऱ्या मुक्त बंदींचे पुनर्वसन होणे ही समाज स्वास्थ्याच्या दृष्टीने काळाची गरज असून अतिशय महत्त्वाचे आहे. हे सगळे लोक आपल्या समाजामधूनच निर्माण झालेले आहेत. त्यास आर्थिक, सामाजिक, मनोवैज्ञानिक असे विविध पैलू आहेत. त्यामुळे समाजाने म्हणजेच रूढ अर्थाने शासनाने त्यांच्या पुनर्वसनाकरिता एक सर्वसमावेशक योजना तयार करणे आवश्यक आहे. याकरिता डॉ. विजय राघवन, 'प्रयास'ची टीम टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने काम करीत आहेत. हे करीत असताना 'प्रयास' हे कधीच विसरत नाही की कोणीही व्यक्ती जन्मतः गुन्हेगार नसते त्याला मिळणारी संधी, त्याच्या आसपासचा परिसर आणि असे अनेक घटक त्यास कारणीभूत असतात. त्यामुळे आपल्याला त्याच्या सवयींना बदलायचे आहे. त्या व्यक्तीला बदलायचे आहे. जसे महात्मा गांधींनी म्हटले आहे की, कारागृहातील बंदी हा एका आजारी व्यक्तीसारखा आहे, कारागृह हे रुग्णालय आहे आणि त्यात काम करणारे कर्मचारी हे रुग्ण सेवक आहेत तर त्यांना आजारातून बरे करण्यासाठी उपचारांची गरज आहे. ते कार्य 'प्रयास' करीत आहे.

गुन्हेगारांना पाठीशी घालणे, पाठिंबा देणे त्यांना केवळ कारागृहातून सोडवणे असे प्रयासचे उद्दिष्ट मर्यादित स्वरूपाचे नाही. त्या व्यक्तीस पुनः गुन्हा करण्यापासून परावृत्त करणे अशा व्यापक प्रतिबंधात्मक दृष्टिकोनातून प्रयास मागील ३३ वर्षांपासून समाजात आपले कर्तव्य पार पाडत आहे. हा भगीरथाचा रथ आहे तो ओढण्यास अनेक हातांची गरज आहे. ■

# रिमांड होम? छे छे बालगृह...

**दलितमित्र प्रा. साधना झाडबुके**
सामाजिक कार्यकर्त्या

**रिमांड होम म्हटले की असे वाटते की जी मुले गुन्हेगार आहेत, आई-वडिलांचे ऐकत नाहीत, व्रात्य, उनाड आहेत त्यांना तिथे ठेवले जाते. म्हणजेच लहान मुलांची कैद. पण रिमांड होम हा शब्ददेखील कायद्याने काढून टाकला आहे.**

रात्रीचा साडेदहाचा सुमार. दारावरची बेल ७-८ वेळा वाजली आणि त्या आवाजाने माझी लहान रेणु दचकून जागी झाली. पोलीस वेळी-अवेळी केसेस घेऊन येतात. पण त्यांच्या वागण्यात आदब असते. मी बाहेरचा कानोसा घेतला. बायकांचा व पुरुषांचा आवाज जोरजोराने येत होता. एक तरुण बाई, छातीवर हात बडवून जोरजोराने रडत होती. शिव्या देत होती. रेणुला सांभाळणारी सुनिता सांगू लागली की, ''बाई, बाहेर फार गोमगाला झालंय.'' मी दरवाजा उघडून बाहेर आले तेवढ्यात त्या जोरजोराने रडणाऱ्या बाईने अस्सल कोल्हापुरी शिवी देऊन मला चकितच केले. मी तिला काय झाले असे विचारताच ती म्हणाली, ''माझ्या बोबड्या पोपटाला तुम्ही तुरुंगात का ठेवले? माझा राघू रस्ता चुकला, २-३ दिवस आम्ही त्याला शोधतोय. आता पोलीस स्टेशनला जाऊन आलो. त्यांनी सांगितले की त्या झाडबुक्की बाईने त्याला रिमांड होममधे ठिवलंय! माझ्या पोपटाने काय गुन्हा केला हो? म्हणून त्याला तुम्ही तुरुंगात ठेवला? तो बोबडा हाय हो, पत्ता त्याला सांगाय येत नाही, म्हणून त्याला तुरुंगात ठेवताय व्हय?'' तिच्या बरोबर असणाऱ्या तीन-चार बायका आणि डोळे लाल झालेले दांडगे ८-१० पुरुष अगदी कोल्हापुरी भाषेत मला शिव्या देत होते. मनातून मला त्यांच्यापेक्षा पोलिसांचा राग आला होता. कारण त्यांना त्यांचा मुलगा बाईंनी रिमांड होममध्ये ठेवला आहे आणि त्याला लगेच सोडता येणार नाही असे पोलिसांनी सांगितल्याने त्या सर्वांचा राग माझ्यावर होता.

मी शांतपणे सगळे ऐकून घेतले. त्या सर्वांना सोफ्यावर बसवून थंड पाणी दिले. त्यांच्या रागाचा पहिला तडाका निघून गेल्यावर मी त्यांना सांगितले, ''तुमचा मुलगा रस्ता चुकला होता, त्याला पत्ता सांगता येत नव्हता. उपाशीच १-२ दिवस हिंडत असताना पोलिसांनी त्याला माझ्याकडे आणले व माझ्या आदेशाप्रमाणे त्याला सध्या बालगृहात (निवारागृह) ठेवले आहे. तो पूर्णपणे सुरक्षित असून त्याला जेवणखाण, त्याचे संगोपन व्यवस्थित चालले आहे. तुम्ही काळजी करू नका. उद्या त्याचा जन्मदाखला, तुमच्याबरोबरचा एखादा फोटो व इतर काही संबंधित कागदपत्रे असतील तर बरोबर घेऊन या. मी त्याला लगेच तुमच्या ताब्यात देते. काळजी करू नका.'' हे ऐकले तरी ती बाई 'त्याला तुरुंगात का ठेवले?' हाच प्रश्न वारंवार विचारत होती. त्यांच्याबरोबर आलेला बहुतेक नगरसेवक असावा. त्याने मध्यस्थी केली. म्हणाला, ''ताई सांगतात ते बरोबर आहे. उद्या जाऊ या त्या पाण्याच्या खजिन्याजवळ. तिथेच मुलाला ठेवले असणार. पूर्वी तिथेच त्या मुलांबरोबर माझा वाढदिवस करून जेवण दिले होते.'' माझ्यापेक्षा त्यांना नगरसेवकाचे म्हणणे पटले. तरी पोपटच्या आईच्या शिव्या चालूच होत्या. जाता-जाता नगरसेवकाने हात जोडून मला राजकीय नमस्कार केला. बाहेरच्या खोलीतील कर्मवीर अण्णांचा मोठा हार घातलेला फोटो त्यांनी बघितला व प्रश्न केला, ''ह्यांचा फोटो तुमच्या घरी कसा काय?'' मी सांगितले, ''हे अण्णा माझ्या वडिलांचे मोठे भाऊ होते.'' हे ऐकताच नगरसेवकाने जो मोठा 'आ' पसरला आणि बरोबरीच्या सगळ्यांना डोळे वटारून हाताने 'चूप बसा' असा सल्ला दिला व दोन्ही हात जोडून अण्णांना नमस्कार केला व सर्व निघून गेले.

वरील प्रसंग पहिलाच नव्हे. १९८९ साली कोल्हापूरच्या 'बाल कल्याण मंडळाची अध्यक्षा' म्हणून माझी नियुक्ती हायकोर्टाकडून झाली. महाराष्ट्रातील बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम १९८६ नुसार महाराष्ट्रातील माझी पहिलीच नियुक्ती होती. कायदा नवीन होता. पोलीस,

बालगृह, निवारागृह, निरीक्षणगृह येथे काम करणाऱ्या सर्वांना याची फारशी कल्पना नव्हती. हळूहळू सर्वांना कायद्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पण पोलिसांना मात्र या कायद्याविषयी फारसे प्रशिक्षण देण्यात आले नाही. त्यामुळे नाशिक पोलीस ट्रेनिंग कॉलेज, यशदा मीडिया येथे या कायद्याविषयी मी पोलिसांना प्रशिक्षण दिले. पण अजूनही 'रिमांड होम' हाच शब्द अजून रूढ आहे असे दिसते.

जवळजवळ १० ते १२ वर्षे मी बाल कल्याण मंडळाची अध्यक्षा म्हणून 'विनामानधन' प्राध्यापक पदाची नोकरी सांभाळून काम केले. असंख्य अडचणी आल्या. फोन नाही, पोलिसांचे प्रोटेक्शन नाही, हाताखाली कारकून नाही, रात्री-अपरात्री पोलीस मुलांना घेऊन यायचे -- कधी कधी नुकतीच जन्मलेली बालके, हातापायाला मुंग्या लागलेली बालके, कधी कधी तरुणपणी भावनेच्या आहारी गेलेल्या मुली, बालकामगार, भिकारी, सावत्र बापाने खूप मारून संस्थेसमोर आणून टाकलेली बालके, अनौरस अनैतिक संबंधातील मुले. अनेक दुःखद अनुभव पण त्याच मुलांचे पुनर्वसन झाल्यावर मिळणारा आनंद वेगळाच.

रिमांड होम म्हटले की असे वाटते की जी मुले गुन्हेगार आहेत, आई-वडिलांचे ऐकत नाहीत, व्रात्य, उनाड आहेत त्यांना तिथे ठेवले जाते. म्हणजेच लहान मुलांची कैद. पण रिमांड होम हा शब्ददेखील कायद्याने काढून टाकला आहे.

बाल न्याय कायदा १९८६ नुसार दुर्लक्षित मुले म्हणजेच १८ वर्षे आतील बालके जी उनाड, व्रात्य, अनाथ, भिखारी, अनैतिक संबंधातून जन्मलेली, चुकलेली मुले की ज्यांच्या काळजी व संरक्षणाची गरज आहे अशा मुला-मुलींना वरील कायद्यानुसार संरक्षणासाठी तात्पुरते, निवारागृहात ठेवले जाते.

१९८६ पूर्वी मुंबई मुलांचा कायदा होता. त्यानुसार १४ वर्षांचे आतील मुलाला बालक म्हणायचे. तसेच मद्रास मुलांचा कायदा होता. वेगवेगळ्या राज्यात बालकांसंबंधी वेगवेगळे कायदे होते व बालकाच्या वयातही तफावत होती. त्यामुळे १९८६ साली 'बाल न्याय कायदा' अस्तित्वात येऊन त्याची अंमलबजावणी झाली. हा केंद्रीय कायदा असून या कायद्याने १८ वर्षांचे आतील बालक अशी व्याख्या केली असून रिमांड होम हा शब्द काढून टाकला आहे. या कायद्याचे एकूण तीन आधारस्तंभ आहेत. १) बाल कल्याण मंडळ, २) बाल पोलीस दल, ३) बाल न्यायालय.

**बाल कल्याण मंडळ** – पोलीस, सोशल वर्कर, पालक, स्वयंसेवी संस्था, एखादी व्यक्ती, चुकलेल्या, दुर्लक्षित मुलाला बाल कल्याण मंडळासमोर सादर करते. बाल कल्याण मंडळ मुलांची अनौपचारिक मुलाखत घेऊन तेथील प्रोबेशन ऑफिसरला बालकाची संपूर्ण चौकशी करून अहवाल १५ दिवसांचे आत सादर करण्यास सांगते. मुलाच्या संरक्षणासाठी त्याला तात्पुरते निवारागृहात ठेवण्यात येते. तेथे त्याला खाण्या-पिण्याच्या व इतर सर्व सोयी उपलब्ध करून देण्यात येतात. संपूर्ण चौकशीअंती मुलाला बाल कल्याण मंडळाच्या आदेशानुसार पालकांच्या ताब्यात देण्यात येते, पण चौकशीअंती असे सिद्ध झाले की पालक मुलाला ताब्यात घेण्याच्या लायकीचे नाहीत, पालकांचा शोध लागत नाही, बालकाला पुन्हा आहे त्या वातावरणात सोडले तर मूल बिघडण्याची शक्यता आहे, अशा वेळी बालकाला वयाच्या १८व्या वर्षापर्यंत बालगृहात ठेवले जाते. जेथे त्याच्या निवारा, शिक्षण, संगोपनाची सर्व सोय केली जाते.

बाल कल्याण मंडळाची एक अध्यक्ष म्हणजे ज्याला या कायद्याचे ज्ञान, अनुभव आहे अशी व्यक्ती व त्यास मदत करण्यास दोन व्यक्ती अशा नेमणुका केल्या जातात. त्यापैकी एक डॉक्टर व एक सोशल वर्कर अशी रचना असते. या सर्वांना फर्स्ट क्लास ज्युडिशियल मॅजिस्ट्रेटच्या पॉवर्स असतात.

**बाल पोलीस दल** – जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी बाल पोलीस दल कार्यरत असून या दलातील प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याला 'बाल न्याय कायदा'८६ चे पूर्ण प्रशिक्षण दिलेले असून बालकांशी त्यांची वर्तणूक कशी असावी, बाल मानसशास्त्र यांचे ज्ञान दिलेले असते. तसेच प्रत्येक पोलीस स्टेशनला एका पोलीस अधिकाऱ्याला बालकांसंबंधी सर्व व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी दिलेली असते.

पोलिसांनी बालकाला बाल कल्याण मंडळासमोर किंवा निवारागृहात सोडताना सिव्हिल ड्रेसवर असणे, बालकाला मारहाण करणे, हातकड्या घालणे, काढण्या बांधणे यास मनाई असून बालकाला पोलिसाने ताब्यात घेतल्याबरोबर २४ तासांचे आत बाल कल्याण मंडळासमोर हजर करणे आवश्यक आहे. पालकांना वकील नेमावयाचा असेल तर त्यासाठी बाल कल्याण मंडळाची पूर्वसंमती आवश्यक असून तशी संमती दिल्यास वकिलांनी सिव्हिल ड्रेसमध्ये येणे बंधनकारक आहे. बाल कल्याण मंडळासमोरील सर्व काम अनौपचारिक पद्धतीने चालते.

**बाल न्यायालय** – ज्या बालकाच्या हातून समाजविघातक कृत्य घडलेले आहे त्यास बालगुन्हेगार मानले जाते. पोलिसांनी अशा बालकाच्या बाल न्यायालयासमोर हजर करून बालकाच्या हातून कोणते समाजविघातक कृत्य केव्हा, कसे, का घडले याचा सविस्तर अहवाल सादर केल्यानंतर बाल न्यायालय त्याचे संरक्षणासाठी प्रथम त्यास निरीक्षणगृहात ठेवून,




पोलीस व प्रोबेशन ऑफिसरला संपूर्ण चौकशी अहवाल सादर करण्याचा आदेश देते. संपूर्ण चौकशीअंती बालक आहे त्या परिस्थितीतच पुन्हा पालकांकडे सोपविल्यास भविष्यकाळात तो गुन्हेगार होण्याची शक्यता असल्यास अशा बालकाला वयाचे १८ वर्षापर्यंत विशेष गृहामध्ये कमिट करून त्याला शिक्षण, व्यवसाय कौशल्याचे ज्ञान दिले जाते. परंतु अशा मुलाचा फोटो, नाव, गाव प्रसारमाध्यमांकडे देऊ नये असे कायदा म्हणतो. कारण समाजविघातक कृत्य करण्यासाठी बालक स्वत: जबाबदार नसून तो ज्या परिस्थितीत वाढतो, त्याच्यावर जे संस्कार होतात ते कारणीभूत असल्याने त्यास शिक्षा न देता सुधारण्याची संधी दिली जाते.

१९८६च्या बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमामध्ये २०१५ साली काही बदल करण्यात आले. या कायद्यानुसार बालकाचे वय १८ असून बालगुन्हेगार म्हणण्याऐवजी विधीसंघर्षग्रस्त बालक असे म्हणावे व त्यासंबंधी केसेस या बाल न्याय मंडळासमोर येतील जेथे प्रिन्सिपल मॅजिस्ट्रेट व त्यास साहाय्य करण्यासाठी दोन व्यक्ती असतील. त्यापैकी समाजकार्याचे प्रशिक्षण घेतलेली एक व्यक्ती व दुसरी सोशल वर्कर, डॉक्टर किंवा बालमानसशास्त्राचा अभ्यास असणारी व्यक्ती असेल.

तसेच काळजी व संरक्षणाची गरज असणारी बालके (बालविवाहित, अनाथ, दुर्लक्षित, बालकामगार, भिकारी) बाल कल्याण समिती समोर येतील व त्यांची पूर्ण चौकशी होईपर्यंत बालगृहात राहतील. चौकशीअंती पालक योग्य असल्यास पालकांकडे सुपूर्द केले जातील. बाल कल्याण समितीमध्ये एक अध्यक्ष व चार सदस्य असतील.

एकूणच कायद्याचे संपूर्ण ज्ञान घेता लहान मुलांना तुरुंगात न ठेवता किंवा रिमांड होममध्ये न ठेवता सुधारण्याची संधी, संरक्षण, पालनपोषण बालगृहात केले जाते. सकाळी ५॥ ते ६॥ अंघोळ, ७॥ वाजता नाश्ता - पोहे / उप्पीट / इडली, १ वाजता जेवण. त्यानंतर संस्थेबाहेरील शाळेत शिक्षण, संध्याकाळी ५॥ ते ६॥ खेळ, ७॥ वाजता जेवण, ९॥ पर्यंत अभ्यास अशी बालकांची दैनंदिनी असते. सर्व सण, मुलांचे वाढदिवस, रक्षाबंधन, भाऊबीज, सहल, शाळेतील सर्व खेळांमध्ये सहभाग अशा गोष्टींचा अंतर्भाव त्यात असतो. त्यामुळे बालक संस्थेमध्ये राहणे म्हणजे तुरुंगात राहणे हा गैरसमज काढून टाकावा यासाठी हा लेखनप्रपंच. म्हणूनच बालगृह म्हणजे रिमांड होम किंवा तुरुंग नव्हे, तर बालकाला भारताचा जबाबदार नागरिक बनण्याची योग्य संधी.


IN CONVERSATION
WITH
HAPPINESS!
Kaishori Prangan
S. No. 42, Near Dnyandeep School,
Manaji Nagar, Narhe, Pune- 41.
Showrooms, Shops,
1, 2 & 3 BHK Luxurious Flats.
Call : 8956695761, 8956695762
Deveshwar Tekadi
S. No. 1/1/1A/1, Bhilarewadi,
Katraj, Pune- 411046.
Showrooms, Shops,
1 & 2 BHK Luxurious Flats.
Call : 8956695764, 8956695765
Vyomkesh
S. No. 72, Off Sinhgad Road,
Near Bangalore- Mumbai Bypass,
Vadgaon (kh), Pune- 411058.
Shops,
1 & 2 BHK Luxurious Flats.
Call : 8010639913
Navjyot Abha
S. No. 150 & 151, Lane No. 27A,
Dhayri, Pune- 411041.
Shops,
2 BHK Luxurious Flats.
Call : 9011433233,8530433331,
8010642238
Best Locations & Smart Planning
Festival Wishes by
सुमेरु समूह
आम्ही घरे करतो
Corporate off. : S. No. 150 & 151, Lane No. 27A, Dhayri, Pune- 41.
(T): 020-24395454, 020-24395656.
Mumbai off. : Off. No. 403, Costa Rica, Plot No. 1 & 2,
Sector-18, Sanpada Palm Beach Road, Navi Mumbai- 400705.
sales@sumerugroups.com
www.sumerugroups.com

# कारागृह पर्यटन : एक महत्त्वाकांक्षी योजना

**महादेव गायकवाड**
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे - कार्यवाह

**कितीतरी जेलमध्ये आता अभ्यास करण्यासाठी, परीक्षा देण्यासाठी, वाचनालयांची वगैरे व्यवस्था केली जात आहे. शिवाय त्यांच्याकडून सामाजिक कार्यासाठी, लघुउद्योगासाठी कामकाजाची व्यवस्था केली जाते. कित्येक कैद्यांच्या कलागुणांना जाणून कामे करून घेतली जातात. जेलमधील कैद्यांमध्ये सामाजिक परिवर्तन होऊन त्यांनी गुन्हेगारी मार्ग सोडून मुख्य सामाजिक प्रवाहात सामील व्हावे, यासाठी तुरुंग प्रशासनातर्फे विविध उपक्रम राबवले जातात. परंतु काही कैद्यांमध्ये सुधारणा होत नाहीत. ते पुन्हा पुन्हा गुन्हा करतात आणि आपला मार्ग सोडत नाहीत.**

आपल्या देशात महाभारताच्या काळापासूनच कारागृह या शब्दाचा उल्लेख आढळून येतो. पुरातन काळातील कौटिल्य अर्थशास्त्रात द्रव्य दंड भरू न शकणाऱ्या गुन्हेगारांना 'बंधन वाड्या'त ठेवण्यात यावे, असा आदेश राजदरबारात होत असल्याचा शास्त्रात उल्लेख आहे. त्या काळातील सामाजिक व्यवस्था परंपरागत चालत आलेल्या शास्त्रानुरूप होती, असा उल्लेखही आहे. ऐतिहासिक काळातील कारागृहाबद्दल अनेक उदाहरणे आहेत. आधुनिक भारतातील कारागृहाची रचना पाश्चिमात्य धर्तीवर उभारण्यात आली आहे. इंग्लंडमध्ये गुन्हेगारांना सुनावणीपूर्वी मुदतीत बंदिस्त ठेवण्यासाठी कारागृहाचा उपयोग केला जात असे. अशा प्रकारचा उपयोग बाराव्या शतकापासून करण्यात येऊ लागला. अकराव्या पोप क्लेमेंट ह्याने पहिले कारागृह सन १७०३ साली रोम येथे सुरू केले. प्रत्येक कैद्याला इतरांपासून वेगळे व एकांतवासात ठेवून त्याच्याकडून शारीरिक कष्टाची भरपूर कामे करून घेण्याची प्रथा अठराव्या शतकात पुढे आली होती.

सर्वसाधारण कारागृह किंवा तुरुंग या देशात असंख्य आहेत. बहुतेक राज्यांत खुली कारागृहे आहेत. महाराष्ट्रात तीन खुली कारागृहे आहेत. त्यातील एक मराठवाड्यातील पैठण येथे आहे. कैद्यांना शारीरिक कष्टदायक काम द्यावे या उद्देशाने पाटबंधारे खात्यातील जायकवाडी प्रकल्पाची कामे देण्यात आली होती. कैद्यांना, गुन्हेगारांना अति कष्टाची कामे देऊन त्यांना जरब बसवावी व अद्दल घडवावी, म्हणजे त्याने पुन्हा गुन्हा करू नये, हा यामागचा उद्देश होता. पूर्वी पुराणात, ऐतिहासिक काळात राजे महाराजे गुन्हेगारांना विहिरीवरील मोट ओढणे, बैलगाडी ओढणे अशा प्रकारची शिक्षा देत असल्याची चित्रे पुराणात उपलब्ध आहेत. अशा प्रकारच्या शिक्षेमुळे कैद्यांना शिक्षा पण होते आणि सामाजिक उपयोगाची सरकारी व सार्वजनिक कामेदेखील होतात. या शिक्षेचा उद्देश एकच आहे की त्या गुन्हेगाराने पुन्हा तशा प्रकारचा गुन्हा करू नये.

भारतातील जेलची व्यवस्था पाश्चिमात्य पद्धतीनुसार आहे. ज्या वेळी भारतात जेल किंवा तुरुंग तयार झाले तेव्हा तत्कालीन परिस्थितीचा विचार झाला असेल. आत्ताची गुन्हेगारांची संख्या मात्र बेसुमार आहे, त्यांच्यासाठी तुरुंग कमी पडतील अशी अवस्था आहे. कधीकाळी सामाजिक स्थिती व घडणारे गुन्हे यांचे प्रमाण कमी होते, गुन्हे कमी घडत. पण सध्याची अफाट लोकसंख्या आणि सामाजिक समस्या पाहता, गुन्ह्यांचे प्रमाण वाढल्याने उपलब्ध तुरुंगव्यवस्था कैद्यांसाठी कशी पुरेल हे तज्ज्ञांनी सांगण्याची गरज नाही.

सध्या राज्यात जेलचे तीन प्रकार आहेत. खुले कारागृह, अंडासेल टाईप, लहान खोल्यांसह गोलाकार, यामध्ये सुरक्षा दृष्टीने उपाययोजना राबविणे सोयीस्कर पडते. पूर्वीच्या जेल व्यवस्थेतही वेळोवेळी बदल करण्यात आला आहे. सध्या कैदेत असलेली कैद्यांची संख्या कैक पटीने जास्त आहे. आजमितीस राज्यातील एकूण कैद्यांची संख्या कित्येक हजारांच्या घरात आहे. जसे रुग्णालयात वेगवेगळ्या आजाराचे रुग्ण असतात, तसे जेलमध्ये वेगवेगळ्या गुन्ह्यात पकडलेले गुन्हेगार असतात. त्यांच्यासाठी नेमलेली व्यवस्था प्रशिक्षित असते. या व्यवस्थेला

जास्त सतर्क राहावे लागते. ज्ञानाचा वापर आहेच, कधीकधी वेळ पडल्यास बळाचादेखील वापर करावा लागतो.

पुणे शहरात मध्यवर्ती भागात येरवडा भागात ऐतिहासिक जेल आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान स्वातंत्र्य सेनानींना तिथे ठेवले जायचे. त्यामुळे या जेलला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. एकोणिसाव्या शतकात या कारागृहाचे बांधकाम करण्यात आले. हे राज्यातील सर्वांत मोठे कारागृह असून तिथे सर्वाधिक कैदी ठेवण्यात येतात. गंभीर गुन्हा केलेल्या कैद्यांची संख्या जास्त असते. या कारागृहात फाशीच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यात येते.

याच येरवडा जेलमध्ये २६ जानेवारी २०२१ पासून 'कारागृह पर्यटन' सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही महत्त्वाकांक्षी योजना असून ती देशातील पहिलीच योजना आहे. या योजनेसाठी पुणे येथील येरवडा जेलची निवड झाली कारण ठाणे, पुणे व रत्नागिरी या ऐतिहासिक कारागृहांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात कितीतरी महान स्वातंत्र्यसेनानींना तुरुंगवास सोसावा लागला होता. महात्मा गांधी, लोकमान्य टिळक, मोतीलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस आदी नेत्यांनी या कारागृहात तुरुंगवास भोगला होता. सन १८९९ मध्ये महान क्रांतिकारक चापेकर बंधूंना याच येरवडा कारागृहात फाशी दिली होती. त्या थोर नेत्यांची, क्रांतिकारकांची, स्वातंत्र्यसेनानींची कारावासाची ठिकाणे 'स्मारक' म्हणून जतन करण्याची योजना अमलात आणली गेली आणि येरवडा तुरुंग हा 'कारागृह पर्यटन तुरुंग' म्हणून देशात ओळखला जाऊ लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात कारागृहातच 'पुणे करार' झाला होता. हा करार गांधी यार्डमधील ज्या आंब्याच्या झाडाखाली झाला होता, त्या झाडाची देखभाल करण्यात येते.

कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची अंमलबजावणी करण्यात हे जेल सुसज्ज आहे. राज्यातील कारागृहांची एकूण संख्या ६० असून सध्यातरी ४० हजारांच्या आसपास कैदीसंख्या आहे. कैद्याच्या जवळच्या नात्यातील व्यक्तीचे निधन झाले, लग्न समारंभ, आजारपण वगैरे या कारणाने आयुक्त कार्यालयातून पॅरोल मान्य करण्यात येतो, यासाठी कैद्याचा पोलीस ठाण्याचा अहवाल, जेलमधील त्याची वर्तणूक, ज्या कारणासाठी रजा पाहिजे, त्याबद्दल सविस्तर माहिती, कैद्याच्या नातेवाइकांचा अहवाल अशी माहिती आयुक्तांकडे सादर करून रजा मिळवली जाते. मात्र रजेवर गेल्यानंतर कैदी फरार होण्याचे प्रमाण वाढल्याने फर्लोची रजा देण्याचे




नियम खूपच कडक करण्यात आले आहेत. अंतर्रचना आणि व्यवस्था यात वेळोवेळी सुधारणा केल्या जात असून सर्वसाधारण सकाळी ०५.१५ ते रात्री ०९.३० ही कैद्यांसाठी कामाची वेळ असली तरी प्रत्यक्ष अवधी ते १०.४५ आणि ते ०४.१५ असा केला जात आहे.

सध्याची लोकसंख्या गुन्हेगारी बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. गुन्ह्यांची संख्या, गुन्हे प्रकारही वाढले आहेत. त्यामुळे जेल व्यवस्था व व्यवस्थापन ही सध्या असलेली सुविधा अपुरी पडत आहे. न्यायालयातील संपूर्ण कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर आणि न्यायालयात गुन्हा सिद्ध झाल्यानंतर पुढील शिक्षा उपभोगण्यास ज्या यंत्रणेकडे गुन्हेगारांना सोपवण्यात येते ती कार्यरत यंत्रणा म्हणजे जेल. संपूर्ण दिलेली शिक्षा याच विभागात उपभोगली जाते. फक्त जर




येरवडा मध्यवर्ती कारागृह येथे दि. २४/०९/१९३२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचेमध्ये ऐतिहासिक पुणे करार झालेचे ठिकाण



गुन्हेगाराच्या वर्तणुकीत सुधारणा झाली असे दिसून आल्यास त्याचीही पडताळणी करून त्याची शिक्षा कमी होऊन त्याचा सुटण्याचा कालावधी कमी होऊ शकतो. कैद्यांनी गुन्हेगारी मार्ग सोडून सन्मार्गावर यावे असे प्रशासनाचे सतत प्रयत्न असतात. यासाठी कितीतरी सामाजिक संस्था, सामाजिक कार्यकर्ते वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्नशील असतात.

सर्वसाधारणपणे कैद्यांची वर्गवारी पाहता गंभीर गुन्हा केलेला कैदी, साध्या गुन्ह्यातील कैदी, नेहमी गुन्हा करणारे कैदी असे तीन प्रकार मोडतात. जेलमध्ये आल्यानंतर कैद्यांच्यात वर्गीकरण करण्यात येते. त्याप्रमाणे त्यांना वेगवेगळे ठेवण्यात येते. कोणत्याही प्रकारे कैद्यांना एकत्रित ठेवले जात नाही. कैद्यांवर स्वतंत्रपणे लक्ष ठेवले जाते. तेथील काम करणारे अधिकारी / कर्मचारी यांनी खास प्रशिक्षण घेतलेले असते. पोलीस शिपायांचा सतत पहारा असतो. कैद्यांकडून विविध प्रकारची कामे करून घेण्यात येतात. ज्यांना शेतीच्या कामाचा अनुभव असतो अशांना शेतीविषयक कामे दिली जातात. सुतारकाम, विणकाम इत्यादी कामे त्यांच्यामार्फत पार पाडली जातात. जास्त काळ शिक्षा झालेले कैदी तुरुंगात रुळतात. हे कैदी त्यांना दिलेली जबाबदारीची कामे पार पाडतात. एखादा कैदी नुकताच आलेला असल्यास त्याची मन:स्थिती बरोबर नसते. गुन्हेगारीमुळे मन:स्थिती बिघडलेली असल्यामुळे तो कैदी जेवण वगैरे घेण्यास नकार देतो. त्याला येथील सुविधा मान्य नसतात. कैद्यांमध्ये भांडणेही होतात. अशा बऱ्याच अडचणी उद्‌भवतात. अशा कैद्यांना जास्त जपण्यात येते.

कितीतरी जेलमध्ये आता अभ्यास करण्यासाठी, परीक्षा देण्यासाठी, वाचनालयांची वगैरे व्यवस्था केली जात आहे. शिवाय त्यांच्याकडून सामाजिक कार्यासाठी, लघुउद्योगासाठी कामकाजाची व्यवस्था केली जाते. कित्येक कैद्यांच्या कलागुणांना जाणून कामे करून घेतली जातात. जेलमधील कैद्यांमध्ये सामाजिक परिवर्तन होऊन त्यांनी गुन्हेगारी मार्ग सोडून मुख्य सामाजिक प्रवाहात सामील व्हावे, यासाठी तुरुंग प्रशासनातर्फे विविध उपक्रम राबवले जातात. परंतु काही कैद्यांमध्ये सुधारणा होत नाहीत. ते पुन्हा पुन्हा गुन्हा करतात आणि आपला मार्ग सोडत नाहीत. अंगमेहनतीचे जास्तीत जास्त कष्टदायक काम देणे, वळणावर आणणे, समजावून सांगणे, समुपदेशन करणे वगैरे तुरुंग प्रशासन करतच असते. गुन्हेगार किंवा कैदी हा जेलचा कधीच शत्रू नसतो. त्याला न्यायालयाने दिलेल्या शिक्षेचे पालन करून त्याचा शिक्षा कालावधी पूर्ण करणे हा त्या जेलचा पहिला उद्देश असतो. त्यानंतर जेलच्या नियमाप्रमाणे त्यास सुधारणा करण्यास संधी उपलब्ध करून दिली जाते, त्याच्या वर्तणुकीकडे, सुधारणांकडे लक्ष दिले जाते.

कुठलीही व्यक्ती जन्मतःच गुन्हेगार नसते. परिस्थिती त्याला गुन्हे करायला प्रवृत्त करते. गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता, अन्याय, बेकारी, अपमान, कळत-नकळत झालेल्या चुका, स्वभाव, राग, वैर, ईर्षा, तेढ, स्वार्थ, बदला, पैशाची हाव, चटक, चोरीची सवय, गर्व, हाणामारीची आवड, निर्ढवलेपण, बेफिकिरी, बेकायदेशीर कृती करण्याची वृत्ती, दागिने किंवा गाड्या चोरून हौसमौज करण्याची वृत्ती, गुर्मी अशा कितीतरी गोष्टी गुन्हे करण्यासाठी प्रवृत्त करत असतात.

सरकारी नियम पाळून गुन्हेगाराला मुख्य सामाजिक प्रवाहात सामील करणे हेदेखील सामाजिक काम आहे. हे योग्य रीतीने पार पाडल्यास गुन्हेगारांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. आपल्या जुन्या लोकांचे कायद्याबाबत मत होते की, एखादा अपराधी कायद्यातून शिक्षेअभावी सुटला तरी चालेल परंतु निरपराध्याला शिक्षा व्हायला नको. तेव्हापासून जुनी सामाजिक व्यवस्था सुदृढ होती. ज्याने सामाजिक अपराध केला असेल त्याने शिक्षा पूर्ण उपभोगली पाहिजेच, परंतु जे झालेल्या चुकीबद्दल पश्चाताप करतात त्यांच्याबद्दल सहानुभूती नक्कीच दाखवली जावी. कारण, अशा गुन्हेगारांच्या वागणुकीत सुधारणा दिसते.

प्रशासनाने त्यासाठी विविध योजना आखल्या आहेत. तुरुंगात आता कैद्यांना डांबण्याची व्यवस्था न राहता, सुधारणांची व्यवस्था वाटावी, अशा प्रकारचे कार्य सुरू झाले आहे. नवी मुंबईतील जेलमध्ये कैद्यांसाठी एका संस्थेने निबंध स्पर्धेचे आयोजन केले होते. कैद्यांनी स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली. ज्या कैद्यांना स्पर्धेत बक्षिसे मिळाली त्यांनी ती बक्षिसांची रक्कम ही पुलवामा घटनेत हुतात्मा झालेल्या जवानांच्या कुटुंबातील लोकांना देणगी म्हणून पाठवून दिली. हा किती मोठा आदर्श आहे! अशा स्वरूपाची एखादी घटनादेखील यंत्रणा सुधारण्यास महत्त्वाच्या असतात.

म्हणूनच येरवडा तुरुंगाने सुरू केलेली कारागृह पर्यटन योजना ही नक्कीच महत्त्वाकांक्षी आणि उच्च सामाजिक मूल्यांचे भान राखून आखल्याचे दिसते. अशा उपक्रमांना जनतेने प्रोत्साहन दिले पाहिजे. कारण, त्यामुळेच राज्यातील कैद्यांची, गुन्ह्यांची आणि नकारात्मक घटनांची संख्या कमी होईल. ज्या दिवशी कैद्यांअभावी तुरुंग ओस पडतील आणि ज्या दिवशी रुग्णांवाचून रुग्णालये रिकामी होतील, तो दिवस सर्वांत आनंदाचा आणि समाधानाचा दिवस असेल!

■


देसी खाना, देसी स्टाईल
Vishnuji
विष्णुजी की रसोई
नागपूर, पुणे, लातूर, USA
9823268695
9373100891
9370327557
Morning Lunch: 12.30 to 3.00 PM
Dinner : 7.00 PM to 10.30 PM
RotiShoti aur KABAB
Vishnuji
UNLIMITED BUFFET WITH UNLIMITED
BARBEQUE
• 10 + Veg Starters • 3 Sweets • 2 Ice Creams
• Pastas and Punjabi Dishes
Next to Vishnuji Ki Rasoi, Mhatre Bridge, D.P. Road, Erandwane, Pune.
Contact - 9823268695 I www.vishnujikirasoi.com
सोमवार, बुधवार, शुक्रवार, शनिवार, रविवार
सकाळी ११.०० वा. नविन रेसीपी सह
MASTEeR RECIPES
food culture. Enjoy the authentic traditional recipes
of the world cooked with traditional as well as modern methods.
YouTube

# 'चांगुलपणाची चळवळ' दिवाळी अंकांच्या प्रकाशन समारंभाची क्षणचित्रे




'वुई पुणेकर' या संस्थेच्या वतीने दिनांक १२ नोव्हेंबर २०२० रोजी पत्रकार भवन नवी पेठ, पुणे येथे चांगुलपणाच्या चळवळीच्या पहिल्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले.





तत्कालिन मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या हस्ते मुंबई येथे व 'आडकर फाऊंडेशन' यांच्या वतीने पुणे येथे चांगुलपणाच्या चळवळीच्या दुसऱ्या दिवाळी अंकाचे प्रकाशन झाले.





मा. शरदचंद्रजी पवार साहेब आणि मा. केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी यांनी 'चांगुळपणाची चळवळ' च्या दिवाळी अंकाचे कौतुक केले.



'चांगुळपणाची चळवळ' च्या दिवाळी अंकास मिळालेला पुरस्कार स्वीकारताना संपादिका शुभांगी मुळे










'चांगुळपणाची चळवळ' च्या मागील दोन्ही वर्षांच्या दिवाळी अंकांना विविध पारितोषिकांनी सन्मानीत करण्यात आले आहे.

# २०१९ पासून चांगुलपणाच्या चळवळीअंतर्गत डॉ. ज्ञानेश्वर मुळे फाउंडेशन व इतर अनेक सहयोगी संस्थांमार्फत केलेले सामाजिक कार्य

१) २०१९ सालच्या पुरावेळी तीन गावांमध्ये महिलांसाठी ५०० साड्यांची मदत.

२) लॉकडाऊनमध्ये पोलीस, डॉक्टर व पेशंट यांच्यासाठी अंदाजे १ लाख कप कॉफीची सोय.

३) जिल्हाधिकारी, प्रांत व आयुक्त या कार्यालयांमध्ये १७५ पी.पी.ई. किटचे वाटप.

४) कोल्हापूर महानगरपालिका, हॉस्टेल, दवाखाने, रस्त्यावर अडकलेले प्रवासी यांच्यासाठी ७००० मास्कची मदत.

५) बस्तवाडमध्ये महिलांसाठी लघुउद्योगाचे प्रशिक्षण करणेसाठी बिस्किट बनविण्याचे मशिन दिले.

६) निलेवाडीमध्ये १८० मुलांचे ड्रायव्हिंग लायसन्सची पूर्तता करून दिली.

७) लॉकडाऊनमध्ये अडकलेल्या १४५ परप्रांतीय कामगारांची ४० दिवस राहण्याची व जेवण्याची सोय व मास्क, सॅनिटायझर वाटप.

८) पुरामध्ये अडकलेल्या २०० माणसांची सात दिवस राहण्याची व जेवणाची सोय.

९) ५०० पोलीस कर्मचाऱ्यांची टप्प्या-टप्प्यांमध्ये क्वारंटाइनसाठी राहण्यासाठी सोय.

१०) शेतकऱ्यांना मदतीचा हात म्हणून सेंद्रीय खताचे वाटप.

११) लॉकडाऊनमध्ये कोल्हापूर व इतरत्र भाजी-पाल्याचा घरपोच पुरवठा.

१२) स्पर्धा परीक्षा व पोलीस परीक्षेसाठी रेंदाळमध्ये विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन शिबिर.

१३) रेंदाळ ग्रंथालयात पुस्तकांची मदत.

१४) मुंबईमध्ये ३५ विद्यार्थ्यांना परदेशी नोकरी मिळण्याची संधी प्राप्त करण्याचे मार्गदर्शन शिबिर व त्यासाठी राहणे, जेवणाची व प्रवासाची सोय.

१५) बस्तवाड व निलेवाडीमध्ये ८०० कुटुंबांना दहा दिवस पुरण्याएवढे धान्य वाटप.

१६) पुण्यामध्ये गायीचे शेण व गोमूत्राचे उपयोग व व्यवसाय प्रदर्शनासाठी दोन गावांतील लोकांचा प्रवास खर्च.

१७) रेंदाळमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र व अभ्यासिका निवासांची सोय.

१८) कोल्हापूर व रेंदाळमध्ये सौ. प्रतिभा शिंगारे यांच्या पुढाकाराने हेल्मेट वाटप.

१९) CYDA कडून बस्तवाडमध्ये ११ जनावरांची मदत.

२०) निलेवाडी व बस्तवाड शाळेमध्ये स्वच्छता मोहीम.

२१) कोल्हापूर व कराडमध्ये रिमांड होमच्या मुलांसाठी कपड्यांची मदत.

२२) रेंदाळमधील जिल्हा परिषद शाळेमध्ये सौ. प्रतिभा शिंगारे यांच्या पुढाकाराने प्रोजेक्टर व पंख्यांची मदत.

२३) विधवांसाठी मेळावा व महिला सबलीकरणासाठी मेळावा.

२४) नेल-फ्री ट्री म्हणजेच खिळेमुक्त झाडाचे अभियानमध्ये पुढाकार.

२५) लॉकडाऊनमध्ये भटक्या कुत्र्यांना खाण्यासाठी अन्नपुरवठा.

२६) पुरामुळे घरे पडलेल्या लोकांना सिमेंट व घरे दुरुस्तीची मदत.

२७) प्रामाणिक गरजू कुस्तीपटूंना प्रवास व खुराकसाठी अनेकदा मदत.

२८) निलेवाडीमध्ये आलेल्या पुरामध्ये बोटीने लोकांपर्यंत पिण्याचे पाणी पोहचविण्याची मदत.

२९) दिवाळीमध्ये १५० कुटुंबांना श्री. अनिल नानिवडेकर यांच्या पुढाकाराने फराळाचे वाटप.

३०) निलेवाडीच्या लोकांसाठी भांडी, कपडे, धान्य, चहा पूड, किराणाचे सामान, इ. ची मदत.

३१) जमिनीखालील पाण्याची पातळी वाढविण्यासाठी मोठ्या आकाराचे शोषखड्डे तयार केले ज्यामध्ये दरवर्षी अंदाजे १० कोटी लिटर पाणी जमिनीमध्ये मुरते.

३२) झोपडपट्टीमध्ये स्क्रिनिंग टेस्ट व औषधांचे वाटप.

३३) ४० लोकांचे रक्तदान शिबिर.

३४) ८० विद्यार्थ्यांची फाउंडेशन मार्फत एक वर्षांची शाळेची फीची मदत.

३५) निलेवाडी विद्यामंदिरमधील तीन शिक्षिकांचे फाउंडेशन मार्फत १२ महिन्यांच्या पगाराची मदत.

३६) अंदाजे ८० एकर जमीन विना मोबदला ट्रॅक्टरने नांगरून कसण्यासाठी दिली.

३७) काही शेतकऱ्यांच्या जमिनीला मोफत खत पुरवठा केला.

३८) कोव्हिड सेंटरसाठी विना मोबदला हॉस्टेल व फर्निचर वापरण्यासाठीची सोय.

३९) क्वारंटाइन झालेल्या लोकांसाठी सॅनिटायजरचे वाटप.

४०) जीवामृत (जैविक खत) करणेसाठी कुटुंबाना बॅरल व कॅन दिले.

४१) शेणी, शेणापासून वीट, गोधडी, खेळणी, पर्स, इ. वस्तु बनविण्याचे प्रशिक्षण व ते खरेदी करून रोजगार निर्मितीसाठी प्रोत्साहन दिले.

४२) कोल्हापूर प्रदर्शनामध्ये गावातील महिलांनी केलेल्या वस्तू विक्रीसाठी स्टॉलचे भाडे दिले. व त्यांच्या मालाची (बस्तवाड ते कोल्हापूर) ने-आण मोफत करून दिली.

४३) बस्तवाडच्या लोकांना कोल्हापूरमध्ये भाजीपाला विक्रीसाठी मदत.

४४) अंबप खिळाडू वृत्ती जागी राहावी यासाठी सामन्यांमध्ये बक्षीस देणगी स्वरूपात दिले.

४५) जैविक वनस्पतीपासून रोजगार निर्मिती मार्गदर्शन शिबिर व सात विद्यार्थ्यांना साहित्य पुरवठा.

४६) निबंध स्पर्धा भरविल्या व विद्यार्थ्यांना बक्षीस दिले.

४७) २० मुलांना तीन दिवसांचे फ्लड रेस्क्यू ट्रेनिंग दिले.

४८) निलेवाडीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा सार्वजनिक पुतळा बांधकामासाठी सिमेंटची देणगी.

४९) पडलेल्या घरासाठी खडी व वाळूची मदत.

५०) वादळामध्ये फाटून गेलेले शिरोलीमधील ग्रीनहाऊस दुरुस्त करणेसाठी तात्पुरती मदत.

५१) पुरात नुकसान झालेल्या हॉटेल इमारत उभारणीसाठी तात्पुरती मदत.

**कार्यालय :** २०२/३, अथर्व प्लाझा, ताराराणी पुतळ्याजवळ, कावळा नाका, कोल्हापूर. ४१६००३.
संपर्क : ९८२२०९०९०३, ८८८८५६३५५५
E-mail : dnyaneshwarmulayfoundation@gmail.com






अधिक माहितीसाठी बँकेच्या जवळच्या शाखेस भेट द्या.

# ORION
ADVERTISERS

**OUT OF HOME MEDIA SOLUTIONS**
**OWNERS OF MEDIA PROPERTIES**
**HOARDINGS / NEON SIGNS**

WITH BEST WISHES
FROM

## *Atul Ashar*

FOUNDER & CEO

1220, 12th Floor, Maker Chambers V, Nariman Point, Mumbai 400 021, India.
+91-22-22021312, 22021314, 22021315  9820915992
info@orionadvertisers.com